सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी. : भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या

मु.शी : भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, विनोद तावडे, दीपक सावंत, शरद पाटील, कपिल पाटील, जयंत पाटील, जोगेंद्र कवाडे, रमेश निकोसे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे चालू)

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी त्यांचे अपूर्ण राहिलेले भाषण पुढे सुरु करावे.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, काल अल्पकालीन चर्चेच्या प्रस्तावावर बोलत असतांना शेवटी मी एका वाक्याचा उल्लेख केला होता. ते वाक्य होते "ज्याचे दुखते त्याला कळते." याठिक्राणी "ज्याचे दुखणे आणि त्याला ते कळणे" या वाक्याचा अर्थबोध झालेला नाही असे मी गृहीत धरते. दलितांचे प्रश्न आणि महिलांचे, मागासवर्गीयांचे, अल्पसंख्यांकांचे प्रश्न हे कधीही दलितांचे, महिलांचे, अल्पसख्यांकांचे, मागासवर्गीयांचे नसतात असे शाहू महाराज सांगून गेले. म्हणून घडणारी प्रत्येक घटना दलिताची असते असे मानून चालणार नाही. त्या समाजाचे प्रश्न हे सामाजिक प्रश्न आहेत. आणि त्या प्रश्नासंबंधी समाजाची तेवढीच जबाबदारी आहे, प्रश्न निर्माण करणाऱ्यांची जबाबदारी आहे. राजकारणामध्ये वावरणाऱ्या, सत्तास्थानावर बसणाऱ्यांची हे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी नसते. राजकारण करीत असतांना समाजकारण केले पाहिजे हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. या सभागृहामध्ये आदरणीय प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या भाषणाने ही चर्चा सुरु झाली. मला यानिमित्ताने एका गोष्टीची आठवण करुन द्यावयाची आहे की, कोणत्याही दलित महिलेच्या प्रश्नावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे....

आपण राजकारण करु नये या माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या वाक्याला माझा पाठिंबा आहे. या सभागृहामध्ये दिनांक 16 जुलै 2003 रोजी माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्यामध्ये दलितांच्या प्रश्नावर चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या संदर्भात माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी कार्यवाहीच्या पृष्ठ क्रमांक 129 व 130 वर एक विधान केले होते, त्यातील दोन ओळी मी आपणास वाचून दाखविते. "नाहीतरी उथळ पाण्याला खळखळाट फार असतो, दलितांवरील अत्याचाराच्या बाबतीत हे आपले प्रेम राजकारणापोटी, सत्ताकारणासाठी तर नाही ना? या गोष्टी जोवर आपण नीटपणे तपासत नाही तोपर्यंत सत्ताकारणात राजकारणाच्या माध्यमातून दलितांवर होणारे अत्याचार कदापिही थांबणार नाहीत". आणि म्हणून माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या भाषणातील वाक्याला मी पूर्णपणे पाठिंबा देते. कोणतेही समाजकारण, राजकारण करीत असतांना दलितांचे प्रश्न सोडवीत असतांना शाहू महाराजांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे अभिप्रेत होते त्याप्रमाणे देशाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये सम पातळीवर दलित समाजाचा देखील सहभाग असला पाहिजे. देशाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये दलित समाजाला आणतांना माझ्या या चळवळीचा आणि वक्तव्याचा काही फायदा होईल, अशाप्रकारचा विधायक दृष्टीकोन ठेवून ही चर्चा होणार असेल तर या चर्चेचा आपण आदर आणि सन्मान केला पाहिजे. म्हणून 16 जुलै 2003 च्या माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या वाक्याचा मी आदर करते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरू...

मला एका बाबीच्या संबंधाने सभागृहामध्ये भावना व्यक्त करावयाच्या आहेत. ही बाब अशी आहे की, दिनांक 12-12-1972 रोजी नियम 185 अन्वये एका प्रस्तावावर चर्चा झालेली होती. त्या चर्चेमध्ये त्यावेळचे सन्माननीय सदस्य श्री.दत्ता ताम्हणे यांनी श्री.राजा ढाले यांच्याबद्दल प्रक्षोभक विधाने केली होती. श्री.दत्ता ताम्हणे असे म्हणाले होते की, "राजा ढाले ही व्यक्ती नाही किंवा दलीत पँथर ही संस्था नाही. तर सामाजिक विषमतेमुळे निर्माण झालेल्या तणावाची ती प्रतिक्रिया आहे. राजा ढाले यानी काढलेले उद्गार किंवा दलित पँथरच्या सभासदांचे बोलणे हे लोकशाहीला आव्हान आहे व ते आपण स्वीकारणार आहोत किंवा नाही, हा खरा प्रश्न आहे." या ठिकाणी आजही मला असे वाटते की, काही अंशी अशा प्रकारचा पश्न निर्माण झालेला आहे. ज्या महाराष्ट्रामध्ये दलित संघटना, दलितांचे नेते आमचे सहकारी माननीय श्री.प्रितमकुमार शेगांवकर असोत, किवा आपण असू. हा प्रश्न ज्या पध्दतीने मांडत आहोत, त्यामध्ये जी तीव्रता आहे, त्या तीव्रतेविषयी राग, लोभ हा राजकीय स्वरुपामध्ये व्यक्त करु नये, असे मी आवाहन करते. ज्या पध्दतीने हा राग व्यक्त होत आहे, तो हजारो वर्षाची परंपरा, त्यामध्ये असलेल्या रूढी, परंपरा, माणसामाणसांनी निर्माण केलेला वर्षानुवर्षाचा राग यामधून व्यक्त होत आहे. अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रमध्ये कोणत्याही रागीट प्रतिक्रिया न देता, सन्मानाने तो व्यक्त केला पाहिजे. हे लोकशाहीला आव्हान आहे, हे आव्हान पेलले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये दलितांच्या प्रश्नांविषयी बऱ्याच वेळा चर्चा झालेल्या आहेत. ज्यावेळेला मराठवाडा विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर करण्यात आले. त्या विरूध्द मराठवाड्यामध्ये चळवळ झाली, तो इतिहास आपल्याला विसरता येणार नाही. त्या पार्श्वभूमीवर पागे समिती स्थापन झाली. त्यांच्या शिफारशी आज मंजूर झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये वाचली. त्यावेळेस ज्या चर्चा झाल्या, त्याचे विस्मरण करुन चालणार नाही. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले, त्याला विरोध करणारी शक्ती आज काय करत आहे ? याचाही आज आपण विचार केला पाहिजे. दलितांच्या चळवळीला योग्य दिशा देणे, दलितांची चळवळ सक्षमीकरण करणे, दलितांचा विकास प्रक्रियेमध्ये सहभाग, त्यांचा आत्मसन्मान टिकविणे, या गोष्टी केल्या पाहिजेत, याविषयी कोणाच्या मनामध्ये शंका असण्याचे कारण नाही. माननीय शरदराव पवार साहेबांनी जो अंगुली निर्देश केलेला होता की, "सत्ताधिशांना दलितांच्या अस्मितेला मारुन सत्ता टिकविता येणार नाही, सत्ता गेली तरी चालेल. डॉ.बाबासाहेब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरू.....

आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला आपल्याला द्यावेच लागेल." त्याचप्रमाणे सन्माननीय श्री.रा.सु.गवई पासून आपण सर्वांनी हेच मान्य केलेले आहे. स्त्रियांचे आरक्षण असेल, स्त्रियांवरील अत्याचार असतील याबाबतीत सभागृहाने जरूर संयमी भूमिका घेणे गरजेचे आहे. एका गोष्टीचा मला उल्लेख करावयाचा आहे की,समाजप्रवृत्ती विषयची चळवळ कायमची कशी पुढे नेणार आहात, हा खरा प्रश्न आहे. एकमेकांच्या राजकीय चुका काढून, कायदा करून चळवळ पुढे जाईल काय ? 1994 मध्ये महाराष्ट्रामध्ये महिलाविषयक धोरण जाहीर झाले त्यावेळच्या प्रास्ताविकामध्ये माननीय शरद पवार साहेबांनी एका गोष्टीचा उल्लेख केलेला आहे की," महिलांविषयी कल्याणकारी कायदे करणे, स्त्री मुक्तीची कायदे करणे ही जबाबदारी आहे, तरीसुध्दा कायद्याची अंमलबजावणी करण्याची लोकांची मानसिकता आहे काय ? ही मानसिकता बदलण्याचे काम, सभागृहात व सभागृहाबाहेर करावे लागेल." अशी भूमिका शरद पवार साहेबांनी व्यक्त केलेली आहे.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी थोडा वेळ द्यावा.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : ही चर्चा आपल्याला 11.45 वाजता संपवावयाची आहे. 11.15 वाजता सन्माननीय उपमुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहतील. ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्या प्रत्येक सदस्याला संधी दिली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जरुर बोलावे परंतु ...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आमच्या पक्षाच्या सदस्यांनी नावे आहेत. आपण सन्माननीय सदस्यांना वेळ द्यावा.

उपसभापती : आपल्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची नावे कमी करावयाची आहेत काय ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : नावे कमी करु नका परंतु त्यांना थोडासा जास्त न्याय द्यावा.

श्री. रमेश निकासे : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणाबाबत आणि दलितांवरील अन्याय अत्याचाराबाबत या ठिकाणी जी चर्चा सुरु आहे त्यामध्ये वेळेची कपात करु नका. विशेषत: माझ्या भाषणात अजिबात वेळेची कपात करु नका. आपण माझे नाव शेवटी टाकलेले आहे.

उपसभापती : आपले नाव मी शेवटी टाकलेले नाही. माझ्याकडे खालून नावे येतात.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, दि. 26.11.1949 रोजी भारतीय संविधान लोकार्पण केले गेले. 25.11.1949 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान परिषदेच्या कार्यक्रमाचा समारोप केला त्या समारोपाच्या भाषणामध्ये दोन ओळींचा उल्लेख झाला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, " आपल्या आत्मप्रतिष्ठेचा बळी देऊन कोणीही माणूस कृतज्ञ राहू शकत नाही. आपल्या शीलाचा बळी देऊन कोणीही माणूस कृतज्ञ राहू शकत नाही. राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिले. हे करताना 1949 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे वाटत होते ते करावे. आज जर आपल्याला असे वाटत असेल की, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे, अशा प्रकारे शिलाचा बळी दिला जात असेल, आत्मसन्मान चिरडला जात असेल तर त्याबाबतीत आपल्याला निश्चितपणे लक्ष घालावे लागेल. या सभागृहातील सुध्दा काही संदर्भ आहेत. मी हे सदंर्भ यासाठी दिले की, ज्यावेळी एखादी नवीन घटना घडते त्यावेळी जुन्या पार्श्वभूमीमध्ये आपण काय केलेले आहे, काय बोललेले आहे आणि पुढे काय करण्याची आवश्यकता आहे याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे "बोल अमृताचे" यामध्ये एक उल्लेख केलेला आहे. आज मागासवर्गीय समाजाला एक मत देण्याचा अधिकार मिळालेला आहे परंतु त्यांच्या अस्तित्वाला लोकशाहीमध्ये अभिप्रेत असलेले सामाजिक समतेचे मूल्य मिळावयास पाहिजे ते देण्यामध्ये आपण कमी पडलो काय याचा विचार व्हावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्रीमती उषाताई दराडे ....

राजकारणात आपण "एक माणूस एक मत आणि एम मत एक मूल्य" हा सिध्दांत मान्य करणार की नाही हा प्रश्न त्यावेळी विचारला गेला आणि आजही विचारला जातो. सभापती महोदय मी जास्त वेळ घेणार नाही. आणखी पुष्कळ सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. मला एकच बाब सांगावयाची आहे. सातत्याने राजकारण करीत असताना सातत्याने समाजाचे प्रश्न सोडविण्याची भावना मनामध्ये ठेऊन आपण प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत वक्तव्य केले पाहिजे. ज्या राज्याने मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली, ज्या राज्यामध्ये त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्तीचा सन्मान केला आणि त्या शिफारशी स्वीकारण्याचे धाडस केले, ज्या राज्याने महिलांसाठी अनेक कायदे केले, अनेक कल्याणकारी योजना केल्या, ज्या राज्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भीमशक्तीचा नेहमी सन्मान केला आणि ही भीमशक्ती चुकीच्या मार्गाने जाणार नाही याचा विचार केला त्या राज्यामध्ये असे प्रश्न निर्माण होत आहेत. मनूवादी प्रवृत्ती या चळवळीला आपल्या हातामध्ये घेण्याचा प्रयत्न मागच्या दाराने करीत नाही ना ? असा प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ही चळवळ कोण चालविणार ? कोणाच्या खांद्यावर बंदूक ठेवणार ? मराठवाडा विद्यापीठाच्या नाम विस्ताराच्या वेळी ज्यांची घरे जळाली ते गरीब दलित होते आणि जे जाळावयास निघाले ते गरीब शेतकऱ्यांची मुले होती. यामध्ये गरीब माणसांचाच बळी जातो. ज्या विचाराचे लोक हे घडवून आणतात ती माणसे या समाजामध्ये ही चळवळ चालू नये म्हणून असा बुध्दिभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. हा धोका आपण ओळखला पाहिजे. चातुर्वर्ण्य व्यवस्था समाजातून जाऊ द्यावयास नको हा हेका धरणारी माणसे या दलित अस्मितेच्या प्रश्नाच्या बाबतीत चुकीची भूमिका घेत असतील आणि त्याला वेगळी गती देण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्याबाबत सभागृहाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. पागे समितीच्या ज्या शिफारशी आहेत त्याचा सन्मान करावा. दलितांना देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये समान पातळीवर आणण्याचा प्रश्न हा माझा, तुमचा किंवा एकट्या सभागृहाचा प्रश्न नसून हा प्रश्न देशातील प्रत्येक नागरिकाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न सर्वांचा आहे. त्याचा आपण आदर केला पाहिजे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे...

आणि हा प्रश्न स्वत:चा म्हणून सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राजकारणासाठी राजकारण न करता समाजकारणासाठी राजकारण केले पाहिजे. म्हणून मी शेवटी कवियित्री बहिणाबाईंच्या कवितेतील एक ओळ उद्धृत करते. "माणसा माणसा कधी होशील माणूस" हा जो प्रश्न बहिणाबाईंना पडलेला आहे तो प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारावा. जगण्या-मरण्यामध्ये फक्त दोन श्वासांचे अंतर असते. म्हणून आपण कुणाचे तरी दु:ख दूर करण्यासाठी जगणार आहोत की नाही ? असा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. कबीरांनी असे सांगितलेले आहे की,

"शबद् शबद् सबहु कहें, शबद् के हाथ न पांव,
एक शबद् अवषुध करे, एक शबद् करे घाव."

प्रत्येक शब्द जपून वापरला गेला पाहिजे. दलितांच्या सन्मानाचे मुडदे पाडणारे शब्द कुणी वापरु नयेत. दलितांचा प्रश्न हा माझा प्रश्न समजून आणि घडलेल्या घटनांचा निषेध तीव्र निषेध करुन मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महात्मा गांधी ने कहा है :

"जात-पात पूछे नहिं कोई, हरि को भजे सो हरि को होई."

सभापती महोदय, महात्मा गांधींनी हरिजन सेवक संघ नावाची संस्था काढली आणि जातीभेद मिटविण्याचा प्रयत्न केला. दलितांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांना हक्क मिळाले पाहिजेत म्हणून संघर्ष केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ मिळविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यवीर बॅ.विनायक दामोदर सावरकर यांनी सहभोजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात केली. छत्रपती शाहू महाराजांनी रिझर्व्हेशन जाहीर केले, हरिजनांसाठी देवळे उघडी केली. माझे सहकारी सदस्य श्री. धनाजी साठे यांनी देखील मला सांगितले की, त्या काळात त्यांच्या वडिलांनी हरिजनांसाठी विहीर उघडी करुन दिली होती. या महाराष्ट्राचा देव, पंढरीचा विठोबा. संत ज्ञानेश्वरांना समाधी घ्यावी लागली की आत्महत्या करावी लागली हा एक संशोधनाचा विषय आहे. भिंत बांधत असताना चोखोबाला चेंगरुन टाकण्यात आले. त्यानंतरही या महाराष्ट्रामध्ये क्रौर्य सुरुच आहे. खैरलांजीमध्ये झालेले हत्याकांड ही अत्यंत शरमेची आणि लाजीरवाणी गोष्ट आहे. खैरलांजी प्रकरणासंबंधी वर्तमानपत्रामध्ये बातम्या छापून आलेल्या आहेत. त्यातील काही बातम्यांचा उल्ल्ेख मी करु इच्छितो. एका वृत्तापत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, "खैरलांजी हत्याकांड", शुक्रवार, दिनांक 29.9.2006, - राजकीय नेत्यांच्या संगनमताने श्री. भैयालाल भोतमांगे यांच्या परिवारातील 4 जणांची निष्ठूर व अमानुषपणे हत्या - मौजे खैरलांजी येथे 3 सप्टेंबर 2006 रोजी श्री. भैयालाल भोतमांगे यांचे नातलग व जवळीक असलेले श्री सिध्दार्थ पाटील, राहाणार दुसाळा यांना खैरलांजी निवासी श्री. गोपाळ सुकरु बिजेवार व इतर 11 लोकांनी जबर मारहाण व प्राणघातक हल्ला केला. त्या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार श्री. भैयालाल भोतमांगे यांची पत्नी श्रीमती सुरेखा भोतमांगे व मुलगी पियंका भोतमांगे होत्या. या मारहाण प्रकरणी दिनांक 16 सप्टेंबर 2006 रोजी श्री. सिध्दार्थ गजभिये यांनी आंधळगाव पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविला. त्यामुळे खैरलांजी येथील श्री. गोपाळ सुकरु बिजेवार व इतर 11 नागरिकांना दिनांक 28.9.2006 रोजी अटक करण्यात आली. या प्रकरणी आंधळगाव पोलिसांनी सिध्दार्थ गजभिये मारहाण प्रकरणी सुरेखा व प्रियंका भोतमागे परिवारातील दोघींचे बयान नोदविले होते. यावरुनच खैरलांजी हत्याकांड झाले. शुक्रवार, दिनांक 29.9.2006 रोजी दुपारी सर्व 12 आरोपींची जामिनावर सुटका

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाली व प्रकरण चिघळले. खैरेलांजी येथील सवर्ण भोतमांगे परिवारावर धावून गेले. शुक्रवार दिनांक 29.9.2006 रोजी खैरेलांजीतील शेकडो सवर्णांनी श्री. भैयालाल भोतमांगे या टोलीवर राहाणा-या एकट्या परिवाराला सामूहिक लक्ष्य केले व खुनी हल्ला केला."

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

श्री.रमेश निकोसे.....

श्री.भैयालाल भोतमांगे यांची मुलगी कु.प्रियांका, वय वर्षे 17 हिने लोक हातात लाठ्याकाठ्या घेऊन येताना पाहिले व आपल्या वडिलांस बाहेर पळून जाण्यास सांगितले. लगेच भैयालाल भोतमांगे घराच्या मागून शेतातून परगावी निघून गेले. घरात चार लोक होते. सौ.सुरेखा भोतमांगे, वय वर्षे 46, मुलगा सुधीर भोतमांगे, वय वर्षे 23, मुलगा रोशन भोतमांगे, वय वर्षे 21 व कु.प्रियांका, वय 18 वर्षे हे चारजण घरात होते. वरील सर्वजणांना दिनांक 29.9.06 रोजी सवर्णांनी केलेल्या सामुहिक हल्ल्यामध्ये अमानुषपणे ठार करण्यात आले. भैयालाल भोतमांगे एकटाच दुर्दैवी, अभागी व जीवंत. कारण तो परगावी निघून गेला होता. अमानुषपणाची निर्भत्सना करावी तेवढी थोडीच आहे. भोतमांगे परिवाराला धडा शिकविण्यासाठी माणुसकीला लाज वाटेल असे हीन कृत्य करण्यास सांगितले. नकार दिल्यामुळे हाल करुन हत्या करण्यात आली. ज्यावेळेला तो घरात गेला तेव्हा गावातील सगळे लोक जमा होते. पाशवी कृत्य करायला लावले. 23 वर्षाच्या पोराला सांगितले, तू आपल्या मायवर चढ. नकार दिल्यामुळे त्याचे गुप्तांग कापून टाकण्यात आले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो शब्द आता उच्चारला आहे तो कामकाजातून वगळण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मी माझा शब्द मागे घेतो. बलात्कार करण्याचा प्रयत्न कर असे सांगितले आणि त्या मुलाने नकार दिल्यामुळे गुप्तांग कापण्यात आले. दोघा मायलेकींच्या गुप्तांगात बांबू, लाठीकाठी घालण्यात आली. क्रूरपणे त्यांचे देह छिन्नविछिन्न करण्यात आले.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, न्यायालयात इनकॅमेरा चर्चा का चालते? कारण तेच तेच शब्द उच्चारले जाऊन अवहेलना होऊ नये. सभागृहामध्ये अत्याचाराचे वर्णन पुन्हा शब्दश: केल्यामुळे फार मोठा न्याय मिळणार नाही.

श्री.रमेश निकोसे : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची मी नोंद घेतली आहे. सभापती महोदय, चारही लोकांची हत्या झाल्यानंतर बैलबंडीने 3-4 कि.मी. अंतरावर असलेल्या नहरामध्ये मृतदेह फेकून देण्यात आले. 30.9.06 रोजी भैयालाल भोतमांगे खैरलांजीला परतले. कोणीही तोंड उघडेना. गावात सामसूम होती. वरील घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार श्री.सिध्दार्थ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

गजभिये याचा भाऊ राजन गजभिये याला 29.9.06 रोजीची घटना पूर्णपणे माहिती आहे. वर्तमानपत्रात बातमी आली. आमदार मधुकर कुकडे हे कोणत्या पक्षाचे आहेत याचा काही संबंध नाही. परंतु माणुसकी म्हणून त्या पक्षाच्या लोकांनी त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. तुमसर-देव्हाडा रोडवर त्यांचा जो फार्महाऊस आहे तेथे गावातील सरपंच आणि इतर लोकांमध्ये खलबते झाली. त्यानंतर कोणीही काही बोलायचे नाही, साक्ष द्यायची नाही अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला. त्याचवेळेला चरण वाघमारे नावाचे जिल्हा परिषद सदस्य यांनी पोलिसांना प्रथम घटनेची कल्पना दिली.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ...

या घटनेची सर्वप्रथम माहिती श्री. राजन गजभिये यांनी दि. 29.9.2006 रोजी सायंकाळी 7.30 वाजेच्या सुमारास फोनवरुन दिली. रात्रौ. 10.30 वाजता खैरलांजी येथे पोली पोहचले, सरंपच उपसरपंच, पोलीस पाटील,, माजी पोलीस पाटील यांनी पोलिसांना काहीच झाले असे खोटेनाटे सांगितले. त्यामुळे पोलीस राजन गजभिये यांच्याकडे गेले व खोटेनाटे सांगितले म्हणून 500 रुपयांची चिरीमिरी घेऊन गेले. सभापती महोदय, या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले. 29.9.2006 रोजी गावक-यांनी व मारेक-यांनी सर्वप्रथम श्री. नितीन कडव जिल्हा परिषद सदस्य व सध्या उपाध्यक्ष, जिल्हा परिषद भंडारा यांना मोबाईलवर घटनाक्रम सांगितला त्यांनी आमदार मधुकर कुकडे, शिशुपाल पटले, राज अस्वले, नाना पंचबुध्दे व पंचबुध्देंचे पी.ए. श्री. बनकर इत्यादींना सूचित व सावधान केले व प्रकरण दाबण्याच्या हालचाली सुरु केल्या. सर्व प्रशासकीय यंत्रणा, पोलीस, डॉक्टर, तपासाधिकारी यांचेवर दबावतंत्राचा प्रयोग केला व प्रकरण दाबण्याकरिता पुरावे नष्ठ करण्यास भाग पाडले. तसेच गावातील लोकांनी एकी करुन हत्या करण्याचे नाव अजिबात सांगू नये असे फर्मान काढले. सबब यात कटकारस्थानात पडद्यामागे मुख्य दोषी असेल्या लोकांचे मोबाईन फोनचे प्रिंटआऊट घेतले गेले नाही. त्यात खरी मेख आहे. श्री. नितीन कडव, जिल्हापरिषद भंडारा उपाध्यक्ष, श्री. मधुकर कुकडे, आमदार तुमसर, श्री. राम अस्वले, माजी आमदार, भंडारा. श्री. शिशुपाल पटले, खासदार भंडारा, श्री. नाना पंचबुध्दे, आमदार, भंडज्ञरा तसेच श्री. बनकर, पंचबुध्देंचे पी.ए.यांना दोषी धरण्यात यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. निकोसे साहेब खालच्या सभागृहातील सदस्यांचे नाव घेऊन त्यांच्यावर आरोप करीत आहेत, खासदार आणि आमदारांचा ते या ठिकाणी उल्लेख करीत आहे. त्यांना जर इतर सदस्यांचे नाव घ्यावयाचे असेल तर प्रथम त्यांनी आपल्याला नोटीस दिली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी ज्या सदस्यांचे नाव घेतलेले आहे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाहीत केवळ वर्तमानपत्रात त्यांचे नाव छापून आलेले आहे. तसेच या प्रकरणाच्या संदर्भात या सदस्यांची कोणत्याही प्रकारची चौकशी देखील झालेली नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे खालच्या सभागृहाच्या संदस्यांच्या नावाचा उल्लेख करणे, आरोप करणे हे योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (डॉ. वसंत पवार) : सन्माननीय सदस्यांनी दुस-या सभागृहातील सदस्यांचे अशा प्रकारे नाव घेऊ नये.

श्री. रमेश निकोसे : ठीक आहे. परंतु ज्याच्या कुटुंबातील चार व्यक्तींची अमानुषपणे हत्या करण्यात आली, ज्याने हा प्रकार प्रत्यक्ष पाहिलेला आहे त्याच व्यक्तीने प्रेस कॉन्फरन्समध्ये या लोकांची नावे घेतलेली आहे. मी त्यांचे नाव घेतो असे नाही. सभापती महोदय, भोतमांगे यांने सांगितले आहे की, अजुन सुध्दा पोलिसांनी या घटनेच्या संदर्भात सखोल माहिती घेतली तर या घटनेचे पुरावे अजून देखील मिळू शकतील. सभापती महोदय, मला या घटनेच्या संदर्भात असे म्हणावेसे वाटते की, "महार मेला, ब्राम्हणाच्या खांदी गेला, माय म्हणे माझा अवगती गेला". या घटनेमध्ये मृत व्यक्तींच्या पार्थिवावर जातवाल्यांचे हात देखील पडले नाही. कानुपूरमध्ये डॉक्टर बाबासाहेबांच्या पुतळयाची विटंबना झाल्यामुळे महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटले. असे असतांना गृहखात्यांने चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे त्यामुळे मी माननीय आर.आर.पाटील साहेबांना धन्यवाद देतो. या घटनेमध्ये गाडया जाळल्या जात होत्या तरी सुध्दा त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार केला नाही. गृहखात्याला वाटले असेल की, या प्रकरणात तरी दलितांची हत्या घडू नये त्यामुळे मी पुन्हा एकदा माननीय गृहमंत्र्यांचे आभार मानतो. या घटनेच्या संदर्भात शासनाने भोतमांगे कुटुंबाला 10.12 लाख रुपये दिले पाहिजे. तसेच त्यांची सीआयडीची मागणी सुध्दा मंजुर होऊन त्याप्रमाणे चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणामध्ये, या घटनेमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना फाशीची सजा मिळाली पाहिजे. परंतु महात्मा गांधीचा खून झाल्यानंतर ती केस कोर्टात 10-15 वर्षे चालली होती हे सुध्दा लक्षात घेतले पाहिजे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे...

श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली तसेच राजीव गांधी यांची हत्या झाली. पण या हत्येचा तपास करण्यासाठी 10-15 वर्षे लागली. या दोन्ही केसेस सी.बी.आय.कडे होत्या. सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणाचा नि:पक्षपातीपणे तपास झाला पाहिजे. या प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजेत. अशाप्रकारची कडक कारवाई झाली पाहिजे की, दलितांवर अन्याय करताना कोणाचेही हात थरथरले पाहिजे. जे या प्रकरणात दोषी आहेत, ज्यांनी हे कृत्य केले त्यांचे हात कापले पाहिजे. जेणेकरुन पुन्हा असे कोणीही कृत्य करण्यास धजावणार नाही अशाप्रकारची एक दहशत निर्माण झाली पाहिजे त्यामुळे 21 व्या शतकात अशाप्रकारचे कृत्य करण्यास कोणीही धजावणार नाही. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडून दिलेले) : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरण निर्धृणपणे आणि पाशवी वृत्तीतून झालेले आहे व काळाला लाज वाटेल अशा पध्दतीचे हे कृत्य आहे. हे सर्व कृत्य शब्दात व्यक्त करण्या पलिकडचे आहे. खैरलांजीमध्ये जे हत्याकांड झाले, ते कसे झ ाले हे तेच तेच पुन्हा सांगून आपण ज्यांची निर्घृण हत्या झाली त्यांचा अवमान करीत तर नाही ना ? असे मला वाटते. सभापती महोदय, या प्रकरणाचे गांभीर्य नसलेला माणूस महाराष्ट्रात आणि देशात असेल असे मला वाटत नाही. जे खैरलांजी प्रकरण घडले त्याची कारण मीमांसा करण्याऐवजी या महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारचा द्वेष भरला गेला असेल, अशाप्रकारच्या दुष्ट पध्दतीची सामुदायिक प्रवृत्ती निर्माण होत असेल तर त्या संदर्भात शासनाने निश्चित स्वरुपामध्ये कोणत्या पध्दतीने मार्ग काढावा आणि भविष्यामध्ये कोणती काळजी घ्यावी हा महत्वाचा विषय आहे. ग्रामीण जीवनामध्ये एकरुप अमानुषता कशी निर्माण होऊ शकते याचे हे विदारक दृश्य असल्याने कायद्याने सर्व प्रश्न सुटतीलच असे नाही, अन्यथा या कायद्यामध्ये वेळोवेळी बदल करावे लागले नसते. कोणाला दोष द्यायचा, कोणाला दोष द्यायचा नाही....प्रत्येक वेळेला मी असो वा आपण वा कोणीही असो, दुसऱ्याकडे बोट दाखविताना उरलेली चार बोटे आपल्याकडे वळलेली असतात याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. तेव्हा भान ठेवून बोलले तर समाजातील प्रश्न आपल्याला सोडविता येतील. दलितांवर होणाऱ्या अत्याचारा संदर्भात आणि खैरलांजी प्रकरणामुळे आणि त्या अनुषंगाने घडणाऱ्या गोष्टींमुळे मी मनापासून व्यथित झालो आहे. परंतु या महाराष्ट्रात अशी एक विचित्र लाट निर्माण झ ालेली आहे की, एखाद्या घटनेचा प्रॉपर्टी म्हणून उपयोग केला जातो. सर्व हत्याकांडे ही निषेधार्हच असतात. अशाप्रकारची हत्याकांडे करणाऱ्यांना कडक शासन केलेच पाहिजे. परंतु अमूक हत्याकांड झाले ती आमची प्रॉपर्टी आहे, तमूक हत्याकांड झाले ती आमची प्रॉपर्टी आहे अशाप्रकारची भावना व्यक्त केल्यामुळे समाजामध्ये एकप्रकारची वेगळी दरी निर्माण झालेली आहे. अशा पडलेल्या दरीमुळे मी जास्त चिंतेत आहे. मला या ठिकाणी नम्रपणे सांगावयाचे आहे की, अशाप्रकारची दरी निर्माण करुन भावा-भावांमध्ये भांडण लावणे आपल्याला परवडणारे नाही आणि हे होता कामा नये या विचाराचे आम्ही आहोत. जर अशी भांडणे होत असतील तर ती मिटविण्याची जबाबदारी आपली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

असते. आपण आपल्या समाजाला प्रगतीपथावर नेले पाहिजे त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. ही तुमची आमची जबाबदारी आहे. आपण सर्वजण या मातीची लेकरे आहोत.

सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणात जे घडले ते येथे पुन: पुन: किती वेळा सांगावे, ज्यांच्यावर हा प्रसंग गुदरला ती माझी आई होती, बहीण होती असे मी समजतो.

यानंतर श्री.पुरी....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आपण आपल्या जागेवर उभे राहून वारंवार माझ्या मातेच्या नग्नतेचा आणि माझ्या भगिनीच्या विद्रुपतेचे चित्र निर्माण करुन काय साध्य करणार आहात, हे मला कळत नाही. आपण यातून फक्त निर्भत्सनाच निर्माण करीत आहात, असे मला वाटते. मी सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे ताईंना धन्यवाद देऊ इच्छितो. त्यांनी सांगितले की, बोलताना भान ठेऊन बोलावे. माननीय प्रा.कवाडे सरांनाही मी धन्यवाद देऊ इच्छितो. त्यांनी अतिशय सुंदर भाषण केले. ते भावनाविवश असतानाही त्यांनी एका पातळीवर आपले भाष्य याठिकाणी ठेवलेले आहे. भावनेचा उद्रेक असतानाही भावनेच्या आहारी न जाता त्यांनी याठिकाणी आपले कौशल्य दाखवलेले आहे. म्हणूनच कालचे ते खऱ्याअर्थाने हिरो होते. ते भावनेच्या आहारी गेले नाहीत.

सभापती महोदय, मी याठिकाणी दुर्दैवाने नमूद करु इच्छितो की, अशाप्रकारचा जो संघर्ष चालू आहे तो दलित विरुध्द सवर्ण अशा पध्दतीने चालला आहे, त्याचे परिणाम पूर्ण महाराष्ट्रामध्ये कारण नसतानाही उमटत आहेत, ते थांबले पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे. माझ्याकडे कॅलिडोस्कोप, श्री.निखील वागळे यांचा दिनांक 18 नोव्हेंबर, 2006 रोजीचा "खैरलांजीचं पाप कुणाचं ?" या सदराखालील लेख आहे. त्यांच्या बाबतीत कोणीही संशय घेण्याचे कारण नाही. त्यांनी जे लिहिले ते मी याठिकाणी वाचून दाखवतो. त्यांनी यामध्ये असे म्हटले आहे की, "सवर्ण आणि दलित हे शब्द आपण फार सैलपणे वापरतो. खैरलांजीच्या घटनेच्या तपशीलात शिरले तर हा सैलपणा लक्षात येतो. खैरलांजीचा अत्याचार हा उच्चवर्णीयांनी दलितांवर केलेला अत्याचार नाही. भोतमांगे कुटुंबावर हल्ला करणा-यात ब्राम्हण, मराठे किंवा वैश्यवाणी आघाडीवर नव्हते. सुमारे 731 लोकसंख्या असणा-या या गावात राहणा-या 180 कुटुंबांपैकी बहुसंख्य अन्य मागासवर्गीयांपैकी (ओबीसी) आहेत. कलार किंवा कोवार जातीतल्या या कुटुंबांनीच भोतमांगे कुटुंबावरच्या हल्ल्यात पुढाकार घेतला होता." अशाप्रकारे त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे. आपण अशाप्रकारे दलित विरुध्द सवर्ण अशाप्रकारचा वाद निर्माण करुन माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांची जबाबदारी आणखी वाढवत आहात. परंतु या महाराष्ट्रातील दलित आणि दलित्तरांची प्रकरणे संपली पाहिजेत आणि या सर्व स्तरावरील सगळया गोष्टी थांबल्या पाहिजेत. अत्याचार कोणावरही झाला तर त्याविरुध्द आपण सर्वांनी एकत्रितपणे उभे राहिले पाहिजे. सभापती महोदय, असे काम मी करत आलो आहे. मी ज्यावेळी नैतिकतेने बोलतो

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यावेळी मला नैतिकतेचा अधिकार प्राप्त आहे की नाही, याचा मी पहिल्यांदा विचार करुनच बोलत असतो. हाताचे एक बोट जरी समोर असले तरी चार बोटे आपल्या बाजूने असतात याचे भान मला आहे. अशाच प्रकारच्या प्रकरणांबाबतीत मीही अमरावती येथे मोर्चा काढलेला आहे. ज्यावेळी महिलांवर झालेल्या अत्याचाराविरुध्द, आदिवासींना झालेल्या अत्याचाराविरुध्द मी लाखोंचा मोर्चा काढला, त्यावेळी दलित नेत्यांनी माझी कानउघडणी केली. परंतु याठिकाणी मी दलित नेत्यांचा टेंभा मिरवणाऱ्यांना सांगू इच्छितो की, कोणतीही महिला ही दलित किंवा सवर्ण असू शकत नाही तर ती प्रथम माता, बहिण असते. प्रत्येकवेळी याठिकाणी भेदभाव निर्माण करणारे भाष्य न करता, याठिकाणी जबाबदारीने वक्तव्ये केली पाहिजेत, या मताचा मी आहे. शिवसेना-भाजपाचे सरकार सत्तेवर असताना रमाबाई हत्याकांड झाले. त्यावेळी सभागृहामध्ये सर्व प्रकारची दृष्ये झाली व त्यावेळी काही जणांनी राजीनाम्याची मागणी केली. ते या प्रकरणाच्या बाबतीत नैतिक जबाबदारी स्वीकारुन काय करतात ते माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या उत्तरामध्ये सांगावे. कारण, त्यावेळी राजीनाम्याची मागणी करण्यांमध्ये माननीय गृहमंत्री हे आघाडीवर होते. या राज्यामध्ये पोलिसांनी दलितांवर अन्याय केला असेल तर त्याबाबतीत कारवाई झाली पाहिजे. आज वृत्तपत्रामध्ये छापून येते की, अमूक अमूक पोलीस दलित आहे. आज पोलिसांच्या बाबतीत जातीवाचक लिखाण येत आहे. भंडारा जिल्हयातील भोतमांगे कुटुंबाच्या बाबतीत जे घडले ते निषेधार्थच आहे. त्याचे तीव्र पडसाद आज संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यानंतर अंकिता लांजेवार प्रकरण झाले, 10 वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाला, हे प्रकरण 13 ऑक्टोबरला झाले, भोतमांगे प्रकरणानंतर हे प्रकरण घडले. परंतु, भोतमांगे प्रकरणानंतर या प्रकरणाचे गांभीर्य कुणाला वाटले नाही. या प्रकरणी सर्वजण गप्प बसले. 1 महिन्यानंतर शिवसेना पक्षाने मोर्चा काढून या प्रकरणी सरकारला जाब विचारला. शासनाने नंतर कुटुंबियांना 2 लाख रुपयाची मदत केली परंतु, हा सर्व नंतरचा प्रकार आहे. अंकिता लांजेवार या लहान मुलीवर बलात्कार झाला त्याबद्दल कुणी व्यथा का मांडली नाही ? हा खरा प्रश्न आहे. बलात्कारी स्त्री माझी बहिण असेल, माता असेल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी अंकिता लांजेवार या मुलीवर झालेल्या बलात्कार व खुनाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला व याविरुध्द कुणी आवाज उठविला नाही, असे वक्तव्य केले आहे. मला या संदर्भात असे स्पष्टपणे सांगावयाचे आहे की, अंकिता लांजेवार या मुलीवर रामटेके या गृहस्थाने बलात्कार केला व नंतर खुन केला. त्या रामटेकेला ताबडतोब अटक झाली पाहिजे, त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी माझ्या पक्षाने व मी भंडारा येथे केली होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांना त्यांच्या जागरुकतेबद्दल धन्यवाद देतो. महाराष्ट्रातील दलित व दलितेतर समाजाचे एकच रक्त आहे, ती सर्व याच भूमिची लेकरे आहेत, ती एकत्र राहिली पाहिजेत, एवढेच मला सांगावयाचे आहे. त्यांच्यामध्ये तयार झालेली किंवा तयार होणारी भिंत पाडली पाहिजे, अशा प्रकारची माझी व माझ्या पक्षाची भूमिका आहे. मी आता जे वाचून दाखविले त्यावरुन आपल्या हे लक्षात येईल की, हा वाद दलित व सवर्ण असा नसल्याने दलित व सवर्णांमधील वातावरण खराब करण्याचा कुणीही प्रयत्न करु नये, अशी माझी विनंती आहे. जो कुणी या प्रकरणी दोषी असेल मग तो सवर्ण असो वा दलित असो त्याला शिक्षा झाली पाहिजे परंतु अशा प्रकारचा वाद निर्माण करुन महाराष्ट्राच्या गावागावांमध्ये जातीयतेच्या भिंती उभ्या राहू नयेत, असे मला या ठिकाणी नम्रपणे सांगावयाचे आहे. मंत्रालयामध्ये काही आया-बहिणी घुसल्यानंतर त्या ठिकाणी ज्या घोषणा देण्यात आल्या त्या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या आहेत. यामागील कर्ताकरविता कोण आहे हे बघितले तर वाईट

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वाटते. या संदर्भातील बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली आहे, त्या बातमीची नोंद सरकारने गांभीर्याने घेतली पाहिजे. वर्तमानपत्राची बातमी चुकीची असेल तर त्यायाबाबतीतही विचार करावा. परंतु, एका मंत्र्याने असे म्हटले असेल तर त्याची गांभीर्याने नोंद घेतलीच गेली पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची विटंबना झाली याचा सर्वांनीच निषेध केला आहे. या घटनेचे कुणीही समर्थन करणार नाही. त्यानंतर समाजामध्ये जो उद्रेक झाला तो उत्स्फुर्त असा होता. खैरलांजी प्रकरणानंतरही जो उद्रेक झाला तो उत्स्फुर्त होता, लोक रस्त्यावर आले हे आम्ही सर्वांनीच समजून घेतले आहे. परंतु त्यानंतरही जर महाराष्ट्राचे मंत्रीमहोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत असे सांगणार असतील, अशा प्रकारची वक्तव्ये करणार असतील तर ते निषेधार्ह आहे, त्याची नोंद घेतली गेली पाहिजे. अशा प्रकारचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न होणार असेल तर तो धोकादायक आहे. अशा प्रकारचे कर्तृत्व आणि नेतृत्व सरकारमधील मंत्री दाखविणार असतील तर सरकारला त्याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. सभापती महोदय, या संदर्भातील स्पष्ट भूमिका मी मांडत आहे. माझी दलितांना नम्रपणे विनंती आहे की, तुम्ही कालपर्यन्त हिंदू होता, बौध्द झाला, का झाला याची कारणमिमांसा आपण एकसारखी करीत असतो. परंतु, तुमचे आणि आमचे रक्त एक आहे त्यामुळे अशा प्रकारचे आक्षेप आणि आरोप करुन जातीयतेच्या भिंती रुंद करण्याचा प्रयत्न करु नका. काल या ठिकाणी दलित नेत्यांनी अतिशय चांगले विचार मांडले, अतिशय संयमाने मांडले. सन्माननीय सदस्या, श्रीमती उषाताई दराडे यांनी शरद पवारांचा आग्रहाने उल्लेख केला, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्या म्हणाल्या की, सन्माननीय सदस्यांनी शब्दप्रयोग वापरतांना अतिशय काळजीपूर्वक वापरावेत. त्या असेही म्हणाल्या की, दलितांना राष्ट्रीय विकासामध्ये सामावून घेतले पाहिजे. सन्माननीय नेते, श्री.रामदास आठवले टाहो फोडत आहेत, त्यांच्या भावना तुमचे साहेब समजून घेणार आहेत की नाहीत, हा प्रश्न मी त्यांना या ठिकाणी विचारणार आहे. महाराष्ट्रामध्ये युतीचे शासन असतांना रमाबाई नगर प्रकरणामध्ये आताच्या सरकारमधील नेत्यांनी किती हैदोस घातला होता, उत्पात घडविला होता हे आम्ही पाहिलेले आहे. त्यावेळी सरकारने राजीनामा देण्याची भाषा आपण

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वापरली होती. आज खैरलांजीचे प्रकरण त्यापेक्षा भयानक घडले आहे त्याची जबाबदारी स्वीकारुन हे सरकार राजीनामा देणार आहे की नाही, हा माझा प्रश्न आहे.

धन्यवाद.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी फक्त दोन-तीन मुद्दे मांडणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आम्हाला बोलण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ पाहिजे असेल तर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आपल्याला पुढे ढकलावे लागेल. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण बोलतील.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी फक्त दोन-तीन प्रश्न मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे असे म्हणाले की, या सर्व प्रकरणानंतर जी डेक्कन क्वीन जाळण्यात आली, ते आपल्याला उद्देशून म्हणाले. त्याबाबत आपण उत्तरामध्ये सांगावे. माझे असे मत आहे की, ही जी जाळपोळ करण्यात आली ती आंबेडकरांच्या अनुयायांनी केलेली नाही. या सगळयाचा फायदा गुंडांनी घेतला, असे आमचे मत आहे. आपल्याला उद्देशून ते असे म्हणाले की, डेक्कन क्वीन जाळत असतांना पोलिसांनी फायरींग केली नाही. त्याअर्थी गृह खात्याचे असे आदेश असावेत की, गोळीबारामध्ये दलितांचा मृत्यू होऊ नये किंवा त्यांचे बळी जाऊ नयेत तर हे आपल्याला मान्य आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ही सगळी जाळपोळ झाल्यानंतर माननीय गृहमंत्री महोदयांनी असे वक्तव्य केले होते की, फार मोठे नुकसान झालेले नाही. डेक्कन क्वीनचे 5-6 डबे जळलेले आहेत व 5-6 गाळया जळलेल्या आहेत. काल सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी पोस्टर्स दाखविलीत ती इतकी अमानुष होती की, त्यामुळे कोणाच्याही भावनांचा उद्रेक होणे स्वाभाविक आहे. यामध्ये काही गैर नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते असे म्हणाले की, स्त्री ही शेवटी स्त्री असते. ती कोणत्या जातीची आहे, हा मुद्दा नाही. परंतु माणसातील देवत्व संपून राक्षसत्व जागू लागले आहे हा या सर्व घटनांचा अर्थ आहे. कदाचित द्वेशापोटी हे झाले असेल. कुटुंबातील एकाला मारणे चूक आहे किंवा नाही हे न्यायालय ठरवेल. खरे म्हणजे कोणालाही मारणे चुकच आहे. परंतु जो त्या घरातील अपंग होता त्याला मारण्याचे काय कारण ? अशी बातमी आहे की, 14 वर्षाची मुलगी आंघोळ करीत होती, तर तिला ठार मारण्याचे काय कारण आहे ? हे सवगळे कृत्य अमानुष आहे. म्हणून मला असे वाटते की, हा एकूण जो उद्रेक झाला त्याबाबतची बातमी अशी आहे की, दिनांक 30 सप्टेंबरला कुमारी पियांका हीचा मृतदेह वडेगाव शिवारात आढळला. पत्नी सुरेखा, मुलगा सुधीर व रोशन बेपत्ता असल्याची श्री.भोतमांगे यांची तक्रार होती. तेव्हा पासून या सगळया घटनांची मालिका सुरु झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

दिनांक 13 नोव्हेंबरला अमरावती येथे आंदोलन झाले, त्याचा तपशील देऊन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. दिनांक 14 नोव्हेंबरला श्री.भोतमांगे यांची रुग्णालयातून सुटका झाली. दिनांक 30 ऑक्टोबर पासून ही घटना घडल्याच्या सर्व कालखंडामध्ये महाराष्ट्रामध्ये जो असंतोष पसरलेला आहे त्याची जाणीव यांच्या गुप्तचर खात्याला झालेली आहे की नाही ? सभापती महोदय, मागच्या 30-40 वर्षाचा आपण दलित-दलितेतर चळवळीचा अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येईल की, काँग्रेसने या सगळया समाजाचा मतांसाठी उपयोग केलेला आहे. आपण म्हणालात ते बरोबर आहे. त्यांना गुणात्मक समाजामध्ये सहभागी होण्यासाठी केवळ एक माणूस एक मत असा अधिकार देऊन चालत नाही. भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेची युती सत्तेवर असतांना अर्थसंकल्पामध्ये दलितांसाठी जी बजेटरी प्रोव्हीजन होती, त्यातील काही प्रोसिडींग सन्माननीय सदस्यांनी येथे वाचून दाखविले. 1995 पासून ते 1999 पर्यंतचे सर्व प्रोसिडींग आपण बघा. दलित आणि आदिवासी यांच्या सुधारणांसाठी, त्यांचा सामाजिक विकास व्हावा, आर्थिक विकास व्हावा, त्यांनी समाजामध्ये आपल्याला वेगळी वागणूक दिली जाते असे न समजता मूळ समाजाच्या प्रवाहामध्ये एकत्र यावे यासाठी युती शासनाने प्रयत्न केले. युती शासनाच्या काळातील सभागृहातील कार्यवाही आपण वाचावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे. माझा तिसरा मुद्दा असा आहे की, खैरलांजी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर कानपूरमध्ये परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना झाली. या सगळयाचा महाराष्ट्रामध्ये उद्रेक झाला यासंदर्भात माननीय गृहमंत्री महोदयांचे काय मत आहे ? कानपूरला घटना घडली आणि त्याचे पडसाद येथे उमटले याचे कारण असे आहे की, योग्य वेळेला खैरलांजी प्रकरण योग्य प्रकारे हाताळले असते तर दलित जनतेचा असंतोष झाला नसता. म्हणून याची शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे. शासन ती जबाबदारी कशा प्रकारे घेणार आहे हे माननीय गृहमंत्रीही महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे.

धन्यवाद.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, एका नवीन चर्चेला येथे तोंड फुटते आहे. आजपर्यंत या महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ करीत होते, आता दलितेतर चळवळ करीत आहेत म्हणजे दलितांना कॉर्नर करण्याचा व्यवस्थितरित्या प्रयत्न केला जात आहे आणि गेल्या 60 वर्षांचा हा प्रयोग यशस्वी होत आहे व तेही नागपुरामध्ये त्याचे मला दु:ख आहे. ज्या नागपुरामध्ये धम्मपरिवर्तनाचा सोहळा झाला आणि मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही असे म्हणून ज्यांनी हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारला., त्या घटनेस 50 वर्षे होत असताना हे प्रकार घडत आहेत त्यामुळे हा एखाद्या षडयंत्राचा प्रकार तर नाही ना याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कानपूरला काय झाले, खैरलांजीला काय झाले वगैरे सगळे मुद्दे सगळ्यांनी येथे मांडले आहेत. परंतु यामध्ये मुख्य मुद्दा हा आहे.... श्री. व्ही.एस.नायपॉल नावाचा एक साहित्यिक आहे, त्याला नोबेल पारितोषिक मिळालेले आहे, त्याने म्हटलेले आहे की, भारताचा प्रचंड गतीने विकास होत आहे परंतु येथील सर्वसामान्य गरीब माणूस आहे त्याला त्याचा वाटा मिळत नाही आणि मला वाटते, तेच खरे दु:ख आहे. मूळ दुखणे तेच आहे. खरा सुईचा काटा कोठे वळायला पाहिजे तर तो तेथे. हत्या कोणी केल्या ? त्या संबंधात निखिल वागळेंनी काय लिहिले, कोणत्या माध्यमातून या हत्या झाल्या हे महत्त्वाचे नाही. महाराष्ट्रात जात वास्तव किती महत्त्वाचे आहे हे यातून पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे. मी ज्या परिवारातून येतो.. 1925 साली माझा आजा त्यातून गेला होता तेव्हा त्याला राम मंदिरात प्रवेश दिला नव्हता. खरे तर आपल्या सगळ्याच समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दैवत मानण्याची गरज आहे. कारण आज आम्ही ज्या शक्तीने, ज्या ताकदीने उभे आहोत त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शक्ती एकवटलेली आहे. दलितांना मिळालेले अधिकार हे केवळ दलितांनाच मिळाले नाहीत तर ओबीसींना देखील मिळालेले आहेत. शूद्र, अतिशूद्रांना देखील अधिकार देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. कर्मकांड, पुनर्जन्म वगैरे वेगवेगळ्या मार्गांनी हिंदू समाजामध्ये जे वेगवेगळे वर्ग निर्माण झालेले होते त्याच्या विरोधात उभे राहिले पाहिजे याची जाणीव करून देण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. मला वाटते तोच परिवार आता व्यवस्थितरित्या कामाला लागलेला दिसतो. कोण होता त्या गावातील सरपंच ? मघाशी येथे सांगितले गेले की, तो जो कोणी भारतीय जनता पक्षाचा असला तरी त्याला सोडू नका. त्यांची नावे बाहेर येऊ द्यात. कारण हा विचारांच्या अभिनिवेशाचा

..... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

प्रश्न आहे. विचार कसे खोलपर्यंत पोहोचविले जातात याचा हा प्रश्न आहे. ज्या पुस्तकाच्या माध्यमातून चातुर्वर्णावर मुद्दाम शिक्कामोर्तब केले याचा विचार केला जातो काय ? "The Bunch of Thoughts" म्हणजेच "विचारधन" या पुस्तकातून काय म्हटले आहे आणि त्यांच्या परिवारातील माणसाने ते स्वीकारून हे कृत्य केले असेल तर महाराष्ट्रातील हे जाळे नष्ट केले पाहिजे याचे भान आपण ठेवले नाही. सभापती महोदय, खैरलांजीमध्ये जे झाले ते घृणास्पद आहे, तेथे जो नरसंहार झाला तो घृणास्पद आहे यात शंका नाही. सभापती महोदय, या देशातील सरंजामशाही आजही नष्ट झालेली नाही. याबाबतीत वामनरावदादा कर्डक यांची एक कविता मला आठवते. '

" सांगा की हो बिर्ला, टाटा, बाटा,
धनाचा वाटा आणि आमचा साठा कोठे आहे ? "

(यानंतर श्री. सरफरे .... एल 1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

नायपॉल आणि वामनदादा कर्डक यांच्या वाक्यामध्ये 30 वर्षाचे अंतर आहे. सभापती महोदय, दलितांना आर्थिक ताकद मिळू नये याचा व्यवस्थितपणे विचार केला जात आहे. त्यामधून खैरलांजीचे प्रकरण उदभवले आहे. भंडारा जिल्हा हा कृषी क्षेत्रामध्ये ॲडव्हान्स असलेला जिल्हा आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त ओलिताखालील क्षेत्र या जिल्हयामध्ये आहे. तसेच, सर्वात जास्त पाणी या जिल्हयामध्ये आहे. अशा या जिल्हयातील पाच एकराची शेती असलेल्या भोतमांगेला एकटे पाडले जाते व त्याच्या कुटुंबाची हत्या केली जाते. या प्रकरणी एका समाजाकडे अंगुली निर्देश जात आहे. महाराष्ट्रामध्ये जातीव्यवस्था किती भयानक आहे याची जाणीव सभागृहाला झाली पाहिजे. आणि म्हणून अशाप्रकारच्या परिस्थितीचा फायदा घेऊन दलित आणि दलितेतर समाजामध्ये फूट पाडण्याचे काम केले जात आहे ते आपण थांबविले पाहिजे. देशाच्या पातळीवर महाराष्ट्रातील दुर्जनांच्या आधारावर सोशल चेंज घडवून आणले पाहिजे. याकरीता या महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांनी पहिली शाळा सुरु केली, दलितांसाठी चळवळ सुरु केली. तसेच, दलितांना आरक्षण मिळाले पाहिजे, या समाजाला सामाजिक व्यवस्थेमध्ये योग्य वाटा मिळाला पाहिजे अशी भूमिका शाहू महाराजांनी 1904 मध्ये घेऊन पहिल्यांदा दाखवून दिले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या भाषणाचे मला स्वागत करावयाचे आहे. शाहू महाराजांनी त्या काळात जे सांगितले ते आम्ही साडे चार वर्षे सत्तेवर असतांना केले. तुम्ही गेली 50 वर्षे सत्तेवर असतांना केले नाही याचा कबुली जबाब दिल्याबद्दल आपणास धन्यवाद.

श्री. जितेंद्र आव्हाड : 5 हजार वर्षापूर्वीचा हा विचार 50 वर्षामध्ये नष्ट झाला असता तर सर्व संपले असते. मी जे बोललो त्यासंबंधी तुम्हाला एवढा कळवळा आला आहे तर मराठवाडा विद्यापीठ नामांतराचे जे आंदोलन सुरु होते त्यावेळी सामना दैनिकामध्ये छापून आलेला अग्रलेख आपण वाचा....

श्री. दिवाकर रावते : सामनातील अग्रलेखामध्ये आम्ही हीच भावना व्यक्त केली होती की, दलित आणि दलितेतर असे वातावरण महाराष्ट्रामध्ये निर्माण होऊ नये अशी भूमिका घेतली होती. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावर आमचा विरोध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

नावाला नव्हता. मराठवाडा या नावासहीत विद्यापीठाचे नामांतर व्हावे अशी आमची भूमिका होती. ती भूमिका माननीय श्री. शरद पवार यांना देखील मान्य होती.

श्री. जितेंद्र आव्हाड : मराठवाडयाला महारवाडा कोण म्हणाले? जाऊ द्या मला त्या विषयावर आता जास्त बोलावयाचे नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अर्थशास्त्राचा चांगला अभ्यास होता, समाजशास्त्राचा चांगला अभ्यास होता. दलितांच्या प्रश्नासंबंधी त्यादृष्टीने विचार होणे गरजेचे आहे. खैरलांजीच्या प्रकरणामध्ये चार जणांची हत्या करण्यात आली हे महत्वाचे नाही. परंतु त्याच्या पाठीमागचे सत्य किती महत्वाचे आहे ते किती विदारक आहे हे महत्वाचे आहे. येथील सामाजिक व्यवस्था समतेच्या आधारावर जोपर्यंत आणीत नाही तोपर्यंत येथील न्याय प्रक्रियेमध्ये दलितांना न्याय मिळणार नाही हे सत्य आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

"तिरस्काराने, गुलामगिरीने व अमानुष अन्यायाच्या गर्तेत पिचत पडलेल्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यामध्ये मी अपयशी ठरलो तर मी स्वतःला गोळी मारुन घेईन" हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाक्य महाराष्ट्राने लक्षात ठेवले पाहिजे. या भूमिकेतून त्यांनी राज्यकर्त्यांना लिहिले, त्या भूमिकेतून त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेला विरोध केला. येथील अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले. त्या भूमिकेचा पराभव आज महाराष्ट्रामध्ये होतांना दिसत आहे याची कुठेतरी जाणीव आपल्याला असली पाहिजे. खैरलांजीचे प्रकरण हे अतिशय घृणास्पद आहे. परंतु या माध्यमातून एका परिवाराला पुढे करुन महाराष्ट्रामध्ये जाती जातीमध्ये दरी वाढविण्याचा प्रयत्न माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे करीत नाहीत ना याचा जाणीवपूर्वक विचार करावयास पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (पुढे सुरु...

"भीम शक्ती" ही कोणाच्याशक्तीवर आधारीत होऊन पुढे जाऊ लागली तर महाराष्ट्राला त्रास होईल. ही या निमित्ताने मी आठवण करून देऊ इच्छितो...

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. "भीमशक्ती" ही स्वयंभू शक्ती आहे. ती कधी कोणाच्या इशाऱ्यावर काम करीत नाही, हे सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.जितेंद्र आव्हाड : जाता जाता मी एवढेच म्हणेन की, खैरलांजी प्रकरण घडले, ही दुर्दैवी घटना आहे. ते एक सामाजिक सत्य आहे.

(विरोधी पक्षातील सदस्य बसून बोलतात, त्यांना उद्देशून..)

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, शेवटी या सभागृहामध्ये शिस्त असली पाहिजे. सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये जाणूनबुजून त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून अडथळा आणला जातो, हे बरोबर नाही. याची आपण दखल घ्यावी.

उपसभापती : मी दखल घ्यायची की सदस्यांनी दखल घ्यायची ?

श्री.जितेंद्र आव्हाड : कालपासून या विषयावरील भाषणे ऐकली, त्यामध्ये आम्ही कोणी अडथळा आणला नाही. परंतु आमच्या भाषणामध्ये सन्माननीय सदस्य जाणूनबुजून अडथळा आणत आहेत. सभापती महोदय, आपण आमचे संरक्षण करणारे आहात, तेव्हा सन्माननीय सदस्यांना आपण समज द्यावी. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेब काल भाषण करतांना म्हणाले की, पोलिसांकडून हिंसाचार चालू आहे, त्याचबरोबर एका सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये पोलिसांनी प्रचंड हिंसाचार केला, दलितांवर अन्याय केला, पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पाहिजे, असे सांगितले. पोलिसांनी लाठीमार केला नाही तर तो का केला नाही ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि लाठीमार केला तर तो का केला ? असाही प्रश्न उपस्थित केला जातो. त्याचबरोबर सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा द्यावा,अशाप्रकारची मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात येते. महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेमध्ये 'जात' पाहिली जाते हे सत्य आहे. जातीशिवाय कोणाचे काही चालत नाही. याबाबत मार्क्स् आणि डॉ.बाबासाहेंब आंबेडकर यांनी सांगितलेले असतानासुध्दा खऱ्याअर्थाने महाराष्ट्रामध्ये पुरोगामित्वाचा प्रभाव आहे, तो रोखण्याचा समाजधुरीणांनी प्रयत्न करु नये. खैरलांजी प्रकरणाचा निषेध करुन माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अजूनही दोन-तीन सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत. तेव्हा प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर उत्तराला आपण परवानगी द्यावी.

उपसभापती : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती निलम गोऱ्हे बोलतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव आम्ही मांडलेला आहे. परंतु बोलणाऱ्या सदस्यांमध्ये माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

उपसभापती : आपल्याला बोलण्यास संधी मिळेल.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कालपासून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये अतिशय गांभीर्याने खैरलांजी प्रकरणाची चर्चा सुरू आहे. सभापती महोदय, या विषयावर चर्चा करावी तेवढी थोडी आहे. या विषयामध्ये जेवढी निंदा करावी तेवढी कमी आहे. आज ही चर्चा चालू असताना काही सन्माननीय सदस्यांनी चांगले विचार व्यक्त केले.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे .....

या राज्यामध्ये दलित आणि दलितेतर अशी दरी पडत आहे हा महत्वाचा विचार काही सन्माननीय सदस्यांनी मांडला. परंतु खैरलांजीच्या प्रकरणामध्ये नक्की काय घडले आहे ? दलित-दलितेतर अशी दरी पडलेली आहे काय ? याचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. सन्माननीय गृहमंत्र्यांचे कालचे विधानसभेतील भाषण मी ऐकले. त्या ठिकाणी श्री. सिध्दार्थ गजभिये नावाचे दलित समाजातील पोलीस पाटील होते. त्यांना मारहाण झाली. भोतमांगे कुटुंब त्यांच्या बाजूने उभे राहिले हे कारण सांगितले जाते. अनेक सन्माननीय सदस्यांनी सुध्दा हे कारण या ठिकाणी सांगितले. परंतु भोतमांगे कुटुंबाची जी थोडीफार जमीन आहे त्या जमिनीमधून गावाला रस्ता दिला होता. आम्हाला हाही रस्ता पाहिजे आणि तुमच्या जमिनीमधून सुध्दा दुसरा रस्ता पाहिजे. म्हणजे दलितांची जमीन हडपण्याचा गावकऱ्यांचा जो प्रयत्न होता त्याबद्दलचा उल्लेख या ठिकाणी झाला नाही. दलितांची जमीन हडपणे म्हणजे काय करणे आहे ? ही जातीयता नाही काय ? माझी अशी माहिती आहे की, त्या गावामध्ये श्री. भोतमांगे यांची कन्या प्रियांका ही एक मुलगी सोडली तर गावात एकही शिकलेली मुलगी नाही. ही कॉलेजला जाणारी प्रियांका एन.सी.सी.ला जाताना पॅन्ट आणि शर्ट घालून जात होती. ही मुलगी पॅन्ट घालून जाते काय ? अशा प्रकारे तिरस्काराने तिच्याकडे पाहिले जात होते. म्हणजे दलितांनी शिक्षण घ्यावयाचे नाही. दलितांनी शेती करावयाची नाही. दलितांनी काहीच करावयाचे नाही. मग हा जो काही प्रकार घडला त्यामध्ये दलित-दलितेतर यांच्यातील अंतर वाढत चालले आहे असा काही तरी भयानक विचार या सभागृहामध्ये कोणी मांडत असतील तर ही अत्यंत दुर्दैवी शोकांतिका आहे. हा जातीयवादाचाच प्रकार आहे. हा चातुर्वर्ण्याचा प्रकार आहे. चातुर्वर्ण्यामध्ये चार मजले उभे राहिले आणि तळाला जो दलित आहे तो जर शिकत असेल, वरच्या वर्गात जात असेल तर आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही, आम्ही तुमची हत्त्या करु असा हा प्रकार झालेला आहे. दलित दलितेतर यांच्यातील अंतर वाढावे असे दलितांना वाटत नाही. आज जे बोलतात त्यांनी त्याच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. म्हणून मी याबाबत उल्लेख करु इच्छितो.

शासनाच्या दृष्टीने मी एक महत्वाचा मुद्दा मांडणार आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो की, ते तातडीने खैरलांजीला गेले. परंतु प्रकरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

शांत झाले नाही. सगळी शंकेची सुई राजकीय नेत्यांवर आहे. मग ते सत्ताधारी पक्षातील असो किंवा विरोधी पक्षतील असो. हे असे का घडले ? पोलीस यंत्रणेने त्या ठिकाणी योग्य ती कारवाई केली नाही. श्री. सिध्दार्थ गजभिये यांना मारहाण झाल्यानंतर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला असता तर कदाचित हे प्रकरण पुढे गेले नसते. पोलिसांनी ही कारवाई केली नाही. मी अत्यंत खेदाने सांगू इच्छितो. माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले. माननीय उपमुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले परंतु या राज्याच्या पोलीस महासंचालकांना आजपर्यंत त्या ठिकाणी जाण्याची गरज वाटली नाही. हे काय चालले आहे ? पोलीस महासंचालक जर या पध्दतीने वागत असतील, जी सक्षम यंत्रणा पोलीस महासंचालकांच्या अधिपत्याखाली आहे, नियंत्रणाखाली आहे तेच जर त्या ठिकाणी जाऊन चौकशी करीत करीत नाहीत आणि मुंबईमध्ये राहून ते रिपोर्ट देणार असतील तर त्यातून नक्षलवादाचेच नाव पुढे येणार आणि सरकार अडचणीत येणर. माझी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना आणि सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे. पोलीस महासंचालक त्या ठिकाणी का गेले नाहीत ? मला आठवते की, दहा बारा वर्षापूर्वी या सभागृहामध्ये असाच प्रसंग आला होता.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. शरद रणपिसे....)

त्यावेळचे पोलीस महासंचालक आणि गृह खात्याचे सचिव यांच्यामध्ये आय.ए.एस. श्रेष्ठ की आय.पी.एस.श्रेष्ठ असा वाद सुरु होता. मी त्यावेळीही विधानपरिषदेचा सदस्य होतो. या विषयावर रात्री 1.00 वाजेपर्यन्त सभागृहाचे कामकाज चालले. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांनी सांगितले की, पोलीस असो अथवा पॅरा मिलिटरी फोर्स असो, या सर्वांवर सिव्हिल सर्व्हण्टचे नियंत्रण राहील. या प्रमाणे पोलिस महासंचालकांनी घडलेल्या घटनांचा रिपोर्ट गृह सचिवांना दिला पाहिजे आणि गृह सचिवांनी तो रिपोर्ट मुख्य सचिवांना दिला पाहिजे. जर प्रशासकीय यंत्रणा या पध्दतीने काम करीत नसेल तर साहजिकच शंकेची सुई राज्यकर्त्यांवरच जाणार. मी सन्माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी मुख्य सचिवांना सांगावे की, ज्याला घोड्यावर बसायचे आहे त्याची मांड पक्की असली पाहिजे. गृह खात्याच्या सचिवांचे नियंत्रण पोलिस महासंचालकांवर असले पाहिजे. हे नियंत्रण सुटल्यामुळे परिस्थिती प्रक्षोभक बनून तिचा भडका उडाला.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. ॲट्रॉसिटी कायद्याचा जसा चांगला परिणाम झालेला आहे तसा या कायद्याचा गैरवापर झालेला आहे हेही मी नाकारीत नाही. जागतिक स्तरावर सुरु असलेला दहशतवाद आणि खैरलांजीतील दहशतवाद यांची तुलना केली तर जागतिक दहशतवादाला लाजवील अशा प्रकारचा खैरलांजीतील दहशतवाद आहे. ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत जो आयोग केलेला आहे त्या आयोगामार्फत योग्य त्या सुधारणा करुन दहशतवादाला आळा घालण्यासाठी जे जे काही कायदे करावे लागतील ते सर्व कायदे करुन त्यांचा ॲट्रासिटी ॲक्टमध्ये समावेश करावा अशी सूचना करुन आणि भोतमांगे कुटुंबातील मृत्य व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणावर आज आणि काल दोन दिवस चर्चा झाली. उद्या 6 डिसेंबर असल्यामुळे लक्षावधी लोक मुंबईकडे निघालेले आहेत. नागपूरमध्ये मोर्चा निघू नये म्हणून वेगवेगळे तंत्र आणि मंत्र वापरण्यात आल्याचे चित्र दिसते. खैरलांजी घटनेचे गांभीर्य फार आहे. या घटनेचा निषेध करावा तितका थोडाच आहे. इंदापूर तालुक्यातील भीमाई आश्रमशाळेवर दरोडेखोरांनी दरोडा टाकला आणि दलित महिलेवर अत्याचार केला. त्या प्रकरणातील आरोपी अजून सापडलेले नाहीत. दुसरे प्रकरण म्हणजे मनोरमा कांबळे या दलित मुलीची केस अजून प्रलंबित आहे. संपूर्ण विदर्भ आणि महाराष्ट्रामध्ये या घटनेचे पडसाद उमटले होते. विदर्भामध्येही या घटनेचा वारंवार उल्लेख केला होता. या घटनांमुळे दलितांच्या मनामध्ये वैफल्याची, नैराश्येची आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. खैरलांजी प्रकरणी देखील न्याय मिळत नाही हे पाहून दलितबांधवांच्या भावनांचा विस्फोट झाला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अंकिता लांजेवार यांचा उल्लेख केला. कोठेवाडी प्रकरणी मात्र न्याय मिळू शकला. गुन्हा नोंदविण्यास पोलीस स्टेशनला गेल्यावर पोलीस यंत्रणा गुन्हा का नोंदवून घेत नाही ? याचा गांभीर्याने विचार कण्याची गरज आहे. एका मंत्र्यांचा किंवा संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा मागून हा प्रश्न सुटणार नाही. सोलापूर जिल्हयामध्ये एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. उत्तमप्रकाश खंदारे यांनी त्या महिलेला संरक्षण देण्याची पोलिसांना विनंती केली असतांना देखील त्या महिलेला संरक्षण् मिळाले नाही.

....नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

शेवटी तिची धिंड निघाली. या खैरलांजी प्रकरणामध्ये पोलीस स्टेशनमध्ये जाऊन संरक्षण मागितले गेले असताना ते मिळाले नाही. कोठेवाडी प्रकरणात पोलिसांना बोलावले असता आमच्या जीपमध्ये पेट्रोल नाही त्यामुळे येऊ शकत नाही असे उत्तर मिळाले. संरक्षणाच्या दृष्टीने सक्षम पोलीस यंत्रणा का उभारु शकत नाही? यामुळे समाजातील कोणत्याही घटकाला संरक्षण देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. बलात्कार झाल्याचे उल्लेख वारंवार सदनामध्ये होतात. अनेक लोकांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या असल्यामुळे ते त्या संदर्भात माहिती देत आहेत. 376 कलम लावले की नाही? या प्रकरणाची स्थिती काय आहे? याबाबत सदनामध्ये स्पष्टपणे भूमिका मांडली पाहिजे. बलात्काराचे कलम अजूनही लावले नाही. काही वृत्त वाहिन्यांनी खैरलांजीमध्ये जाऊन चित्रण केले, त्यांच्याकडे पुरावे आहेत असे म्हटले जाते. वृत्तपत्रांमध्ये देखील उल्लेख आलेला आहे. झी न्यूजकडे बातमी आहे. त्याचा पुरावा म्हणून उपयोग केला की नाही याची विचारणा होणे आवश्यक आहे. घटना घडल्यानंतर 8 ऑक्टोबरला विधीमंडळाच्या महिला हक्क व कल्याण समितीने देखील शासनाकडे विचारणा केली होती. भंडाऱ्याच्या एस.पी.नी या प्रकरणी काय कारवाई केली याची माहिती कळवावी. विधीमंडळाची समिती असून देखील आम्हाला उत्तर मिळाले नाही ही वस्तुस्थिती आहे. या सगळया परिस्थितीत स्पष्टपणे दिसते की, शासन कोणत्या प्रकारचा गुन्हा आहे याला सारख्या प्रवाहाने गांभीर्य देत नाही. भिवंडीला पोलिसांची हत्या झाल्यानंतर त्यांना किती नुकसानभरपाई दिली गेली? प्रविण राऊत याचा अमरावतीला पोलीस गोळीबारात मृत्यू झाल्यानंतर त्याला नुकसानभरपाईची रक्कम वेगळी. गोळीबारामध्ये जखमी झालेल्या दलित कार्यकर्त्याला वेगळी रक्कम. ज्या दलित पोलिसाचा भिवंडीमध्ये मृत्यू झाला त्यांना नुकसानभरपाईची वेगळी रक्कम. असे माणसा-माणसांच्या मृत्यूबद्दल नुकसानभरपाईची रक्कम जातीधर्मानुसार वेगवेगळी द्यावयास लागली तर शेतकऱ्यांच्या शरीराची आणि देहाची किंमत आहे ती दुसऱ्या कोणत्या समाजापेक्षा जास्त किंवा कमी असा संदेश देतो का? म्हणून सत्ताधारी पक्षाचे दुभंगलेले घर आहे, त्याचा परिणाम राजकीय निर्णयावर झालेला दिसतो. दलित संघटनेच्या महिला मंत्रालयात मोर्चा घेऊन गेल्या. त्यामध्ये अनेक साहित्यिक, कार्यकर्ते होते. परंतु त्यामध्ये बारमालक संघटनेच्या युनियनबरोबर काम करणाऱ्या वर्षा काळे गेल्या होत्या. संस्थेच्या नावाने अहवाल येतो की, बारमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती कशी वाईट आहे, म्हणून बार सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

करावेत. केवळ एका विभागाला टार्गेट करण्याऐवजी ॲट्रॉसिटी ॲक्टबद्दल समित्या गठित करावयास पाहिजेत. अशी समिती भंडारा जिल्हयामध्ये कधी गठित झाली? त्या समितीची शेवटची बैठक कधी झाली? प्रत्येक जिल्हयामध्ये अशी समिती गठित करावी व याबद्दल अहवाल द्यावा असे केंद्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोगाने सुचविले होते, याबद्दलची परिस्थिती काय आहे? ॲट्रॉसिटी ॲक्ट समिती गठित करण्याची जबाबदारी महसूल विभाग व सामान्य प्रशासन विभागाची आहे. स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी या समित्या गठित केल्या पाहिजेत. अशा वेळेला ज्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी समिती गठित केली नाही आणि जे मुख्यमंत्री 42 दिवसांनी खैरलांजीला गेले त्याबद्दल अभिनंदन केले हे अनाकलनीय आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. खैरलांजी प्रकरण झाल्यानंतर सगळया पक्षाचे लोक तेथे गेले. मुख्यमंत्री गेले, गृहमंत्री केले. शासनाने जी मदत द्यायची होती ती दिली. परंतु ही जी मदत दिली ती गैर होती का? अभिनंदन नाही करणार तर काय करणार? तुमच्यापैकी कोणी गेले नाही. आमच्यापैकी गेले, त्यांचे अभिनंदन करायचे नाही तर काय करायचे? त्यांना दगड मारायचे का? म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपा करुन मी जे बोललो ते योग्य बोललो, पध्दतशीर बोललो.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राम निकोसे ...

सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात माझ्या भावना अतिशय तीव्र आहेत हे लक्षात घ्या खरे म्हणजे निवडणुका या जाती-धर्मावरुन जिंकल्या जातात. लोकशाहीला हा प्रकार मारक आहे. तुमचे आणि आमचे संबंध चांगले असले पाहिजेत, तुमचे आणि आमचे संबंध चोळीदामनचे असले पाहिजेत. जाती धर्मामध्ये दुरावा असता कामा नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

डॉ. नीलम गो-हे : माननीय गृहमंत्री या घटनेच्या संदर्भात रिप्लाय देणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात महिला अत्याचाराच्या, दलित अत्याचाराच्या संदर्भात समित्या अस्तित्वात आहेत. परंतु या समित्यांच्या आतापर्यंत किती बैठका झालेल्या आहेत याचीही माहिती माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. या संदर्भातील उत्तर माननीय गृहमंत्री देणार नसतील तर त्याचा काही उपयोग होणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. आपण आता या समित्यांचे पुनर्घटन करणार आहात. सर्व पिडीत महिलांना, सर्व दलित संघटनेला एकत्र आणण्याचे काम आणि कृती केली गेली पाहिजे. एखादी घटना एखाद्या गावात घडली तर तीचा अर्थ सगळीकडे तशाच पध्दतीने लावता कामा नये हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. ब-याच वेळा गावामध्ये लाईटवरुन, पाण्यावरुन छोटया छोटया कारणावरुन वादावादी होत असते आणि त्याचा फायदा गावातील समाजकंटक घेत असतात. त्यामुळे अशा पध्दतीचा फायदा गावातील समाजकंटकानी घेऊ नये यासाठी समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत परंतु या समित्यांचे काम चांगल्या प्रकारे होत नाही. जर या कमिटयांचे काम चांगल्या प्रकारे झाले तर अशा घटना कोठेही घडणार नाहीत. खैरलांजीच्या संदर्भात फास्टट्रॅक कोर्ट गठीत झालेले आहे. यासंदर्भात मला एवढेच सांगावयाचे आहे की, भंडारा जिल्हयाचे प्रतिनिधीत्व माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे करीत आहेत. या जिल्हयानेच माननीय कवाडे साहेबांना या ठिकाणी निवडून पाठविलेले आहे. असे असतांना त्या जिल्याहत अशा प्रकारची घटना का होते? याचे त्यांनीआत्मपरीक्षण करण्याची गरज आहे असे मला वाटते.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीची माहिती जाऊ नये यासाठी मी आपल्याला सांगतो की, मी भंडारा जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करीत नाही. सन्माननीय सदस्या या देखील महिला आघाडीच्या नेत्या आहेत त्यांना या घटनेची सर्व माहिती असतांना देखील त्यांनी खैरलांजीला भेट दिलेली नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे.

...2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : माननीय सभापती महोदय, कोठेवाडीमध्ये जेव्हा घटना घडली होती तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. कवाडे साहेबांनी देखील या ठिकाणी कोठे भेट दिली होती? याचा अर्थ माननीय सदस्यांना कोठेवाडीच्या संदर्भात दु:ख झाले नाही असे आम्ही समजत नाही. मी खैरलांजीला भेट दिलेली नाही ही वस्तुस्थिती आहे परंतु मी जर खैरलांजीला भेट दिली असती तरी त्या कुटुंबातील राहिलेले सदस्य श्री. भोतमांगे हे तरी त्या गावात कोठे राहत आहेत? त्याच्या मुंबई आणि दिल्ली अशाच फे-या चालल्या आहेत. हे सर्व माहीत असतांना केवळ त्या गावाला भेट देण्याचे नाटक करावयाचे हे मला जमण्यासारखे नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, दलित अत्याचाराच्या ज्या घटना घडत आहेत त्या थांबल्या पाहिजेत. तसेच भिवंडी येथे ज्या दोन पोलिसांची हत्या करण्यात आली त्या घटना परत होणार नाहीत याचा सुध्दा विचार झाला पाहिजे व प्रकरणाला न्याय मिळाला पाहिजे. खैरलांजीच्या प्रकरणाच्या संदर्भात या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी राजिनामा द्यावा अशी मागणी केली जात आहे परंतु या घटनेमध्ये माननीय गृहमंत्री जेवढे जबाबदार आहेत तेवढेच माननीय मुख्यमंत्री हे सुध्दा जबाबदार आहेत त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांचा देखील राजिनामा मागण्याची आवश्यकता आहे. या घटनेच्या संदर्भात आपल्या बरोबर माननीय शिवसेना प्रमुखांचा आशिर्वाद असून आम्ही सुध्दा आपल्या बरोबर, आपल्या पाठीशी आहोत एवढेच या निमित्ताने सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय हिंद, जय महाराष्ट्र

...3

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

उपसभापती : या प्रस्तावावर अद्याप अजून दोन-चार सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत व त्यानंतर माननीय गृहमंत्री उत्तर देणार आहेत. प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही चर्चा केव्हा घ्यावयाची याबाबत माननीय सभापती निर्णय घेणार आहेत. आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.53 मिनिटांनी दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना न्याय मिळणेबाबत

(1) * 20310 श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री.केशवराव मानकर तारांकित प्रश्न क्रमांक 17339 ला दिनांक 3 जुलै, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने दिनांक 13 जुलै, 2006 रोजी मा.सभापती विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या विधान भवनातील दालनामध्ये संबंधित विभागाचे मंत्री व अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक घेण्यात आली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू बैठकीमध्ये मा.सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार विणकरांना न्याय देण्यासाठी प्रत्येकी रु. 20 हजार स्वेच्छानिवृत्ती योजनेअंतर्गत अनुदान देण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित विभागाने आजतागायत उक्त विणकरांना प्रत्यक्षात अनुदानाचे वाटप केलेले नाही हे खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासन कधीपर्यंत निर्णय घेणार आहे व किती कालावधीत विणकारांना अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे वा करण्यात आले आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. सतीश चतुर्वेदी : (1) होय.

(2) होय.

(3) होय.

(4) व (5) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना स्वेच्छनिवृत्ती देण्यासाठी निधी नियोजन व वित्त विभागाकडून अद्याप उपलबध झालेला नाही. निधी उपलब्ध झाल्यावर वाटप करणे शक्य होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20310....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील अधिवेशनात सुध्दा हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी विचारला होता. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, शक्य असल्यास व निधी उपलब्ध झाल्यास विणकरांना पैसे देण्यात येतील. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना कधी निधी उपलब्ध करुन देणार आहात ? त्यांच्यासाठी निधी उपलब्ध होणार आहे की नाही हे सांगावे. मंत्रिमहोदय फक्त आश्वासन देऊन विणकरांना धत्तुरा देत आहेत....

श्री.जितेंद्र आव्हाड (बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी "धत्तुरा" शब्द वापरला तो असंसदीय आहे, तेव्हा तो शब्द कामकाजातून काढून टाकावा.

सभापती : "धत्तुरा" शब्द संसदीय आहे की असंसदीय आहे हे तपासून तो कामकाजातून काढला जाईल.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने आपल्या दालनात आपण एक मिटींग आयोजित केली होती. त्या मिटींगला मी, वित्तमंत्री तसेच सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी उपस्थित होते. त्या बैठकीत असा निर्णय झाला की, विणकरांची व्ही.आर.एस.ची जी मागणी आहे ती आमच्या विभागाने मान्य केली व त्यांना 20 हजार रुपये देण्याचा निर्णय झाला होता. त्याप्रमाणे आम्ही तशी नोंद घेऊन ती फाईल वित्त विभागाकडे पाठविली आहे. त्यांच्याकडून मंजुरी आल्यानंतर आम्ही पैशाचे वाटप करु. विणकरांना निधी देण्याबाबत आमच्या विभागाकडून कोणतीही अडचण नाही. परंतु वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. निधीची तरतूद वित्त विभागाने करायची असल्यामुळे त्या बैठकीस वित्तमंत्र्यांना बोलाविण्यात आले होते. आम्हाला निधी उपलब्ध झाल्यास आम्ही निधीचे वाटप करु.

सभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विणकरांच्या प्रश्नाबाबत माझ या दालनात दिनांक 13 जुलै 2006 रोजी बैठक झाली होती. त्या बैठक्ीस वित्तमंत्री देखील उपस्थित होते. विणकरांना व्ही.आर.एस.पोटी 20 हजार रुपये देण्याच्या निर्णयास वित्तमंत्र्यांनी अनुकूलता दर्शविली होती. आज हा पहिलाच प्रश्न असल्यामुळे आणि त्यासंदर्भातील उत्तर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20310....

माननीय सभापती.....

वाचल्यानंतर मी वित्तमंत्र्यांशी फोनवर बोललो. मी त्यांना सांगितले की, आपण सांगितल्याप्रमाणे विणकरांसाठी अजून तरतूद उपलब्ध झालेली नाही. " त्यावर त्यांनी सांगितले की, " मी तातडीने तरतूद उपलब्ध करुन देतो".

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,

माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्रिमहोदय शासन म्हणून उत्तर देत आहेत. निधी उपलब्ध नाही असे सांगून प्रश्न सुटत नाही. तसेच आपण निर्देश दिल्यानंतर वित्तमंत्र्यांनी निधीची तरतूद उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती.

सभापती : मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना ते परिपूर्ण दिले पाहिजे. प्रश्नाचे उत्तर देण्याअगोदर संबंधित विभागाशी चर्चा करुन त्याप्रमाणे उत्तर दिले पाहिजे. मी पुन्हा सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या दालनात बैठक झाली होती. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये हा पहिलाच प्रश्न होता. त्या प्रश्नाचे उत्तर वाचल्यानंतर मी वित्तमंत्र्यांशी फोनवर बोललो. त्यावर त्यांनी मला सांगितले की, याबाबतीत तरतूद करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.पुरी...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आज प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमातून वेगळीच माहिती उपलब्ध झालेली आहे. खरे म्हणजे याठिकाणी आमची तर फसवणूक झालेलीच आहे, परंतु आपलीही फसवणूक होत आहे, हे योग्य नाही. आपल्या दालनामध्ये झालेल्या बैठकीच्यावेळी माननीय वित्त मंत्री, माननीय वस्त्रोद्योग मंत्री उपस्थित होते, त्यावेळी यासाठी माननीय वित्त मंत्र्यांनी 20 कोटी रुपये देतो असे कबूल केले होते. आता हा प्रश्न सुटला म्हणून मी बाहेर पडलो. यामध्ये वस्त्रोद्योग मंत्र्याचा दोष नाही. परंतु यामध्ये वित्त विभागाने आता नवीन खुट्टी मारलेली आहे. हे पैसे नियोजन विभागाच्या मंत्रिमंडळ उप समितीची मान्यता घेऊन देऊ, असे म्हटलेले आहे. ही नवीन उप समिती कोणती ? ती कशाकरिता आहे ? माननीय सभापती महोदयांच्या दालनमाध्ये ठरल्यानंतर वित्त मंत्र्यांनी अशाप्रकारची खुट्टी मारण्याची आवश्यकताच नव्हती. आज विणकर लोक आत्महत्या करीत आहेत. त्यांच्या अंगावर साधे कपडेही नाहीत, याबाबतची माहिती माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना आहे. असे असतानाही आपण असे का करीत आहात ? माननीय वित्त मंत्र्यांनी सदर फाईलमध्ये असा शेरा मारला आहे की, पैसे देण्याच्या बाबतीत पहिल्यांदा उप समिती निर्णय करेल. माननीय सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये ठरल्यानंतर, नियोजन सचिवांनी कबूल केल्यानंतर व त्यास माननीय वित्त मंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतरही अशाप्रकारचे नवीन घोंघडे का घालण्यात येत आहेत ? त्यामुळे याबाबतीत माझी विनंती आहे की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांची व आपली प्रतिष्ठा म्हणून हे अधिवेशन संपण्याच्या आत हा निधी रिलिज करावा अशाप्रकारचे निर्देश आपण शासनाला द्यावेत. हे आपल्याशी अशाप्रकारचा घाणेरडा खेळ खेळतात, हे योग्य नाही. त्यामुळे याबाबतीत आपण शासनाला निर्देश द्यावेत, ही नम्र विनंती.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी सूचना केली आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, याबाबतीतील निधी देण्याबाबत नानाप्रकारच्या अडचणी व अडथळे वित्त विभाग उपस्थित करीत आहे. ठरल्यानंतर व या सभागृहाची हाय ऑथॉरिटी आपण असतानाही व आपल्या समक्ष हे झाल्यानंतरही अशाप्रकारची वृत्ती घृणास्पद आहे. त्यामुळे याबाबतीत आपण एक तर क्लिअर आदेश द्यावेत किंवा हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा. न्याय मिळण्याच्यादृष्टीने मागणी होत असताना अशाप्रकारची घाणेरडी मनोवृत्ती सातत्याने होणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे, असे मला वाटते.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20310...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये ज्यावेळी बैठक झाली त्यावेळी त्या बैठकीस माननीय वस्त्रोद्योग मंत्री व माननीय वित्त मंत्री उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे वस्त्रोद्योग विभागाने तसा प्रस्तावही वित्त विभागाकडे पाठविला. एवढे सर्व झाल्यानंतर व माननीय सभापती महोदयांनी आदेश दिल्यानंतरही सरकार नीट वागत नसेल तर याबाबतीत आपण गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. आज नागपूरच्या भूमीमध्ये अधिवेशन होत असून हा प्रश्न नागपूर मधील आहे. गेल्या 5-6 महिन्यांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे याबाबतीत माझी विनंती आहे की, हा प्रश्न एकतर राखून ठेवावा अथवा सदरचे पैसे त्या लोकांना माननीय वित्त मंत्री किती दिवसात देणार याचे उत्तर त्यांनी द्यावे.

सभापती : या प्रश्नाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, प्रा.बी.टी.देशमुख, गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याअनुषंगाने मी मघाशी हा प्रश्न पाहिल्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांशी याबाबतीत बोललो. त्यांना मी सांगितले की, या प्रश्नाबाबत माझ्या दालनात चर्चा झाली होती, त्यावेळी असा निर्णय झाला होता की, या हातमाग कामगारांना निवृत्तीवेतन द्यावे व हा प्रश्न मानुसकीच्या दृष्टीने पहावा. परंतु या उत्तरावरुन असे दिसत आहे की, अद्यापि हा प्रश्न अनिर्णितच आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्यांच्या भावना शासनाच्या नजरेस येण्याच्या दृष्टीने निदेश देतो की, अधिवेशन संपण्याअगोदर या बाबतीतील निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी अर्थ विभागाने घ्यावी तसेच, वस्त्रोद्योग विभागाने त्याचा पाठपुरावा करावा.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प टप्पा क्रमांक ३ व ४ मधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

(२) * २३४३९ डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १८५९५ ला दिनांक १७ जुलै, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील तारापूर अणुऊर्जा प्रकल्पातील १२५० प्रकल्पग्रस्तांच्या घरांची बांधकामे पूर्ण करण्यात आली आहे काय,

(२) उक्त प्रश्नी घरांची बांधकामे अपूर्ण असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी प्रकल्पग्रस्तांच्या घरांची बांधकामे लवकरात लवकर पूर्ण केली जावीत यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री.राजेंद्र शिंगणे, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता : (१) मा. उच्च न्यायालय रिट याचिका ५६६३/०४ चे सुनावणीचे आदेशाप्रमाणे आखून दिलेल्या मुदतीमध्ये घरांची बांधकामे पूर्ण करावयाची कार्यवाही चालू आहेत.

(२) मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १४.७.२००६ व २१.८.२००६ रोजीचे सुनावणीचे आदेशानुसार २ ऑक्टोंबर, २००६ पूर्वी ४०० घरे पूर्ण करण्याची होती. त्याप्रमाणे एकूण ४०८ निवासी वापरयोग्य घरे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ८४२ घरे २६ जानेवारी २००७ पूर्वी बांधून पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, पुनर्वसनासंबंधी शासनाचा कायदा आहे आणि प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकडे किती दुर्लक्ष होत असते, हे आपण पाहतो. तारापूर अणुऊर्जा प्रकल्पातील टप्पा क्रमांक 3 व 4 मधील प्रकल्पग्रस्तांना उच्च न्यायालयात जावे लागले. उच्च न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे 2 ऑक्टोबर 2006 पूर्वी 400 घरे बांधून दिली त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. पुनर्वसनाच्या प्रश्नांमुळे खैरलांजीसारखी प्रकरणे घडत असतात. रस्त्यांच्या कामाकरिता, कालव्यांकरिता लोकांच्या जमिनी जातात, यामुळे अशी प्रकरणे घडतात. या प्रकल्पग्रस्तांना 842 घरे 26 जानेवारी 2007 पूर्वी बांधून देण्याचे आश्वासन उत्तरामध्ये दिलेले आहे. जर 26 जानेवारी, 2007 पर्यन्त घरे बांधून झाली नाही तर शासन संबंधित बांधकाम कंत्राटदारावर कोणती कारवाई करणार ? आणि प्रकल्पग्रस्तांना कसा न्याय देणार आहे ? हा माझा प्रश्न आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23439.....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तारापूर अणुऊर्जा प्रकल्प, टप्पा क्रमांक 3 व 4 मुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. माननीय उच्च न्यायालयाने जे निदेश दिलेले आहेत त्या निदेशांचे पालन पुनर्वसन करतांना करण्यात येत आहे. या निदेशानुसारच 1250 प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे बांधकाम करणार आहोत. न्यायालयाने जे निदेश दिलेले आहेत त्यामध्ये तारखा ठरवून देण्यात आलेल्या आहेत व त्याप्रमाणे ही घरे बांधून द्यावयाची आहेत. आतापर्यन्त ठरवून दिलेल्या तारखानुसार बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. 26 जानेवारी 2007 पूर्वी सर्व घरे बांधून द्यावयाची आहेत. उर्वरित घरे 26 जानेवारी 2007 पूर्वी निश्चितपणे बांधून पूर्ण होतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, डॉ.वसंत पवार यांनी जो मुद्दा मांडला आहे तो महत्वाचा आहे. अनेक नवीन प्रकल्प येतात, या प्रकल्पांना कोकणातील लोक विरोध करतात अशी टीका तेथील लोकांवर होत असते. मुळात तेथील जनतेला कोर्टात गेल्याशिवाय न्याय मिळत नाही, याही प्रकरणी कोर्टात गेल्यानंतरच न्याय मिळालेला आहे. सन्माननीय श्री.रामभाऊ नाईक यांनी त्या ठिकाणी अनेक वर्षे आंदोलन चालविले. या ठिकाणी उत्तरात दिले आहे की, 408 निवासी वापरयोग्य घरे बांधून पूर्ण झाली आहेत. या वापरयोग्य घरांमध्ये प्रकल्पग्रस्त रहावयास गेले आहेत काय ? रहावयास गेली नसतील तर का गेले नाहीत ? वीज व पाणीपुरवठा होत नसल्यामुळे लोक रहावयास गेलेली नाहीत. 26 जानेवारीपर्यन्त उर्वरित घरे बांधून पूर्ण करावयाची आहेत. त्यांना दरमहा 2500 रुपये भाडे दिले पाहिजे, असे कोर्टाचे निदेश आहेत. सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर या महिन्याचे भाडे या लोकांना देण्यात आलेले आहे काय ? प्रकल्पग्रस्त अल्पभूधारकांना उदरनिर्वाह भत्ता म्हणून रुपये 300/-, 500/- व आदिवासींना दुप्पट द्यावयाचा आहे. ही रक्कम त्यांना देण्यात आलेली आहे काय ? हा भत्ता ॲटोमिक एनर्जी या संस्थेकडून देण्यात येणार आहे काय ?

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23439.....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, जवळपास 300 प्रकल्पग्रस्तांनी घरांचा ताबा घेतलेला आहे. उर्वरित घरांचा ताबा देण्याची कार्यवाही सुरु आहे. वापरयोग्य आहे असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी वीज व पाणीपुरवठा त्या ठिकाणी असते. त्यामुळे या सर्व सुविधा त्या ठिकाणी दिल्यानंतरच त्यांनी ताबा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे 2500 रुपये घरभाडे देण्यात येते. ज्यांनी घरांचा ताबा घेतलेला नाही त्यांना घरभाडे देण्याची कार्यवाही सुरु आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23439....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हे माझे जन्मगाव आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, शासनाने स्वत:हून कोणतीही पावले उचललेली नाहीत. प्रकल्पग्रस्तांना भाडे घेण्यासाठी कोर्टामध्ये जावे लागले. वापरयोग्य घरे बांधून पूर्ण झालेली आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु घरे वापरयोग्य झालेली नाहीत. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, यातील दोन कुटुंबे अशी आहेत की, त्यांचा समावेश प्रकल्पग्रस्तांच्या यादीमध्ये करण्यात आलेला नाही. ते गरीब आहेत. शासन त्यांचा प्रकल्पग्रस्तांच्या यादीमध्ये समावेश करणार आहे की नाही ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, घरातील सोई पूर्ण झालेल्या असल्यामुळे 300 लोक तेथे राहण्यासाठी गेलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी 2 कुटुंबांचा उल्लेख केला. तपासणी करुन त्यांना यामध्ये घेण्यात येईल आणि योग्य न्याय देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 300 प्रकल्पग्रस्त लोकांनी घरांचा ताबा घेतलेला आहे. 408 घरांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. मग 108 घरांचा ताबा देण्याची कार्यवाही शासनाला अजून पर्यंत का पूर्ण करता आली नाही ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, जी घरे बांधण्यात आलेली आहेत त्या घरांमध्ये सर्व प्रकल्पग्रस्तांनी राहण्यासाठी गेले पाहिजे, सर्व प्रकल्पग्रस्तांनी घरांचा ताबा घेतला पाहिजे यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. परंतु घराचा ताबा घेतल्यानंतर दरमहा 2500/- रुपये घरभाडे मिळणे बंद होईल म्हणून त्यातील काही प्रकल्पग्रस्त तेथे राहण्यास जात नाहीत. अशा तक्रारी शासनाकडे आलेल्या आहेत. ते लोक मुंबईमध्ये राहतात. शासनाचा असा प्रयत्न आहे की, सर्व प्रकल्प ग्रस्त तेथे राहण्यास गेले पाहिजेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे विनोद झालेला आहे. हा प्रकल्प कोठे आहे आणि त्यांना पर्यायी घरे कोठे देण्यात येत आहेत ? मंत्री महोदय सांगतात की, ते लोक मुंबईमध्ये राहतात. त्यांना मुंबई सोडून तेथे राहण्यास जावेसे वाटत नाही. त्यांना दरमहा 2500/- रुपये घरभाडे मिळते. घराचा ताबा घेतला तर घरभाडे मिळणार नाही म्हणून ते लोक तेथे राहण्यास जात नाहीत असे मंत्री महोदयांनी सांगितले. प्रकल्पग्रस्त तेथील स्थानिक आहेत. प्रकल्प आला म्हणून ते प्रकल्पग्रस्त झाले. शासनाने

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23439....

श्री.मधुकर सरपोतदार .....

त्यांना घरे बांधून दिली. पण प्रकल्पग्रस्तांनी तेथे राहण्यास जावे असे शासनाला सांगावे लागत आहे. याचे कारण असे आहे की, शासनाने निर्माण केलेली निवासस्थाने राहण्यासाठी योग्य नाहीत. वीज आणि पाणी त्यांना उशिरा मिळाले ही वस्तुस्थिती आहे. शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. तेथे राहणा-या लोकांना रोजगार कसा मिळेल याचे उत्तर आपण शोधलेले नाही. त्यांना घरे बांधून दिली म्हणजे ते तेथेच राहणार आहेत हे आपण मान्य करता. कोणताही प्रकल्प हातामध्ये घेतांना प्रथम प्रकल्पग्रस्तांची व्यवस्था करावी, त्यांना निवासस्थाने बांधून द्यावीत, त्यांचे पुनर्वसन करावे व त्यानंतरच प्रकल्प हाती घ्यावा असा निर्णय झालेला असतांना सुध्दा निष्काळजीपणा दाखविला जातो, बेजबाबदारपणा दाखविला जातो. या प्रश्नासंदर्भात शासनाकडून अशा प्रकारे अनास्था का घडावी ? असा माझा शासनाला प्रश्न आहे.

यानंतरा श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 23439 ...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प हा एक अतिशय महत्त्वाकांक्षी व मोठा प्रकल्प असून हा केंद्र सरकारचा आहे. आता येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त कोर्टामध्ये गेले होते, मग ते घरांच्या बाबतीत असतील वा जमिनींच्या बाबतीतील असतील आणि न्यायालयानेही वेळोवेळी यामध्ये जे निर्णय दिले आहेत त्यानुसारच तेथे त्यांचे काम चालू आहे. हे काम चालू असताना 1250 घरांचे काम तेथे आपण करीत आहोत आणि टप्प्याटप्प्याने लोक तेथे जाऊन रहात आहेत. 26 जानेवारीपर्यंत या सगळ्या घरांचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन आपण न्यायालयाला दिलेले आहे. त्या ठिकाणी ज्या कंत्राटदारांनी हे घरांचे काम घेतले आहे त्यांच्याकडून 8-10 दिवसात त्या घरांचे काम वेळेत पूर्ण होते आहे की नाही हे पाहण्याचे काम आपले अधिकारी करीत आहेत. तेव्हा वेळेमध्ये हे काम पूर्ण करण्याचाच आपला प्रयत्न असून न्यायालयाच्या निर्देशांचे पालन कसे होईल या दृष्टीने शासन निश्चितपणे प्रयत्नशील आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. त्यांच्या निवासस्थानांचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यातील काही निवासस्थाने पूर्ण झालेली आहेत तर काही पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. हे जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना प्रकल्पग्रस्त भत्ता 300 रूपये किंवा 500 रूपये देण्यात येतो आणि आदिवासींना दुप्पट दिला जातो. तर हे भत्ते त्या प्रकल्पग्रस्तांना दिले जात आहेत काय ? असल्यास, ते कोणाकडून दिले जात आहेत ? म्हणजे शासनाकडून दिले जात आहेत की, अणू ऊर्जा प्रकल्पाकडून दिले जात आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या संदर्भातील सर्व काही खर्च करण्याचे काम मग ते भत्ता देण्याचा वा अन्य कोणताही मोबदला देण्याचे काम असो, तेथील प्रकल्प यंत्रणा म्हणजे तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प कंपनी करीत आहे आणि सर्व प्रकारचे भत्ते देण्याचे काम तेथे चालूच आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एक गंभीर प्रश्न आहे. या प्रकल्पावरील एका पुस्तकाचे प्रकाशन मी केलेले होते त्यामुळे मला या प्रश्नाची चांगल्या प्रकारे माहिती आहे. यातील एक गंभीर प्रश्नाची दखल शासनाने अजूनही घेतलेली नाही असे माझे मत आहे. अडीच हजार कोटी रूपयांचा हा प्रकल्प आहे आणि त्यामध्ये 60 ते 65 कोटीच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. यातून

..... व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्राला देखील वीज मिळणार आहे परंतु यामध्ये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होण्यामध्ये मोठा विलंब झाल्यामुळे ही वीज जी महाराष्ट्राला मिळणार होती ती अजूनही मिळालेली नाही. हा सारा खर्च प्रकल्प करणार आहे मात्र त्यासाठी जी एजन्सी आहे ती महाराष्ट्र सरकारचा विभाग आहे. पण या विभागाच्या गलथानपणामुळे अजून यातील वीज महाराष्ट्राला मिळालेली नाही. यातून महाराष्ट्राचे आणि पर्यायाने देशाचे देखील मोठे नुकसान झालेले आहे व होत आहे. तेव्हा आतारी तुम्हाला यामध्ये काही बदल व्हावा असे वाटत नाही का ? पुनर्वसनाच्या बाबतीत आपण पटापट विचार करणार आहात की नाही ? 60 कोटी रूपयांच्या पुनर्वसनासाठी 700 कोटीचे नुकसान आपण करीत आहात. तेव्हा त्यात सुधारणा आपण करणार आहात की नाही ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांची नोंद निश्चितपणे घेतली जाईल आणि याबाबतीत अधिक काही करता येईल काय हेही पाहिले जाईल. कारण यामध्ये न्यायालयाच्या निर्देशानुसारच काम तेथे सुरू आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अतिशय खेदाने सांगावेसे वाटते आणि मी नेहमीच एक्झिक्युटिव पॉवर्स न्यायालयाने घेण्याच्या विरोधामध्ये बोलतो. पण सध्या तरी उच्च न्यायालय हे पुनर्वसन मंत्रालय झालेले आहे. ....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थेट प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी मघाशी असे सांगितले की, या प्रकल्पग्रस्तांना उदरनिर्वाह भत्ता देणे चालू आहे. पण माजी केंद्रीय मंत्री श्री.राम नाईक यांना या संबंधात जे पत्र केंद्राकडून आलेले आहे त्यात स्पष्ट म्हटलेले आहे की, याबाबत विचार करीत आहोत, देणे सुरू नाही. म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, या प्रकल्पग्रस्तांना भत्ता देणे सुरू आहे काय ? दुसरे असे की, आताच आपल्यासमोर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 2500 रूपयांचे भाडे जे दिले जाते ते बंद होऊ नये म्हणून प्रकल्पग्रस्तांकडून प्रयत्न होत आहे, तसा त्यांनी आरोप त्यांच्यावरकेलेला आहे. पण त्यांची मुले शाळांमध्ये जात आहेत असे असताना ते नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मध्येच कसे काय येथून सोडून जातील.

..... व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी मघाशीच या सगळ्याच गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी आता सांगितले त्याप्रमाणे ही बाब मी तपासून घेतो आणि निश्चितपणे तसे होत नसेल तर त्या गोष्टी सुरू होतील. मग त्या भत्त्याच्या बाबतीत असतील वा अन्य कोणत्याही बाबतीत असतील.

सभापती : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात सदनाच्या भावना अशा आहेत की, ज्या ज्या ठिकाणी असे प्रकल्प होत आहेत तेथे जे लोक प्रकल्पग्रस्त होतात त्यांचे तातडीने आणि व्यवस्थितरित्या पुनर्वसन व्हावे म्हणून राज्य स्तरावर जी एक ॲथॉरिटी आपण निर्णय केलेली आहे तिच्या माध्यमातून हा निर्णय होणे गरजेचे आहे. ...

(यानंतर श्री.सरफरे ... डब्ल्यू 1

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत आपण उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलो तर सामान्य माणसाला न्याय मिळणार नाही, तेव्हा याबाबतीत आपण पहावे. हे अधिवेशन संपल्यानंतर आपण सन्माननीय सदस्यांना सोबत घेऊन तारापूर येथील प्रकल्पग्रस्तांच्या विभागामध्ये जाऊन त्याठिकाणी कोणकोणत्या उणीवा आहेत, त्या उणीवा कशा दूर होतील यासाठी प्रयत्न करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके पूर्ववत सुरु करण्याबाबत

(३) * २०३११ श्री. श्रीकांत जोशी , श्री.सय्यद पटेल , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. दिवाकर रावते , डॉ. दिपक सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री. अनिल परब , श्री. रामनाथ मोते तारांकित प्रश्न क्रमांक १७६८२ ला दिनांक ३ जुलै, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक चालु करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांसमवेत १५ दिवसात बैठक घेण्यात येईल असे आश्वासन सहकार राज्य मंत्री यांनी जुलै २००६ च्या पावसाळी अधिवेशनात दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हया आश्वासनानुसार मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी बरोबर बैठक घेतली आहे काय,

(३) एम.एस.सी. बँक, नाबार्ड व महाराष्ट्र राज्य यांनी किंवा इतर वित्तीय संस्थांनी आर्थिक मदत केली आहे काय,

(४) असल्यास, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पूर्ववत चालू होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरीता : (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहाकरी बँकेच्यावतीने नाबार्डला रु.२०० कोटीची थकहमी देणे व रु.२० कोटीचे शासकीय भागभांडवल उपलबध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा तारांकित प्रश्न मागील अधिवेशनात मांडण्यात आला होता, त्यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये सुध्दा मांडण्यात आला होता. प्रत्येकवेळी तेच तेच उत्तर दिले जात आहे, आणि उत्तर देणारे मंत्री सुध्दा तेच आहेत. यांची गाडी काही पुढे सरकत नाही. त्या बँकेच्या संचालकांवर आपण ठोस अशी कारवाई कां करीत नाही? त्यामध्ये अडचण काय आहे? आपल्याला कारवाई करण्यामध्ये अडचण काय आहे हे एकदा मोकळेपणे सांगा? कारण या बँकेमध्ये लोकांचे करोडो रुपये अडकले आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

* २०३११ ...

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ही बंद असलेली बँक सुरु करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे...

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : हेच उत्तर आपण आम्हाला कितीवेळा सांगत आहात?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या बँकेची आर्थिक परिस्थिती बिघडलेली आहे . या बँकेचे 87 टक्के एन.पी.ए. डिपॉझीट आणि 57 टक्क्याच्या जवळपास डी.पी.इरोझन आहे. 200 कोटींची बँक गॅरंटी राज्य सहकारी बँकेला देऊन वित्त पुरवठा पुन्हा सुरु व्हावा यासाठी राज्य सरकारने हमी दिली होती. परंतु राज्य सहकारी बँकेची पूर्वीची थकबाकी जास्त असल्यामुळे सर्व हिशेब पाहून राज्य सहकारी बँकेला ही रक्कम परत मिळेल की नाही याबाबत साशंकता वाटल्यामुळे राज्य सहकारी बँकेने वित्त पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली. त्यानंतर बँकेचे अधिकारी औरंगाबाद येथे माननीय श्री.शरद पवार साहेबांना भेटले. त्यावेळी माननीय श्री. पवार साहेबांनी याबाबतीत दिल्ली येथे नाबार्डबरोबर...

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

सभापती : माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे...

(गोंधळ)

सभापती : आपण सर्वजण उभे राहून एकाच वेळी प्रश्न विचारणे बरोबर नाही. आपण पहिल्यांदा खाली बसावे...

प्रा.जोगेंद्र कवाडे : बँकेच्या या डबघाईला जबाबदार कोण आहे?

(गोंधळ)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : नामदार कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बँकेचे अधिकारी व सरकारचे प्रतिनिधी यांची नाबार्डबरोबर बैठक झाली...

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

सभापती : आपण सर्वजण उभे राहून एकाच वेळी बोलणे बरोबर नाही. आपल्याला प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही. आपणास प्रश्न विचारण्यास मी परवानगी देतो. परंतु त्यापूर्वी मंत्रिमहोदयांना आपले उत्तर पूर्ण करु द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या बँकेचे संचालक कोण आहेत?

श्री. नितीन गडकरी : राज्य सहकारी बँकेने या बँकेचे प्रपोजल रिजेक्ट केले त्यामध्ये नाबार्डचा संबंध काय? मंत्रिमहोदय काहीही उत्तर देत आहेत? सभापती महोदय, आपण देखील सहकार मंत्री होता...

सभापती : मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. परंतु सर्वांनी उभे राहून एकाच वेळी प्रश्न विचारले तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. आपणापैकी एकाने प्रश्न विचारल्यास मी परवानगी देतो. मंत्रिमहोदयांनी देखील जेवढा प्रश्न विचारला असेल तेवढेच उत्तर द्यावे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, शासनाने काय कारवाई केली आहे त्या संदर्भात मी सांगितले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20311 (पुढे सुरू....

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पुढे सुरु..

20 कोटी रुपये राज्य शासनाने भागभांडवल द्यावे आणि राज्य शासनाच्या गॅरंटी नंतर 200 कोटी नाबार्ड बँक फायनान्स करणार आहे. त्यानंतर वित्त पुरवठा होऊ शकेल. त्या दृष्टीने मंत्रीमंडळासमोर गॅरंटीचा प्रस्ताव ठेवला जाणार आहे, ती गॅरंटी देऊन नाबार्डकडे प्रस्ताव सादर केला जाईल आणि त्यानंतर बँक पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : गेल्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये निवेदन केले होते की, पोलिसांच्या संदर्भातील कारवाई करू नये अशाप्रकारची कारवाई नियम 88 खाली कारवाईस कोर्टाकडून स्थगिती दिला गेलेला होता. ती स्थगिती उठविण्यासाठी आपण काय कारवाई केली ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर: नियम 88 च्या कारवाईच्या संदर्भात काही लोक न्यायालयात गेले. दरम्यान राज्य शासनाने बँकेचे रिऑडीट केले जाणार आहे, या कारणासाठी एका संचालकाला नियम 88 च्या कारवाईमधून स्थगिती दिली. स्थगिती दिली या कारणावरुन काही संचालक पुन्हा न्यायालयात गेले. न्यायालयाने योग्य त्या ठिकाणी पुन्हा दाद मागावी असे सांगितलेले आहे.

डॉ.वसंत पवार : माननीय राज्य मंत्री महोदयांनी नांदेड मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात 87 टक्के एन.पी.अे. आहे. 57 टक्के डिपॉझिटचे इरोजन झालेले आहे. चुकीचे अग्रीमेंट केले म्हणून शासन संबंधितांवर कारवाई करत नाही. वैद्यनाथन कमिटीने सरकारबरोबर ॲग्रीमेंट करायचे ठरविलेले होते. 11 राज्यांनी आर.बी.आय.बरोबर ॲग्रीमेंट केलेले आहे. महाराष्ट्र सरकार टास्क फोर्स स्थापन करण्याच्याबाबतीत ॲग्रीमेंट करणार आहे. परंतु अजूनही शासनाने ते केलेले नाही. आर.बी.आय.बरोबर ॲग्रीमेंट केले तर आता जो गैरकारभार होतो आणि बँक बंद पडते, त्याबाबतीतील त्यांच्याकडून तपासणी चांगल्या प्रकारे होऊन योग्य ती कारवाई करता येऊ शकेल. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन त्या ॲग्रीमेंटवर सही करणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : वैद्यनाथन समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या आहेत. त्या संदर्भातील कराराची कार्यवाही चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.20311 (पुढे सुरु...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा मुख्य प्रश्न असा आहे की, पहिला प्रश्न विचारलेला आहे की, मुख्यमंत्र्यांच्या समवेत 15 दिवसात बैठक घेण्यात येईल असे जुलै 2006 च्या पावसाळी अधिवेशनात आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "होय", असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर पुढचा उपप्रश्न विचारलेला होता की, या आश्वासनानुसार मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्यातील लोकप्रतिनिधीबरोबर बैठक घेतली आहे काय ? या उपप्रश्नाला "नाही", असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे 15 दिवसामध्ये बैठक का घेतली नाही ? आता मंत्रीमहोदय सांगतात की. 88 च्या नियमाखाली करवाई करण्यास स्थगिती दिलेली आहे. परंतु 19 जुलैला दिलेल्या उत्तरामध्ये स्थगिती फक्त फौजदारी कारवाई करण्याविषयी आहे. नियम 88 च्या कारवाईला स्थगिती दिलेली नाही. मग नियम 88 प्रमाणे कारवाई का केली नाही ? मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करून कारवाई करण्यात येईल असे सांगता, त्याप्रमाणे त्यांच्याशी चर्चा केली आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, नांदेड बँकेचा जो प्रश्न आहे तो अतिशय गंभीर प्रश्न आहे. स्टे दिलेला नाही. त्यांचे फेर ऑडिट करण्याचे आदेश दिलेले आहेत. शेवटी संचालकांवर योग्य ती कारवाई होईल परंतु ती बँक चालू झाली पाहिजे, शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला पाहिजे म्हणून 20 कोटी रुपयांचे भागभांडवल देण्याचा तत्वत: निर्णय घेतलेला आहे आणि 200 कोटी रुपयांची हमी नाबार्डला देण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे आणि येत्या मंत्रिमंडळासमोर हे दोन विषय प्रोसेसमध्ये आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 20 कोटी रुपये देण्याचा तत्वत: निर्णय घेतलेला आहे. माननीय राज्यमंत्री श्री. दांडेगावकर यांनी सांगितले की, कॅबिनेटच्या मंजुरीनंतर 20 कोटी रुपये देणार आहेत. कॅबिनेटच्या मंजुरीनंतर 20 कोटी रुपये देणार असतील तर यांना ते देण्याचा अधिकार नाही. सभापती महोदय, सभागृहाची सँटीटी आहे की नाही ?

सभापती : सभागृहाच्या सँटीटीच्या दृष्टीने दोन्ही बाजूने प्रश्न आणि उत्तर समजून घेतले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण जे बोलत आहात ते बरोबर आहे. डॉ. शिंगणे साहेबांच्या बँकेच्या बाबतीत कारवाई केली...

सभापती : माननीय मंत्रिमहोदय सभागृहात आलेले आहेत आणि याबाबतीत ते जास्त माहिती देतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 20 कोटी रुपये कॅबिनेटच्या मंजुरीनंतर मिळणार आहेत. माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की, कॅबिनेटची मंजुरी मिळाल्यानंतर हे मिळणार आहेत आणि माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, तत्वता निर्णय झालेला आहे. म्हणजे आम्ही पुढच्या आठवड्यात पुन्हा प्रश्न विचारावयाचा काय ?

डॉ. पतंगराव कदम : मी काय म्हणालो ते ऐकण्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते आणि या सभागृहाचे जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा घोटाळा झालेला आहे. आम्ही तत्वत: निर्णय घेतलेला आहे. ती बाब मंत्रिमंडळासमोर आणणार आहोत असे मी म्हटले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/

ता.प्र.क्र. 20311 .....

श्री. नितीन गडकरी : तत्वत: म्हणजे काय ?

डॉ. पतंगराव कदम : तत्वत: म्हणजे इन्फॉर्मली. माननीय अर्थमंत्री, माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही अशी चर्चा केलेली आहे. ही प्रोसीजर आहे.

Shri Nitin Gadkari: Mr. Chairman, Sir, the Hon. Minister has no right or power to take such a principle decision.

Dr.Patangarao Kadam: Mr. Chairman, Sir, I have all powers to take the decision.माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री आणि आम्ही याबाबत चर्चा केलेली आहे. तो प्रस्ताव तत्वत: मान्य झालेला आहे. तो प्रस्ताव येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : जो 80 टक्के एन.पी.ए. झालेला आहे त्यामध्ये ॲग्रिकल्चरल एन.पी.ए. किती आहे आणि नॉन ॲग्रिकल्चरल एन.पी.ए.किती आहे ? गेल्या अधिवेशनामध्ये माननीय कॅबिनेट मंत्री आणि माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी आश्वासन दिले होते की, बँक बरखास्त करु आणि नवीन नांदेड बँक काढण्याचा प्रस्ताव करु जेणेकरुन जे डिपॉझिटर्स आहेत त्यांना इंश्योरंसचे संरक्षण मिळू शकेल. अशी चर्चा झाली होती. त्याबाबत गेल्या अधिवेशन काळापासून या अधिवेशनापर्यंत शासनाने कोणती कारवाई केली ?

डॉ. पतंगराव कदम : बँक बरखास्त केलेली आहे आणि जिल्हाधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमले आहे.

सभापती : यानंतर पुढचा प्रश्न क्रमांक 21517 घेण्यात येईल. मला जेवढे शक्य आहे तेवढी संधी मी सन्माननीय सदस्यांना दिलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नाचे उत्तर आले नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना ता.प्र.क्र. 20311 संबंधी उपप्रश्न विचारण्याची पूर्ण संधी दिलेली आहे. या प्रश्नाला मी बराच वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे अशी मी विनंती करतो. अन्यथा मला पुढील प्रश्नाकडे जावे लागेल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटाकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.42 वाजता 15 मिनिटाकरिता तहकूब झाली.)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अद्याप दोन मिनिटे अवधी शिल्लक आहे. यापूर्वी चर्चेला घेण्यात आलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक-20311 च्या संदर्भात आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अर्थपुरवठा करण्याचे काम थांबले आहे. त्या जिल्हयातील शेतकऱ्यांना तातडीने कर्जपुरवठा करण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे? या प्रकरणात चौकशी होणे हा भाग वेगळा आहे. आज राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत आहेत, त्यादृष्टीने नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना तातडीने कर्जपुरवठा कसा करता येईल यावर शासनाने काय विचार केला आहे?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, राज्य शासनाकडून 20 कोटी रुपये भागभांडवल आणि नाबार्डला 200 कोटी रुपये कर्जाचा थकहमी देण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे जात आहे. हे 220 कोटी रुपये मिळाल्यानंतर पूर्ववत शेतीला कर्जपुरवठा करता येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अनुक्रमांक 7 वरील तारांकित प्रश्न महत्वाचा आहे. त्याकरीता 5 मिनिटे प्रश्नोत्तराचा वेळ वाढविण्याबाबत आमची विनंती आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : अनुक्रमांक-5 वरील प्रश्न देखील अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे 10-15 मिनिटे वेळ वाढविण्याची आमची विनंती आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. महत्वाच्या प्रश्नाबाबत विशेष बाब म्हणून अर्धातास चर्चा उपस्थित करण्याची अनुमती देता येईल.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी. : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव (2) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 4 डिसेंबर, 2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 9- मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, 206 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 10- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यदेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 12 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 11- महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 8- महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 15- महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 13- महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 14- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय,2006-2007 च्या पुरवणी मागण्या अद्याप विधानसभागृहात मांडल्या नसल्यामुळे त्या मागण्या परिषदेत नंतर मांडण्याची अनुमती मिळावी.

सभापती : अनुमती देण्यात येत आहे.

डॉ. सुनील देशमुख: सभापती महोदय, 1998-99 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्या अद्याप विधानसभागृहात मांडल्या नसल्यामुळे त्या मांगण्या परिषदेत नंतर मांडण्याची अनुमती मिळावी.

सभापती : अनुमती देण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनमुतीने " राज्यातील पोलीस दल गृह विभाग या विषयाबाबतचा अंदाज समितीचा सातवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महोदय, सदर अहवाल सादर करीत असतांना अहवालातील काही प्रमुख शिफारशींचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छिते.

महाराष्ट्र राज्यातील पोलीस त्यांची रचना कशाप्रकारे आहे, पोलिसांकडे कोणकोणती कामे सोपविण्यात आलेली आहे, त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात करण्यात येणारी तरतूद तसेच पोलिसांच्या निवासाच्या आरोग्याच्या असलेल्या समस्या याचा अभ्यास समितीने केलेला आहे.

राज्य शासनाने 5 वर्षाच्या कालावधीत एकूण 11,000 पदे पोलीस दलात टप्प्याटप्प्याने भरण्याचे ठरविले आहे. गुन्हयांची वाढणारी संख्या लक्षात घेता पोलीस कर्मचा-यांशी संबंधित विभागात प्राथम्यक्रमाने नियुक्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने योजना आखावी अशी समितीची शिफारस आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

पोलिसांचे शारीरिक स्वास्थ्य तंदुरुस्त राहण्यासाठी त्यांच्या दर सहा महिन्याला शारीरिक तपासण्या करण्यात याव्यात. त्यांच्यासाठी तरण तलाव, क्रीडा केंद्र इत्यादीचीसुध्दा उभारणी करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच मुंबईत एक अत्याधुनिक फॉरेन्सिक लॅब तयार करण्याबाबत शासनाने त्वरेने पावले उचलावी अशी समितीची शिफारस आहे.

पोलीस दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची निवासाची व्यवस्था ही फार मोठी समस्या आहे. त्यांच्या चाळींच्या दुरुस्तीसाठी एखादे स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत साकल्याने विचार करुन निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्रामध्ये ध्वनीप्रदूषण होऊ नये म्हणून रात्री दहानंतर लाऊडस्पीकर लावण्यास शासनाने बंदी घातलेली आहे. परंतु या बंदीमुळे ग्रामीण भागातील तमाशा या लोककलेला व कीर्तन, प्रवचनाला सूट देण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शासनाने सनदशीर निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

इतर राज्यांमध्ये शवविच्छेदन करणाऱ्याला वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. केवळ महाराष्ट्र राज्यात शवविच्छेदन करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही. म्हणून महाराष्ट्र राज्यात शवविच्छेदन करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

सभापती : अंदाज समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन 2006-2007 या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत" शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमासाठी तरतूद करणे" या नवीन बाबी संबंधातील अंदाज समितीचा आठवा अहवाल सभागृहास करीत आहे.

मी या निमित्ताने सदर अहवालातील प्रमुख शिफारशींचा उल्लेख करु इच्छिते. विद्यार्थ्यांची वाढती संख्या व वाढती महागाई लक्षात घेता शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमासाठी सध्या करण्यात येत असलेल्या तरतुदीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे असे समितीला वाटते.

सर्व शिक्षा अभियान ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी गंभीर आजारावर उपचारांचा समावेश करण्यात आलेला नाही. सबब केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान या योजनेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना होणाऱ्या गंभीर आजारावर उपचार करणे ही बाब समाविष्ट सकरण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून दोन वेळा केली जाते. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्याची आकडेवारी केवळ कागदपत्रांवर दाखवून उपयोग नाही तर प्रत्यक्षात विद्यार्थ्यांची तपासणी करुन त्यांच्यावर औषधोपचार करणे आवश्यक आहे. शालेय आरोग्य तपासणीकरिता खाजगी डॉक्टरांना मानधन तत्वावर सहभागी करुन घ्यावे अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीकरिता असलेल्या वाहनांच्या इंधन व दुरुस्तीकरिता मंजूर करण्यात आलेले अनुदान अपुरे आहे. वास्तविक पाहता वाहनाच्या इंधनासाठी रकमेद्वारे अनुदान न देता लीटरनुसार इंधन पुरवठा करण्यात यावा असा प्रस्ताव आरोग्य विभागाने वित्त विभागाकडे सादर केलेला आहे. परंतु अद्याप प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली नाही. सबब सदरहू प्रस्तावाला त्वरित मंजुरी देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सभापती : अंदाज समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

सभापती : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहांद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

प्रधान सचिव (2) : विधान परिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

(अ) खालील विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 16 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2006

(2) सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 1 - कारखाने (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006

(3) सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक - 20 महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग विधेयक, 2005

(4) सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक - 25 महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) विधेयक, 2005

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 15- मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक,2006.

(2) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 73 - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2006.

(3) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 65 - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2006.

(4) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 67 - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, 2006.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(5) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 68 - महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) विधेयक, 2006.

(6) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 74 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2006.

(7) सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 69 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राहयीकरण) विधेयक, 2006.

(8) सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 16 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक, 2006.

..3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "अमरावती जिल्हयातील मुर्तिजापूर सब ट्रेझरीने गत 2 वर्षात कोटयावधी रुपयांची बोगस देयके मंजूर करुन झालेल्या 50 कोटींच्या आर्थिक घोटाळयाकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी "शासनाचे दि.27.10.2006 च्या अधिसूचनेद्वारे अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट विभागातील अंदाजे 40 गावांचे औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केल्याने खारेपाट विभागातील जनतेमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, केशवराव मानक, वि.प.स. यांनी "नागपूर शहराच्या सीमेला लागून असलेल्या ग्रामीण भागातील गावाच्या शेतजमिनी कार्गो हब प्रकल्पाकरिता भूसंपादित करण्यात आल्याने पुनर्वसन कायद्यानुसार शेतकऱ्यांना व नागरिकांना मोबदला न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, मधु चव्हाण, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील (जि.ठाणे) पॉयषा इंडस्ट्रीयल कंपनी मे, 1994 पासून कायमस्वरुपी बंद केल्यामुळे कंपनीत काम करणाऱ्या कामगारांचे वेतन व फंड मंजूर असूनही न मिळाल्याने कामगारांवर ओढवलेली उपासमारीची आपत्ती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी एका कार्यकारी अभियंत्याच्या कामासंबंधी सूचना दिलेली आहे. त्या कार्यकारी अभियंत्याने जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखवून नोकरी मिळवलेली आहे. त्याच्या कामाची स्थितीही फारच वाईट आहे. बुलढाणा जिल्हयातील सर्व विभागातील कामांच्या विरोधात कॉन्ट्रॅक्टर्स उपोषणाला बसलेले आहेत. त्याची सर्व कामेही बंद आहेत.

सभापती : या विषयी आपण लक्षवेधी सूचना द्यावी, ती मी स्वीकारतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

सभापती : यानंतर माननीय सदस्य गुरुमुख जगवानी, नितीन गडकरी, प्रतापराव सोनावणे, विनोद तावडे, वि.प.स. यांनी " भुसावळ नगरपालिकेत सभागृहात हरकत नोंदविल्याच्या कारणावरुन झालेल्या वादाचे पर्यावसन दंगलीत होणे व संतप्त जमावाने श्री.संतोष चौधरी, वि.स.स. यांचा बंगला पेटवून देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "मुंबई शहरात व उपनगरात डेंग्यूच्या साथीने सुमारे 183 जण मरण पावले" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी " मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या अभियांत्रिकी परीक्षेच्या प्रश्न प्रत्रिकेतील 8 प्रश्नात तब्बल 51 गुणांच्या चुका आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

यानंतर सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "नागपूर मधील कामठी रोड ते छिंदवाडा रोडला जोडणाऱ्या मानकापूर रेल्वे ओव्हरब्रीजच्या बांधकामात तांत्रिक दोष असल्याने नागरिकांची होणारी गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम

93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या 93 च्या सूचनेसंबंधी आपण शासनास निवेदन करण्यास सांगितले, परंतु सदरची निवेदने फारच उशिराने येतात. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी बरीच निवेदने येतात.

सभापती : आजच्या सूचनांची निवेदने 3 दिवसांच्या आत यावीत अशा प्रकारची मी शासनाला स्टँडींग ऑर्डर देत आहे.

..6.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा.

सभापती : मला पोलीस उपायुक्त, विशेष शाखा, नागपूर शहर यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानपरिषद सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना दिनांक 4 डिसेंबर, 2005 रोजी मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 134, 135 अन्वये 17.30 वाजता पोलीस मुख्यालय, नागपूर येथे अटक करण्यात येऊन त्यांना 18.30 वाजता मुक्त करण्यात आले आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या

मु.शी.: भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दिपक सावंत, प्रा.शरद पाटील, सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे व श्री.रमेश निकोसे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(**चर्चा पुढे सुरु**.....

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माझ्या हातामध्ये खैरलांजी प्रकरणासंबंधी 'यशदा' या संस्थेने तयार केलेला अहवाल आहे. याच प्रकरणासंबंधी काल सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींसाठी आयोग स्थापन करण्यात येईल. यशदाने त्यांच्या अहवालात शिफारस केल्यानुसार हा आयोग नेमण्यात येणार आहे काय ? या अहवालामध्ये आपण पाहिले तर बलात्कार झाल्यानंतर आणि खून झाल्यानंतर मृतदेहाचे त्यांच्या संस्काराप्रमाणे अंत्यविधी झाले पाहिजेत पण या सर्व देहांना दफन करण्यात आले आहे. अशा प्रकारे दफनविधी का करण्यात आला ? याविषयी माझ्या मनामध्ये शंका आहे. त्यानंतर दलित संघटनांनी मागणी केल्यानुसार या मृतदेहांचे पुन्हा उत्खनन करण्यात आले व दुसऱ्यांदा पोस्टमार्टेम करण्यात आले. यानुसार बलात्काराची खुण दिसून आली नाही, असे या अहवालात म्हटले आहे तसेच डॉक्टरांच्या अहवालामध्येही म्हटले आहे. ज्यावेळी मृतदेह 7 दिवसानंतर बाहेर काढण्यात येतो त्यावेळी त्यामध्ये कोणतीही खुण असू शकत नाही. मग हे पूर्वनियोजित होते काय ? पोलिसांच्या आदेशावरुन पुन्हा पोस्टमार्टेम करण्यात आले काय ? पुन्हा पोस्टमार्टेमची मागणी होईल अशी दाट शंका येऊन उत्खननाची ऑर्डर देण्यात आली व पोस्टमार्टेम करण्यात आले काय ? या विषयी माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

प्रकाश टाकावा. जर हेच करावयाचे होते तर त्याचवेळी पुन्हा पोस्टमार्टेम का करण्यात आले नाही ? यामध्ये 15 दिवसांचा काळ का गेला ? त्याचप्रमाणे पंकज गुप्ता नावाचे जे अधिकारी आहेत त्यांनी लाच घेतल्याचे उघड झाले आहे, या विषयी गृह विभागाने नेमके कोणते धोरण स्वीकारले आहे, हे आम्हाला समजलेले नाही. त्यांना पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे, अशा प्रकारचे वक्तव्य गृहमंत्र्यांनी केले आहे. यासंदर्भात त्यांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे 2 शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य, डॉ.दीपक सावंत यांनी या ठिकाणी वारंवार यशदाचा उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. ज्या अहवालाचा ते उल्लेख करीत आहेत तो 'यशदा' या संस्थेने तयार केलेला नाही. ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार प्रधान सचिव हे नोडल ऑफीसर असतात. नोडल ऑफीसर म्हणून कायद्यान्वये प्रस्थापित झालेले ते एक पद आहे आणि त्यांनी तयार केलेला तो अहवाल आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, माझ्याकडे यशदाचा अहवाल आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, "Nodal officer of the Atrocity Act."असे आहे. म्हणून यशदा हा शब्द वगळण्यात यावा.

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, या रिपोर्टवर असे लिहिलेले आहे की, " Organised killings of Dalits in Khairlanji Village, Taluka-Mohadi, District-Bhandara - Report under SC-ST (POA) Act, 1989 by Dr. Babasaheb Ambedkar Research and Training Institute, Department of Social Justice, GOM and Centre for Equity and Social Justice, YASHDA - Commissioned by Nodal Officer SC-ST (POA) Act, 1989." श्री.रत्नाकर गायकवाड हे आय.एस. अधिकारी आहेत आणि त्यांनी दिलेला हा रिपोर्ट आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री महोदयांनी खैरलांजी हत्याकांडासंदर्भात निवेदन करण्यापूर्वी मला दोन-तीन गोष्टांचा खुलासा करावासा वाटतो. माननीय गृहमंत्री खोटे बोलतात असे शब्द मी काल वापरले त्यावेळी आपण ऑब्जेक्शन घेतले. बुडत्याचा पाय खोलात म्हणतात तशी परिस्थिती झालेली आहे. एक वेळ खोटे बोलल्यानंतर वारंवार खोटे बालावे लागते अशी परिस्थिती राज्य शासनाची झालेली आहे. आज वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आली आणि खालच्या सभागृहामध्ये माननीय गृहमंत्र्यांनी जे वक्तव्य केले ....

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांना मी सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहामध्ये जे वक्तव्य झाले असेल त्याचा रेफरन्स येथे देता येणार नाही. काल तुम्ही यासंदर्भात तुमचे विचार मांडलेले आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आली त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले आहे की, खैरलांजी प्रकरणामध्ये दोन वर्षापूर्वी श्री.भोतमांगे यांच्यावर अत्याचार झाला होता आणि त्याची सूचना .....

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे आपण खाली बसा. राईट-टू-रिप्लाय झाल्यानंतर तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता येईल.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, वर्तमानपत्राच्या माध्यमातून ज्या गोष्टी माननीय गृहमंत्र्यांनी व्यक्त केलेल्या आहेत त्यासंदर्भात त्यांनी खुलासा करणे आवश्यक आहे. माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले की, श्री.भोतमांगे यांनी दोन वर्षापूर्वी प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्याकडे तक्रार केली होती. तेव्हाच दखल घेतली असती तर आज ही परिस्थिती उद्‌भवली नसती. माननीय गृहमंत्र्यांसारख्या जबाबदार व्यक्तीने अशा प्रकारे बोलण्याचे धाडस करणे ही शोकांतिका आहे. श्री.प्रितमकुमार शेगावकर मंत्री झाल्यामुळे प्रा.जोगेंद्र कवाडे नाराज आहेत अशा पद्धतीचे दिशाभूल करणारे वक्तव्य माननीय गृहमंत्र्यासारख्या जबाबदार व्यक्तीने करणे सभागृहाला शोभनीय नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे मी आपल्याला वेगळया माध्यमातून बोलण्याची संधी देईन.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल. अैनापुरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या चर्चेतील मी शेवटचा वक्ता आहे आणि सभागृहाचे एकंदर स्पिरीट लक्षात घेऊन मी थोडक्यात या संदर्भातील माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. काल पासून या संदर्भात अनेकांची भाषणे मी ऐकली आहेत. खैरलांजी प्रकरणाबद्दल सगळ्यांनीच चिंता व्यक्त केली आहे, सहानुभूती व्यक्त केली आहे. काहींनी परस्परांवर आरोपही केले आहेत. खरे म्हणजे अशी प्रकरणे घडतात आणि हा प्रकार केवळ तेथेच घडला आहे असे नाही तर महाराष्ट्रात कोठे ना कोठे असे प्रकार घडत आलेले आहेत. प्रत्येक वेळी त्यावर चर्चा करून मलमपट्टी करून सावरासावरी करण्याचा प्रयत्न होतो आणि त्यामुळे नंतर ती प्रकरणे विसरली जातात आणि असे एखादे प्रकरण घडले की त्याची आठवण काढली जाते. खरे तर हा अत्यंत जुनाट असा रोग आहे आणि त्यावर कायम स्वरूपी उपाय करण्याची गरज आहे. मुळापासून उपाय करून हा रोग नष्ट करण्याची गरज आहे असे आज प्रकर्षाने जाणवत आहे. तेवढ्यापुरता इलाज करून काही रोग बरा होत नाही आणि हा काही राजकारणाचा विषय नाही. राजकारण हे गजकर्णासारखे असते. गजकर्ण झाल्यावर ज्याप्रमाणे खाजवल्यावर बरे वाटते पण त्यामुळे तेथे जखम होऊन ती चिघळत जाते तसेच हे होत चालले आहे. किंबहुना या जखमेवर जालीम उपाय केले गेले पाहिजेत. हा रोग जुनाट आहे आणि त्यावर जालीम इन्जेक्शन दिले पाहिजे. सभापती महोदय, मी खरे तर या विषयावर भरपूर बोलणार होतो पण सभागृहाचे स्पिरिट पाहता मी थोडक्यात माझे भाषण आटोपते घेणार आहे. या ठिकाणी माझ्यापुढे दोन प्रश्न उभे राहिले आहेत. येथे विद्वान, अभ्यासू सदस्यही बोलले आहेत. परंतु त्यामध्ये प्रश्नाचे गांभीर्य किती आहे आणि राजकारण किती आहे याची सीमारेषा काही मला उमजली नाही. कारण बऱ्याचदा प्रश्न राहतो बाजूला आणि चर्चा वेगळीच होते. आता या प्रकरणामध्ये विशेषत: गृहमंत्री असतील वा अन्य कोणा एका व्यक्तीला लक्ष्य करून विषय वळविण्याचा प्रयत्न झाला तो मला प्रशस्त वाटला नाही. ती चर्चा मला योग्य वाटली नाही. उलट माझ्या, सर्वसामान्य लोकांच्या मते या प्रकरणामध्ये माननीय गृहमंत्र्यांनी हा प्रश्न प्रभावीपणे हाताळला आहे. या प्रकरणाशी ज्यांचा संबंध नाही अशा लोकांनी देखील त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. मध्यंतरी जे काही घडले त्या नंतरच्या कालखंडामध्ये उखाळ्या पाखाळ्या झाल्या. त्यामुळे विनाकारण कोणाला तरी टार्गेट केले जात आहे किंवा काय असेच वाटत होते. जे बळी गेले आहेत त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यापेक्षा कोणाला तरी त्याबद्दल दोषी

..... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अैनापुरे .....

ठरविण्याचे, टार्गेट करण्याचेच प्रयत्न होत असल्याचे चित्र मला तरी दिसते आहे. कदाचित ते चुकीचे असेल. परंतु त्याबद्दल माहिती देताना सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांचे भाषण जोरदार झाले. परंतु पुन्हा ते माननीय गृहमंत्र्यांवर घसरले आहेत. अशा घटना घडतात तेव्हा कोणी विशिष्ट व्यक्ती सत्तेवर असते म्हणून घडतात असे नाही तर कोणीही सत्तेवर असताना देखील अशा घटना घडत आलेल्या आहेत. त्यामुळे कोणाला दोष देऊन हा प्रश्न सुटणार नाही. किंबहुना मी या संबंधात माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री असलेल्या श्री.आर.आर.पाटील यांचे अभिनंदन करतो. कारण त्यांनी तातडीने पावले उचलली आहेत. पण हा रोगच इतका चमत्कारिक आणि जुनाट होता की त्यामुळे कोणाचाही सुरूवातीस गोंधळ उडणे स्वाभाविक आहे. नंतर कानपूरमध्ये जे काही घडले त्याचे पडसाद मुंबई-नागपूरमध्येच नाही तर सबंध महाराष्ट्रभर उठले. हे काही सहजा सहजी घडत नाही. त्यामध्ये काही एक सूत्र दिसते आहे. त्यामध्ये कोणाला तरी दोषी धरण्याचाच प्रयत्न अधिक दिसतो आहे ते होऊ नये असे मला वाटते. सभापती महोदय, मी या ठिकाणी कोणाच्या संरक्षणासाठी उभा आहे असे नाही. पण जे काही घडते आहे, माझ्या दृष्टीने जे काही मला समजते आहे ते मी येथे सांगतो आहे. जी काही घटना घडली आहे तिचा उपयोग करून घेऊन ती किती मर्यादेपर्यंत ताणायची हेही आपण पाहिले पाहिजे. ....

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात ...)

सभापती महोदय, मी गोलगोल असे काही बोलत नाही तर स्पष्टपणे मला जे काही वाटते आहे तेच सांगतो आहे. या प्रकरणामध्ये सातत्याने गृहमंत्र्यांचा राजीनामा मागितला जात आहे. उखाळ्या पाखाळ्या काढल्या गेल्या आहेत. मी कोणाचीही नावे यासंबंधात घेत नाही. मला सभापतींनी अतिशय कमी वेळ दिला असल्याने मी या संबंधात सविस्तर असे सांगू शकत नाही अन्यथा मी अगदी विस्ताराने सारे सांगितले असते. मला यातून एकच जाणवते आहे की, यामध्ये कोणाला तरी टार्गेट करण्याचे प्रयत्न होत आहेत. यामध्ये एकाच मंत्र्यांचा राजीनामा आपण कशासाठी मागता ? मागायचाच असेल तर साऱ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा का मागू नये ? एखाद्याने राजीनामा देऊन काही हा प्रश्न सुटणार नाही. तसेच चांगल्या यंत्रणेला नाउमेद करूनही प्रश्न सुटत नाहीत हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

(यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. जी. एल. अैनापूरे...

यंत्रणेला उघडे करण्यापेक्षा यंत्रणेमध्ये असलेले दोष दूर करुन चांगल्या स्पिरिटने आपण या गोष्टीकडे पाहिले तर यंत्रणेला चांगल्याप्रकारे काम करण्याची संधी मिळेल. तेव्हा या चर्चेमध्ये आपण नुसते नाव ठेवून चालणार नाही तर काहीतरी उपाययोजना सुचविल्या पाहिजेत. त्या उपाययोजना आपण सुचविल्या आहेत काय? ज्यामधून काहीतरी चांगला मार्ग निघू शकेल अशाप्रकारचे उपाय आपण सुचविले नाहीत. या दोन तासाच्या चर्चेमधून समाजाचे उद्‌बोधन आपण करु शकलो असतो परंतु ते झाले नाही असे मला वाटते. या प्रश्नाचे गांभीर्य जेवढे संभाळले गेले पाहिजे तेवढे ते संभाळले गेले नाही. समाजामध्ये असलेली मजबूत जाती व्यवस्था आणि दारिद्रय या दोन गोष्टींमुळे हे प्रकार पुन्हा पुन्हा घडत राहतात. याच्यावर आपण चिंतन केले पाहिजे. आपण जाती व्यवस्थेवर चिंतन करतो आणि जातीव्यवस्थेचा आधार घेऊन काही गोष्टी करीत असल्यामुळे असे प्रकार होतात. याला आपण कुठेतरी आळा घातला पाहिजे तो घालू शकत नाही. या परिस्थितीचा सर्वांनी गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सभापती महोदय, मी कुणावरही आरोप करीत नाही. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे चांगले बोलले. समाजाच्या चिंतनाचा विषय त्यांनी चांगल्याप्रकारे सभागृहासमोर मांडला. परंतु दुर्दैवाने नेहमीच्या पध्दतीप्रमाणे त्यांच्या भाषणामध्ये अडथळे आणण्याचा प्रयत्न झाला. त्या प्रयत्नांना माननीय सदस्य फसले आणि त्यामुळे त्यांचा मुद्दा सुटला. याठिकाणी नेहमी सांगण्यात येते की, आम्ही आमदार मंडळी शिक्षण पध्दतीवर कधी बोलत नाही फक्त शिक्षकांच्या पगारावर बोलतो. परंतु आम्ही सामाजिक प्रश्नासंबंधी सुध्दा बोलतो. आपण चर्चेमध्ये भाग घेत असतांना पक्षाभिनिवेश बाजूला ठेवावा. आम्ही याठिकाणी कोणत्याही एका समाजाचे प्रतिनिधीत्व करीत नाही, असे प्रतिनिधीत्व करणे समाजाच्या प्रतिष्ठेला घातक आहे. म्हणून आपण या प्रश्नाकडे तिऱ्हाईतपणे पहावे. आपल्याकडे बरेच प्रश्न असतात, त्या प्रश्नांसंबंधी बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत असूनसुध्दा आपल्याला अनुकूल असेल तेवढेच बोलण्याची जी प्रथा सुरु आहे ती बंद झाली पाहिजे. म्हणून या चर्चेच्या माध्यमातून माझ्या सारख्या माणसाला तुम्हाला नेमके काय म्हणावयाचे आहे हे कळले नाही. मी याठिकाणी कुणालाही दोष दिलेला नाही आणि कुणाच्याही कुबडया घेऊन आलेलो नाही. मला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे, मी माझ्या स्वत:च्या सामर्थ्यावर आलो आहे. त्यामुळे मला कुणालाही आवाज देण्याची गरज नाही. अशाप्रकारची चर्चा करुन आपण या प्रश्नाचा विचका करीत चाललो आहोत. तसे न करता आपण पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून काही तोडगा सुचविला तर असे प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अैनापूरे...

पुन्हा निर्माण होणार नाहीत. या प्रश्नाचे भांडवल आपण स्वत:च्या स्वार्थासाठी केलेतर अशाप्रकारची प्रवृत्ती पुन्हा पुन्हा बोकाळेल. आणि खैरलांजीची प्रकरणे पुन्हा पुन्हा होत राहतील. त्यावर चर्चा होऊन व प्रोसेडींग होऊन तो विषय संपेल. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता सत्यशोधन करण्याची गरज आहे. त्याकरीता एक सत्यशोधन कमिटी असणे आवश्यक आहे. त्या कमिटीमध्ये राजकारण येता कामा नये. राजकारणी माणसे त्यामध्ये आली आणि त्यांनी भाष्य सुरु केले की सर्व बिघडत जाते. म्हणून मी मघाशी जे वाक्य उच्चारले ते उच्चारतांना चांगले वाटत नाही. "खाजवतांना बरे वाटते परंतु जखम चिघळत जाते. आणि ही जखम चिघळत चालली तर रोग बरा होणार नाही" हे पुन्हा सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, एका अत्यंत संवेदनशील आणि महत्वपूर्ण अशा चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. उत्तराच्या भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांचे मी अभिनंदन करतो. काल या प्रस्तावाची सूचना माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी दिली होती. नियमाप्रमाणे आणि कायद्याप्रमाणे या चर्चेची सुरुवात करण्याचा पूर्ण अधिकार हा आपला होता.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरू ...

त्यांना अटक व्हावी,अशाप्रकारे सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेबांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना दारुगोळा पुरवून माझ्यावर हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, त्यास राजकीय दृष्टीने दादच दिली पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी हरकत आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दोन सन्माननीय सदस्यांवर हेत्वारोप केलेले आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे माझ्या सल्ल्याने वागतात असे सांगून त्यांना अगोदर बोलण्याची संधी दिली, असा आरोप केलेला आहे. सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेबांना मोर्चासाठी जावयाचे होते, म्हणून त्यांनी येऊन विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेबांकडे मला मोर्चासाठी जावयाचे असल्यामुळे मला पहिल्यांदा बोलण्याची अनुमती द्यावी,अशी विनंती केली. त्याप्रमाणे विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांना अगोदर बोलण्याची परवानगी दिली. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे विचार आणि आमचे विचार परस्पर विरोधी आहेत. ते आमचे ऐकण्याचा प्रश्नच येत नाही. आम्हाला मते मांडाची असतील तर ती आम्ही ठोसपणाने मर्दुमकीने ती मांडू, कोणावर आरोप करावयाचा असेल तर तो प्रत्यक्षपणाने आम्ही करु. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना आपल्याबरोबर ठेवण्यामध्ये तुम्हाला अपयश आलेले आहे. ते काल सरकारच्या विरोधी बोलले, म्हणून याला जबाबदार आम्हाला धरणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांवरही हेत्वारोप केलेले आहेत, ते रेकॉर्डमधून काढले पाहिजेत. दोन्ही सदस्य आम्ही सांगू त्याप्रमाणे बोलतात असे सांगणे म्हणजे त्यांचा अपमान करण्यासारखे आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कोणतीही चर्चा चालू असताना कोणत्याही सदस्यांवर हेत्वारोप करायचा नसतो, असा नियम आहे. गृहमंत्री महोदय, आपल्या सुरूवातीच्याच भाषणामध्ये आम्हा सदस्यांवर हेत्वारोप करत आहेत. परंतु सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे सर आणि मी जे काही बोललो ते जबाबदारीने बोललो. आमच्यावर अशाप्रकारे हेत्वारोप केला जात असेल तर आम्ही मंत्री महोदयांचे उत्तर ऐकायचे की नाही, असा आमच्यासमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यांचे उत्तर मी शेवटपर्यन्त ऐकणार आहे. मी अत्यंत जबाबदारीने बोललेलो आहे. त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून आम्ही दारुगोळा घेण्याचा प्रश्न नाही. आम्ही ज्या संघटनेमध्ये काम करतो ती शाहू महाराज, महात्मा फुले यांच्या विचारांची आहे. परंतु शाहू महाराज, महात्मा फुले,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.कपिल पाटील (पुढे सुरु.....

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर मतांचा जोगवा घेण्यासाठी आम्ही संघटना स्वीकारलेली नाही. त्या एका मूव्हमेंटमधून आलेला मी कार्यकर्ता आहे. आमच्यावर हेत्वारोप करणे हे गंभीर आहे. अशाप्रकारे सभागृहाचे नियम, संकेत पायदळी तुडविणे योग्य नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभागृहाचे नेते आणि राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच ज्या पध्दतीने आमच्यावर हेत्वारोप केले ते अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह आहेत. या विषयाच्या संदर्भात जेव्हा स्थगनप्रस्ताव आला, तेव्हा सुरुवातीपासून मला मोर्चामध्ये सहभागी व्हायचे होते. खरे पाहिले स्थगन प्रस्तावावर त्यांनी अगोदर बोलावे हा विरोधी पक्षाच्या नेत्यांचा अधिकार आहे. त्यानंतर बाकीच्या सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांनी बोलायचे असते. परंतु मला मोर्चाला जावयाचे असल्यामुळे मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना लेखी चिठ्ठी देऊन कळविले होते की, मला दुपारी 3-00 वाजता मोर्चाला जावयाचे असल्यामुळे मला बोलण्यासाठी अगोदर संधी द्यावी. त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांनी मला पहिल्यांदा बोलण्यासाठी परवानगी लेखी स्वरुपात दिली. त्याप्रमाणे मी पहिल्यांदा बोललो. त्यानंतर ते बोलणार होते. असे असताना जबाबदार सभागृहाच्या नेत्यांनी भ्रमिष्ट झाल्यासारखे वागणे बरोबर नाही...

श्री.आर.आर.पाटील : मी भ्रमिष्ट झाल्यासारखे वागलो, अशाप्रकारे सन्माननीय सदस्यांनी शब्द वापरले ते असंसदीय असल्यामुळे ते रेकॉर्डमधून काढून टाकावेत.

...(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)..

प्रा.जोगेंद्र कवाडे : पहिल्यांदा त्यांनी वाटेल, त्याप्रमाणे आरोप केला हे बरोबर नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. उप मुख्यमंत्र्यांनी हेत्वारोप केलेला आहे, तो रेकॉर्डमधून काढून टाकावा.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : त्यांची किंवा तुमची हेत्वारोप करण्याची भावना नसली तरी एखादा शब्द अशा पध्दतीचा गेला तरी अडचण निर्माण होते.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी वाईट शब्द वापरलेला नाही. मी असंसदीय शब्द वापरलेला नाही. संभ्रम झाल्या सारख्या अवस्थेमध्ये वक्तव्य करणे हे माननीय गृहमंत्र्यांसारख्या जबाबदार व्यक्तीला शोभत नाही. म्हणून मी म्हणालो. या ठिकाणी अशा प्रकारचा आरोप केला जातो. हे काय चालले आहे ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, त्यांचे जे वक्तव्य आहे ते कामकाजातून काढून टाकले पाहिजे. ते कामकाजातून काढले नाही तर योग्य होणार नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मला हे जाणून घेण्याचा अधिकार आहे की, काल स्थगन प्रस्तावाची सूचना कोणी दिली होती ? स्थगन प्रस्तावावर बोलण्याचा नियमाप्रमाणे कोणाचा अधिकार होता आणि हा अधिकार बहाल करण्याचे कारण काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी माझ्यावर हेत्वारोप झाला...

सभापती : मघाशी मी आपल्याला बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

सभापती : आपल्याला संरक्षण दिलेले आहे. मी आपल्याला नंतर बोलण्याची संधी देतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी महाराष्ट्रामध्ये उद्भवलेल्या अतिशय गंभीर परिस्थिती बाबतच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी या सभागृहाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब उभे राहिले. काल या चर्चेला सुरुवात झाली आणि चर्चेला सुरुवात कोणी केली हे सर्व सभागृहाने पाहिले आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब बोलता बोलता असे म्हणाले की, चर्चेचा अधिकार हा विरोधी पक्ष नेत्यांचा असताना सुध्दा त्यांनी सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांना संधी दिली आणि त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून कपिल पाटील यांना बरोबर ठासून... (अडथळा) सभापती महोदय, यामध्ये असा कोणता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

असंसदीय शब्द आहे की, जो रेकॉर्डवरुन काढून टाकावयाचा ? या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे कालचे पूर्ण भाषण काढून पहावे. श्री. आर. आर. पाटील यांच्या नावाव्यतिरिक्त ते जरा सुध्दा बाहेर सरकले नाहीत. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी असे शब्द वापरले की "त्यांना फाशी नव्हे तर त्यांना हुतात्मा चौकात उभे राहून काय मारले पाहिजे" असा उल्लेख केला. माननीय आर. आर. पाटील हे सभागृहाचे नेते आहेत. त्यांच्याबद्दल अशा पध्दतीने असंसदीय शब्द वापरावयाचे, त्यांना भ्रमिष्ट म्हणावयाचे आणि ते एखादा शब्द बोलले तर एवढे संतप्त होण्याचे कारण काय ? हे सर्व प्रकरण अंगाशी आलेले आहे याची जाणीव झाल्यामुळे हा आकांडतांडव चालू आहे. म्हणून माननीय उपमुख्यमंत्र्यांचा कोणताही शब्द रेकॉर्डवरुन काढून नये असा माझा मुद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, यामध्ये माझा उल्लेख झालेला आहे. आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी.

सभापती :सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी आपल्याला सातत्याने संधी देत आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : आपल्याला सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालवावयाचे आहे की अन्य काही चर्चा करावयाची आहे ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी नियमाच्या बाबतीत सांगत आहे.

सभापती : मी आपले म्हणणे ऐकतो. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : दोन स्थगन प्रस्तावाच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यातील एक सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, श्री. जयंत प्र. पाटील आणि श्री. कपिल पाटील, अशी आम्ही तिघांनी दिलेली होती.

सभापती : नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव कोणी दिला हे सभापतींना माहीत असेल की अन्य कोणाला माहीत असेल ?

श्री. नितीन गडकरी : माझ्यावर हेत्वारोप झालेले आहेत. मी आपणास नियम वाचून दाखवतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, मी आपणास बोलण्याची संधी दिली होती. त्याच वेळी आपल्याला हा नियम सांगता आला असता.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झालेला असल्यामुळे मला खुलासा करण्याची संधी मिळाली पाहिजे.

सभापती : मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना संधी देत असतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मद्दा असा आहे की, हे सभागृह नियमाप्रमाणे चालणार आहे की नाही ? मी या सभागृहाचा विरोधी पक्षनेता होतो त्यावेळी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्याची संधी मी अन्य सन्माननीय सदस्यांना अनेक वेळा दिलेली आहे. अशा प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सुरुवात केली होती. अशा प्रस्तावावर कोणाला प्रथम बालू द्यावे हे ठरविण्याचा अधिकार विरोधी पक्षनेत्याला आहे. काल सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना बाहेर जायचे असल्यामुळे आणि त्या विषयावर ते जास्त अग्रेसर असल्यामुळे त्यांना प्रथम बोलण्याची संधी दिली. नियम 289च्या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी अशी अनेक नावे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

होती. प्रस्तावावर कोणाला प्रथम बालू द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार विरोधी पक्षनेत्याला आहे आणि तो अधिकार नियमाला धरुन आहे. सभापती महोदय, नियम क्रमांक 34 (2) (दोन) याप्रमाणे आहे :- (2) भाषण करत असता सदस्याने -

(दोन) दुस-या सदस्याविरुध्द वैयक्तिक आरोप करता कामा नये,

(तीन) क्षोभक किंवा मानहानिकारक शब्दप्रयोगाचा उपयोग करता कामा नये,

सभापती महोदय, मी या सदनाचा गेल्या 20 वर्षापासून सदस्य आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि माझे वैचारिक मतभेद आहेत. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि माझे वैचारिक मतभेद आहेत. त्यांच्या आणि माझ्या पक्षाची वैचारिक युती झालेली नाही. मी म.फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन जातीय वादाकरिता मते मागण्यासाठी महाराष्ट्रात कधी फिरत नाही. हे मी कधी केलेले नाही. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

सभापती : माझे आपणास नेहमीच संरक्षण असते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. आर.आर.पाटील असे म्हणाले की, "मी काल सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना बोलण्याची संधी दिली आणि त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून मी गोळ्या मारल्या".. सभापती महोदय, नियम क्रमांक 34 प्रमाणे सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी माझ्यावर हेत्वारोप केलेले आहेत. सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. मला वाटते त्यांच्यासारखी सन्माननीय व्यक्ती अशा प्रसंगी गोंधळून गेली असेल किंवा त्यांची मानसिकता खराब झाली असेल हे मी समजू शकतो. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील लोक त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत असतील हेही मी समजू शकतो. मी सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्यावर आरोप करणार नाही. पण ते असे गोंधळून का गेले ? त्यांनी माझ्यावर हेत्वारोप केलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

या दोन्ही सदस्यांना काही समजत नाही, हे दोन सदस्य माझ्या शिकवणुकीवर बोलले. ज्याप्रमाणे गुरुजी विद्यार्थ्यांना शिकवणी देतो त्याप्रमाणे मी त्यांना शिकवणी दिली, मी माझे जे मुद्दे लिहून देतो तेच मुद्दे ते मांडतात हा त्यांच्या बुध्दिमत्तेचा, त्यांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांच्या पक्षाचा, त्यांच्या विचारांचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा, त्यांच्या वैधानिक अधिकाराचा, लोकतांत्रिक मुल्यांचा, लोकशाहीचा एकप्रकारे अपमान आहे. हा अपमान आपण सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून आम्ही सहन करावा असे आपण कधीच करणार नाही. आपल्याबद्दल आम्हाला आदर आहे. अनुचित वर्तन करणारी व्यक्ती लहान असो किंवा मोठी असो, कायद्यासमोर सगळे समान आहेत. अफझल गुरुची केस ही वेगळी असू शकते. परंतु सभागृहाच्या नियम 34 प्रमाणे माझ्यावर हेत्वारोप झालेला आहे. माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे, कदाचित मानसिक ताणामुळे, विशेषत: मित्र पक्षाने अडचणीत आणल्यामुळे त्यांचा तोल गेला असेल. त्यांचा परिस्थितीमुळे चूकून तोल गेला असेल. मी त्यांना उदार मनाने माफ करायला तयार आहे. त्यांनी वादविवाद टाळावा. अन्यथा नियमाचा आधार घेऊन सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेले त्यांचे वाक्य कामकाजातून वगळण्यात यावे. हे वाक्य माझ्यावर, सन्माननीय सदस्य श्री.कवाडे आणि श्री.कपिल पाटील यांच्यावर अन्याय करणारे आहे. आपण आम्हाला न्याय द्यावा हीच विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कालच्या चर्चेसंबंधी दोन प्रस्ताव देण्यात आले होते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक प्रस्ताव दिला होता व दुसरा प्रस्ताव मी, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व शरद पाटील यांचा होता. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना आम्ही दोघांनी मिळून आमचा वेळ बोलण्यासाठी दिला. आमच्या वतीने तेच बोलणार होते. म्हणूनच मघाशी माझे नाव पुकारल्यानंतरही मी बोललो नाही. मी शब्द दिलेला होता तो पाळला आहे. आमच्या तिघांच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हेच बोलणार होते. आम्ही काही सांगितले म्हणून ते सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील बोलले हे सन्माननीय गृहमंत्र्यांचे म्हणणे चुकीचे आहे. आमचा प्रस्ताव स्वतंत्र होता, आपल्याकडे त्याची नोंद आहे. तिघांच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हेच बोलतील असे आम्ही कळविले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे कार्यक्षम, कर्तृत्ववान, ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी आपले विचार मांडताना काँग्रेस पक्षावर हेत्वारोप केला आहे. काँग्रेस पक्षाची फूस आहे असे ते म्हणाले. सत्ताधारी आघाडीतील मित्र पक्ष म्हणून त्यांनी काँग्रेस पक्षावर हेत्वारोप केला आहे. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. राष्ट्रवादी पक्षाचा मित्र पक्ष हा काँग्रेस पक्ष आहे. त्यामुळे त्यांनी जो हेत्वारोप केला आहे ते शब्द रेकॉर्डवरुन वगळण्यात यावेत. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना काँग्रेस पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे.

श्री.नितीन गडकरी : चंद्रपूर येथील माननीय मुख्यमंत्र्यांच्या सभेत तीन कार्यकर्त्यांनी श्री.आर.आर.पाटील मुर्दाबाद असे नारे दिले, या प्रसंगाचे फोटो काढण्यात आले आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहाच्या नेत्यांनी उत्तराच्या भाषणाची सुरुवात करतानाच एक हेत्वारोप केला. त्यासंबंधीचा निर्णय अद्याप आपण द्यायचा आहे. पुन्हा खुलासा करीत असताना सभागृहाचे नेते व गृहमंत्री यांनी असा उल्लेख केला की, विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव असताना यांना का पुढे करण्यात आले याचा खुलासा हवा आहे, अशा पध्दतीने त्यांनी प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, हा प्रश्न नसून दुसरा हेत्वारोप आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेला प्रस्ताव स्वतंत्र असून डाव्या आघाडीच्या वतीने सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील आणि मी स्वत: मिळून दिलेला प्रस्ताव स्वतंत्र आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सभापती महोदय, आम्ही कोणाला मुद्दे विचारुन किंवा कोणाच्या मुद्यांची कॉपी करुन प्रस्ताव देत नाही. डाव्या आघाडीची भुमिका स्वतंत्र आहे. माझ्यावर दुसरा आरोप असा करण्यात आला की, माननीय गडकरी साहेबांनी आम्हाला या प्रकरणाच्या संदर्भात दारुगोळा पुरविलेला आहे. सभापती महोदय, माझ्यावर जे आरोप करण्यात आलेले आहेत ते गंभीर स्वरुपाचे आरोप आहेत. मी खैरलांजीच्या संदर्भात जे विचार मांडलेले आहेत ते आपण जरुर पहावे. मी व्यक्तीश: कोणाचीही निंदा नालस्ती केलेली नाही. मी माननीय आबासाहेबांचा आदर करतो. खैरलांजीच्या घटनेच्या संदर्भात गृहखात्याने आणि शासनाने जी भुमिका स्वीकारली त्यासंदर्भातच मी काल माझे विचार व्यक्त केलेले आहेत. खैरलांजीच्या प्रकरणाच्या संदर्भातच मी विचार व्यक्त केलेले आहेत. असे असतांना मला दुस-यांनी दारुगोळा पुरवला असा माझ्यांवर आरोप करणे हे काही बरोबर नाही. आम्ही पुरातत्ववाद्यांचा आणि हिंदुत्ववाद्यांचा मुकाबला केलेला आहे. आम्ही काही कुंपणावर बसून दुस-या कोणाला नाचविण्याचे उद्योग केलेले नाहीत. असे असतांना माझ्यावर अशा प्रकारचे आरोप करणे हे कदापिही योग्य नाही.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी, माननीय गृहमंत्र्याचा "तोल ढळला" आहे असा जो हेत्वारोप केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, "तोल ढळला" असे म्हणणे हा काही हेत्वारोप होऊ शकत नाही.

सभापती : काल दिनांक 4 डिसेंबर, 2006 रोजी 289 नियमानुसार ज्या सूचना आल्या त्यामध्ये पहिली सूचना माननीय श्री. फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची होती. या सन्माननीय सदस्यांची सूचना सकाळी 8.15 वाजता आली होती. तसेच दुसरी सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील तसेच शरद पाटील यांनी सकाळी 8.30 वाजता दिलेली होती. त्यानंतर या चर्चेला सुरवात करतांना माननीय सभापती महोदयांकडून असे सूचित करण्यात आले होते की, माननीय फुंडकर साहेबांनी या चर्चेला सुरुवात करावी. तेव्हा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले की, या माझ्या ऐवजी सन्माननीय सदस्य श्री. कवाडे साहेब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

चर्चेला सुरुवात करतील, तरी याबाबत मला परवानगी द्यावी. तेव्हा माननीय सभापतींनी या सूचनेस परवानगी दिली. नियम 289 मध्ये असे म्हटले आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतीच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदे पुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल." तसेच मी सांगू इच्छितो की, या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. कवाडे साहेबांनी चर्चेला सुरुवात केली. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कवाडे साहेबांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. परंतु ही सूचना मी नियम 97 खाली स्वीकारली होती. कालच्या चर्चेच्या सुरुवातीपासून, ते या क्षणापर्यंत ज्या पध्दतीने भाषणे झाली त्या भाषणांच्या अनुषंगाने कोणत्या ना कोणत्या पध्दतीने जी वक्तव्ये करण्यात आली, ती सर्व वक्तव्ये तपासून घेण्यात येतील. या वक्तव्यांमध्ये सन्माननीय सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्र्यानी सुध्दा जी काही वक्तव्ये केलेली आहेत ती सुध्दा तपासून घेतली जातील. यामध्ये जे जे वक्तव्य योग्य असेल तेच रेकॉर्डवर ठेवले जाईल, अयोग्य वक्तव्ये असतील तर ती रेकॉर्ड वरुन काढली जातील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर आता, या ठिकाणी जे काही आरोप करण्यात आलेले आहेत ते आपण स्वत: ऐकलेले आहेत.....

सभापती : यासंदर्भातील निर्णय मी आता दिलेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,आपण मला न्याय दिला पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिली पाहिजे.....

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील मी निर्णय दिलेला आहे. तेव्हा कृपया आपण खाली बसावे. मी संपूर्ण प्रोसिडींग्ज पाहून किंबहुना या सभागृहाचे नेते आणि उपमुख्यमंत्री यांनी जे विचार मांडले ते सुध्दा पाहतो. जे आक्षेपार्ह असेल ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी भाषणाची सुरुवात करताना एक शब्दप्रयोग वापरला.....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण रेकॉर्ड तपासावे.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी देखील श्री.नितीन गडकरी जे म्हणाले त्यामध्ये देखील हेत्वारोप होता असे सांगितले. तेव्हा या संदर्भातील रेकॉर्ड मला तपासावे लागेल.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.नितीन गडकरी : माननीय उपमुख्यमंत्री भावनेच्या भरात बोलून गेले असतील, परंतु त्यांनी तरी मनाचा मोठेपणा दाखवावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे एक जबाबदार अनुभवी सदस्य आहेत. त्यांनी या सभागृहाला दिलेले योगदान मोठे आहे. त्यांनी नियम 34 वाचून दाखविला. पुढे सांगितले की, सदस्यांवर व्यतिगत आरोप करता कामा नये. त्या अनुषंगाने माननीय सभापतींनी निर्णय दिला की, कालपासून या सभागृहात एकमेकांवर आरोप होत आहेत. तेव्हा या संदर्भातील रेकॉर्ड तपासून जो आक्षेपार्ह भाग असेल तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल. माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतर आपण तेथेच थांबावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणातील चर्चा सामंजस्याच्या वातावरणात व्हावी असे वाटते. तेव्हा मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे नाव घेतले ते कामकाजातून वगळण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण सांगितले की, जे सन्माननीय सदस्य ठराव देतात शक्यतो त्यांच्याकडून प्रथम भाषणास सुरुवात केली जाते. महत्वपूर्ण बाबींवरील चर्चेची सुरुवात माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून होत असते आणि तसे अनेकवेळा घडलेले आहे. सभापती महोदय, या संपूर्ण गंभीर प्रकरणावर चर्चा होत असताना टीका होणे स्वाभाविक होते. या सदनामध्ये जसे स्तुतीचे बोल ऐकावे लागतात तसेच टीकेचे बोलही ऐकावे लागतात..... सभापती महोदय, मी बोलायचे की नाही....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता जे संपूर्ण प्रकरण सुरु झाले, गोंधळ झाला, त्यावेळी मी सभागृहात उपस्थित होतो. प्रश्न असा आहे की, या सदनाचे कामकाज नियमाप्रमाणे चालावे असा आपण नेहमी आग्रह धरतो. परंतु जे सन्माननीय सदस्य नियम पाळत नाहीत त्यांनाच बोलण्याची संधी दिली जाते. एक-एक सदस्य तीन-तीन वेळा बोलण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा सभागृहाचे कामकाज नियमाने चालले पाहिजे हे पाहण्याची नितांत गरज आहे, परंतु त्याकडे दुर्लक्ष होऊन इतकी चर्चा झाली.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांचा आदर ठेऊन मी याठिकाणी सांगू इच्छितो की, या सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे व्हावे ही जी आपली अपेक्षा आहे, त्या पध्दतीने मी एवढेच सांगितले की, एका गंभीर अल्पकालीन चर्चेवर याठिकाणी बोलत असताना काल याबाबतीत जी चर्चा झाली, त्यातील जे शब्द अयोग्य आहेत ते काढण्याच्या दृष्टीने प्रक्रिया होईल व जे योग्य आहे ते राहणारच आहे. सन्माननीय श्री.सुनील देशमुख यांनीही सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे विचार मांडले त्यात सुध्दा काही शब्द अयोग्य आहेत. त्यामुळे हे सर्व तपासावे लागेल. त्यानंतर माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबही बोलले. त्यामुळे याठिकाणी सगळी वक्तव्ये तपासून जे योग्य आहे ते कार्यवाहीमध्ये ठेवले जाईल व जे अयोग्य आहे ते कार्यवाहीमधून काढले जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी ज्या गोष्टींचा उल्लेख ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी केला व तो ज्या सन्माननीय सदस्यांना झोंबला त्याचा प्रामुख्याने विचार व्हावा. तसेच जे वक्तव्य नियमानुसार अथवा संसदीय प्रथेप्रमाणे झाले नसेल ते आजच्या या सगळया प्रोसिडींगवरुन काढून टाकावेत, एवढेच मला याठिकाणी सांगायचे आहे. परंतु याठिकाणी आपण एकतर्फी निर्णय घेत आहात.

सभापती : मी एकतर्फी निर्णय घेत नाही. आपल्याला काही तरी भास होत आहे. माझा एकतर्फी निर्णय नव्हता. सभागृहातील दोन्ही बाजूच्या भावना विचारात घेऊनच मी निर्णय दिला असून माझा निर्णय सगळयांना बंधनकारक आहे. आता माननीय गृहमंत्र्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एक अतिशय महत्वाचा प्रसंग आणि एक अतिशय वाईट, घृणास्पद घटना महाराष्ट्रात घडून गेली आहे. याबाबतीत माझ्यावर जबर टीका करण्यात आली असून माझा तोल ढळला अशीही साशंकता व्यक्त करण्यात आलेली आहे. मी माझा तोल तर ढळू देणारच नाही परंतु राज्याचाही ढळू देणार नाही. ज्यांचा तोल ढळला आहे त्यांनासुध्दा सावरुन त्यांचाही तोल सावरण्याचे काम मी करुन दाखवीन, हे मी याठिकाणी आत्मविश्वासाने सांगू इच्छितो. या घटनेकडे केवळ चार पोलिसांवर टीका करुन, गृहमंत्री कैचित सापडले म्हणून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करुन, महाराष्ट्रात झालेल्या सगळया घटनेला तपशीलवार उत्तर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

मिळू शकते का ? टीकेचा भडीमार करुन पुन्हा राज्यामध्ये असे प्रकार घडणार नाहीत याचे अचूक उत्तर देता येईल का ? याचा गांभीर्याने या प्रकरणांमध्ये विचार करण्याची आवश्यकता आहे. सगळीच आकडेवारी पाहिली तर असे दिसेल की, पोलिसांकडून सगळे गुन्हे नोंदविले जातात. असे कोणी म्हणू शकतो का की कुठल्या एका वर्षामध्ये ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत एकही गुन्हा घडलेला नाही ? असे एखादे वर्ष महाराष्ट्राते गेले आहे का की त्या वर्षामध्ये ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा महाराष्ट्रात घडला नसेल ? याठिकाणी मी सांगू इच्छितो की, असे एकही वर्ष गेले नाही की त्यावर्षी दीडशेपेक्षा जास्त गुन्हे ॲट्रॉसिटी ॲक्टखाली नोंद केलेले नाहीत. असे कुठल्याही वर्षामध्ये घडलेले नाही. आपण आपल्या राज्याला साधु-संतांचे राज्य म्हणतो. इतर राज्यांपेक्षा आपल्या राज्याला जास्त प्रमाणात साधु-संत वाट्याला आलेले आहेत. हे महाराष्ट्र राज्याचे सौभाग्य आहे की, ज्यांनी आपले आयुष्य सामाजिक समतेतील विषमता दूर करण्यासाठी घालविलेले आहे एवढे समाजसुधारक आपल्या राज्याला लाभले. आपल्या राज्याच्या वाट्याला शाहू-फुले-आंबेडकरांसारखी माणसे आली. जेवढी आपल्या राज्याला अशी माणसे वाटयाला आली तेवढी इतर राज्याला आली नाहीत. हे राज्य साधु-संतांचे, समाजसुधारकांचे व दिग्गजांचे राज्य आहे. या राज्यामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक सत्तेवर आले आहेत. या राज्याचा इतिहास पाहिला तर आपल्या दिसून येईल की, गृहमंत्री व मुख्यमंत्री पदावर सगळया जाती-धर्माचे लोक येऊन गेलेले आहेत.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

एवढा सगळा कर्तृत्वसंपन्न वारसा असतांना सुध्दा खैरलांजी प्रकरणाची ज्याची सर्वांना घृणा वाटेल, अशा घटनांची पुनरावृत्ती अधुन-मधून का होते ? आणि आजपर्यन्त केलेल्या सगळया प्रयत्नांवर पाणी का पडते ? याचा खोलात जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. आरोपांच्या चार फैरी झाडल्यानंतर, मोठया नेत्यांची नांवे घेतल्यानंतर, रोजच्या रोज कडक बोलत गेल्यानंतर वर्तमानपत्रात बातमी येईल, नाव छापून येईल पण समाजाचे जे मुलभूत प्रश्न आहेत ते संपणार काय ? हा विचार या चर्चेच्या माध्यमातून राज्यातील जनतेसमोर जाण्याची आवश्यकता आहे. राजकारणामध्ये टीकाटिप्पणी होत असते, मी 8 दिवस सहनसुध्दा केले. पण ज्या पध्दतीने टीका केली जाते, ज्या पध्दतीने वार केले जात आहेत, पातळी सोडून चुकीचे वार केले जात आहेत. व्यक्तिगत स्वभावापासून व्यक्तिगत हेत्वारोपापर्यन्त कालची सगळी भाषणे वाचून बघितली तर 'हा माणुस दिसण्यास साधाभोळा आहे पण हुषार आहे' अशा प्रकारचे सर्टिफिकेट दिल्याबद्दल गुरुजनांचे मी आभार व्यक्त करतो. महाराष्ट्राला साधाभोळा माणूस असून उपयोगी नाही, या राज्याला जितक्या धुर्तपणाची आवश्यकता आहे तेवढी असल्याबद्दल सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी सर्टिफिकेट दिले, मी त्यांचाही आभारी आहे. कारण हे सर्टिफिकेट गुरुजनांचे आणि पत्रकारांचे आहे. माणुस दुस-याचे परीक्षण करतांना, जसे आपण आहोत त्याच भावनेतून दुस-याकडे बघत असतो. यापेक्षा मला अधिक बोलावयाचे नाही. स्वत:ची परीक्षा आपण ज्या पध्दतीने करतो त्याच पध्दतीने दुस-याची परीक्षा करण्याचा प्रयत्न होतो. मी कसा आहे हे सांगत असतांना तुम्ही कसे आहात ? हे नवीन सभासद असतांना सुध्दा त्यांनी सभागृहाला दाखवून दिले आहे. कधी सामाजिक बांधिलकी म्हणून बोलावे लागते, कधी समाजाची गरज म्हणून बोलावे लागते. कधी कधी राजकारणामध्ये कुणाला तरी लाभ व्हावा म्हणून कुणावर हल्ला करावा लागतो. यापेक्षा मला सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांच्या कुठल्याही वक्तव्यावर काहीही बोलावयाचे नाही. परंतु, त्यांनी आपल्या भाषणात ज्या सूचना केल्या आहेत त्याची जरुर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, ही सगळी घडलेली घटना बघितल्यानंतर आपण केवळ पोलिसांच्याकडून याचे उत्तर मागत आहोत. जरुर या राज्यात ॲट्रॉसिटीचा कायदा आहे. अनेक कायदे या राज्यात आहेत, पण गुन्हे घडत आहेत. खुन केल्यानंतर 302 चे कलम लावले जाते, फाशीची शिक्षा त्या कलमामध्ये आहे. पण दरवर्षी महाराष्ट्रामध्ये फाशीची शिक्षा असतांना सुध्दा साधारणपणे 2000 खून होत आहेत. दारुबंदीचा कायदा आहे, दरवर्षी 17000 केसेस या कलमाखाली नोंदविल्या जात आहेत. कायदा करुन जागेवर सगळे प्रश्न सुटले असते तर समाजसुधारकांना काही कामच करावे लागले नसते. जनमताचा आधार नसेल, समाजाचे समर्थन नसेल तर मी असे शेकडो कायदे दाखवून देईन की जे विधानसभेने पारीत केले, लोकसभेने पारीत केले, घटनेत काही गोष्टींचा उल्लेख आहे पण समाजातील स्थिती मात्र कायद्यापेक्षा वेगळी आहे. कायदा आणि कायद्याची अंमलबलबजावणी करणारी यंत्रणा यांच्याकडून समाज परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त करीत असू तर समाजाचे दु:ख एकीकडे आहे, आजार एकीकडे आहे आणि उपचाराची चुकीची पध्दत आपण स्वीकारली आहे, असा त्याचा निष्कर्ष निघेल. या सगळया घटनेमध्ये दोन्ही बाजूने पोलिसांना क्रिटिसाईज करण्यात आले. एका बाजुला 150 वर्षांची परंपरा असलेली लोकल जळत असतांना पोलिसांनी गोळया का झाडल्या नाहीत ? आणि बघ्याची भूमिका स्वीकारली ? यामुळे पोलिसांवर कारवाई करा, अशी मागणी होत आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री.आर.आर.पाटील .....

दुस-या बाजूने पोलिसांवर टीका केली जाते. पोलिसांनी गोळीबार केला तर पोलिसांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी केली जाते. मी काल सभागृहामध्ये 4 महिन्यांपूर्वी घडलेले एक उदाहरण सांगितले. मुंबईला आरक्षणाच्या प्रश्नावरुन काही विद्यार्थ्यांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरु केले. परंतु तेथे त्यांच्या आंदोलनाची कोणीच दखल घेत नाही हे पाहून लोकांचे लक्ष वेधले जावे म्हणून विद्यार्थ्यांनी कोणतीही पूर्व कल्पना न देता राजभवनामध्ये जाण्याचा प्रयत्न केला. राजभवन राज्यातील प्रोटेक्टेड एरिया आहे. विद्यार्थी राजभवनामध्ये घुसले असते आणि मोडतोड केली असती तर राज्यातील राजभवन देखील सुरक्षित नाही, अशी टीकेची झोड उठली असती म्हणून त्यावेळी कारवाई करणे आवश्यक होते. विद्यार्थ्यांनी राजभवनावर जाऊन आंदोलन करण्याची कोणतीही सूचना पोलिसांना दिलेली नव्हती. त्यामुळे तेथे पोलिसांकडे आवश्यक पोलीस बळ उपलब्ध नव्हते. या गोष्टीची पोलिसांना कल्पना असती तर तेथे सर्व पर्यायी व्यवस्था करता आली असती. लक्ष वेधण्यासाठी अचानकपणे विद्यार्थी तेथे गेले तेव्हा पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. त्यानंतर या घटनेचे चित्र जेव्हा टी.व्ही. वर विविध चॅनलच्या माध्यमातून प्रसारित होऊ लागले तेव्हा श्रीमती सोनिया गांधींनी सुध्दा ते पाहिले. त्यानंतर त्यांच्याकडून माननीय मुख्यमंत्री आणि मला फोन येण्यास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांवर एवढा कठोर लाठीचार्ज पोलीस कसे करीत आहेत याबाबत विचारणा झाली. तेव्हा मी जबाबदार पोलीस अधिका-यांना बोलावून घेतले आणि विचारणा केली की, तुम्ही विद्यार्थ्यांना इतक्या अमानुषपणे का मारता ? पोलिसांनी मला एकच प्रश्न विचारला की, जर विद्यार्थी राजभवनामध्ये गेले असते तर आम्हाला कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले असते, याचा विचार करुनच शेवटी नाईलाज म्हणून आम्हाला लाठीचार्ज करावा लागला. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांची आणि माझी चर्चा झाली आणि संबंधित पोलीस अधिका-याला निलंबित करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानंतर एक महिन्याचा कालावधी गेल्यानंतर विल्सन कॉलेजमध्ये मुले घुसली. प्रा.आठवले यांच्या गळयामध्ये चपलांची माळ घातली गेली. 20 विद्यार्थ्यांनी त्या प्राध्यापकाची धिंड काढली. पोलीस घटनास्थळी पोहोचले. एका बाजूने धिंड चालली होती आणि दुस-या बाजूने पोलीस संरक्षण दिल्यासारखे मिरवणूकीतून चालले होते. केवळ बघ्याची भूमिका घेतली जात आहे म्हणून तुम्ही पोलिसांवर कोणती कारवाई करणार आहात,

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

असे त्यावेळी प्रश्न विचारण्यात आले होते. पोलिसांनी कारवाई केली म्हणून त्यांना सस्पेंड करावे आणि कारवाई केली नसेल तरीही सस्पेंड करावे. तर आपण असा निर्णय घ्यावयाचा काय की, सर्व पोलीस दल सस्पेंड करण्यासारखे आहे ? पोलीस यंत्रणेला जाणून बुजून नामोहरम केले तर समाजाचे संरक्षण कोण करेल ? कालच्या घटनेमध्ये पोलिसांनी बळाचा वापर केला, असे कोणी म्हणत असेल तर माझ्याकडे मेडीकल रिपोर्ट आहे. खैरलांजी येथील घटना असेल, कानपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या विटंबनेची घटना असेल, त्यासंदर्भात लोकांच्या प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक आहे. माता रमाबाई आंबेडकर नगरमध्ये आम्ही बघितलेले आहे की, कठोर कारवाई केल्यानंतर दंगल पसरली. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र अशांत झाला होता. परंतु वेळ प्रसंगी मार खावा लागला तरी चालेल असे म्हणून यावेळी पोलिसांनी योग्य पद्धतीने महाराष्ट्र हाताळला. या आंदोलनाच्या वेळी 128 पोलीस व 52 आंदोलनकर्ते जखमी झाले यावरुन आपल्याला असे दिसून येईल की, पोलीस किती संयमाने वागले. पोलिसांना सूचना देण्यात आली होती की, या घटनेसंदर्भात लोकांमध्ये स्वाभाविक प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे त्यामुळे पोलिसांनी योग्य प्रकारे परिस्थिती हाताळली. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पोलीस यंत्रणेला जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत. राग आला तरी काठया आवरण्याचे काम पोलिसांनी केले. काही ठिकाणी नाईलाजास्तव लाठीचार्ज केला, अश्रुधूर सोडला आणि एकंदरीत 52 राऊंड फायर करण्यात आले. त्यामध्ये फक्त 3 माणसे जखमी झालेली आहेत.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

त्याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ आहे की, लोकांना मारणे हा पोलिसांचा उद्देश नव्हता तर केवळ आणि केवळ शांतता प्रस्थापित करणे हाच मुख्य उद्देश होता. एका बाजूने राज्यातील सर्व परिस्थिती पोलिसांनी संयमीपणे आणि शांतपणे हाताळली आहे. त्याला आपण अपयश म्हणणार असाल तर मग माता रमाबाई आंबेडकर नगर येथे जे काही घडले होते ते योग्य होते काय ? पोलिसांनी येथपर्यंतची कारवाई केली नसती तर दुसरे प्रकार त्यातून निर्माण झाले असते. सभापती महोदय, नाशिकमध्ये झालेला दलित कार्यकर्त्याचा मृत्यू हा पोलिसांच्या लाठीमारामुळे वा गोळीबारामध्ये झालेला नव्हता तर तेथे दलित कार्यकर्ते दुकानदारांना दुकाने बंद करा असे सांगत फिरत होते. एक दोन ठिकाणी दगड पडले. काही दुकानदार पुढे आले आणि तुम्ही दुकाने बंद करा म्हणून आम्हाला सांगणारे कोण ? असे विचारू लागले. त्यावेळी बाकीचे पळून गेले आणि एक जण मात्र तेथेच थांबला. त्याच्यावर तेथील जमाव तुटून पडला आणि मरेपर्यंत मारण्याची भूमिका त्या जमावाने स्वीकारली. त्यात एका दलित कार्यकर्त्याचा अंत झाला. पोलिसांनी योग्य काम केले नाही तर काय होते याचा दुसरा प्रकार मी आपल्याला सांगतो. औरंगाबादमध्ये काही दगडफेक झाली. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगेन की, त्यांनी वाटल्यास याबाबत माहिती घ्यावी. त्यांच्या पक्षातील काही प्रमुख व्यक्ती पोलीस ठाण्यामध्ये गेल्या आणि सांगू लागल्या की, तुम्ही आवरते घ्या अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू. अशा प्रकारची भूमिका घेतली गेली की नाही हे आपण जाणून घ्यावे. सोलापूरला वाहने फोडली गेली, दुकाने फोडली गेली. त्यावेळेस सर्वपक्षीय दुकानदार येऊन सांगू लागले की, आम्हाला तुम्ही मोकळीक द्या आम्ही यातून मार्ग काढतो. तेव्हा तुम्ही दोन्ही बाजू सांभाळल्या नाही तर काय होईल याचा अंदाज घेऊनच पोलिसांना कारवाई करावी लागते. काही वेळेस कर्फ्यू पुकारावा लागला, काही लोकांना अटक करावी लागली. परंतु त्यामध्ये शांतता राहील अशीच भूमिका पोलिसांना घ्यावी लागली. ही घटना घडल्यानंतर त्याचे प्रतिसाद उमटू नयेत म्हणून मागील महिन्यामध्ये कोणाही गृहमंत्र्यांने केले पाहिजेत त्यापेक्षा अधिक काम करण्याचा मी निश्चितपणे प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे दोन बैठकांना हजर होते. सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे साहेबांबरोबरही तीन बैठका झाल्या. ज्या ज्यावेळी दलित संघटना माझ्याकडे आल्या त्या त्यावेळी मी माझ्यापुढील काम बाजूला करून त्यांची भेट घेतली आहे, चर्चा केली आहे आणि राज्य सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या प्रयत्नांची माहिती देऊन त्यांना

..... आरआर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

समजावून सांगितले आहे तसेच त्यांच्याकडून जे सहकार्य सरकारला पाहिजे होते त्याचीही मागणी त्यांच्याकडे केली आहे. सभापती महोदय, मी काही जणांचा वेगळा अनुभव घेतला आहे. बैठकांमध्ये चर्चा करताना सामंजस्याची, शांततेची भूमिका घ्यावयाची, परंतु माईक आणि कॅमेरा समोर आल्या बरोबर आक्रमकपणे बोलावयाचे हेही मी अनुभवले आहे. कदाचित त्यामागे त्यांची अशीही भूमिका असण्याची शक्यता आहे की, अगोदरच माझा समाज कमी आहे, त्यामुळे मी आक्रमता दाखविली तरच मी त्या समाजाचा मोठा नेता आहे आणि समाज आपल्या पाठीमागे येईल असे त्यांना वाटत असावे. इतकेच काय पण एखादी खाजगीमध्ये आपण काही माहिती दिली तर ती देखील बाहेर उघडपणे अगदी वर्तमानपत्रातूनही सांगितली गेली. काही अशी माहिती वर्तमानपत्रांना अचूकपणे दिली गेली. सभापती महोदय, गेल्या काही दिवसांमध्ये मला एक गोष्ट कळली आहे की, कोणाबरोबर बैठका घेतल्या पाहिजेत आणि कोणाबरोबर घेऊ नयेत एवढे शहाणपण मला अलिकडच्या काही घटनांतून आलेले आहे हे प्रांजळपणे सांगितले पाहिजे. माझा यातील अनुभव नवा आहे. अर्थातच 10 कोटी जनतेतील सगळ्यांची मने काही मी ओळखू शकत नाही. सगळ्याच नेत्यांची माहिती माझ्याकडे असणे शक्य नाही. परंतु काही गोष्टी अनुभवातून कळतात हे आज मला कळू लागले आहे. काही गोष्टी तर मी अनेकदा, वारंवार निक्षून सांगितल्या असताना, त्याच त्या गोष्टींचा खुलासाही अनेकदा केला असताना, घेतलेल्या बैठकांमध्ये त्याबाबत स्पष्टपणे खुलासा केलेला असताना विधान परिषद आणि विधानसभेपासून उपलब्ध होईल त्या स्टेजवर स्पष्टपणे सांगितले असतानाही, वर्तमानपत्रांनाही दोन वेळा खुलासे करूनही तेच ते आरोप पुन्हा पुन्हा माझ्यावर करण्यात आले. प्रेसमध्ये जी चर्चा झाली ती मी बैठकांमध्ये देखील सांगितली. चंद्रपूर, गोंदिया, भंडारा या सगळ्या जिल्ह्यांमध्ये .....

(यानंतर श्री.सरफरे ....एसएस 1 ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

हे सर्व जिल्हे अगोदरच नक्षलग्रस्त आहेत, या जिल्हयामध्ये नक्षलवाद्यांच्या ॲक्टिव्हिटीज काही प्रमाणात चालू असतात. या नक्षलवाद्यांची मोडस ऑपरेंडी नेहमी अशी राहिली आहे की, ज्यावेळी छत्तीसगढ आणि आंध्र प्रदेश या राज्यांनी नक्षलवाद्यांच्या विरोधात कडक भूमिका घेतली तर ते महाराष्ट्रामध्ये पळून येतात. आणि महाराष्ट्रामध्ये नक्षलवाद्यांविरोधात अभियान राबविले जाते त्यावेळी ते शेजारच्या राज्यामध्ये पळून जातात. त्यामुळे एका बाजूने या ॲक्टिव्हिटीज वाढल्या आहेत. अशावेळी दुसऱ्या बाजूने हे आंदोलन चालू राहिले तर त्या परिसरामध्ये नक्षलवादी त्याचा फायदा घेतील आणि पोलिसांवर हल्ले करतील. मला आपण दलित चळवळीबद्दल सांगता. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण पुरोगामी विचाराचे आहात. आपण माझ्या गावामध्ये एकदा जा. माझ्या राजकारणाची सुरुवात ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून झाली आहे. त्या निवडणुकीमध्ये सर्व जातीच्या धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन प्रसंगी माझ्या भावकीचा विरोध स्वीकारुन पहिले पॅनेल उभे केले. मी याठिकाणी जे सांगत आहे ते जर असत्य असेल तर मी राजीनामा देईन.माझ्या राजकारणातील पहिली निवडणूक होती त्यावेळी माझ्या गावातून मी पहिला दलित सरपंच केला. माझ्या बहिणीच्या लग्नाला माझ्या भावकीतील अनेक लोक आले नव्हते. गावामध्ये अनेक वर्षे बोर्डावर आर.आर. पाटील कंसामध्ये "मांग" असे लिहिले जात होते. हा सर्व घटनाक्रम माझ्या नावावर असतांना मी एक सवर्ण आहे अशाप्रकारचा एक विखारी विचार माझ्या बाबतीत पूर्णपणे माहिती न घेता ओकण्याचे काम केले गेले याचे मला आश्चर्य वाटते. सभापती महोदय, मी या सदनामध्ये पुरावे द्यायला तयार आहे. त्या काळामध्ये आपण देखील मंत्रिमंडळामध्ये होता. अनेक पक्षांच्या बैठकीमध्ये नामांतराच्या भूमिकेला विरोध होत होता. त्यावेळी सभागृहामध्ये आणि सभागृहाबाहेर उघडपणे समर्थन करणारा मी होतो हे माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपल्याला विसरता येणार नाही. या राज्यामध्ये मंडल आयोग लागू करतांना त्याचे उघडपणे मी समर्थन केले होते. अलिकडच्या काळात काही जणांनी आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतली असता आरक्षणाच्या बाजूने मी पोटतिडिकीने भूमिका घेतली. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये आरक्षणाचे समर्थन करण्याची भूमिका पहिल्यांदा उघडपणे, जाहीरपणे मी घेतली होती. त्यामुळे मी वरच्या जातीतला आहे म्हणून माझ्यावर जातीयवादाचा आरोप करणाऱ्यांचा खालच्या जातीतल्यांचे पुढारीपण करण्याचा प्रयोग मी महाराष्ट्रामध्ये कधीही यशस्वी होऊ देणार नाही या गोष्टीची मी सभागृहामध्ये ग्वाही देतो. एखाद्यावर आरोप करण्यापूर्वी त्याचा पूर्वेतिहास बघण्याची आवश्यकता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

आहे.

माननीय सदस्य प्रा. कवाडे सरांबद्दल माझ्या मनामध्ये राग असता, वेगळा विचार असता तर कदाचित त्यांच्याबरोबर मी मैत्री करण्याचा प्रयत्न केला नसता. त्यांना राष्ट्रवादीबरोबर येण्याची विनंती केली नसती. ही विनंती करण्यासाठी मी पहिल्यांदा त्यांच्या घरी गेलो होतो.माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांच्या पॅनेलला तोडीस तोड उत्तर देण्यासाठी आपल्याबरोबर संयुक्त पॅनेल केले पाहिजे. या जिल्हयामध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसची ताकद कमी होती. म्हणून त्यांच्या ताकदीचा उपयोग होईल याकरीता दोघांचे मिळून पॅनेल केले. तरीसुध्दा आमची ताकद कमी पडली आणि आमच्या पॅनेलच्या दोन तृतियांश उमेदवारांचे डिपॉझीट गेले हा भाग वेगळा. परंतु तुमच्याबद्दल माझ या मनामध्ये वेगळा विचार असता तर याठिकाणी मी या गोष्टी उघड केल्या नसत्या. आपल्याबद्दल माझ्या मनामध्ये नेहमीच आदर वाटत आला आहे. सभापती महोदय, संपूर्ण गावाला एकत्र घेऊन एखाद्या दलित कुटुंबाची हत्या होते, आणि त्या बाबत जबाब देण्यासाठी कुणीही पुढे येत नाही यामुळे कुणालाही राग येणे स्वाभाविक आहे, हे मी समजू शकतो. आपण परदेशातून आल्याबरोबर मी आपणास फोन करण्याचा प्रयत्न केला. परंतु मिसटायमिंगमुळे आपले बोलणे झाले नाही. त्यावेळी आंदोलन सुरु झाले नव्हते कुणीही रस्त्यावर उतरले नव्हते. 40 दिवसानंतर पहिले आंदोलन सुरु झाले. ही घटना 29 तारखेला घडली. त्यानंतर पोलिसांनी कलमे लावली. स्वाभाविकपणे त्याबाबतीत पोलिसांकडून जरुर चुका झाल्या आहेत. कोणत्याही चुकणाऱ्याला आम्ही माफ केले नाही. परंतु या संपूर्ण घटनेची पार्श्वभूमी न तपासता रोज उठून आक्रमकतेने एकावर एक टीका करणारे या प्रश्नाचे गांभीर्य कमी करीत नाहीत ना याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरू ...

म्हणून माझ्याकडे पहिल्यांदा राजीनामा मागितला,दुसऱ्यांदा मला सहआरोपी करण्याचा प्रयत्न झाला आणि तिसऱ्यांदा सरकार बरखास्तीची मागणी केली जात आहे. या मागण्या करण्यापेक्षा एकदाच श्री.आर.आर.पाटील यांना फासावर लटकविण्याची मागणी का करत नाही ? यापुढची कोणतीच शिक्षा असू शकत नाही. आर.आर.पाटील यांना फासावर लटकून मोकळे व्हावे. अशी मागणी केली तर फासावर जाण्याची सुध्दा माझी तयारी आहे. पण गॅरंटी द्या की, पुन्हा महाराष्ट्रामध्ये एकाही दलितांवर अत्याचार होणार नाही, एकाही आदिवासींवर अत्याचार होणार नाही. मी सगळेच राजकारण बघितले नसले तरीसुध्दा मी इतिहास वाचलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनासुध्दा राज्याच्या पाटलाला शिक्षा द्यावी लागली होती. त्यावेळेस पाटलाच्या हातून गुन्हा घडला होता. रामराज्यामध्ये देखील गुन्हे घडले. रामाला वनवासाला जावे लागले. सभापती महोदय, जोपर्यन्त माणसाच्या मनामध्ये वाईट भावना आहेत, तोपर्यन्त गुन्हे हे होत रहाणार. या गोष्टी नष्ट करण्याची आवश्यकता आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चांगली घटना लिहिलेली आहे. सगळ्यांना मतांचा अधिकार दिलेला आहे, सगळ्यांना विकासाच्या समान संधी दिलेल्या आहेत. असे असतांना या घटना कमी का होत नाहीत ? दुसऱ्यावर आरोप करत असताना, जाती कमी झाल्या काय ? याचा अंतर्मुख होऊन विचार केला तर सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब माझ्या मताशी सहमत होतील. अजूनही समाजाच्या मनामध्ये ही जातीची विषारी संकल्पना नष्ट करण्यामध्ये साधु-संत, राजकारणी अपयशी ठरलेले आहेत. दिवसेंदिवस ही भयानकता वाढत चाललेली आहे. आपण महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये डोळसपणाने पहात आहोत. विविध राजकीय पक्षांचे निर्णय पाहिल्यानंतर समाजाची ओळख जातीय वादामध्ये होते. याबाबतीत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी कधी तरी एकदा लोकसभेमध्ये किंवा विधानसभेमध्ये उभे राहिले पाहिजे. पण याचे कारण असे की, या मागची व्यथा आहे. जरूर समाजमन ज्या पध्दतीने घडले पाहिजे, त्या पध्दतीने घडलेले नाही. माणसे जातीपातीचा विचार करतात, त्याला आम्ही राजकीय पक्ष बळी पडतो. सभापती महोदय, राजकीय पक्षांनी कोण निवडून येईल त्यांना तिकीट देण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. पक्षांनी लोकांची मानसिकता स्वीकारलेली आहे. अडीच टक्क्येच्या बाबतीत खूप बोलले जाते. परंतु सन्माननीय श्री.बाळासोब ठाकरे यांना मी धन्यवाद देतो की, त्यांनी त्यांचा पक्षाचा मुख्यमंत्री करून दाखविला. परंतु असे कमी वेळा घडलेले आहे. महाराष्ट्राचे विश्लेषण नि:पक्षपाती करायचे ठरविले तर जात ही व्यवस्था पूर्णपणे मोडीत निघालेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरू...

आहे, असा दावा कोणी करु शकत नाही. कोणी, कोणी हे जोपासण्याचा प्रयत्न केला याचे उत्तर माझ्याइतके प्रा.कवाडे सर सुध्दा त्या पध्दतीने देऊ शकतील. हे सगळे मोडून काढावयाचे असेल तर केवळ चार पोलीसांकडे दंडुके देऊन परिवर्तन होईल असे नाही. आज समाजसेवक, समाज सुधारक, सामाजिक कार्यकर्ते पूर्णपणे राजकारणामध्ये आलेले आहेत. त्याचा परिणाम असा झाला की,आज समाजकारण मागे पडलेले आहे. समाजकारणामध्ये काम करणारे कार्यकर्ते राजकारणामध्ये आले परंतु ते राजकारणात अपयशी ठरलेले आहेत. त्यांच्यामध्ये वैफल्यग्रस्त भावना निर्माण झालेली आहे. या पुरोगामी राज्यामध्ये खैरलांजीसारखे प्रकरण घडू नये म्हणून सामाजिक संस्था, या राज्यातील साहित्यिक, या राज्यातील कलाकारांनी एक ठराविक वेळ देऊन यासंबंधातील भूमिका वटविली पाहिजे. जात्यांधतेचे समाजामध्ये विष पसरलेले आहे ते समाजसुधारकांनी मोडून काढण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारे अपेक्षित असतांना आज आपण रेड्याला औषध देण्याऐवजी पखाल्याला देतो, मग रेड्याचा रोग कसा कमी होईल हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

समाजातील हे दोष दूर करण्यासाठी बसावे लागेल, एकत्र यावे लागेल, विचार प्रबोधन करावे लागेल. हे सर्व करताना मी कोठे तरी समाजकारण करणाऱ्यांवर ही जबाबदारी टाकून या राज्याचा गृहमंत्री, पोलीस दल, कायदा, घटना यांना बाजूला करु इच्छित नाही. एका बाजूला या गोष्टी करीत असताना दुसऱ्या बाजूला समाज परिवर्तन सामाजिक अभिसरणातून व्हावयास वेळ लागतो म्हणून कायदेमंडळाने काही कायदे करुन समाज परिवर्तनाचे काम कायद्याच्या माध्यमातून झाले पाहिजे अशी भूमिका घेतली जाते. आपल्या घटनेने ती भूमिका घेतलेली आहे. विविध कायद्यांनी ती भूमिका घेतलेली आहे. आज मी या राज्याचा उपमुख्यमंत्री असलो तरी मी स्पष्टपणे आणि प्रांजळपणे कबूल करीन की, प्रशासनातील सगळेच लोक संवेदनशील नाहीत. मी एक गोष्ट प्रांजळपणे कबूल करीन की, प्रशासनातील भ्रष्टाचार पूर्णपणे संपलेला नाही. उदासिनता दाखविणारे अधिकारी, कर्मचारी नाहीत असे म्हणण्याचे धाडस मी करु शकणार नाही. यंत्रणेतील हे सगळे दोष असताना आपण सगळा समाज या यंत्रणेमार्फत बदलावयास निघालो तर मग आपली फसगत होईल. या राज्यामध्ये दररोज अनेक प्रकार घडत असतात आणि सगळ्या घटनांची माहिती गृहमंत्र्यांना असत नाही. किंबहुना माहिती घेण्याचा प्रयत्न केला तरी अनेक वेळा प्रत्येक गुन्ह्याची नोंद घेणे शक्य होत नाही. तशी प्रथा सुध्दा नाही. अनेक वेळा अनेक गुन्हे नोंदविले जात नाहीत. जर आपण या खैरलांजी प्रकरणाकडे पाहिले तर असे दिसून येते की, श्री. सिध्दार्थ गजभिये हे खैरलांजी गावाजवळ धुसार नावाचे गाव आहे त्या गावचे पोलीस पाटील होते. भोतमांगे कुटुंब आणि त्यांचे अत्यंत घनिष्ठ आणि चांगले संबंध होते. सुरेखा भोतमांगे ही त्यांची मानलेली बहीण होती. या पोलीस पाटलाचे गावामध्ये जाणे-येणे असावयाचे. ते जवळचे नातेवाईक होते. सगळ्या भोतमांगे परिवाराची पार्श्वभूमी पाहिली तर असे दिसून येते की, श्री. भय्यालाल भोतमांगे हे या गावचे राहणारे नव्हते. हे त्यांच्या मामाचे गाव आहे. त्यांच्या मामाने जमीन घेतली होती. प्रदीर्घ काळ ही जमीन पड राहिलेली होती. जमीन पड असल्यामुळे या गावातील काही शेतकरी त्या जमिनीचा जाण्या-येण्यासाठी उपयोग करावयाचे. त्यांनी या गावामध्ये येऊन आपल्या मामांनी घेऊन ठेवलेली जमीन कसावयास घेतली. त्यावेळी गावातील काही शेतकऱ्यांचा रस्ता बंद झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. आर. आर. पाटील ....

थोडासा संघर्ष झाला. तहसिलदारांपर्यंत प्रकरण गेले. तहसिलदारांनी रस्ता दिला पाहिजे असा निर्णय दिला आणि श्री. भोतमांगे यांनी उदार मनाने जमिनीच्या एका बाजूने गावासाठी रस्ता उपलब्ध करुन दिला. परंतु कधी जनावरे घुसवणे, हे दलित कुटुंब आहे म्हणून त्यांची मानहानी करणे हे प्रकार अधूनमधून होत होते. दुर्देवी श्री. भोतमांगे हे आपल्यापरीने सगळीकडे न्याय मागण्याचा प्रयत्न करीत होते. माननीय श्री. कवाडे साहेब, 2002 साली मी या राज्याचा गृहमंत्री नव्हतो. 2002 साली त्यांनी आय.जी., एस.पी. आणि डी.एस.पी. यांच्याकडे तक्रार दिली आणि फार विश्वासाने त्यांनी त्या तक्रारीची प्रत आपल्याला दिली. मी पुरावा देणार आहे. हे मला दुसरे तिसरे कोणीही सांगितले नाही तर स्वत: भय्यालाल भोतमांगे यांनी भेटून सांगितले. ज्या सुरेखा भोतमांगे यांचा खून झाला त्यांच्या सहीची प्रत माझ्याकडे आहे. आपली पोच त्या प्रतीवर आहे. आपण म्हणाल तर मी त्यांना प्रत देतो. त्यांनी ही कॉपी दिली होती. त्यांनी असे म्हटले आहे की, गावातील काही लोकांनी मला जातीवाचक शिव्या दिल्या म्हणून मी तक्रार केली परंतु सगळ्यांनी माझ्यावर दबाव आणून मला केस पाठीमागे घ्यावयास लावली. प्रा.कवाडे साहेब, आपण सातत्याने माझा राजीनामा मागत आहात. फासावर लटकवा असे म्हणत आहात. सहआरोपी करा असे म्हणत आहात. त्याची कॉपी मला आली असती तर, माझ्याकडे आलेला कोणत्याही दलिताचा किंवा गरीब माणसाचा एकही अर्ज मी असाच जाऊ दिला नाही. जर 2002 साली या माणसाला वेळीच न्याय मिळाला असता, संवेदनशील नेता म्हणून आपण वेळीच दखल घेतली असती तर कदाचित त्यांना न्याय मिळू शकला असता. पण कोणत्याच आघाडीवर त्यांना न्याय मिळाला नाही. एका बाजूने गावामध्ये हा माणूस लढतो आहे म्हणून लोकांना व्देष वाटत होता.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

हे दलित असून देखील आम्हाला दाद देत नाहीत., आम्हाला घाबरत नाहीत...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : माननीय उप मुख्यमंत्र्यांचे भाषण संपल्यानंतर मी आपणास अर्धा मिनिट बोलण्याची संधी देईन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : "कवाडेसाहेब म्हणतात की, मला फासावर लटकवा" असे सन्माननीय उप मुख्यमंत्री म्हणाले. मी अशा प्रकारची मागणी केलेली नाही.

श्री. आर.आर.पाटील : मी असे म्हणालो की, एकदाच तेवढी मागणी करा, म्हणजे टप्प्याटप्प्याने वर जायला नको. मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांची इन्क्वायरी नेमायला तयार आहे. खुद्द भैयालाल भोतमांगे यांनी हे पत्र दिलेले आहे. यापेक्षा मी आणखी काय सांगू ? हे जर खोटे ठरले तर आपण सांगाल ती शिक्षा भोगायला माझी तयारी आहे. एका राजकीय नेत्याला हे पत्र दिलेले असून त्याची पोच पाहाण्यासाठी मी हे पत्र आपणाकडे देत आहे. हे पत्र त्याने आय.जी.ला देखील दिले होते. त्यावेळी आय.जी. संवेदनशील का नव्हता ? त्यावेळी डीएसपी कुठे हुरडा खात बसला होता ? त्यानी तक्रारीची दखल का घेतली नाही ? हा प्रकार 2002 सालापासून 3 सप्टेंबर 2006 पर्यन्त घडला. त्या दिवशी सिध्दार्थ गजभिये हा खैरलांजीला आला होता. सिध्दार्थ गजभिये हा एका गावचा पोलीस पाटील असून त्याची जमीन आहे आणि त्याची आर्थिक परिस्थितीही बरी आहे. सभापती महोदय, या प्रकरणी एससी/एसटी कमिशनने जे जबाब घेतले त्यावेळी अशी माहिती पुढे आली की, तेथील एका शेतमजुराने या सिध्दार्थ गजभियेकडे कामाचे पैसे मागितले.पुढे एवढ्यावरुन चिडून जाऊन हा पोलीस पाटील माजलाय म्हणून त्या गावाच्या बाहेर सिध्दार्थ गजभियेला मारण्यात आले. स्वाभाविकच सुरेखा भोतमांगे आणि प्रियंका भोतमांगे यांचे सर्वांशी संबंध चांगले असल्यामुळे त्यांनी पोलीस पाटलाला वाचवले. स्वत: पोलीस पाटलाला एवढी मारहाण झाल्यानंतर त्याने पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवायला पाहिजे होता. परंतु तसे न करता तो पोलीस पाटील कामठी येथील दवाखान्यात दाखल झाला आणि कामठीला गुन्हा दाखल होऊन आंधळगावला ही केस पाठवण्यात आली. 13 तारखेला गुन्हा रजिस्टर झाल्यानंतर सिध्दार्थ गजभिये हा दलित असल्यामुळे या प्रकरणी ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

करण्यामध्ये पोलीस अधिका-यांनी वेळकाढूपणा केला. ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यासाठी कायदेशीर सल्ला घ्यावा असे डीएसपीने श्री.भरणे नावाच्या अधिका-याला सांगितले. त्यानंतर श्रीमती लता गजभिये या पोलीस प्रॉसिक्युटरने 25 तारखेला ॲट्रॉसिटी ॲक्ट लावण्याची आवश्यकता नाही असा कायदेशीर सल्ला दिला. 29 तारखेला 12 आरोपींना अटक करण्यात आली. त्यांना कोर्टा पुढे हजर करण्यात आले आणि 15 मिनिटाच्या आत या सर्व आरोपींना सोडण्यात आले. या प्रकरणी राजकीय हस्तक्षेप झालेला आहे काय ? अशा प्रकारचे वक्तव्य या सदनामध्ये करण्यात आले. यामध्ये राजकीय हस्तक्षेप झालेला आहे की नाही ही बाब अजून स्पष्टपणे पुढे आलेली नाही. एक गोष्ट खरी आहे की, भारतीय जनता पार्टीचा कडव नावाचा कार्यकर्ता या प्रकरणी आरोपी आहे. त्याने आमदाराना फोन केला होता आणि आमदारानी संबंधित पोलीस स्टेशनला फोन केला होता की, "कोर्टामध्ये जामीन घेऊन जे लोक परत यावयास निघालेले आहेत त्यांच्यावर हल्ला होण्याची शक्यता असल्याची माहिती मिळालेली आहे, त्यामुळे त्यांना संरक्षण द्या." ही वस्तुस्थिती असून हे पोलिसांनी रेकॉर्डवर देखील घेतलेले आहे. कोर्टात जामीन मिळालेल्या लोकांना असे वाटले की, सिध्दार्थ गजभिये याने आम्हाला मारण्यासाठी मारेकरी आणलेले आहेत. त्यांना चुकीचे सांगितले गेले. तो मॉब गावात आला आणि ज्या पध्दतीने याठिकाणी वर्णन करण्यात आले त्या पध्दतीने त्यांनी खून करुन प्रेते कॅनॉलमध्ये टाकली. ही घटना 29 तारखेला घडली.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

30 तारखेला हा गुन्हा नोंद झाला. तेथपर्यंत ॲट्रॉसिटी ॲक्ट न लावणे, उदासिनता दाखविणे या सगळया चुका पोलिसांनी केल्या आहेत. ही घटना घडल्यानंतर सुध्दा एस.पी.पासून सगळया अधिकाऱ्यांनी जे काम केले ते निश्चितच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणारे काम आहे. 1 तारखेला तातडीने 28 लोकांना ॲट्रॉसिटी आणि 302 च्या गुन्हयाखाली अटक करण्यात आली. इतकी हत्याकांडे झाली, 47 आरोपींना आतापर्यंत पोलिसांनी दोषी धरले आणि 302 खाली, ॲट्रॉसिटी लावून अटक करण्यात आली ही काहीच कारवाई नाही का? या घटना घडल्यानंतर हा प्रकार अमानुषपणाचा होता. सगळयांना विश्वासात घेऊन अनेक बैठका झाल्यानंतर पहिल्यांदा मागणी करण्यात आली की, स्थानिक पोलिसांकडे तपास नको. भंडारा जिल्हयातील दलित कार्यकर्त्यांचे मत होते की, पोलीस कधीही आरोपी करतात. मग राज्य पेटविण्याची भाषा सुरु झाली. सरकारने दबावाखाली येऊन तपास सीआयडीकडे दिला. मग मागणी झाली की, सीआयडी ऐवजी सीबीआयकडे तपास द्यावा. सरकारने सीबीआयकडे तपास दिला. आंदोलनकर्त्यांनी, विविध नेत्यांनी फास्ट ट्रॅक कोर्ट नेमा अशी मागणी केली. सरकारने ती घोषणा केली. केस चालविण्यासाठी अमूक वकील द्या अशी मागणी केली असता वकील देण्यात आला. पुनर्वसन करुन द्या अशी मागणी केली तेव्हा पुनर्वसनाची भूमिका सुध्दा स्वीकारली. अशी कोणती मागणी शिल्लक राहिली, जी गोष्ट सरकारने केली नाही? यापुढे जाऊन ज्या अधिकाऱ्यांनी उदासिनता दाखविली होती त्यासंबंधी महाराष्ट्रातील सगळया प्रशासनाला योग्य तो संदेश जावा म्हणून जे अधिकारी चुकले त्यांना या घटनेमध्ये सहआरोपी करण्यात आले आणि जबरी कलमे त्यांच्यावर लावण्यात आली आहेत. चुकलेले अधिकारी तुरुंगात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात असे प्रसंग किती वेळा आले? कामात चूक झाली तर कोणाला पाठिशी घालण्याची भूमिका घेतली जाणार नाही हा संदेश देण्याचे काम केले. या घटनेमध्ये सर्वश्री सिध्देश्वर भरणे, पोलीस सब इन्स्पेक्टर, बबन मेश्राम, पोलीस हवालदार, एस.सुसदकर, विभागीय पोलीस अधिकारी, नथू बडवाईक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सहारे, पोलीस हवालदार यांना कायम सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय सरकारने घेतला. ही कठोर कारवाई यासाठी केली जाते की, या राज्यामध्ये अशा पध्दतीने उदासिनता दाखविणे, एखाद्या कुटुंबाला बेईज्जत होऊन मारण्यापर्यंत प्रसंग येत असेल तर वेळीच घातलेला एक टाका 9 टाके वाचवितो. वेळीच कारवाई केली नाही, कर्तव्य बजावले नाही त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सगळयांना सहआरोपी करणे, सेवेतून काढून टाकणे ही सगळी कारवाई सरकारतर्फे करण्यात आली. पुन्हा एक प्रश्न सातत्याने उपस्थित केला जातो की, तुम्ही 15 तारखेला का गेला? उशिरा का गेला? मला 1 तारखेला संध्याकाळी या घटनेची माहिती इंटेलिजन्सने दिली होती. मी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर तेथे मला यावे लागेल, भेट द्यावी लागेल असे सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी मला विनंती केली की, तुम्ही आलात तर आमचा बंदोबस्त करण्यामध्ये वेळ जाईल. आरोपी पळून जातील. पुरावे नष्ट होतील. त्यामुळे तपासाचे काम थोडे अंतिम टप्प्यावर आले की येऊन जा. आता आलात तर कामात व्यत्यय येईल. आपण आलात की नंतर सगळे नेते येतील. केवळ पोलीस तपासामध्ये व्यत्यय नको म्हणून इच्छा असून सुध्दा मी जाऊ शकलो नाही. त्यांनी ग्रीन सिग्नल दिल्यानंतर मी तातडीने गेलो. मागील 15 दिवसात मी कुठेही दौरे करायचे नाहीत इतके या सगळ्या गोष्टीवर लक्ष केंद्रीत करुन होतो. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत. अन्याय ज्यांच्यावर झाला ते दलित होते आणि आपण त्यांचे नेते आहात. म्हणून बोलायला आपल्याला मोकळीक आहे. मी गृहमंत्री पदासारख्या जबाबदार पदावर असल्यामुळे मला मर्यादा आहेत. मला माझ्या मर्यादांची जाणीव आहे. या प्रकरणामध्ये कुठेही उदासिनता दाखविली नव्हती. प्रकरण लक्षात आल्यानंतर यंत्रणेची चूक होणार नाही याची पूर्णपणे दक्षता घेतली होती. नम्रपणाने मी जर विचारले की, मी उशिरा गेलो असलो, 15 तारखेला गेला असलो तरी 16 तारखेला श्री.प्रकाश आंबेडकर गेले, 16 तारखेला श्रीमती सुलेखा कुंभारे गेल्या आहेत. 22 तारखेला आपण गेलात. महाराष्ट्रातील सगळयात मोठे जे दलित नेते आहेत, त्या सगळयांच्या अगोदर मी गेलो असून तुमच्यापेक्षा मला यंत्रणेचा प्रमुख म्हणून या घटनेची माहिती लौकर कळणे हे स्वाभाविक आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, माझी खात्री आहे की, सन्माननीय सदस्यांना या घटनेचे गांभीर्य समजले नसावे, आपल्याला जर या घटनेचे गांभीर्य समजले असते तर आपण युरोपच्या दौ-यावर गेला नसता. कदाचित महाराष्ट्रातील घडलेल्या सर्व घटनांची माहिती आमदारांना असते असे काही नाही. याबाबत मी आपल्याला दोष देत नाही. मी कधी चूक केली, उदासिनता दाखवली अशी माझ्याकडून एक तरी घटना घडली असेल तर ती आपण मला दाखवून द्यावी. या घटनेतील सर्व दोषींवर कारवाई करा अशी मागणी करण्यात आली त्या प्रमाणे सर्वांवर कारवाई करण्यात आलेली आहे. आपण ज्या काही मागण्या केल्या होत्या सर्व मागण्या मान्य करण्यात आलेल्या आहेत.

माझ्यावर टीका करण्यात आली की, आर.आर.पाटील हे नागपूरमध्ये आणीबाणी आणीत आहेत, नागपूरला पोलीस छावणीचे स्वरुप देत आहे. 3 आठवड्यापूर्वी मुंबईच्या विधानभवनात कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली होती त्या बैठकीमध्ये आपण स्वत: उपस्थित होता. कामकाज सल्लागार समितीच्या मिटींगच्या अगोदर इंटेलिजन्सकडून गृहखात्याला माहिती आली होती. नागपूरचे हिवाळी अधिवेशन सुरळीत पार पाडण्यासाठी नागपूरमधील काही संवेदनशील भागात बंदोबस्त वाढविण्याच्या संदर्भात सूचना मिळाली होती. जी काही सूचना मिळाली होती ती सर्व सूचना या ठिकाणी उघड करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. काही वेळा कडक भूमिका शासनाला घ्यावी लागते. यासंदर्भातील माहिती सचिवालयाला कळविण्यात आली होती. त्यावेळी नागपूर येथील 4 डिसेंबरचा मोर्चा काढण्याचे निश्चित झाले नव्हते. आम्ही केवळ मोर्चासाठी बंदोबस्त लावलेला नाही. बंदोबस्त वेगळयाच कारणासाठी लावण्यात आलेला आहे. हा बंदोबस्त आम्हाला अधिवेशन संपेपर्यंत ठेवावा लागणार आहे तसेच अधिवेशन संपल्यानंतरही नागपूरमधील काही भागात हा बंदोबस्त आम्हाला ठेवावा लागणार आहे कारण आम्हाला या संदर्भात इंटेलिजन्सकडून माहिती मिळालेली आहे. जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आम्हाला हा बंदोबस्त ठेवावा लागणार आहे. जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अजून काही दिवस बंदोबस्त ठेवला तर त्यामध्ये काही गैर आहे असे वाटत नाही. या घटनेच्या संदर्भातील मोर्चाला परवानगी नाकारली असे काही नाही. परंतु या घटनेच्या निमित्ताने नागपूरमध्ये 5 मोर्चे, निषेध सभा तसेच एक दिवस संपूर्ण नागपूर शहर बंद ठेवण्यात आले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

एका बाजूला नागपूरमध्ये अधिवेशन सुरु होणार होते तसेच मुंबईमध्ये सहा तारखेला दिक्षा भूमिवर कार्यक्रम आहे या कार्यक्रमामध्ये लाखो लोक जमाणार आहेत. या संदर्भात नेत्यांनी कितीही ठरवले की, आपण आपला मोर्चा शांततेत पार पाडू. मी सुध्दा राजकारणातील एक कार्यकर्ता आहे. परंतु या मोर्चाला बदनाम करण्यासाठी काही लोकांकडून मोर्चाला चिडवण्याचे, डिवचण्याचे प्रकार होऊ शकतात. शेवटी राजकारणाला बदनाम करणारे लोक काही कमी नाहीत. त्यामुळे मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली की, आपण 4 तारखेचा मोर्चा काढू नका. कारण नागपूरमध्ये या घटनेच्या निमित्ताने 5 मोर्चे, निषेध सभा तसेच एक दिवस संपूर्ण नागपूर शहर बंद ठेवण्यात आले होते. या घटनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील म्हणाले की, "मग आम्हाला आमच्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार नाही काय? परंतु यासंदर्भात किती वेळा भावना व्यक्त कराव्यात. तुमच्या भावना आम्हाला कळत नाही, आम्ही असंवेदनशील आहोत असे तुम्हाला वाटते काय? या घटनेच्या निमित्ताने 5 मोर्चे, निषेध सभा तसेच एक दिवस संपूर्ण नागपूर शहर बंद ठेवण्यात आले होते त्यामुळेच आम्ही मोर्चावर निर्बंध आणण्याचे काम केले आहे. या मोर्चामुळे येथील जनतेलाही त्याचा त्रास होणार होता. कालच्या बंदोबस्तामुळे नागपुरच्या जनतेने सुध्दा आभार मानले आहे. कालच्या घटनेच्या संदर्भात जनता खुष आहे. तसेच कार्यकर्त्यांना त्यामुळे बरे वाटले आहे. शेवटी नेत्यांच्या आग्रहामुळे त्यांना सुध्दा यावे लागते त्यामुळे कार्यकर्ते सुध्दा कालच्या प्रकारामुळे माझ्यावर खुष आहेत. माननीय गडकरी साहेब कालच्या घटनेच्या संदर्भात आपण त्रयस्थपणे लोकांना प्रतिक्रिया विचारली तर मला लोकांनी जे सांगितले तेच तुम्हाला सांगतील असे मला वाटते. कधी कधी अर्थाचा अनर्थ करुन काही गोष्टी घडत असतात.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, मी या सदनाला कॅसेट द्यायला तयार आहे, माझ्याकडे ती उपलब्ध झालेली आहे. विदर्भामध्ये दुसऱ्या बाजुने आंदोलन सुरु आहे. आर.आर.पाटील दलितांना शस्त्र देणार आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना मी पुन्हा एकदा सांगतो की, दलित नक्षलवादी आहेत असे मी म्हटलेले नाही. आपण अशाप्रकारचे वक्तव्य करुन वातावरण बिघडवू नये अशी माझी आपणास विनंती आहे. सभापती महोदय, एकाच वर्तमानपत्रात बातमी आली की, आम्ही दलितांना शस्त्र देणार आहोत. या संदर्भात सांगू इच्छितो की, अमरावती येथे प्रेस कॉन्फरन्स झाली, त्यावेळी मला प्रश्न विचारण्यात आला की, खासदार श्री.रामदास आठवले म्हणाले की, दलितांना शस्त्र द्यावीत. याबाबत सरकारची काय भूमिका आहे ? त्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले की, जर कुणाला स्वसंरक्षणार्थ शस्त्र पाहिजे असेल तर त्यांनी तसा अर्ज करावा. त्या अर्जाची छाननी करुन जर गरज असेल तर स्वसंरक्षणार्थ शस्त्र दिले जाईल.

श्री.नितीन गडकरी : आपण शस्त्र देणार आहात अशाप्रकारचे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट मी देखील वाचलेले आहे. ते कोणत्या वर्तमानपत्रात आले ते त्यांनी सांगावे.

श्री.आर.आर.पाटील : आपण मला कशाला अडचणीत आणता ? आपल्याला ते माहीत आहे. सभापती महोदय, खासदार श्री.रामदास आठवले म्हणाले की, "दलितांना शस्त्र द्यावीत". त्यावर आपले काय म्हणणे आहे असा मला प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आपल्या राज्यात कोणालाही शस्त्र पाहिजे असेल तर त्यासाठी प्रथम अर्ज करावा लागतो. जर एखाद्याला व्यक्तिगत संरक्षणासाठी, स्वसंरक्षणासाठी शस्त्र पाहिजे असेल तर त्यांनी त्याप्रमाणे अर्ज करावा. त्या अर्जाची पोलीस विभागाकडून तपासणी केली जाते आणि आवश्यकता असेल तर त्या संबंधीचे लायसन्स जिल्हाधिकारी यांचेकडून दिले जाते. आजही आपण शस्त्र देतो. परंतु ते केस-टू-केस चौकशी करुन दिले जाते. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आली की, आम्ही दलितांना शस्त्र देणार आहोत, त्याच्या दुसऱ्या दिवशी शस्त्र देणे कसे गैर आहे यावर अग्रलेख लिहिण्यात आला. नंतर असे समजले की, हा अग्रलेख श्री.रामदास आठवले यांच्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

तयार होता. सभापती महोदय, एखादे विमान हवेत अगदी सुरळीत जात असले तरी एखाद्या ठिकाणी ढगाळ हवामानामुळे ते थोडेसे हेलखावे खातेच. कधी कधी बॅड पॅच येतो. परंतु त्यामुळे नाउमेद झालेलो नाही. झालेल्या प्रसंगामुळे तोल सुटणे तर सोडाच पण या महाराष्ट्रामध्ये जे प्रसंग घडले त्या प्रत्येक प्रसंगांमध्ये सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, मी गृहमंत्री झाल्यावर पहिल्याच महिन्यात मुंबईत विषारी दारु पिऊन 100 जण मृत्युमुखी पडले. तेव्हा लगेच दोन एस.पीं.ना सस्पेंड केले. दोन दिवसांपूर्वी माझी वित्त विभागाच्या सचिवांशी गाठ पडली, त्यांनी मला सांगितले की, एक्साईजचे उत्पन्न 1200 कोटींनी वाढले आहे. फक्त हातभट्टया बंद केल्यामुळे एक्साईजचे उत्पन्न 1200 कोटी रुपयांनी वाढले. दारुच्या पैशावर राज्य चालावे असे मी मानत नाही. महिलांना रात्रीच्या वेळी प्रवास करताना जो त्रास होत होता त्या तक्रारींमध्ये 35 टक्क्यांनी घट झालेली आहे. नाफ्ता चोरी करणारे मोकाट सुटले होते त्यांना देखील आळा घातलेला आहे. नाफ्ता चोरी पूर्णपणे बंद झाली असा माझा दावा नाही.

दुसरे म्हणजे आपण सर्वांनी पाठिंबा दिल्यामुळे डान्सबार बंदीचा निर्णय घेतला. डान्सबारवाले पैशाच्या जोरावर सिस्टीमला करप्ट करु पाहत होते. गँगस्टर, खंडणी यांच्या मुसक्या बांधण्यात आलेल्या आहेत. खंडणीच्या तक्रारीं कमी झालेल्या आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

डान्सबारवाल्यांना आर.आर.पाटील गृहमंत्री पदावर नको, हे मी समजू शकतो. मी आणि मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये असताना थोर साहित्यिक श्रीमती उर्मिला पवार यांच्या काही सहकारी थेट मंत्रालयात आल्या. अचानकपणे दुस-या कामासाठी तिथे आलेल्या डान्सबारच्या नेत्या श्रीमती वर्षा काळे त्यांच्यामध्ये घुसल्या. त्यांचा याच्याशी काहीही संबंध नव्हता, त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या, खैरलांजीच्या घटनेबाबत निषेधाच्या घोषणा देत होत्या. याबाबतीत बाकीच्या लोकांना काहीच माहीत नव्हते. परंतु त्या घोषणा देत होत्या. एका बाजूला निषेधाच्या घोषणा सुरु झाल्या आणि दुस-या कामासाठी आलेल्या या बाई त्या मोर्चाच्या नेत्याच होऊन बसल्या. हे सर्व मंत्रालयात घडलेले आहे. श्रीमती वर्षा काळे यांनी दुस-याच्या मोर्चात घुसून त्याचे नेतृत्व घेत, पहिल्यांदा आंबेडकरांची घोषणा, दुसऱ्यांचा खैरलांजीची घोषणा आणि तिसऱ्यांचा माझ्या नावाच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. अशाप्रकारे एखाद्या मोर्चामध्ये घुसून त्या बाई माझ्या नावाचा धिक्कार करीत होत्या. त्या असे करणार नाही तर काय करणार ? कारण मी त्यांचे डान्सबार बंद केले होते. नाफऱ्यावाल्यांना मी गृहमंत्री पदावर कसे चालेल ? गँगस्टरवाल्यांना मी गृहमंत्र्यांच्या खुर्चीवर कसा चालेल ? जे समाजामध्ये कायद्यापेक्षा स्वत:ला मोठे समजतात, त्यांच्यावर कारवाई केल्यानंतर त्यांना मी या पदावर कसे चालेल ? अशा लोकांशी लढाई करणे मी पसंत करीन. जेवढी ताकद परमेश्वराने मला दिलेली आहे. ती आणि सद्सद्विवेकबुध्दी पणाला लावून प्रामाणिकपणे या शक्तीच्या विरोधात महाराष्ट्राच्यावतीने मी लढणारच आहे. या व्यक्तींनी असे बोलणे मी समजू शकतो, परंतु माननीय कवाडे सर, आपल्यासारख्या लोकांना मी या पदावर का नको आहे ? मी याच गोष्टीचा विचार करीत आहे. सभापती महोदय, आज मला कुठली शिक्षा होते याच्यापेक्षा महाराष्ट्रामध्ये सामंजस्याचे वातावरण कसे निर्माण होईल याचा मी विचार करीत आहे. एवढा प्रयत्न करुन काही गोष्टी घडल्या ही महाराष्ट्राची शोकांतिका आहे. सन 1975 मध्ये माननीय वि.स.पागे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्याप्रमाणे मागील 5 वर्षात सगळया घटनांचा रिव्हयू घेऊन एक समिती गठित केली जाईल व त्यामध्ये संवेदनशील नेते आणि माणसे घेतले जातील. अशा घटना पुन्हा महाराष्ट्रामध्ये घडू नयेत याचे योग्य विष्लेषण करुन दलितांचा विकास करणेही गरजेचे आहे. त्यांच्यासाठी 1600 कोटी रुपये दरवर्षी आपण देतो. परंतु ते गरीब माणसापर्यंत पोहचतात की मधील यंत्रणाच त्यावर डल्ला मारतात, याचा शोध

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

घेणे आवश्यक आहे. इतका पैसा खर्च करुनही लोक भूमिहीन आहेत, अजूनही ते पडक्या छप्परामध्ये राहतात, ही शोकांतिका आहे. त्यामुळे त्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने व पुन्हा त्यांच्यावर अन्याय न होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी एक समिती राज्यमाध्ये गठित केली जाईल आणि त्या समितीच्या येणाऱ्या निष्कर्षावर राज्य सरकार निश्चित विचारसुध्दा करेल. खैरलांजीची बाब राज्य सरकारने संवेदनशीलपणे घेतलेली आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यादृष्टीने पोलीस खात्याला तर सूचना दिल्याच जातील. परंतु विविध राजकीय नेत्यांना मी आवाहन करु इच्छितो की, हे जसे पोलीस खात्याचे काम आहे तसेच संवेदनशील माणसाचे व उभ्या महाराष्ट्राचे काम आहे. जे राज्य देशाला दिशा देण्याचे काम करते त्या राज्यामध्ये अशा घटना घडणे हे या राज्याला शोभणारे नाही. शांत राज्य असतानाही काही ठिकाणी लोकांना अरेस्ट करुन ताब्यात घ्यावे लागले. मी स्वत: लक्ष घालून, त्यांनी केवळ आंदोलने करण्याच्या दृष्टीने 144 कलमाचा भंग केला किंवा अन्यायाच्या गोष्टी केल्या तर याबाबतीत वेगळा विचार केला जाईल. परंतु जे लोक जिविताचे आणि मालमत्तेचे नुकसान करण्यामध्ये सहभागी होते त्यांच्या बाबतीतही वेगळी भूमिका घेतली जाईल.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

राजकीय कार्यकर्त्यांनी आंदोलन केले म्हणून नाहक त्यांना आरोपीच्या पिंज-यात उभे केले जाणार नाही, पण ज्यांनी आंदोलनाच्या नावाखाली गुन्हे केले त्यांना सोडण्याची भूमिकाही घेतली जाणार नाही. दुस-या लोकांनीही रिॲक्ट होण्याची आवश्यकता नाही. सगळया जाती-धर्मांला एका पायावर ठामपणे एकत्र आणावे लागेल. अशा घटना पुन्हा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. सदनाने माझे विचार शांतपणे ऐकून घेतले. जी टीका झाली, जे आरोप झाले ते मी आणखी चांगले करावे म्हणून झाले असावेत. टीका कुणावर केली जाते ? आंब्याच्या झाडाला दगड बसणे स्वाभाविक आहे. टीकेबद्दल सन्माननीय यशवंतरावजी चव्हाण एकदा म्हणाले होते की, ज्यावेळी लोकांच्या टीका वाढतात त्यावेळी माझा भाग्योदय जवळ आला आहे, असे मी समजतो. माझ्यावरील टीका आता वाढली आहे त्यामुळे माझा कोणता भाग्योदय जवळ आला आहे याबाबत मी विचार करतो. टिका ही शक्तिस्थळावर केली जाते आणि ती पात्रता माझ्याजवळ आली आहे, असे जे आपण आपल्या भाषणतून सूचित केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. धन्यवाद.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. राज्याच्या गृहमंत्र्यांनी जी सामंजस्याची भूमिका मांडली त्याला विरोध होण्याची आवश्यकता नाही. ती आपली सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. गोतमांगे याने सन 2002 मध्ये पत्र दिले ते डी.एस.पी., जिल्हाधिकारी यांना दिले आणि त्याची एक पत्र मला दिली, असे गृहमंत्र्यांनी सांगितले. ते पत्र त्यांनी सरकारी अधिका-यांना दिले त्यावेळी गृहमंत्री म्हणून माननीय आर.आर.पाटीलसाहेब नसतील, पण त्यावेळी सरकारने त्याची दखल का घेतली नाही ? हा माझा प्रश्न आहे. सन्माननीय श्री.आर.आर.पाटील हे माझे चांगले मित्र आहेत, ते तसे समजतात की नाही, मला माहित नाही. परंतु, माझे मित्रत्व कमी झालेले नाही. आपण म्हणाला की, मी राजीनामा मागितला. पोलिसांनी मला अटक केल्यानंतर व रात्री सोडल्यानंतर भोतमांगेच्या कुटुंबियांनी मला येऊन सांगितले की, भोतमांगेला धमक्या देण्यात येत आहेत, दबाव आणला जात आहे. याची चौकशी सरकार करणार काय ? सन्माननीय गृहमंत्री वडयाचे तेल वांग्यावर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे करुन ते काय साध्य करु इच्छित आहेत ? हे सांगुन भोतमांगेसंबंधी जे प्रकरण झाले आहे त्याचे समर्थन त्यांना करावयाचे आहे काय ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

मी माननीय गृहमंत्र्यांचा राजीनामा मागितला याचे एकच कारण आहे. आपल्या गृह खात्याने या प्रकरणामध्ये आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे असे श्री.भैय्यालाल भोतमांगे आणि तेथील कार्यकर्ते सांगत आहेत.

उपसभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे आपण खाली बसावे. आता आपण पुरवणी मागण्या घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2006-2007 करीता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006-2007 करीता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे, आणि तसे करीत असतांना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सन 2006-2007 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

उपसभापती : सन 2006-2007 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 1998-1999 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्या सादर करणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1998-1999 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्या सभागृहाला सादर करीत आहे, आणि तसे करीत असतांना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सन 1998-1999 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

उपसभापती : सन 1998-1999 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्या सभागृहाला सादर झाल्या आहेत.

आता मी सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी 4 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 3 वाजून 12 मिनिटांनी 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर .....)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी. : विदर्भातील नागपूर औद्योगिक क्षेत्रातील आजारी व बंद पडलेल्या उद्योग पुनर्जीवित करणे.

मु.शी. : विदर्भातील नागपूर औद्योगिक क्षेत्रातील आजारी व बंद पडलेल्या उद्योग पुनर्जीवित करण्यासंबंधी सर्वश्री सय्यद जामा, संजय दत्त, सागर मेघे, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सभागृहाचे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" शासनाने राज्यात औद्योगिक विकासाचे धोरण अवलंबिले असून राज्यातील जागा घेण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणे, परंतु विदर्भातील नागपूर औद्योगिक क्षेत्रातील हिंगणा, बुटीबोरी, कन्हान इत्यादी भागातील लघु, मध्यम व मोठे उद्योग सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणात बंद व आजारी असून त्यामुळे या भागाच्या विकासास अडथळा निर्माण होणे, सदर उद्योग पूर्ववत सुरू झाल्यास तेथील लोकांच्या रोजगाराचा प्रश्न सुटू शकेल. तथापि या बाबीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सदर भाग विकासापासून वंचित राहत असल्याने येथील जनतेत निर्माण झालेली न्यूनगंडाची भावना, त्यामुळे त्यांच्यात वाढत असलेली असंतोषाची भावना., यावर शासनाने ठोस कृती आराखडा तयार करून आजारी व बंद असलेले उद्योग पुनर्जीवित करण्याची आवश्यकता, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. उद्योग राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला या संदर्भात केवळ एकच प्रश्न येथे विचारावयाचा आहे. 1993 ची जी सामूहिक प्रोत्साहन योजना होती त्या अंतर्गत ज्या उद्योग घटकांनी अर्ज केले होते आणि ज्यांनी त्या संबंधातील आपल्या सगळ्या अटी पूर्ण केल्या आहेत त्यांना आपण सवलती दिलेल्या आहेत. त्याची मुदत 2005 पर्यंत होती. यामध्ये काही उद्योगांना या सवलती मिळालेल्या आहेत, विशेषत: सिकॉम आणि बँकांमार्फत, आणि काही उद्योगांबाबत अजूनही प्रकरणे प्रलंबित आहेत. तेव्हा ज्या निकषावर आपण जुन्यांना सवलती दिल्या आहेत त्याच निकषांवर नवीन येणाऱ्यांना देखील आपण सवलती देणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, अशा उद्योगांची माहिती देण्यात आली तर निश्चितपणे विचार केला जाईल.

***

..... 3सी 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वर्धा जिल्हयात कापूस पिकावर लाल्या रोग पडल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान.

मु.शी. : वर्धा जिल्हयात कापूस पिकावर लाल्या रोग पडल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, सागर मेघे, सुरेश जेथलिया, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, जितेंद्र आव्हाड, वसंतराव चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" वर्धा जिल्ह्यातील विविध भागात कापसावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांना फार मोठे नुकसान सोसावे लागणे, कापसाला मिळणाऱ्या भावात कपात होऊनही शेतकऱ्यांनी या वर्षीही कापसाची लागवड करून फार मोठ्या प्रमाणावर कापसाचे पीक घेणे, या वर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे कापसाचे उत्पादन बऱ्यापैकी होण्याची शेतकऱ्यांना निर्माण झालेली आशा, मात्र ऑक्टोबर-नोव्हेंबर 2006 मध्ये झालेल्या अकाली पाऊस व गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कापसाचे झालेले अतोनात नुकसान, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागूनही त्यांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत न मिळणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली संतापाची भावना, या वर्षीही लाल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे कापसाचे पीक गमाविण्याची पाळी आलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका. "

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. कृषी राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सुचनेमध्ये वर्धा जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने कापसाच्या पिकावर लाल्या रोग पडल्यामुळे जिल्ह्यातील कापसाचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे आणि त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना तातडीने काही आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे अशी मागणी आम्ही केली होती. त्यावर शासनाकडून करण्यात आलेल्या निवेदनातील तिसऱ्या परिच्छेदामध्ये माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, माहे ऑक्टोबर 2006 मध्ये वर्धा जिल्ह्यात अतिवृष्टी व गारपीटीमुळे एकूण 2764.92 हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झालेले आहे त्यापैकी 50 टक्केच्या वरील नुकसानग्रस्त क्षेत्र 1933.48 हेक्टर असून त्यापैकी कापूस पिकाखालील क्षेत्र 584.99 हेक्टर आहे. 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान असलेल्या क्षेत्राच्या बाबतीत स्थायी आदेशानुसार नुकसान भरपाई देय आहे. म्हणजेच शासन या निवेदनातून मान्य करीत आहे की, वर्धा जिल्ह्यातील कापसाच्या पिकावर लाल्या रोग आढळून आला आहे आणि त्याचा उत्पादनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. एका बाजूला मंत्र्यांनी मान्य केले आहे की, 50 टक्के म्हणजे जवळपास 600 हेक्टर वरील कापसाचे पीक नष्ट झालेले आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... 3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आणि जी भरपाई द्यावयास पाहिजे ती स्थायी आदेशानुसार देय आहे असे सांगता आणि दुसऱ्या बाजूला उत्पादनावर परिणाम झालेला नाही असे सांगता यातील खरे काय आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, अतिवृष्टी व गारपिटीमुळे 585 हेक्टरमध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले आहे. त्यामुळे स्थायी आदेशानुसार नुकसान भरपाई देय आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मागील वर्षी नागपूरमध्ये कापूस पिकावर लाल्या रोग पडल्यामुळे 7 कोटी 71 लक्ष 86 हजार रुपयांची मदत प्राप्त झाली. त्यापैकी 6 कोटी 15 लाख रुपयांचे वाटप 30 नोव्हेंबरपर्यंत करण्यात आले. त्यामध्ये नागपूर जिल्हयाकरीता असलेला 1 कोटी रुपयांचा निधी वाटप न केल्यामुळे परत गेला. नागपूर, बुलढाणा, अकोला, अमरावती या जिल्हयामधील 585 हेक्टरमध्ये 50 टक्क्यापेक्षा अधिक पिकांचे नुकसान हे लाल्या रोगांमुळे झाले आहे . विदर्भातील या जिल्हयांमध्ये लाल्या रोगामुळे झालेल्या नुकसानीबद्दल आपण हेक्टरी किती मदत देणार आहात?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, लाल्या रोग आणि नैसर्गिक आपत्ती या दोन वेगळया गोष्टी आहेत...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अतिवृष्टी व गारपीट ही नैसर्गिक आपत्ती आहे त्याप्रमाणे अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे जी रोगराई पसरते, त्यामुळे रोग निर्माण होतात ती सुध्दा नैसर्गिक आपत्ती नाही काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, हा रोग नसून डेफिशिअन्सीमुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे. नैसर्गिक आपत्तीच्या व्याख्येमध्ये अतिवृष्टी व गारपीट या दोन गोष्टी मोडतात. जे स्थायी आदेश आहेत ते नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत आहेत. गेल्या वर्षी सरासरी उत्पादनामध्ये घट झाली म्हणून हेक्टरी हजार रुपये देण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. यावर्षी पाऊस व्यवस्थित असल्यामुळे कृषी खात्याच्या अंदाजानुसार हेक्टरी 8 टक्के प्रॉडक्टिव्हिटी वाढणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आतापर्यंत पाऊस चांगला झाल्यामुळे पिक चांगले होते. परंतु गेल्या महिनाभरात पिकांची परिस्थिती अतिशय बिघडली आहे. मी ज्या जिल्हयांचा उल्लेख केला त्या नागपूर, वर्धा, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयामध्ये कापसाचे जेवढे पिक होते ते गेल्या महिनाभरामध्ये अतिशय खराब झाले. जेवढे ॲव्हरेज यायला पाहिजे होते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्याच्या 50 टक्के सुध्दा येत नाही. या पिकावर पडलेल्या लाल्या रोगामुळे पराठया खराब झाल्या. त्यामुळे ॲव्हरेजचे प्रमाण घटले आहे. या सर्व जिल्हयामध्ये वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांवर लाल्या रोग पडल्यामुळे पिक नष्ट झाले आहे. तेव्हा अशा शेतकऱ्यांना आपण हेक्टरी 1 हजार रुपये मदत देणार काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आतापर्यंत दोन-तीन वेचण्या झाल्या आहेत आणि दोन-तीन वेचण्या बाकी आहेत. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अमूक ठिकाणी रोगाचा प्रादुर्भाव जास्त आहे, यासंबंधीची माहिती दिली तर त्या पिकाचा सर्व्हे करण्यात येईल. त्याठिकाणी 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर निश्चितपणे नुकसान भरपाई दिली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "त्यापैकी 50 टक्केच्या वरील नुकसानग्रस्त क्षेत्र 1933.48 हेक्टर असून त्यापैकी कापूस पिकाखालील क्षेत्र 584.99 हेक्टर आहे". ही लक्षवेधी सूचना स्पेसिफिक वर्धा जिल्हयासंबंधीची असल्यामुळे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे 584.99 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे, त्या क्षेत्रासाठी आपण नुकसान भरपाई देणार आहात काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये असा उल्लेख केलेला नाही. मात्र ऑक्टोबर-नोव्हेंबर 2006 मध्ये झालेला अकाली पाऊस व गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत उल्लेख केला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाल्याचा उल्लेख केला आहे. त्यामुळे त्यांना स्थायी आदेशानुसार लवकरात लवकर नुकसान भरपाई दिली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नुकसान भरपाई किती देणार आहात? नागपूर, अकोला, बुलढाणा व अमरावती या जिल्हयामध्ये सुध्दा अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकसान भरपाईमध्ये या जिल्हयांचा देखील समावेश करणार काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय गारपीटीमुळे, अतिवृष्टीमुळे पिकाचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले तर त्यांना नुकसानभरपाई देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : लाल्या रोगासंबंधात मी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. त्यामध्ये स्पेसिफिक वर्धा जिल्ह्याचा उल्लेख केलेला आहे. निवेदनामध्ये संपूर्ण राज्याचा आढावा घेऊन उल्लेख केलेला आहे. मी ज्या जिल्ह्यांचा उल्लेख केला, त्या जिल्ह्यामधील शेतकऱ्यांचे लाल्या रोगामुळे कापसाचे नुकसान झालेले आहे. त्यांना नुकसानभरपाई देणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी उल्लेख केल्याप्रमाणे अतिवृष्टीमुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर त्यांना नुकसानभरपाई देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : लाल्या रोगाच्या संबंधातील लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : लक्षवेधीमध्ये अतिवृष्टी आणि गारपीटीचा उल्लेख केलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्याच लक्षवेधीमध्ये लाल्या रोगामुळे शेतकऱ्यांच्या कापसाच्या पिकाचे नुकसान झाल्याचा उल्लेख केलेला आहे. त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : लाल्या रोगामुळे 50 टक्क्यापेक्षा जास्त पिकाचे नुकसान झाले असेल आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी तशी माहिती दिली तर त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : मला माहिती देण्याची गरज नाही. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये उल्लेख केलेला आहे, तो मी दोन वेळा वाचून दाखविलेला आहे. निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "माहे ऑक्टोबर 2006 मध्ये वर्धा जिल्ह्यात अतिवृष्टी व गारपीटीमुळे एकूण 2764.92 हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झालेले आहे. त्यापैकी 50 टक्केच्या वरील नुकसानग्रस्त क्षेत्र 1933.48 हेक्टर असून त्यापैकी कापूस पिकाखालील क्षेत्र 584.99 हेक्टर आहे" हे मान्य केलेले आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मी पुन्हा एकदा खुलासा करतो की,584 हेक्टरचा उल्लेख केलेला आहे त्यामध्ये अतिवृष्टीमुळे, आणि गारपीटीमुळे नुकसान झालेले आहे. लाल्या रोगामुळे पिकाचे नुकसान झाले तर नुकसानभरपाई देत नाही. तरी देखील अपवादात्मक परिस्थितीमध्ये गेल्यावर्षी नुकसानभरपाई दिलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : असे असले तरी गेल्या महिन्यामध्ये नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या कापसाच्या पिकाचे ॲवरेज घटलले आहे. प्रती एकरी 5 क्विंटल कापसाचे उत्पादन होण्याऐवजी 1 क्विंटल कापसाचे उत्पादन झालेले आहे. त्या शेतकऱ्यांना संरक्षण दिले नाही तर ते शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर काय करणार ? अशाप्रकारे त्यांना निसर्गाने मारले आणि सरकारची मदत देखील नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अधिक वाढणार आहे. म्हणून माझी स्पेसिफिक मागणी आहे की. लाल्या रोगामुळे शेतकऱ्यांच्या कापसाच्या पिकाचे उत्पादन घटलेले आहे, त्यांना शासन मदत करणार आहे की नाही ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : कृषी सह संचालकांना पुढच्या तीन दिवसामध्ये यासंबंधीचा रिपोर्ट घेण्यास सांगण्यात येईल, त्यानंतर याबाबत काय करता येईल, याचा निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : आपण त्यांना कोणती मदत करणार आहात ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : रिपोर्टच्या आधारे त्याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : "वर्धा जिल्हयामध्ये कापसाच्या पिकाच्या पक्वतेच्या अवस्थेत तुरळक ठिकाणी अल्प प्रमाणात लाल्या आढळून आला ", असे म्हटलेले आहे. लाल्या रोगामुळे कापसाच्या उत्पादन क्षमतेवर काही परिणाम होत नाही,असे सरकारचे म्हणणे आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : उत्तरामध्येच म्हटलेले आहे की, अल्प प्रमाणात लाल्या आढळून आला. परंतु जे काही कापसाचे उत्पादन होणार आहे, ते गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त होणार आहे, असा कृषी खात्याचा अंदाज आहे.

श्री.दिवाकर रावते : लाल्या रोगामुळे कापसाच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे की नाही ? सरकारचे याबाबतीत काय मत आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : कापसाची प्रोडक्टीव्हीटी वाढल्यामुळे उत्पादनात वाढ होणार आहे. कापसाचे क्षेत्र हे 16 टक्क्यांनी वाढलेले आहे. वर्धा जिल्ह्यात 24 टन कापसाचे उत्पादन जास्त होईल, अशी परिस्थिती आहे. लाल्या रोगामुळे कापसाच्या पिकाचे नुसान हे अत्यल्प आहे. त्यामुळे यासाठी मदत दिली जात नाही. तरी देखील सह संचालक, कृषी यांच्याकडून दोन-तीन दिवसामध्ये रिपोर्ट मागवून घेऊन त्याबाबतचा शासन निर्णय घेईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई, विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात चिकुनगुनिया व डेंग्युचा झालेला प्रादुर्भाव

मु. शी. : मुंबई, विदर्भ,मराठवाडा व राज्याच्या इतर भागात चिकुनगुनिया व डेंग्युचा झालेला प्रादुर्भाव यासंबंधी डॉ. दीपक सावंत, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, ॲड.अनिल परब, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, सुरेश जेथलिया, गोपिकिशन बाजोरिया, सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय दत्त, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, डॉ.वसंत पवार, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जगन्नाथ शेवाळे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, सदाशिवराव पोळ, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई पदवीधन) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई, विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात गेले काही महिने चिकुनगुनिया व डेंग्यु या तापाच्या साथीचा झालेला प्रादुर्भाव तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टोपायरसिस या तापाच्या साथीची इ ालेली लागण, सदर तापांच्या साथीच्या लागणीमुळे शेकडो रुग्ण मरण पावणे, सदर रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये असलेली अत्यंत तुटपूंजी व्यवस्था, सदर तापांच्या औषधोपचाराकरिता लागणारा औषधांचा साठा अत्यल्प असणे, या साथींना आळा घालण्यासाठी शासनाकडे 15 कोटी रुपये तात्काळ उपलब्ध करुन देण्याची सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेली मागणी, त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सदर साथीच्या रुग्णांना औषधोपचार करण्यासाठी निधी उपलब्ध न होणे, या तापांच्या साथीने राज्यांच्या बहुतांश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

भागात घातलेला धुमाकुळ, सदर साथी आटोक्यात आणण्याबाबत युध्द पातळीवर उपाय करण्याची गरज असताना शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेचे आरोग्य धोक्यात आल्याने जनतेत निर्माण झालेले घबराटीचे व चिंतेचे वातावरण, पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ KTG

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे. मुंबईसह विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये, कोकणामध्ये, सिंधुदुर्गमध्ये चिकुनगुनियसा आणि डेंग्यूने जो धुमाकूळ घालता होता आणि त्यानंतर खरेदीचा जो धुमाकूळ शासनातर्फे घालण्यात आला त्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. मुख्य सचिवांनी याबाबतीत एक समिती नेमली होती. चिकुनगुनियाच्या औषधांसाठी जी खरेदी करण्यात आली त्यासाठी या चौकशी समितीचे नियोजन करण्यात आले. चढ्या भावाने औषध खरेदी का करण्यात आली ? अनावश्यक औषधे का घेतली गेली ? याबाबत मुख्य सचिवांनी आदेश देऊन ही समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने काय अहवाल दिला ? यामध्ये किती अधिकारी दोषी आढळून आले आणि त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? दुसरा प्रश्न असा की, शासनाकडे आपण 15 कोटी रुपयांची मागणी केलेली होती. त्याबाबतचा जी.आर.माझ्याकडे आहे. त्यामध्ये आपण धूम्र फवारणी यंत्र व इतर औषधे घेतली. त्यामध्ये जवळजवळ 11 बाबी आहेत. त्याच्या किमती बाजारभावापेक्षा तीनपट जास्त आहेत. इतक्या प्रमाणात खरेदी झालेली आहे ती कोणामार्फत झालेली आहे ? खरोखरच ही खरेदी झालेली आहे काय ? जिल्ह्याच्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी ही धूम्र फवारणी यंत्रणा कार्यरत आहे काय ? मुख्य सचिवांच्या आदेशानुसार जी समिती औषध खरेदीच्या संदर्भात नेमण्यात आली त्याबाबत काय झाले ?

डॉ. विमल मुंदडा : चिकुनगुनियाच्या संदर्भात जी औषध खरेदी केलेली होती त्यामध्ये प्रत्यक्ष पेमेंट 9 कोटी 82 लाख रुपये झालेले आहे. दरकराराप्रमाणे आपण ती खरेदी केलेली होती. दरकराराव्यतिरिक्त चढ्या भावाने कोणतीही खरेदी केलेली नव्हती.

डॉ. दीपक सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे...

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, जी रक्कम दिलेली होती त्यामध्ये 1 कोटी 51 लाखाचे आपल्याकडे सेव्हींग आहे.

डॉ. दीपक सावंत : मुख्य सचिवांनी याबाबतीत ऑब्जेक्शन घेतले होते आणि त्यांनी याबाबतीत सू-मोटो समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल काय आहे ? यामध्ये अनावश्यक खरेदी झालेली आहे. डायफ्रोफेम सोडियम जे पेन किलर म्हणून वापरले जाते ते काहीही खरेदी केलेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जे औषध 1 रुपयाला मिळणार आहे ते 5 रुपयाला खरेदी केले असा मुद्दा आहे. ती बाब लक्षात आल्यानंतर मुख्य सचिवांनी समिती नेमली. त्या समितीचा अहवाल काय आहे ? एवढा सोपा प्रश्न आहे.

डॉ. विमल मुंदडा : मुख्य सचिवांनी नेमलेल्या समितीचा अहवाल माझ्याकडे नाही. ज्यावेळी अशा प्रकारचा आऊटब्रेक संपूर्ण महाराष्ट्रामध्ये झालेला होता त्यावेळी आपल्याला हे सर्व उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे या अत्यावश्यक बाबी असताना..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये तातडीचा फायदा घेऊन कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, यामध्ये कोणताही फायदा घेतलेला नाही. आवश्यक असलेली खरेदी केली गेली आहे. व्यवस्थित नियमानुसारच खरेदी केली गेली आहे. मी सांगू इच्छिते की, आपल्याला मुख्य सचिवांचा पूर्णपणे रिपोर्ट पाहिजे असेल तर तीन दिवसांच्या आत तो देण्यास तयार आहे.

डॉ. दीपक सावंत : तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

डॉ. विमल मुंदडा : त्यासाठी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. ते मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

डॉ. दीपक सांवत : हा संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे...

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : औषध खरेदी प्रकरणी नेमलेल्या समितीचा अहवाल या सभागृहापुढे यावयास पाहिजे होता. मंत्री महोदयांनी सदरहू अहवाल न आणल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माझी उप सभापती महोदय, आपणास विनंती आहे.

डॉ. विमल मुंदडा : याठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या सर्व उपप्रश्नांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करते. मी हे सांगू इच्छिते की, आता हा अहवाल जरी माझ्याकडे उपलब्ध नसला तरी कोणतीही औषध खरेदी नियमबाह्य झालेली नाही. आर.सी. प्रमाणे औषधे खरेदी केलेली असून 1 कोटी 51 लाखाचे सेव्हिंग झालेले आहे. औषध खरेदीमध्ये अनियमितता झालेली नाही.

श्री. परशुराम उपरकर : सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गेल्या 7 वर्षापासून लेप्टोपायरसिस रोगाची साथ सुरु आहे. या साथीमध्ये मागील 5 वर्षामध्ये शंभराहून अधिक बळी गेलेले आहेत. असे असताना शासनाचे या जिल्ह्याकडे नेहमीच दुर्लक्ष होत आहे. शासन केवळ तात्पुरत्या स्वरुपाचे सर्वेक्षण करते आणि त्यातून आरोग्याचा उद्देश सफल होत नाही. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये गेली 8 वर्षे फिझिशियन नाही. तसेच तज्ज्ञ डॉक्टर नाहीत. या जिल्ह्यामध्ये 48 तज्ज्ञ डॉक्टर कमी आहेत. यावर्षी 5800 लोकांची तपासणी केली असता त्यातील 240 लोक लेप्टोपायरसिसने आजारी होते आणि त्यातील 10-12 लोक या रोगामुळे दगावले. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यामध्ये लेप्टोपायरसिस या रोगाचा प्रादुर्भाव होत असतो. हा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ? तसेच फिजिसियन आणि तज्ज्ञ डॉक्टरांची तातडीने नेमणूक करण्यात येईल काय ?

डॉ. विमल मुंदडा : सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे ग्रामीण रुग्णालये,उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये यामध्ये इम्प्लिमेण्टेशन करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये भात कापणीच्या वेळी लेप्टोपायरसिससदृश रोगाची लागण होते. तसेच या जिल्ह्यामध्ये आवश्यक ते वैद्यकीय अधिकारी नाहीत. याबाबतीत मी मंत्री महोदयांना फोन देखील केलेला होता. या विषयासंबंधी आणि औषध खरेदीतील भ्रष्टाचार या विषयासंबंधी दोन वेगवेगळ्या लक्षवेधी सूचना देण्यात आल्या होत्या. या दोन्ही लक्षवेधी सूचना एकत्रित करण्यात आलेल्या आहेत. या दोन लक्षवेधी सूचना वेगवेगळया घेतल्या असत्या तर त्यामधील विषयाला न्याय मिळाला असता.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर आणि सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने मी असे निदेश देऊ इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णालयांमध्ये किमान आवश्यक तेवढे डॉक्टर्स् येत्या 15 दिवसात नेमावेत.

डॉ. विमल मुंदडा : होय.

.... नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3

उपसभापती : जनजागृती अभियानाच्या संदर्भात निकड व्यक्त केली होती. जनजागृती अभियानाच्या संदर्भात देखील शासनाने तातडीने पावले उचलावीत. उपाययोजना केली असेल तर ती अधिक परिणामकारक करावी. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे किमान डॉक्टर्स ताबडतोब 15 दिवसाच्या आत नेमले जावेत अशा प्रकारचे निर्देश मी देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी निवेदन केले की, तीन दिवसाच्या अहवाल सभागृहासमोर सादर केला जाईल. सरकारची सर्व कारभार पुढे आणण्याची इच्छा आहे त्याचे आम्ही स्वागत करतो. या लक्षवेधी सूचनेसंबंधी पुढील तीन दिवसात एखादी बाब सभागृहापुढे येणार असेल तर अडवणूक म्हणून नव्हे तर विनंती म्हणून ही लक्षवेधी सूचना शुक्रवारी चर्चेला घेण्यात यावी, म्हणजे या विषयाला महत्व येईल. औषध खरेदीतील भ्रष्ट्राचार किती मोठ्या प्रमाणात असू शकतो याचे उदाहरण म्हणजे मी दारव्हा येथील डॉक्टरकडे गेलो होतो. ते डॉक्टर मला त्यांच्या नव्याने बांधलेल्या बंगल्यावर चहा पिण्यासाठी घेऊन गेले. त्यांनी त्यांच्या बंगल्याला चिकनगुनिया हाऊस असे नाव दिले आहे. ते म्हणाले मी आयुष्यात कमावले नव्हते एवढे कमावले. त्याच क्षणी मी मंत्रीमहोदयांना त्या बंगल्यावरुन फोन करुन ही माहिती दिली. अशा प्रकारची लूट ग्रामीण भागामध्ये चालू आहे. शासनाने हे केले आहे असे दिसू लागले आहे. माझी नम्र विनंती आहे की, अहवाल सभागृहापुढे आल्यानंतर या लक्षवेधी सूचनेवर चर्चा घेण्यात यावी अन्यथा आजची चर्चा निरर्थक ठरेल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 24 मे, 06 रोजी वृत्तपत्रात बातमी आली आणि 26 मे, 06 रोजी सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांनी 14 कोटी रुपयांची औषध खरेदी करण्यास मंजुरी दिली. सहसंचालक (हिवताप व हत्तीरोग), सहसंचालक (नियोजन व विकास) व सहसंचालक (वैद्यकीय) यांनी मंजूर अनुदानातील रक्कम यासाठी वळविण्यात आली. ही रक्कम दुसऱ्या कामासाठी उपलब्ध झालेली होती. मी स्वत: आरोग्य राज्यमंत्र्यांना पत्र लिहून या प्रकरणाची चौकशी करावी असे कळविले होते. काही तज्ञ लोकांनी पत्र लिहून चिकुनगुनिया हा रोग ताप व अंगदुखीच्या औषधाने बरा होतो, त्याकरीता वेगळया औषधांची आवश्यकता नाही असे कळविले होते हे खरे आहे का? आणि 14 कोटी रुपयांची रक्कम एका हेडमधून वगळून 8 कोटी रुपयांची औषध खरेदी करुनही 14 कोटी रुपयांची खरेदी केल्याचे दाखविले हे खरे आहे का?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मुंबई, विदर्भ व मराठवाडयातील 11 जिल्हयातील तापाच्या साथीला आळा घालण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाला 15 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात होती. सन्माननीय सदस्यांनी औषध खरेदीत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी या लक्षवेधी सूचनेमध्ये कुठेही उल्लेख नाही. तरी देखील मला या विषयाची माहिती असल्यामुळे मी उत्तर द्यायला तयार होते. त्यात अनियमितता झालेली नाही हे मी सांगितलेच आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. खरेदीच्या संदर्भातील समितीचा अहवाल तीन दिवसात मी सभागृहाच्या पटलावर ठेवते. मी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर द्यायला तयार आहे.

श्री.दिवाकर रावते : लक्षवेधी सूचनेमध्ये विषय नसताना मी उत्तर देते असा अविर्भाव आणणे चुकीचे आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये निधीची उपलब्धता आणि खरेदी या मुद्यांचा अंतर्भाव आहे. म्हणजे मंत्रीमहोदया मेहेरबानी करुन उत्तर देत आहे असे कसे सांगत आहेत?

डॉ.दीपक सावंत : चिकनगुनिया, डेंग्यू व इतर साथीच्या रोगावर उपचार करण्यासाठी पुरेसा औषध साठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे, त्यासाठी शासनाने नियमित तरतुदीशिवाय 12 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद केली आहे, त्यातच खरा घोटाळा झालेला आहे. त्या संबंधीचा अहवाल सभागृहापुढे आला पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती :या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न विचारलेले आहेत. औषध खरेदीच्या संदर्भात सांगितले आहे की, सदरहू माहिती आता त्यांच्याकडे उपलब्ध नाही, परंतु ही माहिती येत्या तीन दिवसात देण्यास त्या तयार आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर माननीय मंत्रीमहोदय येत्या तीन दिवसात याबाबतचा अहवाल आपल्यासमोर ठेवणार आहेत. हा अहवाल ठेवल्यानंतर आपल्याला काही शंका असल्यास त्यासंदर्भात प्रश्न विचारता येतील. त्यावेळी आपण जर प्रश्न विचारले तर त्याला मी परवानगी नाकारणार नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी असे मला वाटत नाही. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची आवश्यकता आहे असाही प्रश्न विचारण्यात आला होता. यावर असेही सांगण्यात आले की, त्या ठिकाणी 15 दिवसात डॉक्टर्स नेमले जाणार आहेत. तसेच त्यांनी जनजागृतीच्या संदर्भात सुध्दा संमती दिलेली आहे.

डॉ. दिपक सावंत : सभापती महोदय, आपण कोणत्या नियमानुसार आम्हाला या विषयावर बोलण्याची परवानगी देणार आहात?

उपसभापती : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी आपली मागणी आहे. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील आपल्या 4 प्रश्नांपैकी 3 प्रश्न निकाली निघाले आहेत. आता फक्त एकच प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विचारले आहे की, या विषयावर आम्हाला कोणत्या नियमानुसार बोलू दिले जाणार आहे ?. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सभागृहातील भावना लक्षात घेऊन काही निर्णय सभापती घेऊ शकतात. त्यामुळे तो अधिकार वापरुन मी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन देईन. त्यामुळे ही लक्षेवधी सूचना राखून ठेवू नये याला आपली संमती आहे असे समजून आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 चर्चेला घेत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गडचिरोली जिल्हयातील आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या भागात सागवान वृक्षाची होत असलेली तस्करी.

मु. शी. : गडचिरोली जिल्हयातील आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या भागात सागवान वृक्षाची होत असलेली तस्करी यासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, वसंत पवार, श्रीमती फौजीया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण, गुरुनाथ कुलकर्णी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गडचिरोली जिल्हयात आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या तीन विभागात सागवान वृक्षाची तस्करी सुरु असणे, या विभागातील वन अधिकारी व कर्मचारी गस्तीवर जात नसणे, त्यामुळे याचाच फायदा सागवान तस्कर घेत असणे, परिणामी या विभागातील सागवान वृक्षांची मोठया प्रमाणावर घटत चाललेली संख्या, सागवान तस्करी वाचविण्यासाठी शासनाने तातडीची करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयात आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या ठिकाणी वन विभागातील अधिकारी व कर्मचारी गस्तीवर जात नसल्यामुळे या तीन विभागात सागवान वृक्षांची मोठया प्रमाणात तस्करी सुरु आहे. वनांचे संरक्षण करणे, संवर्धन करणे हे वन विभागाचे काम आहे. राज्यातील सगळयात जास्त वन हे विदर्भात आहे. त्यामुळे या ठिकाणच्या वनाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी वन आहे, त्या ठिकाणी सागाची जी काही झाडे वाढलेली आहे त्या सागाच्या वृक्षांची मोठया प्रमाणात आता तस्करी होत आहे. वनाचे संरक्षण करण्यासाठी वन विभागाकडे मोठया प्रमाणात यंत्रणा आहे, कर्मचारी आहे. त्यामुळे या विभागांत होत असलेली सागवान वृक्षांची तस्करी रोखण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सिरोंचा हा भाग गडचिरोलीमध्ये येतो. आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या ठिकाणी मोठया प्रमाणात वन आहे. सिरोंचामध्ये सागाच्या तस्करीचे प्रमाण जास्त आहे. सिरोंचा वन विभागाच्या सभोवताली इंद्रावती, गोदावरी व प्राणहिता नद्या वाहतात. या तिन्ही नद्या बारमाही वाहत असल्यामुळे आंध्र प्रदेशातील गुन्हेगार सागवान लाकडाची तस्करी स्थानिक लोकांना पैशाचे अमिष दाखवून करीत असतात.

यानंतर श्री. अजित.....

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.बबनराव पाचपुते.....

आपणास माहीत आहे की, हा नक्षलवादी भाग आहे. त्याठिकाणी नक्षलवादी कारवाया वाढलेल्या आहेत. अशापरिस्थितीत सुध्दा त्याठिकाणी सागवान वृक्षाची नदीमार्गे तस्करी होते हे लक्षात आल्यानंतर त्याठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात आलेली आहेत. तस्करीला आळा घालण्यासाठी वन विभागामार्फत काही पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. नियमित गस्त सुरु केलेली आहे. आलापल्ली, भामरागड आणि सिरोंचा या तिन्ही ठिकाणी फिरते पथक नेमलेले आहे, संरक्षण पथकाची व्यवस्था केलेली आहे. वन विभागासाठी गाड्यांची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे. नदीतून गस्त घालण्यासाठी अगोदर चार बोटी होत्या. परंतु आता आणखी पाच स्पीड बोटींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कर्मचाऱ्यांची चोवीस तास डयुटी तैनात करण्यात आलेली आहे. यासाठी बाहेरील व्यक्तींची एक-एक महिन्यांकरिता चेकपोस्टवर डयुटी लावण्यात आलेली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे आपणास सागाची तस्करी कमी करण्यामध्ये यश आलेले आहे. सिरोंच्या भागात तीन नद्या वाहतात. या तिन्ही नद्यांना बारमाही पाणी असल्यामुळे गुन्हेगार सागाच्या लाकडांचे तराफे तयार करुन त्यास जड दगड बांधून ते तराफे नदीच्या खोल पात्रात बुडवून ठेवतात. नदीला पूर आला की नदी मार्गाने ते तराफे आंध्र प्रदेशात घेऊन जातात. या गोष्टी लक्षात आल्यानंतर आम्ही रांत्रदिवस गस्त वाढविली आहे. त्याठिकाणी एसआरपीची एक कंपनी तैनात करीत आहोत. त्याठिकाणी वादळ झाल्यामुळे सागाची झाडे मोठ्या प्रमाणावर उन्मळून पडलेली आहेत. या झाडांपासून जवळपास 66 कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. त्यासाठी आपल्याला फक्त 4 कोटी रुपये खर्च आहे. सागवान झाडाची तस्करी कमी झालेली आहे हे मला या निमित्ताने सांगायचे आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, गेली चार-पाच वर्षे मी विषयावर प्रश्न विचारत आहे. या प्रश्नाचे स्वरुप थोडे व्यापक आहे. ही सागाची तस्करी फक्त आलापल्ली, भामरागड वा सिरोंचा या भागांपुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या आणखी काही भागात ही सागाची तस्करी होत आहे. महाराष्ट्रात दोन गोष्टींमुळे वृक्षांचे नुकसान होत आहे. एक म्हणजे अवैध वृक्षतोड आणि दुसरे म्हणजे वणवा. कोकणात जाताना वाटेत अनेक ठिकाणी वणवे लागलेले दिसतात. सभापती महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

मागच्या वेळेला मी मागणी केली होती की, आपण झाडांना नंबर द्यावेत. माझी ही सूचना मंत्रिमहोदयांनी मान्य देखील केली होती. माझी पुन: एकदा मागणी आहे की, आपण झाडांना नंबर द्यावेत. वन विभाग चार कोटी रुपये खर्च करणार आहे त्यामध्ये आणखी काही रकमेची भर पडेल, परंतु त्यामुळे वन विभागाचा फायदा होणार आहे. तेव्हा मंत्रिमहोदय माझ्या सूचनेचा पुन्हा एकदा विचार करतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी केलेली सूचना चांगली आहे. काही ठिकाणी झाडांना नंबर दिलेले आहेत.त्याची माहिती वर्तमानपत्रात आणि वायरलेस मार्फत दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कोकणचा उल्लेख केला, मी त्यांना सांगू इच्छितो की, कोकणात फक्त 8 टक्के वनक्षेत्र आहे.....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना कोकणचे उदाहरण सांगितले. मी या अनुषंगाने सांगू इच्छितो की, नंदूरबार जिल्ह्यातील तोरणमाळ हे थंड हवेचे ठिक्राण आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर सागाच्या झाडांची तोड झालेली आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, तोरणमाळ येथील तस्करी रोखण्यासाठी एसआरपी नेमलेले आहेत.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सागाची तस्करी रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या त्याची माहिती दिली. परंतु आलापल्ली , भामरागड आणि सिरोंचा या ठिक्राणी सप्टेंबर 2006 अखेरपर्यंत हजारो सागवानी वृक्षाची अवैध तोड झालेली आहे आणि त्याचा तपशील निवेदनात दिलेला आहे. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी ज्या उपाययोजना त्यांनी तस्करी थांबणार आहे का याबद्दल त्यांनी माहिती द्यावी.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे खरे आहे की, आलापल्ली, भामरागड आणि सिरोंचा या तिन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सागाच्या झाडांची कत्तल झालेली आहे. एकूण 5.5 कोटी रुपयांची चोरी झालेली आहे. परंतु आपण प्रत्यक्षात 7.5 कोटी रुपयांचे साग जप्त केलेले आहेत. गुन्हेगारांकडून या तिन्ही विभागातील माल जप्त केलेला आहे तसेच त्यांच्याकडे इतर भागातील अवैध साग होता तो देखील जप्त केलेला आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

त्यामुळे उपाययोजनेच्या संदर्भात एस.आर.पी. पाठविली पाहिजे. हा एकच मुद्दा त्याठिकाणी करणे शिल्लक आहे. बाकीचे सर्व मुद्दे आपण पूर्ण केलेले आहेत. त्याठिकाणी एस.आर.पी. पाठविली तर तेथील लोकांचे मनोधैर्य वाढले, याची मला खात्री आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आपल्या वन विभागाने तेथील वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शस्त्र देण्याचे मान्य केले होते, त्याचा निर्णय झाला काय ?

श्री.बबनराव पाचपुते : होय. शस्त्रे देण्यात आलेली आहेत. फक्त सिरोंचामध्ये शस्त्र दिलेली नाहीत. कारण तो भाग नक्षलग्रस्त असल्यामुळे त्याठिकाणी प्रुफ दिल्याशिवाय किंवा ट्रेनिंग दिल्याशिवाय शस्त्र देता येत नाहीत. परंतु आता आम्ही 7-8 जणांचा ग्रुप करुन ट्रेनिंग देऊन त्यांना शस्त्रे देऊ. आपण याबाबतीत सतर्कता घेतलेली आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी उपाययोजना सांगितली परंतु आपण सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. मी ज्या क्षेत्रामध्ये राहतो त्याला लागूनच नक्षलग्रस्त क्षेत्र आहे. सालेकशी भागतील दरेकसा येथील सीमेवर आम्ही संध्याकाळी 6.00 वाजल्यानंतर त्याठिकाणी प्रचारालाही जाऊ शकत नाहीत वा त्याठिकाणी आम्हाला जाऊ दिले जात नाही. त्याठिकणी शासन जोपर्यंत कायमस्वरुपी उपाययोजना करत नाही तोपर्यंत त्याठिकाणी सागाची तस्करी थांबवता येत नाही. त्याठिकाणी त्यांना 12 तासांचा वेळ भरपूर आहे. या मधल्या काळामध्ये त्याठिकाणी सागाची तस्करी होते. ही तस्करी थांबली पाहिजे. जोपर्यंत पोलीस आणि वन विभाग त्याठिकाणी पाहरेकरी ठेवत नाही, तोपर्यंत सागवानीची निश्चितपणे सुरक्षा होऊ शकत नाही. त्यामुळे याबाबतीत माझी शासनाला विनंती आहे की, रात्री 6.00 ते पहाटे 6.00 वाजेपर्यंत त्याठिकाणी शासन सुरक्षा व्यवस्था करणार की नाही ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख.

पृ. शी. : मंगळूनाथ या गावाजवळून वाहणाऱ्या अडाण नदीवर शिवणी रोड येथे बांधलेल्या पुलामुळे गावातील शेतकऱ्यांचे पुराच्या पाण्याने झालेल्या नुकसानाची भरपाई न मिळणे.

मु. शी. : मंगळूनाथ या गावाजवळून वाहणाऱ्या अडाण नदीवर शिवणी रोड येथे बांधलेल्या पुलामुळे गावातील शेतकऱ्यांचे पुराच्या पाण्याने झालेल्या नुकसानाची भरपाई न मिळणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"वाशिम जिल्हयांच्या तालुका मंगळूनाथ या गावाजवळून अडाण नदी वाहत असून सदर नदीच्या शिवणीरोड येथे सन 2005-2006 मध्ये नवीन पूल बांधून त्यांच्या पुढे चार फलांग 3 मिटरचा भराव टाकल्याने गेल्या पावसाळयात पुराचे पाणी गावात शिरल्याने जवळपासची शेतजमिनीत गाळा घुसून सुपिक मातीचा थर पुरामुळे वाहून गेल्याने शेतीचे झालेले अमाप नुकसान, नदी काठच्या गावात पुराचे पाणी शिरल्याने मोठया प्रमाणात घरे पडली. घरातील जीवनावश्यक चीज वस्तू वाहून जाणे. एवढी मोठी शेतकऱ्यांची पुराने हानी होऊनही सदर गावच्या ग्रामस्थांना नियमाप्रमाणे आजपर्यंत नुकसान भरपाई अथवा शासकीय मदत मिळाली नसल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष लक्षात घेता या प्रकरणी शासनाने मदतीबाबत तात्काळ निवेदन एक महिन्याच्या आत नियमाप्रमाणे करावे, ही नम्र विनंती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी व त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी आपली सूचना मांडावी. तसेच त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी सूचना मांडावी.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री दीपक सावंत व यशवंतराव गडाख अनुपस्थित असतात.)

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा रुग्णालयातील आरोग्याच्या दुरावस्थेबाबत

मु. शी. : जिल्हा रुग्णालयातील आरोग्याच्या दुरावस्थेबाबत याबाबत श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.जयंत पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील 200 खाटांच्या रायगड जिल्हा रुग्णालयाकडून रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसाच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. परंतु हे जिल्हा रुग्णालय या सर्वसामान्य माणसाच्या किमान आणि रास्त अपेक्षाही पूर्ण करताना दिसून येत नाही.

या जिल्हा रुग्णालयातील शासन मंजूर जनरल श्रेणीतील 15 वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी 10 वैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष कार्यरत आहेत. जिल्हा रुग्णालय असूनही येथे एकही स्त्रीरोगतज्ज्ञ नाही.

प्रथम वर्गाचे 16 वैद्यकीय अधिकारी येथे असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात येथे चारच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत, त्यापैकी एक जिल्हा शल्यचिकित्सक आहेत. परिणामी, प्रथम वर्गाची तब्बल 12 पदे येथे रिक्त आहेत.

जिल्हा रुग्णालयात सी.टी.स्कॅन विभाग आहे. यात अत्याधुनिक यंत्रणा आहे, मात्र या विागात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीच नाहीत.

तरी जिल्हा रुग्णालयातील समस्यांचे निराकरण होण्यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहें. "

(यानंतर श्री. रोझेकर ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

सभापती महोदय, त्या ठिकाणी प्रथम श्रेणीची 12 पदे आहेत व ही सर्व पदे रिक्त आहेत. मी या सभागृहामध्ये गेल्या 3/4 वर्षांपासून पाठपुरावा करुन जिल्हा रुग्णालय व सिटी स्कॅन मंजूर करुन घेतले आहे. परंतु, त्या ठिकाणी आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाहीत. 3 कोटी रुपये खर्च करुन त्या ठिकाणी शासनाने सिटी स्कॅन बसविलेले आहे. याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाला विनंती करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (दुसरी सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. XX OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)

श्री.दिलीप वळसे-पाटील (उर्जामंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 20-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 20 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. XXI OF 2006

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.)

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगर हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 21-महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 21 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

..4.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. XXII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 22-मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 22 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. XXIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE HYDERABAD ABOLITION OF INAMS AND CASH GRANTS ACT, 1954.)

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 23 - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, 1954 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 23 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता आपण महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा करणार आहोत. त्यानंतर दोन अर्धा तास चर्चा आहेत. आता 4 वाजून 30 मिनिटे झालेली आहेत. प्रस्तावावरील चर्चा साधारणत: 7 वाजून 30 मिनिटापर्यंत चालेल. म्हणून आजच्या अर्धा तास चर्चा पुढे ढकलावयाच्या काय ?

डॉ.निलम गो-हे : सभापती महोदय, अर्धा तास चर्चा उद्या सकाळी घेण्यात याव्यात.

उपसभापती : ठीक आहे. आपण उद्या सकाळी 10.30 ते 11.30 वाजेपर्यंत अर्धा तास चर्चा घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी.: राज्यात निर्माण झालेला विजेचा तुटवडा.

मु.शी.: राज्यात निर्माण झालेला विजेचा तुटवडा या विषयावर सर्वश्री उल्हास पवार, गोविंदराव आदिक, अरुणलाल गुजराथी, यशवंतराव गडाख, सुधाकर गणगणे, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, सुरेशदादा देशमुख, दिलीपराव देशमुख, भास्कर जाधव, वसंत पवार, सदाशिवराव पोळ, धोंडिराम राठोड, कमलकिशोर कदम, मुझफ्फर हुसेन, गुरुनाथ कुलकर्णी, विलासराव शिंदे, जगन्नाथ शेवाळे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री लक्ष्मण जगताप, संजय दत्त, धनाजीराव साठे, जैनुद्दिन जव्हेरी, रमेश निकोसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो -

" राज्यात सध्या निर्माण झालेला विजेचा तुटवडा, विजेअभावी हवालदिल झालेला शेतकरी वर्ग, ग्रामीण भागाप्रमाणेच नागरी भागातही भारनियमन करण्याची निर्माण झालेली परिस्थिती, राज्यात सद्या तीन हजार मॅगावॅट विजेची तुट निर्माण होणे, विजेच्या तुटवड्यामुळे रब्बी पिकासाठी लागणारी वीज न मिळू शकल्यामुळे विजेच्या पंपाना वीज न मिळाल्यामुळे शेतीला पाणी न मिळणे, तद्वत भारनियमामुळे उद्योगधंद्यावर अतिशय विपरित परिणाम होऊन ते बंद पडणे, विशेषत: लहान लहान उद्योग बंद पडल्यामुळे वाढलेली बेकारी, खाजगी उद्योगांना वीज निर्मिती व वितरण करण्याची मान्यता दिल्याने वीज बिलात केलेली भरमसाठ वाढ, त्यामुळे महाराष्ट्रातील आम जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष दूर करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने युध्दपातळीवर उपाययोजना करण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण परिसरामध्ये आणि औद्योगिक विभागामध्ये विजेची टंचाई भासत आहे. विशेषत: शेतकरी अतिवृष्टीमुळे, पर्जन्याचे कालनियमन बदलल्यामुळे अडचणीत आलेला आपण पाहिला आहे. ज्यावेळी अतिवृष्टी होते त्यावेळी विजेचा वापर कमी होतो आणि पावसाळा संपल्यानंतर विजेची जास्तीत जास्त मागणी विशेषत: औद्योगिक विभागाकडून होत असते. ग्रामीण भागात विजेचा वापर करणारा शेतकरी, वाढणारे उद्योग आणि त्यामुळे विजेची वाढणारी मागणी हे सर्व लक्षात घेऊन वीज निर्मिती करण्यासाठी राज्य शासनाने अधिक विचार करणे गरजेचे झालेले आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

वर्तमानपत्रांतून आलेल्या बातम्या आणि महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांची निर्माण झालेली अडचणीची अवस्था एवढेच नव्हे तर रब्बी पिकांच्याबाबतीत आता देखील शेतकरी भार नियमनामुळे अडचणीमध्ये आलेला आहे. ग्रामीण भागामध्ये वीज पंपांना पुरेशी कनेक्शन्स न दिल्यामुळे, कनेक्शन्स दिली आहेत पण पुरेशी वीज न दिल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर हे निश्चित खरे आहे की, महाराष्ट्रामध्ये अधिकाधिक वीज निर्मितीचे आपले नियमित प्रकल्प असतील किंवा स्रोत असतील त्यात मग अपारंपारिक ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प किंवा महाराष्ट्रामध्ये हैड्रोपॉवर निर्मितीचे प्रकल्प होऊ शकतात. सभापती महोदय, मी विनम्रपणे माननीय ऊर्जा मंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, देशातील, विशेषत: महाराष्ट्रातील एक सद्गृहस्थ श्री.विक्रम राजाध्यक्ष नावाचे, हे गृहस्थ अमेरिकेमध्ये स्थायिक झालेले आहेत आणि त्यांच्यावर श्री.कुमार केतकर हे लोकसत्तामध्ये असताना त्यांनी एक आर्टिकल लिहिले होते त्यातून असे लक्षात आले की, आपल्याकडे मोठ्या प्रमाणात हैड्रोपॉवर जनरेट करण्याची क्षमता आहे पण त्या क्षमतेच्या केवळ 20 टक्केच ऊर्जा निर्मिती आपण करू शकलो आहोत आणि त्यामध्ये आपल्याला खूप मोठा स्कोप आहे. त्या संदर्भात त्यांनी एक प्रयोग केला आणि महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधून अशा अशा प्रकारे देखील वीज निर्मिती करता येईल असे सांगितले होते. सभापती महोदय, श्री. विक्रम राजाध्यक्ष हे या क्षेत्रातील एक अत्यंत विद्वान गृहस्थ असून त्यांना दोन वेळा अमेरिकेमध्ये प्रसिडेंटस् अवॉर्डस् मिळाली आहेत. अशा या क्षेत्रातील विद्वान, तज्ज्ञ माणसाच्या सांगणे लक्षात घेतले तर आपल्याला समजून येईल की, आपण आपल्याकडील ऊर्जा निर्मितीच्या क्षमतेच्या केवळ 20 टक्केच क्षमता वापरतो आहोत. सुदैवाने आता केंद्र सरकारमध्ये आपल्या महाराष्ट्राचे आणि त्यातही या नागपूरचे प्रतिनिधी असलेले श्री.विलास मुत्तेमवार हे या अपारंपारिक ऊर्जा स्रोत विभागाचे मंत्री आहेत आणि त्यांनी देखील या मध्ये काही योजना दिल्या आहेत आणि त्या योजना जनतेपर्यंत पोहावून त्यातून वीज निर्मिती करण्यासाठी अनेक प्रोत्साहनपर सवलती देण्याची तयारी दर्शविली आहे त्यासाठी अनेक संस्थांना सवलती दिल्या आहेत. त्याचा अधिकाधिक वापर करण्याचा प्रयत्न केल्यास आज जवळ जवळ गेले 5-6 महिन्यांतील वृत्तपत्रांतील बातम्या बघितल्यानंतर 3 ते 4 हजार मे.वॅ. विजेची टंचाई आपल्याकडे होते आहे. अवेळी येणारा पाऊस आणि त्यातून पिकांचे झालेले नुकसान यामुळे अगोदरच अडचणीत आलेला शेतकरी

..... 3एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

विजेच्या भारनियमनामुळे अधिकच अडचणीमध्ये आलेला आहे, येतो आहे. त्यामुळे तो पिकांना पाणी देऊ शकत नाही. तेव्हा शेतकऱ्यांवरील ही संकटे वाढू नयेत म्हणून शासनाने याबाबतीत प्रयत्नशील आहे. सभापती महोदय, माननीय श्री.विलास मुत्तेमवार हे केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये अपारंपारिक ऊर्जा खात्याचे मंत्री असतानाच केंद्रामध्ये ऊर्जा खाते संभाळणारे मंत्री देखील आपल्या महाराष्ट्रातीलच आहेत आणि ते म्हणजे सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे. त्यांनी हे खाते स्वीकारल्यापासून आपल्या राज्याला वीज मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यासाठी राज्य सरकारशी सुसंवाद करून सोलापूर येथे वीज निर्मितीचा प्रयत्न ते करीत आहेत. त्याच्या उद्घाटनासाठी देशाचे पंतप्रधान आलेले होते आणि त्यावेळेस त्यांनी सांगितले की, यासाठी 25 हजार कोटी रूपयांची तरतूद केलेली असून महाराष्ट्राच्या वीज निर्मितीसाठी अधिकाधिक मदत करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न राहील. हे खाते अधिक गतिमान करताना, वीज खात्यामध्ये काम करणारे जे अधिकारी आणि कर्मचारी आहेत त्यांच्यामध्ये ज्या पोटतिडकीने आणि गतीने आपण शेतकऱ्यांचे उद्योगांचे प्रश्न मांडतो ती गतिमानता येऊ शकलेली नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3ओ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

अक्षय प्रकाश योजनेच्या माध्यमातून आपण लोकांना सहभागी करुन घेतले आहे. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर कोल्हापूर जिल्हयामध्ये या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आत्ताच मला कोल्हापूरचे एक लोकप्रतिनिधी भेटले. त्यांनी मला सांगितले की, शासनाच्या या प्रयत्नांना चांगले यश मिळत असल्यामुळे ग्रामीण भागातील विजेचा तुटवडा कमी होऊन भार नियमन 2 तासापर्यंत जाऊन पोहोचले आहे. आणि शहरी भागामध्ये 4 तासापर्यंत आले आहे. अशाप्रकारचे एक वेगळे दृश्य आपल्याला ग्रामीण भागामध्ये पहावयास मिळत आहे. या योजनेमध्ये अधिकाधिक लोकांना सहभागी करुन घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करुन ही योजना साकार केली तर आज वीजेचा तुटवडा ग्रामीण भागामध्ये व औद्योगिक भागामध्ये पहावयास मिळत आहे तो दिसणार नाही. औद्योगिक भागाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर विजेच्या तुटवडयामुळे आणि भार नियमनामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये अनेक गोष्टी घडत आहेत. शासनाने औद्योगिक क्षेत्राकरीता एक योजना केली होती की, उद्योजकांनी आठवडयामधून संपूर्ण एक दिवस विजेचा वापर बंद ठेवावा. परंतु त्यामुळे अनेक ठिकाणी घोटाळे निर्माण झाले. विजेचा वापर बंद करावा लागल्यामुळे काही उद्योग बंद पडले, त्यामुळे चोऱ्यांचे प्रकार वाढले. म्हणून किमान वीज वापरण्याची आम्हाला परवानगी मिळावी अशी उद्योजकांनी शासनाकडे मागणी केली. या सर्व बाबींचा विचार करुन मी शासनाला असे सुचवू इच्छितो की, ग्रामीण भागामधील अल्पभूधारक शेतकरी, लहान लहान बागायतदार शेतकरी, व छोटे छोटे उद्योजक या सर्वांना वेळेवर आणि योग्य दराने विजेचे वितरण करण्यात यावे. आज शहरामध्ये भार नियमनामुळे उद्योग बंद पडल्यामुळे बेकारी वाढत आहे, आणि ग्रामीण भागामध्ये वेळेवर वीज मिळत नसल्यामुळे पिकांची हानी होत आहे, त्यामुळे शेतकरी हवालदिल होत आहे, त्याच्यावर येणारी संकटे कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा अशी या प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी करुन माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) :सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी सभागृहापुढे नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडून त्यावर आपले विचार व्यक्त करण्यास सुरुवात केल्यानंतर माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना असे वाटले की, सत्ताधारी पक्षाच्या बाजूने हा प्रस्ताव कसा काय मांडला जात आहे? माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही जरी सत्ताधारी पक्षाकडील सदस्य असलो तरी आम्हाला मतदान करण्याकरीता जरी पक्षादेश दिला जात असला तरी इतर विषयांच्या बाबतीत आम्हाला आमची मते सभागृहामध्ये मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे माझे जवळचे मित्र असून ते या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देणार आहेत. त्यांना माहीत आहे की, युती सरकारच्या साडे चार वर्षाच्या काळात आणि लोकशाही आघाडीच्या सुरुवातीच्या पाच वर्षाच्या काळात आणि त्यानंतर आतापर्यंत या राज्याने एक युनिट सुध्दा वीज निर्माण केलेली नाही ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. माननीय ऊर्जा मंत्र्यांची चांगल्या प्रकारे उत्तर देण्याची ख्याती आहे याची मला जाणीव आहे. केंद्र सरकारने सन 2003 मध्ये इलेक्ट्रिसिटी ॲक्ट मंजूर केला. त्या कायद्यातील तरतुदीनुसार राज्यामध्ये असलेल्या एम.एस.ई.बी. या मंडळाचे विभाजन करावयास हवे होते. अशाप्रकारचे विभाजन देशातील अन्य राज्यांमध्ये असलेल्या मंडळांनी केले होते. परंतु आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये विभाजनाची आवश्यकता असतांना सुध्दा मंडळाचे विभाजन केल्यानंतर त्यामधील कामगारांचे प्रश्न निर्माण होतील या आशयापोटी म्हणा, किंवा शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विभाजनाच्या संदर्भात विचार ऐकून घेतल्यानंतर या मंडळाचे विभाजन करण्यात आले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी (पुढे सुरू...

सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांचे मी जाहीर अभिनंदन करेन की, त्यांनी स्वत: कित्येकवेळा कामगारांच्या प्रश्नांच्या संदर्भात बैठका घेतलेल्या आहेत. जे तांत्रिक कामगार आहेत त्यांनी या त्रिभाजनाला पहिल्यांदा पाठिंबा दिला. सुदैवाने माननीय श्री.शरदराव पवार साहेबांचे सन्माननीय दिलीप वळसे-पाटील असतील किंवा त्यांचे अन्य सहकारी असतील त्यांना मार्गदर्शन मिळालेले आहे. त्या ठिकाणच्या युनियनचा सर्व कार्यभार, त्यांचे प्रतिनिधित्व मी करतो. त्या ठिकाणी जवळजवळ 53 हजार तांत्रिक कामगार आहेत. एम.एस.ई.बी.मधील गावामध्ये जे वायरमन आहेत त्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या 47 हजार इतकी आहे. मी ज्यावेळेला 3 डिसेंबरला नागपूरमध्ये आलो, त्यावेळेस संपूर्ण विदर्भातील दोन-तीन हजार तांत्रिक कामगार नागपूर येथें आले होते. त्यांच्या समोर जाण्याची मला संधी उपलब्ध झाली. त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले तेसुध्दा मी येथे मांडणार आहे. एम.एस.ई.बी.च्या त्रिभाजनाचा धाडशी निर्णय सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील आणि त्यांचे अन्य सहकारी यांनी घेतला. त्यामध्ये संचालक, श्री.जयंत कावळे, श्री. संजय भाटिया, श्री.संजय मेहता या तीन अधिकाऱ्यांचा यामध्ये सहभाग आहे. या त्रिभाजनामुळे आता काय परिणाम झाला? एमएसईबीचे त्रिभाजन होऊन तीन वर्षे झालेली आहेत. त्या अगोदर एमएसईबी काम पहात होती. त्यावेळेस एमएसईबीला कामगारांचे पगारसुध्दा देण्या एवढे उत्पन्न मिळत नव्हते, कामगारांचे पगार देण्यासाठी सरकारला पैसे द्यावे लागत होते. त्रिभाजन करण्याच्या अगोदर संपूर्ण राज्याचे एमएसईबीला दरमहा उत्पन्न 850 कोटी रुपये मिळत होते. आता कर्मचाऱ्यांनीच संपूर्ण योगदान दिल्यामुळे त्रिभाजनानंतर एमएसईबीचे उत्पन्न 1450 कोटी रुपये दरमहा मिळत आहे. म्हणजे 600 कोटी रुपये उत्पन्न त्रिभाजनामुळे वाढलेले आहे. विजेच्या प्रश्नाच्या संदर्भाने आज सभागृहामध्ये जी काही चर्चा होणार आहे, त्या अनुषंगाने "दै.लोकमत"च्या आजच्या अंकामध्ये "आज महसूल वाढूनही प्रकल्पांची स्थिती जैसे थे" या मथळ्याखाली बातमी आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"वीज वितरण कंपनीच्या महसुली उत्पन्नात विक्रमी वाढ झाली असली तरी वीज निर्मितीच्या स्थितीत कोणतीही सुधारणा सरकार आणि वीज कंपन्यांना साधता आलेली नाही. गेल्या वर्षभरातील वीज प्रकल्पांची जैसे थे स्थिंती पाहता, राज्यातील जनतेला अंधाराशी सुरू असलेला लढा पुढील आणखी काही वर्षे कायम ठेवावा लागेल,असे दिसते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु....

वीज मंडळाचे विभाजन झाल्यानंतर राज्यात पहिल्यांदाच वीज वितरण कंपनीने नोव्हेंबर 2006 या महिन्यात 1475 कोटी 57 लाख रुपयांच्या महसुलाची विक्रमी वसुली केली आहे. गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्याच्या तुलनेत ही वसुली (1076 कोटी 75 लाख) 398 कोटी 82 लाख रुपयांनी अधिक आहे. उद्योग क्षेत्रासाठी दिल्या जाणाऱ्या विजेचे दर वाढविल्याने ही वसुली वाढल्याचे बोलले जाते. महसुलात वाढ झाली असली तरी वीज गळती, चोरी रोखणे व ग्राहकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान वीज कंपनीपुढे राहणार आहे. वितरण कंपनी विजेची निर्मिती करीत नसल्याने व आहे तेवढीच वीज विकत घेता येत असल्याने लोडशेडिंग करावे लागते. पर्यायाने जनतेत वीज कंपनीविरूध्द प्रचंड असंतोष आहे. आजच्या घडीला राज्यात दरदिवशी 15 हजार 707 मेगावॅट विजेची मागणी आहे. मात्र त्या तुलनेत केवळ 12 हजार 557 मेगॅवॅट वीज उपलब्ध होत आहे. 3 हजार 150 मेगावॅट विजेचा तुटवडा भासत असल्याने राज्यभर लोडशेडिंग करावे लागत आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

वीज कंपनीच्या महसुलात वाढ झाली असली तरी देखील गेल्या वर्षभरात वीज निर्मितीमध्ये फारशी सुधारणा झालेली नाही. विजेची निर्मिती न झाल्याने राज्यातील अंधाराचे सावट आणखी कायम झाले आहे. राज्यात पुरेशी वीज निर्मिती होतच नाही उलट आहे त्या प्रकल्पातील काही संच वेगवेगळ्या कारणामुळे सतत बंद राहतात. पर्यायाने वीज निर्मितीत आणखी तुटवडा निर्माण झाला. चंदपूर, नाशिक, खापरखेडा, पारस, कोराडी, उरण गॅस प्रकल्प यांचा त्यामध्ये समावेश आहे. अन्य प्रकल्पातील वीज निर्मितीची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. अशा प्रकारे यामध्ये म्हटले आहे. सभापती महोदया, रत्नागिरीचे जे गॅस पॉवर कॉर्पोरेशन आहे त्या ठिकाणी वीज निर्मिती होणार आहे आणि आम्हाला 778 मेगावॅट वीज त्या प्रकल्पातून मिळणार आहे असे सातत्याने सांगितले जाते. आज राज्याची जी परिस्थिती आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, काल मला एका तांत्रिक कर्मचाऱ्याने माहिती दिली. ते लातूरला, परभणीला गेले होते. या वर्षी खूप पाऊस पडलेला आहे त्यामुळे विहिरी पाण्याने तुडुंब भरलेल्या आहेत. लोक विहिरीत पाण्याची बादली टाकून हाताने पाणी काढत आहेत. एवढे पाणी त्या ठिकाणी उपलब्ध आहे. विदर्भ, मराठवाडा अशा निरनिराळ्या भागातील विहिरी पाण्याने तुडुंब भरलेल्या आहेत परंतु ते पाणी शेतामध्ये नेण्यासाठी आवश्यक असलेली वीज उपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती आहे. आपण सातत्याने गेली कित्येक वर्षे प्रयत्नशील आहात पण अद्यापपर्यंत आपल्या प्रयत्नांना यश आलेले नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. परळी प्रकल्पाबाबत असे सांगितले होते की, डिसेंबरमध्ये वीज निर्मिती सुरुवात होणार आहे. पारसच्या प्रकल्पाबाबत सांगितले होते की, या वर्षामध्ये ते सुरु होईल. घाटघर प्रकल्पाची वीज उपलब्ध होईल, तारापूर ॲटॉमिक पॉवर जनरेशन प्रकल्पातून 400 मेगावॅट वीज मिळेल, उरणचा प्रकल्प सुरु झाला तर 560 मेगावॅट वीज उपलब्ध होईल, रत्नागिरी येथील दाभोळचा प्रकल्प सुरु झाला तर त्यातून 750 मेगावॅट वीज मिळेल असे आपण सांगितले होते. आपण वारंवार या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा करतो. आज वस्तुस्थिती अशी आहे की, आमच्याकडे वीज उपलब्ध नाही. यातून काय मार्ग काढावयाचा ? मी या ठिकाणी तांत्रिक कामगार युनियनचा उल्लेख केला. त्यांनी अक्षय प्रकाश योजना नावाची योजना काढली. ही योजना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या डोक्यातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

आलेली नाही. तांत्रिक कामगार युनियनने पुढाकार घेऊन ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. आपण अतिरिक्त वीज वापरु नये अशा प्रकारची ती योजना आहे. आता हिवाळा आहे. सध्या नागपूरला थंडी नाही. परंतु हिवाळ्याच्या दिवसामध्ये एका खोलीमध्ये झोपावयाचे असेल आणि थंडी असेल तर हिटर लावतो. संध्याकाळी 7.00 वाजता एक हिटर लावला आणि तो सकाळी 7.00 वाजेपर्यंत म्हणजे 12 तास चालू ठेवला तर त्याला जेवढी वीज लागते तेवढ्या विजेमध्ये पाच एकर जमिनीतील पिकाला पाणी मिळू शकेल. अशा प्रकारची योजना त्यांनी केली होती. मला त्यांनी अनुभव सांगितला. संपूर्ण मराठवाड्यामध्ये लोकांनी त्यांच्याकडे असलेल्या जुन्या शेगड्या, जुनी उपकरणे फेकून दिली किंवा बाहेर काढली. त्याचा परिणाम असा झाला की, राज्यामध्ये ज्या 6 हजार खेड्यामध्ये लोडशेडिंग होते तेथील लोडशेडिंग या लोकांनी बंद करुन टाकले. आज त्या भागातील गावागावामध्ये चांगल्या प्रकारे विद्युत पुरवठा केला जातो. त्या ठिकाणी शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्यासाठी वीज मिळते. हे आपण संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये करणार काय ? जर हे आपण केले तर तुम्ही राज्यामध्ये 1 हजार मेगावॅट वीज वाचवू शकता. आज मुबईसारख्या शहरामध्ये किंवा अन्य शहरांमध्ये विजेचा झगमगाट चालू असतो. निऑनसाईन बोर्ड अनेक ठिकाणी लावलेले दिसतात. हायकोर्टाच्या आदेशामुळे मुंबईला वेगळे नियम आणि उर्वरित महाराष्ट्राला वेगळे अशा पध्दतीचा भेदभाव केला आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

पण वस्तुस्थिती तुम्हाला नाकारता येणार नाही. एका बाजूला शहरामधून दिवाळी साजरी केली जाते आणि दुस-या बाजूला शेतकरी विजे अभावी आपल्या शेताला पाणी देऊ शकत नाही असे चित्र आज महाराष्ट्रामध्येय निर्माण झालेले आहे. या परिस्थितीमध्ये आपण सुधारणा करणार आहात की नाही ? शहरी भागातून मोठ्या प्रमाणावर जो विजेचा वापर केला जातो त्यावर आपण नियंत्रण घालणार आहात की नाही ? खरे म्हणजे जे लोक मोठ्या प्रमाणावर विजेचा वापर करतात त्यांनी आपल्या वीज वापरामध्ये किमान 25 टक्के कपात करायला पाहिजे जेणे करुन त्यामुळे झालेल्या विजेच्या बचतीमधून आपण शेतक-यांच्या शेताला पाणी देऊ शकू. या पुढच्या काळामध्ये हे काम आपल्याला करावे लागणार आहे. म्हणून अक्षय प्रकाश सारख्या योजना शासनाने तयार कराव्यात. आज नव्याने वीज निर्माण करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे आहे त्याच विजेचा सुनियोजित वापर करुन आज राज्यामध्ये असलेले मुबलक पाणी शेतक-यांच्या शेतापर्यन्त कसे जाईल, त्याची शेती कशी फुलेले आणि आत्महत्येपासून तो कसा परावृत्त होईल यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. शेतकरी शेतामध्ये जे कष्ट करतात त्या कष्टांचे फळ शेतक-यांना मिळाल्या शिवाय राहाणार नाही अशा प्रकारचे चित्र शेतक-यासमोर उभे करुन ते प्रत्यक्षात आणले पाहिजे. म्हणून त्या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी ठोस अशी पावले उचलावीत अशी मी त्यांना विनंती करतो.

तालिका सभापती महोदया, मी एक मुद्दा या ठिकाणी उपस्थित करतो ज्याचे उत्तर मला माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. वीज मंडळामध्ये 117 हजार कर्मचारी आहेत. या वीज मंडळाचे जेव्हा विभाजन झाले त्यावेळी कर्मचा-यांना दोन-दोन इन्क्रीमेटस् दिल्या, 15 टक्के जास्त भत्ता दिला. पगारातील तफावत दूर केली. शिपायाला 8 हजार रु. पगार होता आणि वायरमन म्हणून काम करणा-याला त्याच्यापेक्षा कमी पगार होता. ही पगारातील तफावत दूर केली. या कर्मचा-यांनी शासनाकडे पेन्शन मिळण्यासंबंधी मागणी केली. त्यांचा 3600 कोटी रु.चा ट्रस्ट आहे. त्यांना पेन्शन मिळण्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चाही झालेली होती आणि तत्कालीन ऊर्जा मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांनी "कोणत्याही परिस्थितीमध्ये या कर्मचा-यांना पेन्शन लागू करण्यात येईल" अशा प्रकारचे आश्वासन या सभागृहामध्ये दिले होते. त्याना द्यावयाच्या पेन्शन बाबत शासनावर दोन पैशाचा देखील आर्थिक बोजा पडणार नाही. केवळ त्यांच्या पेन्शन योजनेला शासनाने मान्यता देणे आवश्यक आहे. ही मान्यता द्यावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

तालिका सभापती महोदया, शेवटचा मुद्दा मांडून मी भाझे भाषण संपविणार आहे. परवा पंतप्रधान मुंबईमध्ये आले होते. त्यावेळी मुंबईच्या विकासाच्या संदर्भात चर्चा झाली. मी देखील त्यावेळी उपस्थित होते. श्री. टी. चंद्रशेखर हे एमएमआरडीअे, एमयूटीपी, एमयूआयपी या प्रकल्पांचे मुख्याधिकारी आहेत. त्यांच्या विरुध्द स्वकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी मागणी करुन देखील मुख्यमंत्र्यांनी त्यांचे ऐकले नाही आणि श्री. टी. चंद्रशेखर यांनाच काम करण्याची संधी दिली. श्री. दिलीप वळसे-पाटील हे ऊर्जा खात्याचे प्रमुख आहेत. वीज मंडळाचे विभाजन झाल्यानंतर ज्यांनी चांगले काम केलेले आहे अशा श्री. अजय मेहता, श्री.संजय भाटीया, श्री. जयंत कावळे यासारख्या अधिका-यांची तेथून बदली केलेली आहे. चांगले काम करणा-या अधिका-यांना तेथून का बदलले ? माननीय मुख्य मंत्र्यांच्या बंगल्यावरील वीज पुरवठा खंडित केला त्याला कोण जबाबदार आहे ? श्री. संजय भाटीया हे अधिकारी त्यास जबाबदार आहेत काय ? खरे म्हणजे या सर्व प्रापर्टीची देखरेख, तेथील वीज तसेच पाण्याची बिले भरण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची असून त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली नाही. त्याबद्दल त्यांना सजा झाली नाही. ज्या अधिका-यांनी वीज मंडळामध्ये प्रामाणिकपणे काम केलेले आहे त्यांना मात्र आपण ताकद देऊ शकलो नाही, त्यांच्या बदल्या केल्या, हे काही मला बरे वाटले नाही.

..नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

आपल्यासारख्या मंत्र्यांनी एक आदर्श घालून दिला पाहिजे होता. जर त्याठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यातील वीजपुरवठा बंद केला असेल तर सांगितले पाहिजे होते की, होय, अशाप्रकारेच वीज मंडळाचा कारभार चालतो. तो एक चांगला मॅसेज महाराष्ट्रात गेला असता. जे चांगले अधिकारी आहेत त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आज मुंबईमध्ये जे आयएएस अधिकारी बसले आहेत, जे अधिकारी भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत त्यांना संरक्षण दिले जाते आणि प्रामाणिकपणे काम करतात त्यांना प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली जात नसेल तर तो चुकीचा संदेश जाईल एवढीच माझी भावना व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागात विजेची जी अत्यंत गंभीर परिस्थिती आहे त्या संदर्भात माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आणि आम्ही सर्वांनी मिळून नियम 260 अन्वये हा प्रस्ताव दाखल केला आहे. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपले विचार मांडले आहेत. मी विशेषत: ग्रामीण भागासंबंधी बोलणार आहे. आज परिस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागात विजेचा अत्यंत तुटवडा आहे. लोडशेडिंग महाराष्ट्रातील जनतेने मान्य केले आहे. ग्रामीण भागाने मान्य केलेले आहे, त्याबद्दल कोणाची तक्रार नाही. आम्हाला माहिती आहे की, मागील काही काळामध्ये महाराष्ट्र राज्यात नव्याने वीज निर्मिती होऊ शकली नाही. त्यामुळे आजची अवस्था, परिस्थिती आलेली आहे हे सगळयांनी मान्य केले आहे. नवीन वीज निर्मितीचे प्रयत्न सुरु आहेत, सरकारचे प्रयत्न सुरु आहेत आणि या विभागाला जे ऊर्जामंत्री लाभले आहेत ते देखील प्रयत्नशील आहेत याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु आजच्या अवस्थेत लॉंगटर्म आणि शॉर्टटर्म उपाययोजना काय आहेत याचा विचार ऊर्जामंत्र्यांनी करण्याची गरज निर्माण झालेली आहे. वेगवेगळे प्रकल्प निर्माण होतील त्यासंबंधी आकडेवारी वृत्तपत्रात प्रसिध्द होते. अमुक प्रकल्प पुढच्या वर्षी पूर्ण होईल, त्यापुढील वर्षी अमुक प्रकल्प पूर्ण होईल. इतकी मे.वॅट वीज पुढील दोन-पाच वर्षात निर्माण होईल हे सगळे ठीक आहे. आज परिस्थिती काय आहे त्यासंबंधी तातडीची उपाययोजना आपण काय करु शकतो यासंबंधी ऊर्जामंत्र्यांनी विचार करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. मागील दोन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळ होता. दुष्काळात महाराष्ट्रातील शेतकरी होरपळला. पाणी नव्हते, पीक नव्हते. दोन वर्षानंतर मागील वर्षी सुध्दा भरपूर पाऊस झाला व यावर्षी देखील चांगला पाऊस झाला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कामाला लागला आहे. विहिरींना पाणी आहे, धरणांमध्ये पाणी आहे. गव्हाची पेरणी झाली आहे. अशा अवस्थेत, परिस्थितीत ग्रामीण भागात लोडशेडिंग वगळूनही वीजपुरवठा वेळेवर होत नाही ही अवस्था आहे. ही प्रत्यक्ष परिस्थिती ग्रामीण भागात दिसते. शेतामध्ये पीके पेरली, विहिरींना पाणी आहे. परंतु केवळ वीज नाही म्हणून शेतीला पाणी देता येत नाही आणि डोळयादेखत पीक करपून चालले आहे, जळून चालले आहे अशा अवस्थेत शेतकरी सापडला आहे. मी परवा तालुक्यामध्ये ग्रामीण भागात फिरत होतो. एक शेतकरी वाटेत भेटला. माझ्याकडे येऊन तो रडायला लागला. तीन महिने झाले, आमच्या भागातील डीपी जळाली. तीन महिने होऊनही नवीन डीपी मिळालेली नाही. त्याची पिके वाळून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख.....

गेली. ही अवस्था मी प्रत्यक्षपणे पाहिली. तालुक्यामध्ये शेतकऱ्यांचा मला मोर्चा काढावा लागला. सहा ते सात हजार शेतकरी मोर्चात सामील झाले होते. त्यांचे म्हणणे एकच होते की, लोडशेडिंग मान्य आहे. परंतु वीज मिळते ती अत्यंत कमी दाबाने मिळते. ती पूर्ण दाबाने मिळाली पाहिजे. डीपी ताबडतोब बदलून दिली पाहिजे, दुरुस्ती झाली पाहिजे. याची दखल ऊर्जामंत्र्यांनी तातडीने घ्यावी. दुष्काळानंतर आलेली ही चांगली अवस्था आहे. शेतीचे उत्पन्न वाढणार आहे. अशा अडचणीत केवळ वीज नाही म्हणून शेतीचे उत्पन्न मिळाले नाही तर शेतकऱ्यांची अवस्था कठीण होईल. या परिस्थितीची ऊर्जामंत्र्यांना पूर्ण जाणीव आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

म्हणून पुढील 2-4 महिन्यात तरी ग्रामीण भागातील शेतक-यांना वीज सारख्या दाबाने तसेच जास्त काळ कशी मिळेल, विजेची परिस्थिती कशी सुधारेल यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी प्रयत्न करावेत अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्रामध्ये विजेच्या संदर्भात वेगवेगळे प्रकल्प येत आहेत आणि येत राहणार आहेत. को-जनरेशनच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य अजून 2000 मे.वॅ. विजेची निर्मिती करु शकते. राज्यातील वेगवेगळया भागात मोठ-मोठे साखर कारखाने आहेत. या साखर कारखान्यातील बगॅस पासून आपल्याला 2000 मे.वॅ. वीज निर्माण होऊ शकते. त्यामुळे यासंदर्भात आपण लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. को-जनरेशनसाठी वीज कंपनी आणि वीज बोर्डाबरोबर बैठका घेतल्या पाहिजेत. यासंदर्भात आपण त्यांच्याशी बैठकाही घेत आहात परंतु यामध्ये काही तरी ठोस निर्णय होण्याची आवश्यकता आहे. को-जनरेशन मधून वीज मिळविण्यासाठी आपण को-जनरेशनला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उर्जा मंत्री तसेच वीज मंडळाचे संबंधित अधिकारी यांनी केंद्रसरकारशी चर्चा करुन पॉझिटीव्ह निर्णय कसा होईल यासाठी त्यांना भाग पाडले पाहिजे. अशा प्रकारे प्रयत्न केले तरच पुढील 2-3 वर्षात 2000 मे.वॅ. वीज निर्माण होऊ शकेल आणि यादृष्टीने आपण प्रयत्न करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्यातील विद्युत मंडळाने अगोदर प्रचंड प्रमाणात काम केलेले आहे. गावागावामध्ये वीज पुरविण्याचे काम केलेले आहे. परंतु आज विद्युत वितरण कंपनीमध्ये एक प्रकारचा गलथानपणा आणि निष्क्रीयता आलेली आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. आज अशी परिस्थिती आहे की, डी.पी. जळाल्या तर त्या लवकर दुरुस्त करुन मिळत नाहीत. डी.पी.न मिळाल्यामुळे, विहिरीत पाणी असतांनाही वीज नसल्यामुळे आपल्या डोळयासमोर पीक जळतांना पहावे लागत आहे हे महाराष्ट्र शासनाचे तसेच आपल्या राज्यातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. सभापती महोदया, महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात अग्रेसर आहे. शेतकरी घाम गाळून आपल्या शेतात पीक तयार करीत असतो परंतु त्याला वीज मिळत नसल्यामुळे शेतक-यांची पिके जळत आहेत, केवळ निसर्गाच्याच भरवशावर आणि कोरडवाहूचीच पीके त्याला घ्यावी लागतात. त्यामुळे शेतक-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याला अशा प्रकारे नाऊमेद करुन शासनाला चालणार नाही. महाराष्ट्र राज्याला वीज जास्त प्रमाणात कशी

.....2

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ SBT/ MAP/ KTG/

17:25

श्री. यशवंतराव गडाख .....

मिळेल यासाठी माननीय उर्जा मंत्री प्रयत्न करीत आहेत त्यामुळे आम्ही त्यांना धन्यवादच देतो. परंतु पुढील 2-3 महिन्यात ग्रामीण भागातील शेतक-यांना वीज मुबलक आणि सारख्या दाबाने कशी मिळेल यासाठी प्रयत्न करावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, या सदनाचे आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार साहेबांनी विजेच्या तुटवडयाच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, या सभागृहात विजेच्या संदर्भात सातत्याने चर्चा होत असते, विजेच्या संदर्भात अनेक आश्वासने दिली जातात. तसेच विजेच्या संदर्भात माननीय ऊर्जा मंत्री असे चित्र निर्माण करतात की, समोरच्यांना वाटते की, आता संध्याकाळी सगळीकडे प्रकाशच प्रकाश होईल परंतु संध्याकाळ झाली तर दिसून येते की, कालच्या अंधारापेक्षा आजचा अंधार अधिक गडद आहे. अगोदर वीज एक तास जात असे परंतु त्यानंतर 2 तास, 4 तास, 6 तास, 8 तास, 16 तास आणि आता तर वीज 18-18 तास गायब असते. महाराष्ट्राच्या विकासामध्ये विद्युत मंडळाचा प्रचंड वाटा आहे. परंतु दुर्दैवाने विजेच्या संदर्भात काही गोष्टी शासनाने गांभीर्याने घेतल्या नाहीत. महाराष्ट्रामध्ये एकेकाळी वीज आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणात निर्माण केली जात होती. वीज ॲक्सेस असल्यामुळे त्या काळी परळी आणि पारस येथील विद्युत जनित्र आपण बंद केली होती हे विदारक सत्य आहे. विजेची निर्मिती करुन ती स्टोअर करता येत नाही तर ती युटीलाईजच करावी लागत असते. आपल्याकडे वीज अधिक प्रमाणात वीज निर्माण होत असल्यामुळे आपल्याला परळी आणि पारस येथील विद्युत केंद्र बंद करावी लागली होती.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

आज नेमकी उलटी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज आपल्याला जवळपास तीन-चार हजार मेगावॅटची आवश्यकता आहे. वीज पुरवठा होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीला पाणी देता येत नाही, तो रडकुंडीला आला आहे. त्याला अस्मानी आणि सुल्तानी संकटाला तोंड द्यावे लागत आहे. अस्मानी संकट म्हणजे कधी दुष्काळ असतो तर कधी अतिवृष्टी होते. जर पीक आले तरी त्यास चांगला बाजारभाव मिळत नाही या अस्मानी संकटांना तो सामोरा जात आहे. दुर्दैवाने सरकारचा सुलतानी कारभार सुरु आहे असे वाटते. अशा दोन्ही कात्रीत शेतकरी सापडलेला आहे. शेतीचे उत्पन्न आले तरी त्यास चांगला बाजारभाव मिळत नाही. मग तो ऊस काढणारा शेतकरी असो वा फळांची शेती करणारा शेतकरी असो. आपण या सर्वांच्या मुळाशी गेलो तर आपणास एकच कारण दिसते ते म्हणजे वीज. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी भरपूर पाणी उपलब्ध असले तरी विजेअभावी त्याला शेतीला पाणी देता येत नाही.

सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत सुध्दा विषमता निर्माण झालेली आहे. एकीकडे आपण आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा काढीत आहोत तर दुसऱ्या बाजूला जिल्हापरिषदेच्या शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्याला रात्री अभ्यास करण्याकरिता घरात लाईट नसते. सायंकाळ झाली की, आपण म्हणतो दिवे लागणीची वेळ झाली. आपल्यावर तो संस्कार आहे. संध्याकाळी खेळून आल्यावर दिवे लागणीच्या वेळेला देवासमोर दिवा लावून आपण नमस्कार करतो आणि नंतर अभ्यासाला बसतो. दिवे लागणीच्या वेळेला घरात स्वयंपाकाची तयारी सुरु असते. परंतु आता विजेची कपात असल्यामुळे ग्रामीण भागात मुलांना रात्रीच्या वेळी अभ्यास करता येत नाही. आता तर सायंकाळी 7 ते रात्रौ 10.00 वाजेपर्यंत घरात लाईट नसतो. एमईआरसी कोणता रोल प्ले करीत आहे हे माहीत नाही. मध्यंतरीच्या काळात नगर जिल्ह्यामध्ये विधानसभेतील आमदार यांनी त्याठिकाणी आंदोलन केले. मी त्या भागाचा संपर्क नेता असल्यामुळे त्यांच्याकडे विचारणा केली. त्याने मला सांगितले की, त्याठिकाणी अचानकपणे सायंकाळी 7 ते रात्रौ 10 वाजेपर्यंत लोडशेडींग सुरु केले आहे. जर तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी लाईट नसेल तर व्यापारी त्यांचा व्यवसाय कसा करणार ? मी त्या ठिकाणी अधिका-याला फोन केला. त्यांनी मला सांगितले की, एमईआरसीने आम्हाला डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत की, मुंबई आणि पुणे शहर वगळता सर्व शहरांमध्ये सारखेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

लोडशेडींग करण्यात यावे. त्याप्रमाणे आम्ही सर्व शहरांमध्ये सारखेच लोडशेडींग करीत आहोत. आपण शेतकऱ्यांना त्रास देतच आहात पण शहरांना सुध्दा त्यामध्ये ओढले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय माझे चांगले मित्र आहेत. विजेच्या प्रश्नाबाबत ते खूप काही करण्याचा प्रयत्न करीत आहेत, परंतु त्यांना त्यामध्ये अपयश येत आहे, ही सत्य परिस्थिती आहे. केंद्र सरकारने सौर ऊर्जेचा पर्याय सुचविला आहे, पण आपण त्याचा वापर करीत नाही. सभापती महोदय, मुंबई शहराचा विचार करता किंवा उपनगरांचा विचार करता त्याठिकाणी विषमता आहे. मुंबई शहराला अखंड विजेचा पुरवठा आहे तर उपनगरांना काही ठिक्राणी विजेचा भार सहन करावा लागत आहे. मुंबई शहरास "बेस्ट" कंपनीकडून वीज पुरवठा केला जातो तर उपनगरांमध्ये रिलायन्स आणि एमएसईबी वीज पुरविते. या कंपन्यांकडून पुरविण्यात येणाऱ्या दरामध्येसुध्दा विषमता आहे. या कंपन्यांचे दर वेगवेगळे आहेत. मध्यंतरी रिलायन्स कंपनीने विजेचे दर वाढविल्यामुळे आंदोलन करावे लागले होते. यामध्ये एमईआरसी कोणता रोल प्ले करीत आहे हे मंत्रिमहोदयांनी सांगावे. एमईआरसी रेग्युलेटरी ऑथॉरिटी आहे, ते विजेचे दर कशाप्रकारे निश्चित करते, विजेच्या वितरणावर काही निर्बंध आहेत काय? मुंबई आणि उपनगरातील विजेचा ग्राहक तोच, परंतु या दोन्ही ठिक्राणी विजेचे दर वेगवेगळे आहेत. उपनगरात सर्वसामान्य लोक राहतात.त्यांना विजेच्या जादा दरापोटी जास्त पैसे खर्च करावे लागतात.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

यासंदर्भातसुध्दा एमईआरसीचे डायरेक्टीव्हज् येत नाहीत. आज ग्राहकांना प्रचंड भूर्दंड भरावा लागत आहे. त्यासाठी आंदोलने करावी लागत आहेत. मागे रिलायन्स कंपनीने वेगळाच सरचार्ज लावला, त्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागले. सभापती महोदया, वीज निर्मितीची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी पटलावर ठेवावी. मघाशी चंद्रपूरचा उल्लेख करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात अनेक प्लँट बंद पडलेले आहेत. तांत्रिक बिघाडामुळे काही प्लँट बंद असू शकतात. त्यामुळे जवळपास 500-550 मेगावॅट वीज कमी येते. आपण म्हणतो की, रोज प्रत्यक्षात 8 हजार मेगावॅट वीज तयार होते, परंतु तसे होत नाही. आज वीज निर्मिती हा मुलभूत प्रश्न आहे. वीज निर्मितीसाठी कोळसा लागतो. कोळशामध्येही दर्जा आहे, परत त्यामध्ये भ्रष्टाचार हा वेगळाच विषय आहे. कोळसा वेळेवर येतो की नाही, आला तर तो व्यवस्थित भिजवला जातो की नाही, त्याची राख होते की नाही या सगळया गोष्टींचा पूर्णपणे अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. मघाशी हायड्रोलिक प्लँटचा विषय निघाला. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जी माहिती दिली ती सत्य आहे. आपल्याकडे हायड्रोलिक प्लँट खरेच कमी आहेत. याबाबतीत आपण लक्ष केंद्रीत केले तर प्रचंड मोठया प्रमाणात वीज निर्मिती होऊ शकते. परंतु याबाबतीत आपले लक्ष नाही. तसेच, मघाशी टेमघर प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. त्यासाठी किती कालावधी लागेल ? मध्यंतरी छोटया छोटया तांत्रिक बाबींसाठी टेंडर मागविण्यात आले, तेही फॅशनवाईज मागविण्यात आले. यामध्ये सगळया तांत्रिक बाबी आहेत. त्यामध्ये 1000-1200 ड्रॉईंग असतात. एवढे होऊनही प्रत्यक्षात इन्सॉलिंग हे लोड बेअर करु शकत नाही. त्यानंतर पुन्हा इस्टीमेट करावे लागले. त्यामुळे याबाबतीतही माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष घालण्याची आवश्यकयता आहे. ज्या प्रकल्पांचे काम चालू असते तो प्रकल्प कधी पूर्ण होणार याची माहिती घेणे आवश्यक असते. सभापती महोदय, आणखी दोन-तीन कारणांमुळे वीज निर्मिती होऊन लोडशेडींग कमी होऊ शकते. परंतु त्याप्रमाणे कोणतेच प्रयत्न शासनाकडून होत नाहीत. याबाबतीत शासनाने विचार केला पाहिजे. माझा दुसरा मुद्दा वीज चोरीच्या संदर्भातील असून मुंबई शहराच्या बाबतीत एमईआरसीचा रोल काय आहे ? तिला कोणते अधिकार आहेत ? ती ॲथॉरिटीला डिक्टेट करते का ? तिच्या डायरेक्टीव्हजप्रमाणे आपण वागतो ? प्रत्यक्षात याबाबतीतील रोषाला आपल्याला सामोरे जावे लागते, एमईआरसी मात्र बाजूलाच राहते.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

शेतक-यांचे थोडयाशा पैशाचे वीज थकले तर आपण त्यांचे वीज कनेक्शन कट करता, परंतु मोठमोठया उद्योगपतींनी वीज चोरुनही आपण त्यांच्याबाबतीत काहीच करीत नाही, हे योग्य नाही. मघाशी याठिकाणी वीज चोरीच्या वसुलीबाबत सांगण्यात आले की, साडे बाराशे कोटी रुपयांचा महसूल या माध्यमातून वाढलेला आहे. परंतु आपली वीज निर्मिती वाढलेली नाही. प्रत्यक्षात 1 मेगावॅट वीजेचीही निर्मिती झालेली नाही. असे का झाले नाही ?

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ तळागाळातील लोकापर्यंत कसा पोहचेल यासाठी चांगल्या प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. गावातील तळागाळातील लोकापर्यंत सांगितले गेले पाहिजे की, एक डोमेस्टीक अक्षय प्रकाश योजनेसारखी योजना काढली असून दुसरी शेतीसाठी योजना काढलेली आहे. परंतु तसे काहीच होत नाही. त्यामुळे याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती देणे आवश्यक आहे. आज कोकणामध्ये सिंचन होत नाही, तरीही त्याठिकाणी लोडशेडींग होते. तसेच, इतर राज्यातून वीज मिळविण्यासंबंधी मध्यंतरी सांगण्यात आले की, सर्व कॉरपोरेशनचे आम्ही पॉवर कॉरपोरेशन करणार आहोत.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

सभापती महोदय, एक शेवटची सूचना मला या ठिकाणी करावयाची आहे. विजेच्या चोरीसंदर्भातील माहिती शासनाने एकदा पटलावर ठेवावी. किती लोकांकडून किती पैसे येणे आहेत, चोर कोण आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. शेतक-याला छळू नका. अगोदर आपण हॉर्सपॉवरनुसार बिल घेत होतो. आता शासनाने मिटर लावले आहे. 16 तास लोडशेडिंग असते पण शेतक-यांना भरमसाठ बिले येतात व त्यामुळे शेतक-यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. जर त्यांच्याकडून विजेचा वापर होत नसेल तर त्यांना कशाची बिले येतात ? याची एकदा चौकशी करण्याची आवश्यकता आहे. Energy saved is energy earned. मुंबईसारख्या ठिकाणी सौर उर्जेवर जर दिवे लावले तर तेवढी वीज आपण शेतक-यांना देऊ शकतो. मुंबईसारख्या शहरामध्ये हॉटेल, हॉस्पिटल्स या ठिकाणी मोठया प्रमाणावर 24 तास वीज वापरली जाते. जर त्या ठिकाणी सौर उर्जेचा वापर केला, अपारंपारिक उर्जेसंबंधी विचार केला तर मोठया प्रमाणात विजेची बचत होऊ शकेल. यासंबंधी शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे. 'अगोदरच उल्हास आणि त्यातून फाल्गुनमास' अशी परिस्थिती झाली आहे त्यामध्ये सुधारणा करावी, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा प्रश्नावर सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांनी प्रस्ताव मांडलेला आहे. जे देश उर्जेचा योग्य वापर करतील ते देश 21 व्या शतकामध्ये पुढे जातील, असे म्हटले जाते. जी चर्चा झाली त्यामधून 2 महत्वाचे विषय निघतात. जेवढया विजेची आवश्यकता आहे तेवढी वीज मिळाली पाहिजे आणि हे करण्यासाठी गळती व चोरी थांबविणे आणि वीज निर्मिती करणे हे दोन पर्याय समोर येतात. हे दोन प्रश्न आज आपल्यासमोर आहेत. गळती थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ? आज जवळ जवळ 30 टक्के वीज चोरी होते, गळती होते त्यामुळे आपल्याला भारनियमन करावे लागते. ही चोरी किंवा गळती थांबविली तर आजचे भारनियमन आपल्याल रद्द करता येईल असा हा सरळ हिशेब आहे. हे का होत नाही ? याचा शोध घेण्याची गरज आहे. मी मागे असा प्रस्ताव दिला होता की, नागपूर महानगरपालिकेमध्ये नागरी पोलीस आणि माजी सैनिकांचा उपयोग नागरी सुविधांसाठी करुन घेण्यात आला आहे आणि याचा चांगला उपयोग या शहरात होत आहे. आता त्यांना काढून टाकण्यात आले आहे, ही बाब वेगळी.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

त्याचप्रमाणे वीज गळती आणि वीज चोरी रोखण्यासाठी आपण माजी सैनिकांचे एक दल ऊर्जा विभागामध्ये निर्माण करावे. असे केले तर महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान कमी होईल असे मला वाटते. वीज चोरी माजी सैनिकच थांबवू शकतात. वीज चोरी थांबविण्याचे काम दुसरे कोणी करु शकत नाही. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी याचा विचार करावा, अशी माझी विनंती आहे. माझा दुसरा मुद्दा असा आहे की, वीज निर्मिती झाली पाहिजे, विजेचे नवीन प्रकल्प तयार झाले पाहिजेत. परंतु नवीन प्रकल्प होत असतांना त्या प्रकल्पांमुळे तेथील पर्यावरण उद्ध्वस्त झाले तर आपल्याला फार मोठे नुकसान सहन करावे लागेल. मी दोन प्रकल्पासंदर्भात बोलणार आहे. विजयदुर्ग येथे 4000 मेगावॅट क्षमतेचा औष्णिक विद्युत प्रकल्प येऊ पाहत आहे. विजयदुर्ग देवगड तालुक्यामध्ये आहे. जगातील प्रसिद्ध आंबा देवगड येथील आहे. तेथे 4000 मेगावॅट कोळशाचा औष्णिक विद्युत प्रकल्प येऊ पहात आहे. महाराष्ट्राची शान असणारा, महाराष्ट्राचा सन्मान असणारा आंबा त्या प्रकल्पामुळे बेचिराख होणार असेल तर that project will come only on my dead body. विजेच्या प्रकल्पामुळे जर त्या आंब्याला इजा होणार असेल तर तो प्रकल्प आम्हाला नको आहे. कारण तो आंबा म्हणजे जनतेच्या, शेतक-यांच्या जगण्याचे एक साधन आहे. परदेशामध्ये जाऊन मी या विषयावर अभ्यास केलेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दोन विषय फार महत्वाचे आहेत. कोळशाच्या संदर्भात मी काही म्हणणार नाही. कोळसा जाळल्यामुळे धूर येणार आणि तो धूर आंब्याच्या झाडावर जाणार, हा एक विषय आहे. दुसरा विषय असा आहे की, धूर पानावर जमा झाल्यामुळे झाडाला ऊर्जा कमी मिळते. त्यामुळे झाडांना अन्न मिळत नाही. त्यामुळे झाडे नष्ट होणार आहेत किंवा फळे देणार नाहीत. मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात अभ्यास केला पाहिजे. प्रकल्पामुळे त्या भागामध्ये जी उष्णता निर्माण होईल त्याचा झाडांवर, आंब्यांवर काय परिणाम होईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्रकल्पातील जे गरम पाणी खाडीमध्ये सोडले जाईल त्यामुळे किती उष्णता निर्माण होईल व त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये केले पाहिजे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहिले होते. माननीय मंत्री महोदयांनी मला असे आश्वासन दिलेले आहे की, पर्यावरणावर परिणाम होणार

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

असेल तर हा प्रकल्प होणार नाही. या विषयावर कोणी बोलतच नाही. या प्रकल्पामुळे तेथील पर्यावरणावर परिणाम होणार आहे किंवा नाही याचा अजून पर्यंत कोणीही विचार केलेला नाही. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे, फलोद्यानाचा जिल्हा आहे. प्रकल्प जर तेथील पर्यावरणावर बाधा आणणारे असतील तर असे प्रकल्प होऊ नयेत असे माझे मत आहे आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकांचे सुध्दा हेच मत आहे. राजापूर तालुक्यामध्ये अणू ऊर्जा प्रकल्प येऊ पाहत आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकल्प फार महत्वाचा आहे. मला असे वाटते की, हा 5 रिॲक्टरचा प्रकल्प आहे. लोकप्रतिनिधींना यासंदर्भात विश्वासात घेतलेले नाही. यासंदर्भातील माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांना यासंदर्भात किती माहिती आहे हे मला माहीत नाही. अणू ऊर्जा हा केंद्र सरकारचा प्रकल्प असल्यामुळे मंत्री महोदयांचा या प्रकल्पाशी संबंध नाही.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

परंतु मंत्री महोदयांनी यावर देखील निवेदन करणे आज आवश्यक आहे असे मला वाटते. सभापती महोदया, तिसरा प्रकल्प हा जयगड येथे दीड हजार मे.वॅ.चा औष्णिक प्रकल्प होत आहे. त्याची पाहणी करावी. कारण तेथील लोकप्रतिनिधींनी हा प्रकल्प व्हावा म्हणून मागणी केलेली आहे. परंतु तेथेही पर्यावरणाचा प्रश्न आहे असे वाटते. तेव्हा त्याचाही अभ्यास करूनच निर्णय घ्यावा अशी विनंती मी या निमित्ताने आपल्याला करतो. या वीज निर्मितीच्या दृष्टीकोनातून पूर्ण पाठिंबा असतानाही सरकारने त्याबाबतीत भूमिका घ्यावी असे वाटत असताना त्यातून काही विपरित परिणाम समाजाला भोगावे लागू नयेत असे वेाटते. सभापती महोदया, वीज आणि शेतकरी यांचे एक फार मोठे जवळचे नाते आहे. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना आकारण्यात येणाऱ्या वीज बिलाच्याबाबतीत काय धोरण असावे हे निश्चित होणे अगत्याचे आहे, आवश्यक आहे. या देशातील अनेक राज्यांनी शेतकऱ्यांना वीज बिल माफ केलेले आहे. या निमित्ताने मी तशी मागणी करीत नाही पण आज आपण डब्ल्यूटीओच्या जगामध्ये वावरत आहोत आणि जगातील अमेरिका आणि पश्चिम युरोपमध्ये शेतकऱ्यांना पूर्णपणे वीज बिल माफी आहे. त्यांच्याशी आपण स्पर्धा करीत आहोत अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्याबाबतीत देखील एक सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची आवश्यकता आहे एवढेच मत मी या विषयी येथे मांडू इच्छितो.

सभापती महोदया, दुसरे असे की, आपले जे कर्मचारी आहेत, जे गावपातळीवर काम करतात, जे कार्यकारी अभियंता आहेत, अधीक्षक अभियंता आहेत त्यांची जबाबदारी त्या त्यावेळेस चांगली सेवा देण्याची आहे. त्यांच्याबद्दल एक बाब मी आवर्जून माननीय मंत्री महोदयांना निदर्शनास आणून देऊ इच्छितो, यापूर्वी देखील मी ती बाब आपल्या लक्षात आणून दिलेली आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याबद्दलची ही बाब आहे. ज्या गलथानपणे तेथे आपण वीजेचे खांब टाकलेले आहेत आणि ती बाब वर्तमानपत्रातून येऊनही त्याबाबत त्यावेळी कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. त्यामुळे इजा होणार आहे तरी ते तेथे नसावेत अशी मागणी करूनही ते खांब तसेच होते. त्यामुळे तीन मच्छिमारांना आपले हात-पाय गमवावे लागले. तो प्रश्न आम्ही आपल्या समोर आणली असता आपण त्या लोकांना त्याबद्दलची भरपाई दिलेली आहे त्याबद्दल जरूर आपले धन्यवाद. या संदर्भात आपण अशा प्रकारे लोकांना भरपाई देण्याची आणि संबंधितांवर कारवाई करण्याची ॲक्शन घेतल्या

..... 3वाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

नंतर तेथील आपल्या अधिकाऱ्यांनी त्या लोकांना म्हटले की, तुम्ही आमच्या तक्रारी करता काय ? असे म्हणून त्यांनी दोन महिने सिंधुदुर्ग किल्ल्यातील लाईट कापून टाकली. नंतर आपल्या आदेशानुसार ती लाईट सुरू केली हा भाग वेगळा. पण मग इतका काळ तेथील लाईट अशा प्रकारे कोणी कापली ? तेथील जे आपले अधिकारी होते, मालवण मधील, त्यांनी वीजेच्या खांबासंबंधातील लोकांचे म्हणणे नाही आणि जेव्हा लोकांवर आपत्ती कोसळली व आपल्या आदेशानुसार त्यांना भरपाई द्यावी लागल्याने तेथील अधिकाऱ्यांनी सूडबुद्धीने किल्ल्यातील लाईटच कापून टाकली. या गोष्टीची चौकशी व्हावी आणि ज्या कोणी हे काम केले असेल त्यांचेवर कारवाई केली जावी अशी मागणीही मी या निमित्ताने करतो. सभापती महोदया, एक शेवटचा मुद्दा मला सांगावयाचा आहे. सिंधुदुर्ग मध्ये पवन ऊर्जेचा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला आहे. तेथे जयगड आणि सिंधुदुर्ग येथे दोन प्रकल्प झाले. परंतु त्यापुढे काहीही झाले नाही. एक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर, अशा प्रकारे नैसर्गिक वायुवर प्रकल्प होऊ शकतात हे सिद्ध झाल्यानंतर, जेव्हा आपण अपारंपारिक ऊर्जा स्रोतांची, प्रकल्पांची गोष्ट करतो तेव्हा त्यापुढे आपण अधिक कार्य करावयास पाहिजे. पण आज तेथे जे काही आहे ते मी राजकारणामध्ये येण्यापूर्वी म्हणजे 1991 पूर्वी विंडमिल्स झालेल्या होत्या. त्यापुढे त्यामध्ये काहीच प्रगती झालेली नाही. केंद्रातील आपल्या राज्याचे प्रतिनिधी जे अपारंपारिक ऊर्जा खात्याचे मंत्री देखील आहेत ते श्री.विलास मुत्तेमवार देखील सांगतात की, महाराष्ट्राने या बाबतीत अधिक उपयोग करून घेतला पाहिजे आणि अपारंपारिक ऊर्जेच्या बाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न करून जास्तीत जास्त वीज निर्मिती करावी. त्यातून आज जो महाराष्ट्रामध्ये विजेचा तुटवडा आहे तो काही प्रमाणात तरी कमी करता येऊ शकेल. तरी आपण त्या दृष्टीने प्रयत्न करावेत एवढीच विनंती मी या निमित्ताने करतो. धन्यवाद.

(यानंतर श्री. सरफरे .... 3झेड 1 ...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी हा प्रस्ताव सभागृहापुढे मांडीत असतांना प्रामाणिकपणे काही गोष्टी कबूल केल्या. त्यांनी काय कबूल केले हे आपल्या लक्षात आले असेल. या प्रस्तावावर दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांच्या सहया आहेत. कदाचित माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांना कैचित पकडण्यासाठी केले आहे असे मी म्हणणार नाही. हा प्रस्ताव आम्ही गेली दोन-तीन वर्षे मांडीत होतो त्यावेळी आपण त्याला कडाडून विरोध करीत होता. आम्ही अडीच तासाच्या चर्चेचा प्रस्ताव दिला होता त्यावेळी आम्ही जी भाषा वापरली होती आणि जे मुद्दे या सूचनेमध्ये समाविष्ट केले होते त्या प्रत्येक मुद्दयाला आपण विरोध केला होता. या ठरावाच्या सूचनेची शब्दरचना मी आपणास वाचून दाखवितो. "राज्यात सद्या तीन हजार मेगावॅट वीजेची तूट निर्माण होणे, वीजेच्या तुटवडयामुळे रब्बी पिकासाठी लागणारी वीज न मिळू शकल्यामुळे वीजेच्या पंपाना वीज न मिळाल्यामुळे शेतीला पाणी न मिळणे, तद्वत भारनियमामुळे उद्योगधंद्यावर अतिशय विपरीत परिणाम होऊन ते बंद पडणे, विशेषत: लहान लहान उद्योग बंद पडल्यामुळे वाढलेली बेकारी, खाजगी उद्योगांना वीज निर्मिती व वितरण करण्याची मान्यता दिल्याने वीज बिलात केलेली भरमसाठ वाढ, त्यामुळे महाराष्ट्रातील आम जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष दूर करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने युध्द पातळीवर उपाययोजना करण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी".

ठरावाच्या सूचनेतील संपूर्ण शब्दरचना ही आमची आहे. मंत्रिमहोदय समोरच्या बाकावर बसल्यामुळे मी त्यांची स्तुती करीत नाही. परंतु ते प्रामाणिकपणे धडपडणारे आणि काम करणारे मंत्री आहेत. ज्यावेळी आपण वीजेचा प्रश्न पोटतिडिकीने मांडतो त्यावेळी वीजेच्या तुटवडयामुळे महाराष्ट्रामध्ये फार मोठा असंतोष निर्माण होईल आणि तो वेगळया कारणासाठी होईल. हा असंतोष कुठेतरी जनतेच्या मनामध्ये धगधगत आहे. काल खैरलांजीच्या प्रकरणामधून तो असंतोष निर्माण झाला. म्हणून मला असे वाटते की, आपण या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये जी वाक्यरचना वापरली आहे. त्याबाबतीत या ठरावावरील सदस्यांची नावे वाचल्यानंतर वाटले..

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, ज्यावेळी आम्ही अशाप्रकारचा प्रस्ताव मांडला त्यावेळी समोरच्या बाकावरुन विरोध करण्यात आला. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या ज्यावेळी शेतकऱ्यांचे प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदनामध्ये मांडण्यात आले त्यामध्ये वीजेचे प्रश्न असोत पंपाचे असोत त्या प्रत्येक प्रश्नाच्या वेळी आम्ही विरोध केलेला नाही. उलट आपण या प्रश्नासंबंधी उपस्थित केलेल्या भावना देखील आम्ही या सभागृहामध्ये मांडलेल्या आहेत. त्यामुळे या प्रश्नांची आम्हाला जाणीव असल्यामुळे त्याला विरोध करण्याची भूमिका आम्ही कधीही घेतलेली नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार असोत किंवा माननीय सदस्य श्री. गडाख साहेब असोत, किंवा सभागृहातील अन्य माननीय सदस्य असोत या सर्वांबद्दल आमच्या मनामध्ये आदर आहे. आपले भाषण मी ऐकले असून आपण चांगले बोलला. मुंबईच्या अधिवेशनामध्ये वीजेच्या प्रश्नासंबंधी अडीच तासाची चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी आम्हाला सभागृहाच्या बाहेर जावे लागल्यामुळे आम्हाला बोलू दिले गेले नाही. म्हणून मी त्यासंबंधी याठिकाणी उल्लेख केला. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपल्या भाषणामध्ये म्हणाले की, युतीचे राज्य होते व त्यानंतर आपले राज्य होते त्या कालावधीमध्ये या राज्यामध्ये एक मेगावॅट सुध्दा वीज निर्माण झाली नाही. माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती चुकीची आहे. मी आपणास नम्रपणे सांगतो की, चंद्रपूरमध्ये 500 मेगावॅट वीज निर्माण झाली. युतीच्या काळात नागपूरला कोराडी येथे 250 मेगावॅट वीज निर्माण झाली. एन्रॉन प्रकल्प पाण्यामध्ये बुडविला होता, मान्य परंतु पुन्हा त्याला बाहेर काढून तो भारतीय चलनामध्ये केला. आणि त्यावेळी 1 हजार कोटी रुपयांचा फायदा राज्याला मिळवून दिला व राज्याचे 2170 मेगावॅट वीजेचे उत्पादन वाढविले. त्यावेळी आपण एन्रॉन प्रकल्पाला विरोध केला, बंद केला. आपण असे प्रतिज्ञापत्र केले की, राज्यामध्ये पुरेशी वीज असल्यामुळे हा प्रकल्प बंद करीत आहोत, पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता नाही. आमच्या रावजटीत कोयनेची वीज 1 हजार मेगावॅटने वाढविली, त्यानंतर कोयनेचा तिसरा व चौथा टप्पा आम्ही सुरु केला. गेल्या सहा महिन्यामध्ये राज्यामध्ये 1 लाख 60 हजार वीजेचे कनेक्शन शिल्लक आहेत. आज डिसेंबर महिन्यामध्ये वीजेचा तुटवडा असाच राहणार असेल तर जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे हे येणारे पाच महिने अतिशय भयावह असतील. माझ्या अंदाजानुसार 2 हजार मेगावॅट वीजेची कमतरता राज्यामध्ये भासणार आहे. सभापती महोदया, शासनाने वीज महाग केली. आम्ही हॉर्स पॉवर्सवर वीजेचे बिल देत होतो. आपण मीटरची व्यवस्था आणली. त्यामुळे शेतकऱ्याला जास्त पैसे द्यावे लागत आहेत. आमच्या काळात आम्ही कतारबरोबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

करार केला होता त्याचे पालन तुम्ही केले की नाही. केले? माझी जर माहिती चुकीची असेल तर आपण आपल्या भाषणामध्ये त्याचा उल्लेख करावा. आपण ती माहिती दिली नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

म्हणून मला असे वाटते की, आज महाराष्ट्रामध्ये विजेची भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. एन्रॉनच्या कराराच्या वेळेस 30 टक्के शासनाची भागीदारी घेतलेली होती. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जो उल्लेख केला तो बरोबर आहे. समाधानाची बाब अशी आहे की, मुंबई शहरामध्ये वीज बेस्टमार्फत कुलाब्यापासून सायनपर्यन्त, माहीम खाडीपासून वरळीपर्यन्त वितरीत केली जाते. उपनगरामध्ये विजेच्या बिलामुळे लोक लुटले गेलेले आहेत. रिलायन्स वीज कंपनी विजेचे वितरण करते. "इस देश का माल, अपना माल", असे रिलायन्स म्हणते. रिलायन्सने वीज बिलामध्ये वाढ केल्यानंतर शिवसेना आणि भाजपने आंदोलन केले. युतीचे सरकार असतांना खेडेगावामध्ये त्या वेळेस दोन-तीन तासच वीजेचे भारनियमन होत होते. आता खेडेगावामध्ये 12-12 तास विजेचे भारनियमन होत आहे. आता लोडशेडींगला काही मर्यादा राहिलेली नाही. कोकणातील सिंधूदूर्ग जिल्ह्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्य बोलतील. मी रत्नागिरीपुरते बोलणार आहे.पूर्वी त्या ठिकाणच्या खेडेगावामध्ये सोमवार, बुधवार असे वार ठरवून लोडशेडींग केले जात होते. मुंबईचा चाकरमानी गावाला गेला की, त्याची आई म्हणत असे की, आज बुधवार असल्यामुळे वीज जाणार आहे, तेव्हा वीज जाण्यापूर्वी पंप सुरू कर. परंतु आता केव्हाही वीज जाते, काही पध्दती राहिली नाही. लोडशेडींग आवश्यक आहे पण आज त्यामुळे त्याची माहिती गावातील लोकांना अगोदर मिळत नाही. दिवसातील सकाळी 6-00 ते दुपारी 12-00, सकाळी 6-00 ते 10-00, सकाळी 8-00 ते दुपारी 12-00 अशा भारनियमनाच्या वेळा ठरवा. आठवडयातयून दोन-तीन दिवस लोडशेडिंग करा म्हणजे लोक त्या कालावधीमध्ये पाण्याचा साठा करु शकतील. सभापती महोदया, शासनाला ही सर्व परिस्थिती माहिती असताना कोणत्या तोंडाने जनतेला मोफत वीज दिली जाईल, म्हणून सांगितले ? आपण महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागितली ? या राज्यावर येणारी, देशावर येणारी काही संकटे अशी असतात की, लोकशाहीप्रधान राज्यामध्ये, देशामध्ये ती संकटे दोघांनी सोडवायची असतात. काही संकटे निसर्ग निर्मित असतात जर काही मानव निर्मित संकटे असतात. आता हे संकट निसर्गाने निर्माण केलेले संकट आहे काय? तर ते निसर्ग निर्मित संकट नाही, ते मानव निर्मित आहे. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. शेवटी लोकशाहीमध्ये दोन्ही बाजू लक्षात घ्यावयाच्या असतात. आपण 1 मे.वॅ विजेचीही का निर्मिती करु शकलेलो नाही.? विजेच्या निर्मितीच्याबाबतीत सन्माननीय मंत्री महोदयांचे प्रामाणिकपणे प्रयत्न चाललेले आहेत हे मला माहिती आहे. आम्ही त्यांच्या हेतूबद्दल शंका धेतलेली नाही. महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू....

सह्याद्री अतिथी गृहावर मंत्रीमहोदयांनी विजेची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे एम.ओ.यू. केले, त्यांच्याशी सामंजस्य करार केले. त्यावेळेस माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांनी टीकाही केलेली होती. आता आपण जे अनेक सामंजस्य करार केलेले आहेत. त्याचे काय झालेले आहे? ते कार्यान्वित झाले काय ?त्याप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर तयार केले का ? जमिनी ताबयात घेतल्या का? बीज भांडवल उभे केले का ?प्लॅनिंग केले का ? ते पैसे बँकेमध्ये ठेवले का ? त्यांनी वीज निर्मितीचे कन्स्ट्रक्टीव्ह प्रपोजल दिले का? हे सगळे प्रश्न उपस्थित होतात. राज्यात सगळयात महत्वाचा प्रश्न हा विजेच्या तुटवड्याचा आहे सत्ताधारी पक्षाकडून विजेच्या संबंधात चर्चा उपस्थित केली, त्याचा आनंद झाला. सत्ताधारी पक्षामध्ये सुद्धा ज्यावेळेस एखाद्या विषयाची चिंता निर्माण होते त्यावेळी असे विषय इन कॅमेरा करावे लागतात. .आपल्या मुलाच्या चुका नाक्यावर जाऊन सर्वांसमक्ष कोणी काढत नाही. आपले सरकार, आपला पक्ष हे आपले अपत्य असते. तेव्हा विजेसारख्या महत्वाच्या प्रश्नावर आपल्याला अडीच तासाची चर्चा उपस्थित करुन चिंता व्यक्त करण्याची पाळी आली म्हणजे राज्यामध्ये दिसतो त्याही पेक्षा खरोखरच विजेचा प्रश्न गंभीर आहे असा त्यातून अर्थ निघतो. याचा सर्वसामान्य माणसाला जास्त त्रास होतो आहे. शहरामध्ये एखाद्यावेळी वीज गेली तर आपण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जनरेटरवर घरातील एखादी ट्युब लाईट,एखादा पंखा सुरू करू शकतो. पण आज सर्वात मोठे हाल हे ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांचे झालेले आहेत, सामान्य नागरिकांचे हाल झालेले आहेत. युती शासनाच्या काळातील विजेची कमतरता दाखवून सत्तेचा मुकुट आपण आपल्या डोक्यावर चढवला. तो खाली काढून ठेवा असे मी म्हणणार नाही, या विषयावर राजीनामा मागणे हा त्यावर उपाय नाही. ही भाषा नाही. परंतु दोन अडीच वर्षामध्ये आपण एकही मे.वॅ. वीज का निर्माण करू शकला नाही हा खरा प्रश्न आहे. आमची सत्ता असताना आम्ही वीज निर्माण केली. कर्नाटक राज्याला काही प्रमाणात वीज देत होतो. काही वेळा वीज बाकीच्या राज्यातून घेतली. मला वाटते, या गंभीर प्रश्नावर पूर्णत: विचारविनिमय करून निर्णय घेतला पाहिजे. आम्ही रामराज्य हा शब्द वापरला की, तुम्ही आमची टिंगलटवाळी करता. पण तुम्ही समाजवाद आणणार होता. समाजवादातून सगळयांना मूलभूत गरजा पुरविण्याचे वचन दिले होते. वीज ही सगळ्यात मूलभूत गरज आहे. अशा विजेचा तुटवडा का भासला ? 1 मे.वॅ.ही वीज आपण का निर्माण करू शकला नाहीत हे कृपया शासनाने सांगावे. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदया, देशाची उन्नती, औद्योगिक क्रांती, शेतकऱ्यांची शेती, विद्यार्थ्यांचा अभ्यास या सगळ्या गोष्टी विजेवर अवलंबून आहेत. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार साहेबांनी जो प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हा प्रश्न केवळ सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा नसून सर्वसामान्यांचा हा प्रश्न आहे. ही बाब खरी आहे की,शेतकऱ्यांनी गहू पेरला पण भारनियमन आल्यामुळे त्या ठिकाणी पाणी देण्याची सोय नाही. वीज केव्हाही निघून जाते त्यामुळे शेतकरी आपल्या पिकाला पाणी देऊ शकत नाहीत. रात्री केव्हाही वीज जाते त्यामुळे ग्रामीण भागातील, खेड्यापाड्यातील मुलांना अभ्यास करता येत नाही. पूर्ण गाव अंधारामध्ये असते. डी.पी. गेली किंवा ट्रान्सफार्मर फेल झाला तर दोन तीन महिने तो दुरुस्त होत नाही ही खरी बाब आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी चार कर्मचारी संघटनांबरोबर समझोता केला आणि जी विजेची चोरी होत होती ती उघडकीस आणून शासनाचा जो खजिना रिकामा झाला होता त्यामध्ये भर पाडली. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पण माननीय ऊर्जा मंत्र्यांनी मागच्या अधिवेशनामध्ये सांगितले होते की, 2009-10 पर्यंत आम्ही 15 ते 20 हजार मेगावॅट वीज निर्माण करु. मी मागच्या वेळी सुध्दा बोललो होतो. कोराडी, खापरखेडा, पारस, चंद्रपूर, उमरेड, मौदा या ठिकाणी वीज निर्मिती होऊ शकते. त्याबाबत काय प्रगती झाली हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. आमच्या नागपूरचे नाव ऑरेंज सिटी असे आहे. नागपूर जिल्ह्यातील नरखेड, सावनेर, काटोल या विभागातील संत्रा गायब झाला. तेथील संत्र्याची झाडे सुकून गेली. पाणी वेळेवर मिळत नाही. पाण्याची पातळी खाली गेली त्यामुळे संकटे निर्माण झाली. संत्र्याची झाडे तोडून टाकण्यात आली आणि त्या ठिकाणी शेतकऱ्यांनी दुसरी पिके घेण्याचे ठरविले आहे. मी कोणावर टीका करणार नाही. दाभोळ प्रकल्पाच्या बाबतीत, एन्रॉन प्रकल्पाच्या बाबतीत अशी बातमी आली होती की, त्यांच्याकडून आपण वीज खरेदी करणार आणि ती वीज महाराष्ट्राला देणार आणि भारनियमन कमी करणर. त्याबाबत काय झाले याबाबत सांगावे. खापरखेडा येथे एक प्रकल्प सुरु करणार आहात परंतु ते काम वेगाने झाले पाहिजे. पारस विद्युत केंद्र सुध्दा आपण सुरु करणार होता. तेही काम वेगाने झाले पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार बोलले तसेच इतरही सन्माननीय सदस्य बोलले. केंद्रीय अपांरपारिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकासे ...

ऊर्जा मंत्री श्री. विलास मुत्तेमवार यांच्याबरोबर आमची चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, मी महाराष्ट्राचा असल्यामुळे माझे महाराष्ट्रावर जास्त प्रेम असणे साहजिक आहे. त्यामुळे केंद्राची ही योजना आपल्या राज्यात खेड्यापाड्यापर्यंत गेली पाहिजे. ही योजना जर खेड्यापाड्यापर्यंत गेली तर कोणत्याही परिस्थितीमध्ये दोन चार महिन्यामध्ये 2 हजार मेगावॅटची कमतरता दूर करता येत असेल तर त्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावा. मी महाराष्ट्र शासनाला विनंती करतो. आता जानेवारी महिना सुरु होणार आहे आणि फेब्रुवारी महिन्यापासून नागपूर विभागामध्ये उन्हाळ्याची सुरुवात होते. त्यामुळे फार जास्त उष्णता असते. एक काळ असा होता की, त्यावेळी प्रत्येकाच्या घरामध्ये पंखे नव्हते किंवा इतर उपकरणे नव्हती त्यामुळे त्यावेळी याबाबत काही वाटत नव्हते परंतु आता प्रत्येकाच्या घरामध्ये पंखे आहेत तसेच पाणी गरम करण्यासाठी गिझर, हिटर आले. त्यामुळे आता जास्त वीज लागत आहे. माननीय ऊर्जा मंत्री प्रयत्नशील आहेत. रिलायन्स बरोबर समझोता केलेला आहे. त्यांनी साखर कारखान्यांना वीज निर्मिती करण्यास सांगितले आहे. असे धोरण महाराष्ट्र शासनाने आखलेले आहे. परंतु केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांकडून आपल्याला जी मदत घ्यावयाची असेल ती मदत लवकरात लवकर घ्यावी. त्यांच्याबरोबर चर्चा करावी. त्यांच्याबरोबर बैठक लावावी.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे....

आणि त्यांची जास्तीत जास्त मदत घेऊन राज्यातील दोन-तीन हजार मे.वॅट विजेचा तुटवडा दूर करावा. यामुळे राज्यातील भारनियमन कायमचे दूर होईल. तालिका सभापती महोदया, याठिकाणी मी एक महत्वाचा मद्दा उपस्थित करीत असून त्याची माननीय मंत्री महोदयांनी तात्काळ दखल घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे. नागपूर शहरातील विजेच्या मेण्टेनन्सचे कॉन्ट्रॅक्ट राय कंपनीला दिलेले असून कॉन्ट्रॅक्टमधील अटी व शर्तीनुसार ही कंपनी काम करीत नाही. मात्र दरमहा 18 लाख 50 हजाराचा चेक नागपूर महानगरपालिका या कंपनीला देते. शहरामधील दिवे बंद राहाता कामा नयेत म्हणून नवीन दिव्यांचा वापर करण्यात आला. परंतु राय कंपनी याबाबतीत काहीच काम करीत नाही. तेव्हा राय कंपनी बरोबर केलेले कॉन्ट्रॅक्ट ताबडतोबीने रद्द करण्यात आले पाहिजे असे मला काही नगरसेवकांनी सांगितल्यामुळे मी हा प्रश्न याठिकाणी उपस्थित करीत आहे.तेव्हा राय कंपनी बरोबर केलेले कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याच्या बाबतीत कारवाई व्हावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याबद्दल मला आदर आहे. ते कर्तबगार आणि अभ्यासू आहेत. ते तातडीने निर्णय घेतात. माझी त्यांना आणखी एक विनंती आहे की, भारनियमनामुळे खेड्यापाड्यातील लहान लहान उद्योग बंद पडतात. पिठाच्या चक्क्या बंद पडल्यामुळे गावातील लोकांना गव्हाचे पीठ देखील वेळेवर दळून मिळत नाही. या भार नियमनामुळे खेड्यापाड्यातील लोक अत्यंत त्रस्त झालेले आहेत. तेव्हा खेड्यापाड्यातील भारनियमन दूर करुन या गरीब जनतेला दिलासा द्यावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : तालिका सभापती महोदया, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आपल्या भाषणात असे म्हणाले की, आमचा प्रस्ताव तुम्ही घेतला . आमचे राज्यपण तुम्हीच घेतलेले आहे. त्यांच्या बोलण्याचा आशय असा होता की, आपल्या मुलाला कोणी नाक्यावर नेऊन शिव्या देत नाही. हा प्रस्ताव मांडून या राज्याला किती अंधारात आणि किती प्रकाशात ठेवले गेले आहे हेच सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणजे आपल्या मुलाला नाक्यावर नेऊन पान खायला घालण्याचा हा प्रकार आहे. ...(अडथळा).. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 15 मे.वॅटचा अल्ट्रा प्रोजेक्ट प्रकल्प येणारच असे महसूल मंत्री सांगतात आणि त्यांच्याच पक्षाचे सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत हे तो प्रकल्प येऊ देणार नाही असे म्हणतात. काहीही असो मी काही सिंधुदुर्गाच्या नादी लागत नाही...(अडथळा).. अल्ट्रा प्रोजेक्ट कोणी आणायचा यासंबंधीचा हा वाद आहे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

दादांनी प्रस्ताव मांडताना चांगला उल्लेख केला. श्री.राजाध्यक्ष हे माझ्याही परिचयाचे असून ते फार वर्षापूर्वी माझ्याकडे आले होते. अभिमान यासाठी आहे की, एक मराठी माणूस अमेरिकेमध्ये जाऊन केवळ सेटल न होता स्वत:ची कंपनी काढतो, आज त्यांचे स्वत:चे एअरपोर्ट आहे. वीज क्षेत्रामध्ये अमेरिकेमध्ये त्यांनी क्रांती घडवून आणली. ते मला म्हणाले, व्यवसाय म्हणून आलेलो नाही. महाराष्ट्रात येऊन माझ्या ज्ञानाचा फायदा देण्याची इच्छा आहे. आपण जो उल्लेख केला त्या संदर्भात माननीय ऊर्जामंत्र्यांनी यामध्ये लक्ष घातले तर काही घडू शकेल याची मला खात्री आहे. आतापर्यंत 7 वर्षात त्यांना काही घडविता आले नाही त्याला कारणे वेगळी आहेत. आज विजेच्या प्रश्नामुळे आकांत निर्माण झालेला आहे. लोडशेडिंग दोन तासावर आले आहे असे कोणी म्हणत असेल तर हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील नागरिकांचा अवमान आहे. 12 तासाच्या खाली कुठेही लोडशेडिंग नाही. किंबहुना आणखी आतील भागात गेलो, चंद्रपूर किंवा गडचिरोली भागात तर त्यापेक्षाही जास्त लोडशेडिंग आहे. वीज असल्याशिवाय देता येत नसल्यामुळे लोडशेडिंग आहे. मला वाईट वाटते की, लोकांच्या भावना जपण्याकरीता तरी मंडळाने काही वेळेला काम करणे आवश्यक असते. आपण दिवाळीत सुध्दा भारनियमन जाहीर करुनही थांबवू शकला नाहीत. ग्रामीण भागातील लोकांना अंधारात दिवाळी साजरी करावी लागली. कारण मी त्यावेळेला सांत्वन दिंडीच्या निमित्ताने शेतकऱ्यांना भेटायला जात होतो, ते अंधारात भेटत होतो. ग्रामीण भागातील दारिद्र्य काय आहे याचा जास्त अनुभव मी घेतला आहे. सहज आठवले आणि ओघात आले म्हणून मी सांगत आहे. मी बीडमध्ये ज्या दोन घरांमध्ये गेलो होतो त्या घरामध्ये त्यांनी बॅटरीचा बल्ब लावला होता. अख्ख्या घरामध्ये त्या बॅटरीच्या बल्बचा किती उजेड असेल याची आपण कल्पना करा. दिवाळीचे दिवस होते. प्रत्येक घरात एकच पणती होती. दिवाळीत विजेचा उजेड नाही तर नाही. परंतु पारंपारिक उजेड तरी पडावा. परंतु त्यांनी सांगितले, तेल महाग झाल्याने आम्हाला एकच पणती परवडते. अठराविश्व दारिद्र्य असणारी माणसे ग्रामीण भागात आहेत. आत्महत्या घडल्या त्या घरामध्ये मी जाऊन आलो. त्या संदर्भात मी कथा सांगेन. तीन आत्महत्याची प्रकरणे विचित्र आहेत. दोन प्रकरणातील कागदपत्रे मला प्राप्त झाली आहेत. एका प्रकरणात विजेचे बील 65 हजार रुपये अधिक शेतीचे कर्ज वाढून झालेली आत्महत्या आहे. एक आत्महत्या वीज चोरीच्या माध्यमातून झालेली आहे. अकोला जिल्हयात वीज चोरी झाल्याचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

लक्षात आल्यानंतर आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी ती वीज चोरी पकडली आणि त्यांनी शेतकऱ्याला सांगितले की, 10 हजार रुपये दे, नाही तर तुझी वाट लावतो, खटला दाखल करतो. शेवटी त्या शेतकऱ्याने माझ्यावरच खाजगी कर्ज आहे, त्यामुळे मी 10 हजार रुपये देऊ शकत नाही असे सांगितले. पिच्छा पुरविल्यानंतर तो पोलीस स्टेशनमध्ये गेला. पी.आय.समोर उभा राहिला व रितसर तक्रार नोंदविली. वीज चोरी पकडल्यानंतर सतत 10 हजार रुपये मागितल्यानंतर ते मी देऊ शकत नसल्यामुळे आत्महत्या करतो. त्या पी.आय.समोर त्याने आत्महत्या केली. हा ग्रामीण भागातील अनुभव घेऊन मी उभा आहे.

सभापती महोदया, 12-12 तासाचे लोडशेडिंग आज आहे. हे लोडशेडिंग टाळता येत नाही. माननीय ऊर्जामंत्र्यांचे स्टेटमेंट आहे. फसवणूक आपण किती करायची हे सरकारने ठरवावे. फसवणूक करीत असताना ग्रामीण भागातील लोकांना आशेचा दिवा तरी किती दिवस देणार आहात याचाही विचार करावा. या सभागृहामध्ये प्रास्ताविक भाषण करीत असताना वीज कुठून आणावी याचे मंत्रीमहोदयांना मार्गदर्शन केले. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी कुठून वीज निर्मिती होते याबाबत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. सरकारला चिंता नसेल तर आपण तरी चिंता का करावी हा माझा विषय नाही. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी चांगले प्रश्न मांडले, मला बरे वाटले. विधायक प्रश्न मांडून वीज निर्मिती कुठून होईल हे सांगताना विजेच्या संदर्भात अपमानित करणाऱ्या ज्या बाबी घडत आहेत त्या प्रामुख्याने मी मांडतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

विजेच्या निमित्ताने महाराष्ट्राला आशेचा किरण दाखविण्यात आला, महाराष्ट्र संपन्न कसा होईल हे याचे चित्र रंगविण्यात आले परंतु महाराष्ट्राला वीज न मिळता लाल दिव्याच्या संपन्नतेशिवाय काहीही मिळाले नाही. महाराष्ट्रातील वीज मंत्रालयासारखेच वीज मंत्रालय केंद्रात सुध्दा आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्याकडेच केंद्राच्या विजेचा कारभार आहे. माननीय सुशील कुमार शिंदे केंद्रीय ऊर्जा मंत्री झाल्यामुळे महाराष्ट्रातील विजेची परिस्थिती सुधारेल, महाराष्ट्रातील विजेचे सर्व प्रश्न सुटतील असे चित्र निर्माण करण्यात आले. माझे महाराष्ट्रावर प्रेम आहे असे माननीय विलासराव मुत्तेमवार यांनी म्हटलेले आहे. माननीय सुशीलकुमार शिंदे ऊर्जा मंत्री झाल्यावर त्यांच्या सोबत ब-याच मंत्र्यांनी आपले फोटो सुध्दा काढून घेतले. दिल्लीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी अशी घोषणा केली की, माननीय सुशीलकुमार शिंदे हे महाराष्ट्राला 3000 मे.वॅ. वीज मिळवून देणार आहे परंतु त्यांनी 3000 मे.वॅ. वीज देण्याच्या ऐवजी फक्त 100 मे.वॅ.वीज दिली. सभापती महोदया, "दात कोरुन पोट भरणे" ही जी म्हण आहे ती या ठिकाणी लागू पडते. एवढी मोठी घोषणा करुन माननीय मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ दिल्लीवरुन हात हलवत परत आले. माननीय मंत्रीमहोदयांनी मागील अधिवेशनामध्ये घोषणा केली होती की, मा. सुशीलकुमार शिंदे केंद्रीय ऊर्जामंत्री झाल्यामुळे महाराष्ट्रातील बंद पडलेला एन्रॉन प्रकल्प सुरु सुरु होईल. माननीय शरद पवार साहेबांनी सुध्दा एन्रॉन प्रकल्प सुरु करण्याच्या संदर्भात प्रयत्न केले होते. एन्रॉनच्या संदर्भात कोणी कोणी, काय काय प्रयत्न केले याची माहिती मला नाही. परंतु एन्रॉन चालू होणार आहे म्हणून त्यावेळच्या बातम्या महाराष्ट्रातील जनतेने पाहिलेल्या आहेत. तसेच एन्रॉन सुरु झाल्याच्या संदर्भातील बातम्याही महाराष्ट्राच्या जनतेने पाहिलेल्या आहेत. महाराष्ट्रात आता मोठया प्रमाणात वीज निर्माण होईल, कोठेही लोडशेडींग होणार नाही, चांगल्या दाबाने वीज मिळेल म्हणून महाराष्ट्रातील जनतेसारखाच मी सुध्दा आनंदी होतो. मागील अधिवेशनात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी याच सभागृहात एक निवेदन केले होते त्यात त्यांनी म्हटले होते की, एन्रॉनमधून जी वीज घेतली जाईल तीचा दर फक्त प्रती युनीट 2 रुपये 30 पैसे राहणार आहे. या विजेचा दर 2 रुपये 31 पैसे देखील होणार नाही. पंरतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

प्रत्यक्षात एन्रॉन मधून निर्माण होणारी वीज आता 12.00 रुपये प्रती युनिटने घेतली जाणार आहे. आम्हाला वाटले आता माननीय सुशील कुमार शिंदे केंद्रीय ऊर्जामंत्री झाल्यामुळे महाराष्ट्राला लागेल तेवढी विज ते देऊ शकतील. नॅशनल ग्रीड एकमेकाशी जोडल्यामुळे कोणत्याही राज्याला कितीही वीज मिळू शकेल असे वाटले होते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यावेळेला आमच्या हुशार पत्रकाराने प्रश्न विचारला की, शिंदेसाहेब आपण शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा करणार आहात,त्याचे काय झाले ? त्यावर त्यांनी सांगितले की, "निवडणुकीमध्ये अशाप्रकारच्या घोषणा करायच्या असतात." पण फक्त घोषणा करुन वीज देता येत नाही. महाराष्ट्र उपेक्षित असताना ज्यांनी महाराष्ट्राच्या जिवावर सत्तेवर बसलात परंतु जेव्हा परतफेडीची वेळ आली तेव्हा आपले उत्तरदायीत्व विसरलात, महाराष्ट्राकडे पाठविली ही जास्त खेदाची बाब आहे. या सर्वांकडून आपण चातकासारखी वाट पाहण्यामध्ये काही अर्थ नाही. आज आपण नागपूरच्या ग्रामीण भागात अपारंपारिक वीज देऊ शकत नाही ही सत्य गोष्ट आहे. सभापती महोदय, हा टीकेचा विषय नाही. जे घडते आहे ते सत्य समोर आले पाहिजे. जी सत्य गोष्ट आहे ती सांगितली पाहिजे. भविष्यात महाराष्ट्र असाच अंधारात राहणार आहे काय ?, तसा तो रहावा अशी इच्छा नसताना रहावे लागत आहे हे सांगावे लागत आहे.

सभापती महोदया, मी आपणास वर्तमानपत्रातील बातमी वाचून दाखवितो. "विद्युत केंद्राच्या निर्मिती क्षमतेपेक्षा कामकाज सुरु व्हावे यासाठी राज्याचे ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी मोकाडवाडी येथील वायु विद्युत केंद्राला भेट दिली.त्यांनतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उरणवायु विद्युत केंद्राच्या 252 मे.वॅ. क्षमतेप्रमाणे विजेच्या निर्मितीसाठी केंद्राकडून पुरेशा प्रमाणात गॅस पुरवठा होत नाही. त्यामुळे वायू विद्युत केंद्राची निर्मिती क्षमता कमी झाली. केंद्राकडून पुरेशा प्रमाणात गॅस पुरवठा व्हावा यासाठी केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांशी चर्चा सुरु आहे. केंद्रात ऊर्जा मंत्री म्हणून श्री.सुशीलकुमार शिंदे काम पाहत असल्याने यातून निश्चित मार्ग निघेल असा दावा श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी केला आहे." माझे तर असे म्हणणे आहे की, तुम्ही मृगजळाच्या मागे कशाला धावता ? आपण आहे त्या परिस्थिमध्ये एकत्र राहू. आम्ही आमची आंदालने कमी करतो. वाटल्यास चार अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणे देखील कमी करतो.परंतु आपणास वीज देता येत नाही हे प्रामाणिकपणे सांगावे. सभापती महोदया, महाराष्ट्रातील नाकर्ती माणसे केंद्रात मंत्री आहेत. त्यांना मुंबईबद्दल वा महाराष्ट्राला बद्दल कोणतीही आस्था नाही. मुंबईचे खासदार श्री.मुरली देवरा हे केंद्रात पेट्रोलियम मंत्री आहेत, परंतु ते आपणास गॅस उपलब्ध करुन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

देऊ शकत नाही. त्यांना या प्रश्नाचा जाणीव नाही का ? "असूनही खास मालक घरचा" अशी आपली दिल्ली्मध्ये अवस्था झालेली आहे. आजपर्यंत दिल्लीकडून महाराष्ट्राला काहीही मिळालेले नाही. भविष्यात काही मिळेल असे वाटत नाही. विजेची निर्मिती असो, गॅसची निर्मिती असो की आमचा बेळगाव कारवारचा प्रश्न असो, आपल्या तोंडाला पाने पुसणे हे दिल्लीचे कर्तृत्व आहे. बेळगाव-कारवार प्रश्नाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसणारा गृहमंत्री दिल्लीत बसलेला असताना सुध्दा त्याबाबतीत एकही ब्र काढलेला नाही. फक्त सत्ता उपभोगण्याकरिता दिल्लीमध्ये वाकावे लागते. सत्ता टिकवायची नसेल तर लाथ खावून परत यावे लागते नाही तर वाकावे लागते. तेव्हा विजेच्या बाबतीत दिल्ली्कडून कोणतीही मदत घ्यावी असा सल्ला मी मंत्रिमहोदयांना देऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले ते बरोबर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या नागपूर येथील बंगल्याची वीज कापली, त्या अधिकाऱ्याचा सत्कार करण्याऐवजी त्याची बदली करण्यात आली. यामुळे महाराष्ट्रात एक प्रकारचा मॅसेज गेला की, बड्या लोकांना हात लावू नका. जे व्ही.आय.पी.आहेत त्यांना आणि त्यांच्या आजुबाजुच्यांना हात लावू नका. जे आपल्या मतदारसंघामध्ये ताबा ठेवून असलेले लोकप्रतिनिधी असतील त्यांच्याही लोकांना हात लावू नका. मोठमोठे बागायतदार आहेत, जमीनदार आहेत त्यांनी जर विजेची बिलें भरली नाहीत तर त्यांना हात लावण्याची अधिकाऱ्यांना हिम्मत होणार नाही. सर्वच मंत्री काही सी.डी.देशमुखसारखे मानी नसतात. अशी महाराष्ट्राची परिस्थिती आहे.

सभापती महोदया, आज शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध आहे. परंतु ते शेताला देण्यासाठी त्यांच्याकडे वीज नाही. आज जवळपास 1 लाख 33 हजार वीज कनेक्शन्सची मागणी आहे. परंतु ज्यांच्याकडे वीज कनेक्शन्स आहेत त्यांनाच सरकार वीज पुरवू शकत नाही तर बाकीच्या लोकांना वीज कनेक्शन्स कशी देणार ? मी परभरणीत दोऱ्यावर गेलो असताना तेथील खासदार श्री.रेंगे-पाटील यांना सकाळी लवकर भेटायला बोलाविले, ते उशिरा आले, मी त्यांना म्हटले जरा लवकर यायचे, काही कामे होती. यावर त्यांनी सांगितले की, काय करु, लोकांची भेटायला गर्दी झाली होती त्यामुळे उशीर झाला.

यानंतर श्री.पुरी....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मी त्यांना विचारले की, लोक कोणत्या कामासाठी येतात ? त्यांनी सांगितले की, त्यांचे इतर कुठलेही काम नसते, ते फक्त डी.पी.साठी येतात. आता आमदार/खासदारांना फक्त वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना डी.पी.संबंधी फोन करण्याचेच मोठे काम लागलेले आहे. लोक आमच्याकडे रस्ते, पायवाट, नाल्या किंवा इतर कोणत्याच सुविधा मागत नाहीत ते फक्त डी.पी. देण्यासाठी मागणी करतात. आज संपूर्ण राज्यामध्ये अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु आपण 3 हजार मेगावॅट कशी देणार आहात ? माननीय मंत्रिमहोदय आपल्या उत्तरामध्ये सांगणारच आहेत की, आम्ही इकडच्या प्रकल्पातून वीज आणू, तिकडच्या प्रकल्पातून वीज आणू. आम्ही अमुक करु, तमुक करु. 2010 सालापर्यंत पुढील निवडणुका येईपर्यंत विजेची व्यवस्था करु असेच माननीय मंत्रिमहोदय आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगणार आहेत, याची मला माहिती आहे. त्यांची पूर्वीचीच स्टेटमेंट राहणार आहेत. आज अपारंपारिक ऊर्जेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी साताऱ्याला गेलो असता, त्याठिकाणी काही मंत्र्यांचे मोठे पंखे आहेत. मोठयांचे मोठेच प्रश्न असतात. त्याबाबतीत श्रीमती शालिनीताई पाटील यांनी आंदोलनही केले होते, याची माहिती माननीय श्री.कोरे साहेबांना आहे. त्याठिकाणी मोठमोठे फिरते पंखे आहेत. राज्यातील मुख्यमंत्र्यांपासून अनेक मंत्र्यांच्या मालकीचे पंखे असून ते खाजगी आहेत. परंतु त्यातून किती वीजनिर्मिती होते ? त्याठिकाणी मंत्रिमहोदयांचे पंखे असून त्यातून निर्माण झालेली वीज एमएसईबीने घ्यावयाची असते व त्यांचे पंखे चालू करण्यासाठी त्यांना पैसा द्यावा लागतो. प्रत्यक्षात त्यातून काहीच वीज निर्माण होत नाही. यामध्ये फार मोठयाप्रमाणात भ्रष्टाचार होतो. यामध्ये बरीच सबसिडी देण्यात येते. सभापती महोदया, बजाज ग्रुपलाही मोठयाप्रमाणात शासनाने सबसिडी दिली. आज राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी शासनाकडे एकही पैसा नाही, परंतु अशा मोठमोठया उद्योगपतींना सबसिडीच्या माध्यमातून मोठयाप्रमाणात निधी देण्यासाठी शासनाकडे पैसा आहे, हे योग्य नाही. आज त्याठिकाणी कोणाच्या मालकीचे किती पंखे आहेत, याबाबतची यादी माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी वाचली तर बरे होईल. महाराष्ट्रातील लोकांना कळेल तरी, या कामांव्यतिरिक्त मंत्र्यांना आणखी किती कामे असतात ? आपले उद्योग किती मोठे आहेत, हे आम्हाला कळले पाहिजे. त्यामुळे याठिकाणी मोठयांच्या किती मोठया गोष्टी असतात, हे या मोठया सभागृहाला कळले तर बरे होईल. सभापती महोदया, आज बिलाच्या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

माध्यमातून भ्रष्टाचार होतो. याबाबतीत मुंबईचा प्रश्न नाही, कारण मुंबईला टाटा वीज पुरवते. रेल्वेलाही टाटाची वीज आहे. याठिकाणी मुंबईचा आणि ग्रामीण भागाचा जो वाद आहे, तो योग्य नाही. कारण, याच्याशी मुंबईचा काहीही संबंध नाही. मुंबईला स्वतंत्र वीज मिळते. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर असून जागतिक पातळीवर तिची किर्ती वाढवायची की नाही हे आपण ठरवावे. महाराष्ट्राची किर्ती तर सगळया जगाला माहिती आहे. आपल्याकडील आत्महत्याग्रस्तांची जागाच्या पाठीवर नोंद आहे, बॉम्बस्फोटाची जगाला ओळख आहे. आपला लौकिक आपण ठेवायचा की नाही, हे आपणच ठरवावे. सभापती महोदया, याठिकाणी नॅशनल पॉवर ग्रीड आणि एन्रॉनचा प्रश्न आला. त्याठिकाणी 7.5 दराने काहीतरी वीजनिर्मिती चालू आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नाफ्ता नाही म्हणून बंद झाले, गॅस नाही म्हणून बंद झाले. त्यामुळे एन्रॉनमधून वीज येणार असेल तर ती किती येणार आहे ? ही येणारी वीज गॅसव्दारा येणार आहे की नाफ्ताव्दारा येणार आहे ? 2 रुपये 30 पैसे दरापेक्षा एकही पैसा जास्त द्यावा लागणार नाही असे आपण म्हणाला आहात. हाच दर कायम राहणार आहे काय ? अन्यथा, राज्य शासन सबसिडी देणार आहे, याचा बोध या चर्चेच्या निमित्ताने सर्व महाराष्ट्राला झाला पाहिजे. दर्यापुरमध्ये निवडणुक होती. रायगड जिल्हयातील चौल गावी दत्तजयंतीला फार मोठा उत्सव असतो, त्या ठिकाणी यात्रा भरते, संपूर्ण रायगड जिल्हयातील व परिसरातील लोक या यात्रेला जात असतात. त्या ठिकाणी वीज नसल्यामुळे तेथील लोकांचे मला फोन आले. स्थानिक आमदार म्हणून मी सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील यांना फोन लावला. परंतु, त्यांनी मला सांगितले की, राठोड नावाचा अधिकारी ऐकत नाही. लोड शेडिंगचे शेडयुल चेंज करण्याचे अधिकार त्यांच्याकडे नाहीत. एवढया मोठया उत्सवासाठी एक दिवस शेडयुल चेंज करणे अशक्य होते काय ? दर्यापुर मतदारसंघामध्ये गेल्या 4 दिवसांपासून लोड शेडिंग बंद करण्यात आले आहे. लोकांना हा उजेड कशासाठी देत होता ? केवळ 4 दिवसांसाठी उजेड देऊन लोकांची फसवणूक का करीत होता ? ही राज्यसत्तेची मस्ती आहे. लोकांच्या भावनांशी खेळणारे अशा पध्दतीने शेडयुल चेंज करणार असतील तर पुढचे आंदोलन हे तुमच्या खात्यासाठी होणार आहे, हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. You mean it. You said it. You name it. But the same villlage will stand against you. अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये विजेच्या बाबतीत निर्माण केली आहे. शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. कारखानदारी बंद झाल्यामुळे बेकारी वाढत आहे, राष्ट्रीय उत्पादन बुडत आहे, महाराष्ट्राचे उत्पादन बुडत आहे. विजेच्या निर्मितीच्या शैथिल्यामुळे हे सर्व झाले आहे. 1 मेगावॅट वीज निर्मिती झालेली नाही, असे दिल्लीमध्ये सन्माननीय मंत्री, श्री.सुशीलकुमार शिंदे यांनीच सांगितले आहे. तुमच्या अपयशाचा परिणाम महाराष्ट्राच्या परकॅपिटा उत्पन्नावर होत आहे. जी.डी.पी.कमी होत आहे, उत्पन्न घसरत आहे, बेकारी वाढत आहे, कारखानदारी बंद होत आहे, कारखाने इतर प्रांतात जात आहेत. उद्ध्वस्त महाराष्ट्र बघण्याची सवय तुमच्या राज्यात लोकांना करावी लागणार आहे काय ? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. हा वीज निर्मितीपुरता प्रश्न असू शकत नाही,

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ही चर्चा लोडशेडिंगपुरती असू शकत नाही, महाराष्ट्राच्या उत्पन्नाशी, जी.डी.पी.शी, परकॅपिटा उत्पन्नाशी, राज्यातील घरादाराशी हा विषय संबंधित असल्यामुळे याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. कर्तबगार मंत्री म्हणून लोक आपल्याकडे पाहतात, असे सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले. आपली कर्तबगारी त्यांना माहित असेल, परंतु आम्हाला कुठेही उजेड पडलेला दिसत नाही. अक्षय प्रकाश योजना आणावयाची, टेंडर काढायचे, नवीन छोटे लाईट बसवावयाचे आणि तुटपुंजी वीज वाचवायची, या प्रयत्नांनी हा प्रश्न सुटणारा नाही. वीज निर्मितीशिवाय पर्याय नाही आणि वीजेशिवाय प्रगती नाही. महाराष्ट्राचे पतन तुमच्या माध्यमातून 100 टक्के आहे हे या निमित्ताने आवर्जुन सांगतो. हा प्रस्ताव आणून पुन्हा एकदा हे राज्य जाणार असे सांगण्याची संधी दिली त्याबद्दल सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांना धन्यवाद देतो व थांबतो.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुदीन मोहसिन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदया, महाराष्ट्र राज्य में वीज की कमी के बारे में माननीय सदस्य श्री. उल्हास पवार ने जो प्रस्ताव सदन में पेश किया है, उस प्रस्ताव पर मैं अपने विचार आपके सामने प्रस्तुत करना चाहता हूँ.

सभापति महोदया, महाराष्ट्र में वीज का कम उत्पादन हो रहा है और वीज की कमी की वजह से गरीब लोगों को, किसानों को और छोटे उद्योगपतियों को बहुत तकलीफ हो रही है. वीज की तकलीफ पैसे वाले लोगों और बड़े उद्योगपतियों को नहीं है. सामान्य जनता और गरीब किसानों को वीज की कमी की वजह से बहुत तकलीफ हो रही है और इस बारे में मैं माननीय मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ.

सभापति महोदय, सब से पहले मैं आपको अपने निर्वाचन क्षेत्र की स्थिति के बारे में बताना चाहूंगा. महाराष्ट्र में सब से ज्यादा वीज की निर्मिति चंद्रपुर जिले में होती है. चंद्रपुर जिले में 2500 मेगावाट वीज की निर्मिति होती है. पिछले साल थर्मल पावर की एक यूनिट बंद थी और उसके बाद में एक और यूनिट बंद हो गई है. महाराष्ट्र के अन्दर सरकार की तरफ से वीज निर्मिति के लिए ठोस उपाय-योजना नहीं की जा रही है. हमारा यह अनुभव है कि महाराष्ट्र शासन इमरजेन्सी के नाम पर नगरपरिषद या जिला परिषद में एक रुपए की बजाय सौ रुपए खर्च करता है, फिर भी अधिकारी वर्ग काम पूरा नहीं करते हैं. चंद्रपुर और गडचिरोली सब से पिछड़े हुए जिले है, यह नक्सलवाद से प्रभावित क्षेत्र भी है, यहां के लोगों और किसानों को वीज की कमी से बहुत तकलीफ है. किसानों की जमीन कोल माइन्स ने ले ली है और जो जमीन उनके पास बची है, उस पर खेती करने के लिए उनको वीज नहीं मिल रही है. चंद्रपुर में सुबह 6 बजे से 11 बजे तक वीज नहीं रहती है और उसके बाद 2 घंटे स्पेशल लोड शेडिंग रहती है. इस प्रकार से 7-8 घंटे तक हमारे जिले में लोड शेडिंग होती है. हमारे जिले में सब से ज्यादा वीज की निर्मिति होती है तो फिर यह लोड शेडिंग क्यों होती है ? दूसरी जगहों पर सुबह 6 बजे से लोड शेडिंग नहीं होती है, वहां पर सुबह 7.30 बजे या 8 बजे से लोड शेडिंग होती है. चंद्रपुर के साथ यह भेदभाव किस वजह से किया जा रहा है ? सुबह 6 बजे बच्चे स्कूल जाते हैं और उस समय लोड शेडिंग होने से उनको बहुत तकलीफ होती है. हम ज्यादा वीज पैदा करते हैं, फोरेस्ट का संरक्षण करते हैं, नक्सलवाद से लड़ते हैं और फिर भी हमारा दुर्भाग्य है कि सुबह 6

. . .2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बजे से वीज बंद कर देते हैं. हम अपने देश में और प्रदेश में लोकशाही को मानते हैं और ऐसा कहा जाता है कि जनता का राज है, लेकिन हर जगह पर आयोग बना दिया जाता है और उसके ऊपर रिटायर्ड अधिकारियों और जज की नियुक्ति होती है. समस्या को हल करने के बारे में जब हम एम.एस.ई.बी. के अधिकारियों से फोन पर बात करते हैं तो उनकी तरफ से जबाब दिया जाता है कि यह बात हमारे अन्डर में नहीं है, यह बात एम.ई.आर.सी. के अन्डर में है. मैंने चीफ इंजीनियर से कई बार रिक्वेस्ट की है कि चंद्रपुर में आप लोड शेडिंग का समय सुबह 6 बजे की बजाय सुबह 8 या 8.30 बजे से रखें. मैंने उनको पत्र भी लिखा है, मगर उसका उत्तर नहीं आया है. दूसरी जगह पर लोड शेडिंग सुबह 8 बजे से होती है तो फिर यह तफावत क्यों है ? चाहे इलेक्शन का समय हो अथवा जब कोई बड़े नेता आते हैं तो जहां पर इस प्रकार की बात होती है तो वहां पर लोड शेडिंग के मामले में आप स्पेशल सुविधा देते हैं. मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहता हूँ कि ऐसा क्यों है ?

सभापति महोदया, वीज निर्मिति करने के लिए महाराष्ट्र सरकार उड़ीसा से कोयला लाने वाली है. मैं उन्हें बताना चाहता हूँ कि चंद्रपुर जिले में सब से ज्यादा कोयला होता है. 40 हजार टन कोयला प्रतिदिन चंद्रपुर से दिया जाता है. चंद्रपुर में वेस्टर्न कोल फील्ड की लगभग 40 कोल माइन्स हैं. चंद्रपुर से दूसरे राज्यों को कोयला दिया जाता है. यहां पर वीज निर्मिति के छोटे छोटे कारखाने आ सकते हैं. जहां पर कोयला उपलब्ध है, वहां पर शासन वीज निर्मिति नहीं करता है. चंद्रपुर में जो छोटे छोटे प्लान्ट हैं, वहां पर एक यूनिट वीज निर्मिति पर 1 रुपया 30 पैसै खर्च होते हैं. अकोला में एक यूनिट वीज निर्मिति पर 2 रुपए 30 पैसे खर्च होते हैं और भुसावल में 3 रुपए 30 पैसे खर्च होते हैं. ट्रान्सपोर्ट का खर्च बढ़ने से वीज निर्मिति का खर्च बढ़ जाता है. माननीय मंत्री महोदय इस तरफ ध्यान क्यों नहीं दे रहे हैं ? चंद्रपुर में एक हजार मेगावाट तक के प्रोजक्ट लगाए जा सकते हैं, लेकिन ये प्रोजक्ट एन.ओ.सी. इत्यादि कारणों की वजह से रुके हुए हैं.

सभापति महोदया, मैं बल्लारशाह नगरपरिषद का अध्यक्ष था, वहां पर 24 मेगावाट वीज की निर्मिति होती है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशोधित पत्र / अशोधित नहीं

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

आज वहां बल्लारशा,चंद्रपुर में नदी किनारे बहुत अच्छी 200-250 एकड़ जमीन उपलब्ध है. वहां 5-7 किलोमीटर क्षेत्र में 15-20 कोल माइन्स हैं. इतनी अच्छी जगह होने के बावजूद वहां कोई प्रोजेक्ट नहीं लिया जा रहा है. वहां पर घर, रास्ते, जल और अन्य साधन सुविधाएं, इन्फ्रास्ट्रक्चर तैयार थें इसके बावजूद भी प्रोजेक्ट करने बंद किए गए हैं. मेरी समझ में यह बात नहीं आती कि जब कहीं प्रोजेक्ट के लिए जगह उपलब्ध है, साधन-सुविधाएं उपलब्ध है तो फिर वहां प्रोजक्ट क्यों नहीं बनाये जाते ? अगर आप प्रोजेक्ट नहीं लेना चाहते तो कम से कम जो प्रोजेक्ट चल रहे हैं, उन्हें तो बंद मत कीजिए. बल्लारशा, चंद्रपुर में यह इतनी अच्छी जगह है कि वहां सरकार अच्छे प्रोजेक्ट कर सकती थी. इसलिए मेरी शासन से विनती है कि इस ओर ध्यान दें. मैं आपको यह बताना चाहता हूं कि दूसरे फेक्टरी वालों की इस जगह पर नज़र है. अगर मंत्री महोदय कभी वहां दौरे पर जाए तो देखें. आप को दिखाई् देगा कि बहुत ही अच्छी 200-250 एकड जमीन उपलब्ध है. इस जगह पर 500-1000 मेगावॉट विद्युत योजना की जा सकती है. यहां पर बाकी चीज़ों के रेट भी कम है. दूसरी जगह ट्रांसपोर्ट के रेट बहुत बढ़ गए हैं. हर नेता यह कोशिश करता है कि उसके जिले में फेक्टरी आए. चंद्रपुर और बल्लारशा में 1 रुपये 70 पैसे की दर से बिजली निर्मिती की जा सकती है. ऐसी स्थिति में दूसरी जगह मंहगी दर से बिजली उत्पादन करने की क्या जरुरत है ? शासन को खुद का घाटा नहीं करना चाहिए.

सभापति महोदय, मैं 16 साल की उम्र से राजनीति में हूं. मैंने जीवन में अनेक अनुभव लिए हैं. मैं खुल कर बोलना नहीं चाहता. मेरे सामने बैठे हुए माननीय सदस्य खुल कर बोलते हैं. लेकिन मैं इस सदन में नया सदस्य हूं इसलिए खुल कर नहीं बोलूंगा. लेकिन मैं यह कहना चाहूंगा और यह हकीकत बयान करना चाहूंगा कि जितने भी विभाग है उनमें सबसे ज्यादा भ्रष्ट एमएसईबी है. मंत्री महोदय माने या न माने लेकिन यह हकीकत है कि हर व्यक्ति को बिजली का कनेक्शन लेने के लिए एमएसईबी के कर्मचारियों/अधिकारियों को पैसे देने ही पड़ते है. एमएसईबी में यह प्रथा हो गई है. पैसे दिए बगैर बिजली का कनेक्शन नहीं मिलता. बिजली का कनेक्शन लेने के लिए पहले अर्जी देनी पड़ती है. उसके बाद टेस्ट रिपोर्ट तैयार होती है और उसके बाद पैसे भरने के लिए फॉर्म भरना पड़ता है. आप किसी भी जिले की सूची निकाल कर अर्जी देने की तारीख देखिए, टेस्ट रिपोर्ट की तारीख देखिए तो आपको यह पता चलेगा कि

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

अर्जी देकर तीन-तीन साल हो जाने के बाद भी बिजली का कनेक्शन नहीं दिया गया. जो व्यक्ति 5-6 हजार रुपये देता है उसको 24 घंटे के अन्दर बिजली का कनेक्शन मिल जाता है. 99 प्रतिशत मामलों में आप यह पायेंगे की अर्जी देकर तीन साल हो जाने के बाद भी बिजली का कनेक्शन नहीं मिल पाया है. 5-6 हजार रुपये देने पर 24 घंटे में बिजली का कनेक्शन मिल जाता है. मैंने आमदार बनने से पहले 2005 में थ्री फेज योजना के अन्तर्गत बिजली के कनेक्शन हेतु एमएसईबी विभाग को अर्जी दी थी. लेकिन मुझे बिजली का कनेक्शन नहीं मिल रहा था इसलिए मैंने एमएसईबी विभाग के कार्यकारी अभियंता, उप अभियंता को फोन किया. प्रेम से बात की और डाट कर भी बात की. मैंने यह सोचा कि ज्यादा डाटूंगा तो मेरा आमदार का पद न चला जाए. लेकिन 10 बार फोन करने के बाद भी मेरा काम नहीं हुआ था. बिजली विभाग ने थ्री फेज का डिमांड नोट भी नहीं भेजा. उसके बाद एक लाईनमैन मेरे पास आया और मुझे कहा कि आपका काम हो जाएगा, लेकिन आप मुझे और साहब को कितना देने वाले हो ?

इसके बाद श्री शर्मा....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आमदार के घर पर उससे मिलने के लिए बहुत से लोग आते हैं और सभी लोग सिर्फ वीज की समस्या के समाधान के लिए आते हैं. कोई कहता है कि उसके घर पर मीटर नहीं है, कोई कहता है कि डी.पी. नहीं है, कोई कहता है कि गांव में वीज नहीं है. विदर्भ में किसानों की आत्महत्या का एक कारण यह भी है कि एम.एस.ई.बी. के लोग जबरन मीटर काट देते हैं. चंद्रपुर जिले में बड़े कारखानों पर छापा नहीं मारा जाता है. एक्जीक्यूटिर इंजीनियर और दूसरे बड़े अधिकारी इन कारखानों के रेस्ट हाउस में जाकर खाना खाते हैं और बताते हैं कि अमुक व्यक्ति ने आपके बारे में शिकायत की है. फिर उसके रिश्तेदारों से दबाब डलवाया जाता है, ताकि वह शिकायत वापस ले ले. गरीब लोग वीज की चोरी नहीं करते हैं. मंत्री महोदय अगर इन्क्वायरी करेंगे तो उनको मालूम पडेगा कि वीज की सब से ज्यादा चोरी बड़े उद्योगपति करते हैं, लेकिन उनके खिलाफ कोई एक्शन नहीं लिया जाता है.

सभापति महोदया, मैं आपको बताना चाहता हूँ कि छोटे उद्योगपतियों की वीज काटी जा रही है. जब सरकार ने छोटे उद्योगपतियों के लिए 35 रुपए से बढ़ाकर 250 रुपए रेट कर दिया तो वहां के लोगों ने मोर्चा निकाला. एम.एस.ई.बी. के अधिकारियों ने कहा कि रेट बढ़ाना या कम करना हमारे हाथ में नहीं है, यह अधिकार एम.ई.आर.सी. के पास है. दूसरी तरफ सरकार बड़े बड़े उद्योगपतियों से 20 साल का एग्रीमेंट करती है. उदाहरण के रुप में मैं आपको बताना चाहता हूँ कि अंबुजा सीमेंट का 700 करोड़ रुपए का प्रोजक्ट है और उसके लिए सेल्स टॅक्स के 800 करोड़ रुपए माफ कर देते हैं. यह सरकार छोटे उद्योगपतियों को कोई फायदा नहीं दे रही है. उनके लिए 35 रुपए की रेट बढ़ाकर 250 रुपए कर देते हैं और फिर कहते हैं कि यह हमारे हाथ में नहीं है, यह आयोग के हाथ में है. अगर आपको सभी कार्यों के लिए आयोग बनाना है तो फिर विधान सभा और विधान परिषद को बर्खास्त कर दीजिए और पूरे देश को आयोग के हवाले कर दीजिए. मेरा स्पष्ट रुप से कहना है कि माननीय मंत्री महोदय को कुछ अधिकार अपने पास रखने चाहिए, ताकि वे लोगों की समस्या का समाधान कर सकें. आप सभी अधिकार आयोग के पास मत दीजिए.

सभापति महोदया, अन्त में माननीय मंत्री महोदय से मेरा इतना ही कहना है कि चंद्रपुर पिछडा हुआ जिला है, नक्सलवाद से प्रभावित है और यहां पर हर बात की तकलीफ है इसलिए आप सुबह 6 बजे से लोड शेडिंग मत कीजिए. स्कूल जाने वाले बच्चों को बहुत परेशानी का

. . 4K 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सामना करना पड़ता है. इसलिए आप 6 बजे की बजाय आप 8 बजे से लोड शेडिंग कीजिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

.....

भाषण पूर्ण, नंतर पटेल यांचे मराठी भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये याठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

विजेच्या भारनियमनामुळे ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना, गावकऱ्यांना प्रचंड त्रास होत आहे. यानिमित्ताने एक गोष्ट समोर आली आहे की, शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला नाहीतर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत होत्या. परंतु आता माझ्या जिल्हयामध्ये भारनियमनामुळे देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या आहेत, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. माझ्या जिल्हयातील लामजावे या गावामध्ये श्री. रामकाटे नावाच्या शेतकऱ्याने गहू पेरल्यामुळे मुलीचे लग्न करता येत नाही, म्हणून बटाटयाचे पीक लावले, आणि 700 फूट बोअर वेल खोदली, व त्यावर मोटर बसविली आणि बटाटयाला पाणी देण्यास सुरुवात केली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल(पुढे सुरू....

बोअरमध्ये पाणी आहे, शेतामध्ये पीक हिरवेगार आहे, परंतु त्या बोअरमधील पाणी विजेअभावी पिकाला तो देऊ शकत नाही. वीज खंडीत झाल्यानंतर त्या शेतकऱ्याची मोटार जळाली. त्यामुळे त्याला विजेचे 17 हजार रुपये बील आले. ते पैसे भरण्यासाठी त्याने आठ दिवस सतत प्रयत्न केले परंतु त्याला पैसे मिळाले नाहीत. म्हणून त्याच्या मनावर परिणाम झाला. त्यानंतर त्याने सतत माझी मोटार जळाली, माझी मोटार जळाली, असा ध्यास घ्यायला सुरुवात केली. नंतर त्याने विष पिऊन आत्महत्या केली. तहसिलदार आणि पी.एस.आय यांनी त्याचा पंचनामा केला की, त्याचे मानसिक संतुलन बिघडल्यामुळे आत्महत्या केली. मानसिक संतुलन बिघडले, असे म्हणणे सोपे आहे. परंतु त्या मागचा कोण विचार करते आहे, हा खरा प्रश्न आहे.

अहमदपूर तालुक्यामध्ये चोबळी माखळी नावाचे गाव आहे. शेतकऱ्याने तीन एकरामध्ये गहू पेरलेला होता. त्याला विजेचे 5 हजार रुपये बील आले. ते त्याला भरता आले नसल्यामुळे त्याचा गहू वाळला, त्याचा संसार उघड्यावर पडला, मुले-बाळे रोडावत चालली. हे त्याला सहन झाले नाही, म्हणून त्याने शेतामध्ये जाऊन एन्ड्रो सल्फाईड घेऊन आत्महत्या केली. अशाप्रकारची ग्रामीण भागामध्ये अवस्था एका बाजूला चाललेली असताना, दुस-या बाजूला मुंबईमध्ये विजेचे लोडशेडींग नाही. "अ"वर्ग नगरपालिका, महानगरपालिका शहरामध्ये तीन तासच लोडशेडींग केले जाते. आज खेडेगावामध्ये सहा-सहा तास आणि पुढे मेंन्टेनन्सच्या नावाखाली चार तासही वीज पुरविली जात नाही. 24 तासातील एक तासासुध्दा वीज आज गावामध्ये आपण देऊ शकत नाही. यावर कोणाचे नियंत्रण आहे, हे समजत नाही. आता एमएसईबीचे नाव बदललेले आहे. एमएसईचे बोर्डावरील नाव बदललेले आहे परंतु त्यांचे कार्य बदललेले नाही, कामाची पध्दती बदललेली नाही. म्हणजे एमएसईबीला लिप्स्टीक, स्नो पावडर फक्त लावलेली आहे, असा लोकांमध्ये समज झालेला आहे. आज लोडशेडींगमुळे गावातील लोकांना प्रचंड त्रास होत आहे. गावातील लोक म्हणतात की, आम्हाला दिवसा वीज दिली नाही तरी चालेली, परंतु रात्रीच्या वेळेला चोरांपासून संरक्षण करण्यासाठी वीज पुरवठा करावा. रात्रीच्या चोऱ्यांमुळे गावातील लोक हैराण होत आहेत. आज केंद्र सरकरने तरुणांना पेट्रोल पंप देण्याचा धोरण अवलंबून पेट्रोल पंप दिलेले आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये एक पेट्रोल पंप दिलेला आहे, त्याचबरोबर जिल्ह्याच्या ठिकाणीही पेट्रोल पंप दिले दिलेले आहेत. तालुक्याच्या ठिकाणी आज सहा-सहा तास वीज नसते. एका पंपावर 1 हजार लिटर पेट्रोलचा साठा केलेला असतो. एका लिटरमागे 80 पैसे मिळतात. त्या ठिकाणची वीज गेली म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/ MAP/

श्री.सय्यद पाशा पटेल (पुढे सुरु....

पेट्रोल पंपावर डिझेलवर चालणारा जनरेटर लावला तर एका तासाला दीड लिटर डिझेल लागते.म्हणजेच जनरेटर चालविण्यासाठी एका तासाला 60 रुपये एवढा खर्च येतो. एवढा खर्च येत असेल तर तरुणांमध्ये उद्या आत्महत्या करण्याची वेळ येणार आहे. आज आपल्याला वीज देता येत नसेल तर विजेचे भाडे तरी कमी करता येईल काय ? याचा विचार करावा. आज लोकांमध्ये विजेच्याबाबतीत असंतोष निर्माण झालेला आहे, याबाबतीत विचार करण्याची गरज आहे. आज जिल्हापरिषदेमध्ये पथदर्शक दिवे देणे चालू आहे. याबाबतचे तंत्रज्ञान अमेरिकेमधून शिकून घ्यावे लागते. आजचे तंत्रज्ञानाचे युग असताना, ते पथदिवे बनविण्याचे तंत्रज्ञान आपल्याला अमेरिकेमधून शिकून यावे लागते. तंत्र शिक्षणामध्ये हे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी या विषयाचा समावेश केला पाहिजे. आज वीज ही जीवनावश्यक वस्तू झालेली आहे. अशाप्रकारच्या विजेच्या गंभीर प्रश्नावर आंध्रमधील सरकार कोसळले, तशी आज या ठिकाणी वेळ आलेली आहे. हे लोकांचे सरकार आहे. या राज्यामध्ये माणसेच रहातात, या माणसांचा विचार करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात बोलायचे झाले तर आज शेतकरी दिवसरात्र मेहनत घेऊन, विंचू काट्यांचा विचार न करता शेतातील पिकाला पाणी देतो. अशा वेळेस त्याच्या श्रमाला काहीच किंमत नाही, एवढी मेहनत घेऊनही आपल्याला संसार चालविता म्हणून तो चाकू हाता घेऊन चोरी करण्याचा त्याच्या मनामध्ये विचार आला...

यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ....

तरी तुम्ही त्यांच्या मनातील थांबवू शकणार नाही. गावात काहीच मिळत नाही म्हणून गावात राहण्यापेक्षा शहरामध्ये झोपडपट्टीमध्ये किंवा रस्त्यावर राहून एक चाकू हातामध्ये घेतला तर संसार चालू शकतो म्हणून लोकांनी गाव सोडले तर आपण नांगर सोडून हातामध्ये चाकू घेण्याची वेळ आणणार काय असा प्रश्न आमच्या सारख्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये पडलेला आहे. मी महाराष्ट्र शासनाला आणि माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो. आपण या गोष्टीचा विचार करुन बघावे. आधीच्या काळामध्ये विहिरीवर एखादे कनेक्शन घेतले की, ते 25-25 वर्षे चालावयाचे परंतु आता विहिरीचे पाणी आटले. बोअरवेल धोकेबाज असतात. शेतकरी आधी एका वर्षामध्ये शेतीमध्ये जेवढे उत्पन्न आले ते सगळे उत्पन्न बोअरवेलमध्ये घालू लागला. माझ्याकडे एक कनेक्शन असेल आणि त्या बोअरचे पाणी गेले व दुसरीकडे बोअर घेतली तर त्यासाठी दुसरा डिमांड काढावयाचा काय ? ती माझी चूक नाही. आधी एम.एस.ई.बी. तीन पर्यंत पोल द्यावयाचे. समजा माझे एका पोलच्या ठिकाणचे पाणी गेले आणि तीन पोलनंतर दुसरी बोअर घेतली आणि त्या ठिकाणी तीन पोल घ्यावयाचे असतील तर एका पोलला दहा हजार रुपये द्यावे लागतात. ज्या ठिकाणी वीज मोफत दिली तरी शेती नुकसानीत जाते त्या ठिकाणी एका एका पोलला दहा दहा हजार रुपये देण्याची ऐपत शेतकऱ्यांकडे आहे काय ? याचा विचार शासनाने करावा. या सभागृहामध्ये आलेली सर्व नेते मंडळी गावातून आलेली आहेत. जर अपघाताने या ठिकाणी हे प्रतिनिधी निवडून आले नसते तर आत्महत्या करणाऱ्यांमध्ये या ठिकाणी बसलेल्या 50 टक्के आमदारांची नावे वर्तमानपत्रामध्ये आली असती. अपघाताने ही मंडळी निवडून आलेली आहेत. राजकारणामध्ये निवडून आल्यामुळे आपला वर्ग बदलला. वर्ग जरी बदलला तरी आपण ज्या ठिकाणाहून आलो आहोत ते विसरला तर लोक आपल्याला माफ करणार नाहीत. राजकारणामध्ये निवडणुकीमध्ये मते घेणे हा वेगळा प्रकार आहे. परंतु माणसाच्या मनातील आग विझवणे हा वेगळा प्रकार आहे. मी शासनाला विनंती करतो. लोकांच्या मनातील जी आग आहे ती समजून घ्यावी आणि ती आग जर आपण समजून घेतली नाही तर आगडोंब उसळेल आणि तो आगडोंब तुम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये थांबवू शकणार नाही आणि या ठिकाणी अराजकाला निमंत्रण दिल्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. माणसाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ...

गावामध्ये राहण्यासारखी परिस्थिती निर्माण करावी. आज कोणीही गावामध्ये राहू नये असे चित्र तुम्ही तयार करुन लागला तर ते योग्य होणार नाही. तुम्हाला जर वेळ नसेल तर गोष्ट वेगळी. तुमच्याकडे पैसे आहेत की नाहीत हा प्रश्न वेगळा आहे. खुर्चीवर बसण्यासाठी एवढा आटापिटा करुन आपण आला आहात. आला आहात तर हे करा. आपल्याकडून होत नसेल तर सोडून घरी जा. परंतु किमान या महाराष्ट्राचे वाटोळे करु नका एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद कमरुझ जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदया, महाराष्ट्र में बिजली की कमी के बारे में माननीय सदस्य श्री. उल्हास पवार ने जो प्रस्ताव रखा है, उस पर बोलने वाला शायद मैं अंतिम सदस्य हूँ. यह समस्या बहुत गंभीर है. मैंने यहां पर सभी माननीय सदस्यों के भाषण ध्यानपूर्वक सुने. चाहे विपक्ष के सदस्य हों, चाहे सत्तारुढ़ पक्ष के सदस्य हों, सभी ने यह माना है कि बिजली की कमी एक गंभीर समस्या है और इसका असर सभी लोगों के ऊपर हो रहा है. यह समस्या इतनी गंभीर है कि प्रत्येक माननीय सदस्य आधे घंटे तक बोल सकते हैं. लोड शेडिंग का असर किसानों पर सब से अधिक हो रहा है.

सभापति महोदया, विदर्भ में बिजली सरप्लस है, लेकिन हमें लोड शेडिंग का शिकार होना पड़ रहा है. मैं माननीय मंत्री महोदय से कहना चाहता हूँ कि बिजली से संबंधित राज्य सरकार के जो विभाग हैं और केन्द्र सरकार के जो विभाग हैं, उनमें कॉर्डिनेशन नहीं है. नॉन कन्वेंशनल इनर्जी डिपार्टमेंट का दूसरे विभागों के साथ तालमेल नहीं है. बहुत सारे प्रोजक्ट ऐसे है, जिनके बारे में हम बहुत दिनों से सुन रहे है, लेकिन वहां पर अभी तक बिजली का उत्पादन शुरु नहीं हुआ है. मैं आपको उदाहरण के रुप में बताना चाहता हूँ कि मोदा में एन.टी.पी.सी. का 1 हजार मेगावाट का प्रोजक्ट शुरु नहीं हो पाया है. यह बात शोध करने की है. हमारे विदर्भ में जो कोयला मौजूद है, वह दूसरे प्रान्तों को दे रहे हैं. यह हमें सस्ते में मिल सकता है. विदर्भ का कोयला आप कर्नाटक को दे रहे हैं, निजी कम्पनियों को दे रहे है. महाराष्ट्र के लिए उड़ीसा से कोयला लाने की बात की जा रही है. एन.टी.पी.सी. कोल लिंकेज करता है तो मेरा मंत्री महोदय से अनुरोध है कि उनके साथ में चर्चा की जाए. इस बारे में कोर्डिनेशन करके सरकार को अपनी नीति बनाने की आवश्यकता है. बहुत सारे मंत्रालयों का ऊर्जा के साथ संबंध आता है. कहीं पर गैस नहीं है तो कहीं पर हमें नाफ्ता नहीं मिल रहा है. हम हायडल और थर्मल पावर का उत्पादन नहीं बढ़ा पा रहे हैं. मेरा मत है कि राज्य और केन्द्र सरकार को मिलकर, कोर्डिनेशन करके शॉर्ट टर्म उपाय करने चाहिए, ताकि आने वाले समय में हमें कानून और व्यवस्था की स्थिति का सामना न करना पड़े. इसके साथ साथ राज्य और केन्द्र सरकार को लॉंग टर्म प्लान भी बनाने चाहिए, ताकि भविष्य में बिजली की आवश्यकता को पूरा किया जा सके. केन्द्र सरकार में नॉन कन्वेंशनल इनर्जी डिपार्टमेंट नागपुर के माननीय खासदार के पास है, इसलिए इस बारे में वे महत्वपूर्ण भूमिका निभा सकते हैं. हम अपने विभाग में बिजली बचाने की कोशिश कर रहे हैं.

. . . 4N 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हम अपना काम नॉन कन्वेंशनल सोर्स ऑफ इनर्जी से चला सकते हैं. हॉस्पीटल्स के लिए, ऑफिस के लिए अगर हम ऑल्टरनेटिव सोर्स ऑफ इनर्जी का प्रयोग करेंगे तो हम बिजली की बचत कर सकेंगे और यह बिजली हम खेती करने के लिए किसानों को दे सकते हैं. इस प्रकार के हमें शॉर्ट टर्म और लॉंग टर्म प्लान बनाने चाहिए. बहुत सारी बातें अन्य माननीय सदस्यों ने कह दी हैं, इसलिए उन बातों को रिपीट न करते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

.....

. . . 4N 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : तालिका सभापती महोदय, आज याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी वीज निर्मिती आणि भारनियमनाचा प्रस्ताव मांडला असून त्यावर सभागृहातील अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्य हे महाराष्ट्रातील विजेचे प्रश्न आणि वीज निर्मिती यासंबंधी बोलले. मी मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत माझे विचार मांडणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा छोटा असून या जिल्ह्यामध्ये विजेचा वापर हा अंत्यत कमी प्रमाणात होतो. सिंधुदुर्ग जिल्हा सोडून महाराष्ट्रामध्ये अन्यत्र 40 ते 45 टक्के विजेची चोरी होते. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये विजेची चोरी नावाचा प्रकारच नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वीज बिलांची थकबाकी नाही. या जिल्ह्यातील शंभर टक्के लोक वीज बिले भरतात. असे असूनही आमच्या जिल्ह्याची भारनियमनातून सुटका झालेली नाही. आता नव्याने इमर्जन्सी लोड शेडींग आणल्यामुळे आमच्या जिल्ह्यातील जनता अतिशय त्रस्त झालेली आहे. त्यामुळे विजेच्या दिव्यांऐवजी रॉकेलवर चालणारे कंदील किंवा दिवे लावण्याच्या विचारात लोक आहेत. परंतु हे रॉकेलवर चालणारे दिवे लावायचे म्हटले तर बाजारातून रॉकेल गडप होते आणि ते काळ्या बाजारात विकले जाते. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी लागणारी वीज ही गोवा आणि कर्नाटक राज्यातून विकत घेतली जाते. परंतु ही विकत घेतलेली वीज शंभर टक्के वापरली जात नाही. राज्य शासनाला पैसे मात्र पुरेपूर मोजावे लागतात. इतर राज्याकडून विकत घेतलेली वीज शंभर टक्के न वापरल्यामुळे राज्याचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे याकडे मी माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधीत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग येथे होणा-या प्रकल्पासंबंधी काही जणांनी असे सांगितले की हा प्रकल्प होऊ देणार नाही तर काही जणांनी असे सांगितले की,

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

कोणी कितीही आडवे आले तरी प्रकल्प होणारच आणि काही सन्माननीय सदस्य म्हणतात, आम्ही हा प्रकल्प होऊ देणार नाही. खरोखर प्रकल्प येत असेल तर सिंधुदुर्गातील जनता विरोध करणार नाही. सिंधुदुर्ग जिल्हा हा जास्तीत जास्त पाऊस पडणारा जिल्हा आहे. या जिल्हयामध्ये अनेक मोठमोठे प्रकल्प येत आहेत. धरण प्रकल्प होत आहेत. या धरणांवर वीज निर्मिती प्रकल्पांची निर्मिती केली तर सिंधुदुर्ग जिल्हयातील जनता स्वागत करेल. शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. अशा परिस्थितीत कोळशावर आधारित ऊर्जा प्रकल्प आणून जिल्हयाचे पर्यावरण संतुलन बिघडविण्याचा प्रयत्न होणार असेल तर त्याला निश्चितच विरोध झ ाल्याशिवाय राहणार नाही. आज आंबा पिकाच्या निमित्ताने राज्याला परकीय चलन मिळते. परंतु परेदशातून कोळसा आयात करुन ऊर्जा प्रकल्प उभारला गेला तर देशातील परकीय चलन परदेशात जाईल आणि जिल्हयातील पर्यावरणाची मोठया प्रमाणात हानी होईल. आज सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये विजयदूर्ग किल्ला 800 वर्षापासून दिमाखात उभा आहे. त्या ऐतिहासिक किल्ल्याचे महत्व नष्ट होईल. आज जे पर्यटक त्या भागात येतात ते पर्यटक येऊ शकणार नाहीत. त्यामुळे आपोआप किल्ल्याचे महत्व कमी होईल. आज जिल्हयामध्ये भारनियमन राबविले जात आहे. यापूर्वी ग्रामपंचायतींना प्रती एच.पी.वर आधारित वीज दर आकारला जात होता. सध्या युनिटप्रमाणे वीज दर आकारला जात आहे. मुळात काही नळपाणी पुरवठा योजनांचे डिझाईन असे तयार केले आहे की, 15 ते 16 तास पंप चालविल्याशिवाय पाणी साठा होत नाही. भारनियमन चालू केल्यामुळे पाणी साठ्याअभावी ग्रामीण भागातील जनतेला पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे सर्व ग्रामपंचायतींच्या नळपाणी पुरवठा योजना बंद पडल्या आहेत. शासनाने कोट्यावधी रुपये या योजनांवर खर्च केले आहेत. परंतु विजेअभावी त्या योजना बंद पडत आहेत. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे, याकडे मंत्रीमहोदयांनी लक्ष द्यावे व सिंधुदुर्ग जिल्हयाला भारनियमनातून वगळावे आणि सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यावरण बिघडविणारा प्रकल्प आणण्यापासून रोखावे व धरणाच्या पाण्यावर वीज निर्मिती प्रकल्प उभारावेत. सन्माननीय श्री.सुरेश प्रभू केंद्रीय ऊर्जामंत्री असताना काही प्रकल्पांचा सर्व्हे करण्यात आला होता त्याबाबत पाठपुरावा करावा अशी विनंती करुन सन्माननीय ऊर्जामंत्र्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाला न्याय द्यावा एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

------- (नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, नियम 260 अन्वये सन्माननीय आमचे विद्वान मित्र श्री.उल्हास पवार आणि इतर सन्माननीय सदस्यांनी हा जो प्रस्ताव मांडला आहे त्याबद्दल मी सर्वप्रथम त्या सर्वांचे अभिनंदन करतो. प्रत्येक अधिवेशनामध्ये राज्यातील वीज टंचाई, विजेचा तुटवडा आणि त्याचे दुष्परिणाम आमच्या राज्याला कसे भोगावे लागतात याची सातत्याने चर्चा होत असते. विजेचा संबंध प्रगतीशी आहे. मग ती औद्योगिक प्रगती असेल, कृषि विकास असेल, पर्यटनाचे क्षेत्र असेल, फलोद्यान असेल, शिक्षण असेल, मनोरंजन असेल. म्हणजे जीवनाच्या सार्वजनिक किंवा व्यक्तिगत, परिवारिक जीवनाशी संबंधित ज्या काही समस्या आहेत त्यांचा संबंध या विजेशी आहे आणि त्या विजेचा आपल्या राज्यामध्ये जवळपास 3500 ते 4000 मे.वॅ.इतका तुटवडा सातत्याने भासत आहे. आमचे सन्माननीय ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील हे प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. वीज टंचाईची ही परिस्थिती कशी दुरुस्त करता येईल, वीज टंचाई कमी कशी करता येईल याबाबत सातत्याने त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. केंद्र सरकारकडे सुध्दा या संदर्भात त्यांनी दाद मागितली आहे. या वीज टंचाईमुळे ज्या काही व्यथा राज्यातील आमचा शेतकरी असेल, उद्योजक असतील, विद्यार्थी असतील, ग्रामीण भाग असेल, सर्वच क्षेत्रात...

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

विजेच्या टंचाईमुळे भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. विजेच्या टंचाईमुळे राज्यातील जनता हवालदिल झालेली आहे. वीज टंचाईमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे विदारक चित्र सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सभागृहापुढे मांडले आहे. त्यांनी ग्रामीण भागातील शेतक-यांच्या शेतीला वीज मिळत नसल्यामुळे, मेहनत करुन, घाम गाळून पैसा मिळत नसल्यामुळे आता ग्रामीण भागातील शेतक-यांनी नांगर सोडून तलवारी, चाकू हातात घेऊन शहरात जाऊन चो-या मा-या करुन आपल्या उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करावे असे चित्र त्यांनी निर्माण केलेले आहे. शेवटी प्रश्न हा प्रश्न आहे. आपण सरकार आहात, राज्यातील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर, कोणत्याही समस्येचे उत्तर शोधण्याचे काम शासनाने केले पाहिजे, तड लावण्याचे काम शासनाने केले पाहिजे. खरे म्हणजे सर्व प्रश्न सोडविण्याची नैतीक जबाबदारी शासनावर असते, अर्थात विजेच्या संदर्भातील प्रश्नाची माननीय ऊर्जा मंत्री तड लावत नाही, ते जबाबदारी टाळतात असे काही नाही. नवीन सन्माननीय सदस्य श्री. जामा हे कोळसा सम्राट आहेत. WCL मध्ये जे कामगार आहेत त्यांचे ते मोठे नेते आहेत त्याचा आम्हाला अभिमान आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी तर चंद्रपूर जिल्हयाच्या संदर्भात आपली व्यथा या ठिकाणी मांडलेली आहे. "हाथ कंगन को आयने की क्या जरुरत " अशी जी म्हण आहे त्याचे विदारक चित्र त्यांनी या ठिकाणी तयार केलेले आहे. या विदारक चित्राची जाणीव शासनाला नाही असे म्हणता येणार नाही. वीज टंचाईच्या संदर्भात अल्पकालीन व दीर्घकालीन अशा उपाययोजना आहेत. अल्पकालीन योजनेमध्ये आणि दीर्घकालीन योजनेमध्ये औष्णीक आणि जलविद्युत केंद्र येतात. औष्णीक विद्युत केंद्र हे विदर्भातील कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूरमध्ये आहे. विदर्भात ज्या ज्या ठिकाणी औष्णीक विद्युत केंद्र आहेत त्यातील बरेचसे संयत्र बंद पडलेले आहेत. विद्युत संयत्राची देखभाल करणारे आमचे जे इंजिनिअर आहेत, एक्सपर्ट आहेत त्यांनी तातडीने बंद पडलेले हे संयत्र त्वरीत सुरु केले पाहिजे. हे संयत्र दुरुस्त करण्यामध्ये एक्सपर्ट लक्ष देत नसतील तर आमच्या मंत्र्यांनी त्यांचे कान का पिळू नयेत? हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदया, दुसरी गोष्ट अशी की, आमच्या राज्यात वीज गळतीचे प्रमाण फार मोठया प्रमाणात आहे. वीज गळती आणि वीज चोरी यामुळे विजेचा मोठा प्रश्न निर्माण झालेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

आहे. आज छोटया माणसाला पैसे भरुन सुध्दा लवकर वीज मिटर मिळत नाही. अधिका-यांना काही तरी चिरीमिरी दिल्याशिवाय वीज मिट र मिळत नाही. आमदारांना सुध्दा या अनुभवातून जावे लागते तर सर्वसामान्य जनतेवर काय परिस्थिती येत असेल याचा विचारच केलेला बरा. अमरावतीमध्ये 800 कोटी रुपयांच्या वीज चोरीचे प्रकरण उघडकीस आले परंतु या माणसाला साधी अटक सुध्दा झाली नाही त्याला ताबडतोब जामीन मंजूर करण्यात आला. गरीब जनतेला कनेक्शन मिळत नसल्यामुळे त्यांना चोरी करण्यास भाग पाडले जाते. परंतु मोठ मोठे धनदांडगे कोटयावधी रुपयांची वीज चोरी करतात परंतु त्यांची साधी विचारपूस देखील होत नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

हे चित्र माननीय मंत्रिमहोदयांनी बदलले पाहिजे. आम्हाला त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड ही राज्ये वगळता विदर्भातून मिळणाऱ्या कोळशातून विदर्भ औष्णिक विद्युत केंद्रांचा निर्मिती करु शकतो. पण ते ही केले जात नाही. जी थर्मलपॉवर स्टेशन्स आहेत त्याची संनियंत्रणे नीट चालत नाहीत आणि ती वेळेवर दुरुस्त केली जात नाहीत अशी परिस्थिती आहे. आमच्या एमएसईबीची वाढ झाली, पण वीज निर्मितीमध्ये काही वाढ झालेली नाही. एमएसईबीच्या चार कंपन्या करण्यात आल्या आणि एमएसईआरला ऊरावर आणून बसविले. या एमएसईआरमध्ये सर्व रिटायर्ड झालेले अधिकारी लोक आणून बसविले. त्यांचे विचार सुध्दा रिटायर्ड झालेले आहेत. तेव्हा त्याठिक्राणी नव्या दमाचे तंत्रज्ञ असलेले अधिकारी आणून बसविले पाहिजेत तरच नवी दिशा मिळेल आणि निश्चितपणे या समस्येला तोंड देण्याची क्षमता निर्माण होईल.

सभापती महोदया, एन्रॉन प्रकल्प सुरु होणार होता, परंतु नाफ्ता आणि गॅस मिळत नसल्यामुळे तो तसाच रखडून पडला आहे. मध्यंतरी सरकारने खाजगी क्षेत्रातील कंपन्यांना वीज निर्मिती क्षेत्रात उतरण्याची परवानगी दिली होती. काही साखर कारखाने वीज निर्मिती करतात, परंतु ती अल्प प्रमाणात असते. मी याठिक्राणी नम्रपणे सांगू इच्छितो की, जे मोठ मोठे उद्योग असतील, फाईव्हस्टार हॉटेल्स असतील त्यांना सौर उर्जेचा वापर करण्याचे बंधनकारक करावे. फक्त लिफ्टसाठी वीज मिळेल असे सांगण्यात यावे. बाकी अन्य कारणांसाठी वीज उपलब्ध होणार नाही असे स्पष्टपणे सांगण्यात यावे. यामुळे जी विजेची बचत होईल ती शेतकऱ्यांना पुरवावी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुरवावी.

सभापती महोदय, आता तर समुद्राच्या लाटांपासून वीज निर्मिती करण्याचा प्रयोग सुरु आहे. त्यास टायडल एनर्जी संबोधिले जाते. तेव्हा आपल्याकडील तंत्रज्ञांचा, विद्वांनाच्या विचारांचा फायदा घेऊन आपण टायडल एनर्जी निर्माण करु शकतो का ? याचा देखील गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. पवन उर्जेच्या माध्यमातून आपल्याला जास्तीत जास्त वीज कशी निर्माण करता येईल याचा देखील विचार झाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

रावते यांनी आपल्या राज्याचा जीडीपी कमी होत तर नाही ना, अशी भीती व्यक्त केली. कारण आपल्या राज्यात वीज टंचाई असल्यामुळे राज्यात येणारे मोठमोठे उद्योग बाजुच्या राज्यात म्हणजे गुजरात राज्यात जात आहेत. त्याठिकाणी वीज टंचाई नाही. गुजरात राज्यात चोवीस तास वीज पुरवठा आहे असे तेथील मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी सांगितले. त्या राज्यात बाकीच्या कामात सर्व अंधार असला तरी विजेच्या बाबतीत मोठा प्रकाश आहे. त्याठिकाणी खरोखर वीज टंचाई आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्यांनी जे वक्तव्य केले ते मी सांगितले, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. गुजराज राज्यात कोणत्याही प्रकारची वीज टंचाई नाही तर आपले राज्य त्याप्रमाणे का कायर्वाही करीत नाही. राज्यात वीज टंचाई असल्यामुळे आपल्याकडे येणारे मोठमोठे उद्योग छत्तीसगड, गुजरात व इतरही राज्यात जात आहेत.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आज आमच्या राज्याचे आर्थिक नुकसान होत आहे. याठिकाणी उद्योग नसल्यामुळे बेरोजगारी दिवसेंदिवस वाढत आहे. आज हाताला काम नसल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे, आमच्या राज्यामध्ये विजेची टंचाई मोठयाप्रमाणात आहे. आमचे ऊर्जामंत्री हे सक्षम, कार्यक्षम आणि विद्ववत्तेचा वारसा लाभलेले आहेत. त्यांच्यावर माझा पूर्ण विश्वास असून या चार कंपन्यांमध्ये जे मोठमोठे अधिकारी भत्ते आणि तनखा घेऊन बसलेले आहेत, त्यांना 10-10 लाख रुपये आपण देत असाल परंतु त्यांच्याकडून आपण 50-50 लाख रुपयांचे उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने काम करुन घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे खाजगी क्षेत्रामध्ये काम करुन घेतले जाते त्याप्रमाणे सरकारने यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे. केवळ त्यांना भत्ते आणि पगारी देऊन चालणार नाही तर त्यांच्याकडून आपण विजेची टंचाई दूर करुन घेतली पाहिजे. ज्या गोष्टी प्रामाणिकपणे करण्याची जबाबदारी आहे त्याबाबतीत आपण त्यांच्यावर अकांऊंटीबिलिटी देऊन विजेचा पुरावा निर्माण केला पाहिजे. आज राज्यामध्ये फार मोठयाप्रमाणात वीज टंचाई निर्माण झालेली आहे. सन 2010 पर्यंत आपण याबाबतीत स्वंपूर्ण होणार आहोत, परंतु भाकरीचे चित्र दाखवून पोट भरत नाही. जोपर्यंत भाकर पोटात जात नाही तोपर्यंत पोट भरत नसते. आपण जरी सन 2010 पर्यंत स्वयंपूर्ण होणार असला तरी त्याअगोदर आपण याबाबतीत स्वयंपूर्ण का होऊ शकत नाही, जे आपण उद्या करणार आहात, ते आपण आज आणि आत्ता का करीत नाही ? आपण सन 2010 ची वाट कशासाठी पाहणार आहोत ? आपण हे आत्ताच करणार अशाप्रकारची भावना ठेऊन जर काम केले व आपला संपूर्ण विभाग कामाला लागला तर, आपले सर्व अधिकारी कामाला लागले तर या विजेच्या निर्माण झालेल्या टंचाईवर आपल्याला निश्चितपणे मात करता येऊ शकेल, असा माझा विश्वास आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जो याठिकाणी म.पि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला आणला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, वीज आणि पाणी या दोन गोष्टी प्रगतीशील महाराष्ट्रासाठी अत्यंत आवश्यक आहेत. गेल्या 7 वर्षात या महाराष्ट्राची जनता कुठे तरी प्रकाश येईल याची वाट पाहत होती. परंतु "उष:काल होता होता, काळरात्र झाली, अरे पुन्हा आता प्रकाशाच्या पेटवा मशाली" अशाप्रकारची स्थिती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली आहे, शहरी भागातील छोटया-छोटया इमारतीमध्ये राहणाऱ्या बेरोगजगार तरुणांच्या मनात निर्माण झालेली आहे. गेल्या 7 वर्षामध्ये एकही मेगावॅट वीज या महाराष्ट्रामध्ये आलेली नाही. एका बाजूला आपण प्रगतीशील महाराष्ट्र म्हणतो व दुसऱ्या बाजूला विजेची भयानक टंचाई आहे, हे योग्य नाही. आपला महाराष्ट्र क्रमांक एकवर असला पाहिजे, अशी इच्छा महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाची आहे. याठिकाणी प्रा.कवाडे सरांनी जी माहिती दिली ती सत्य आहे. शेजारच्या गुजरात राज्याचे त्यांनी अभिनंदन केले, त्याठिकाणी अखंडित विजपुरवठा होतो. परंतु आपल्याकडे एका बाजूला शेतीसाठी पाणी नाही आणि दुसऱ्या बाजूला शहरी भागामध्ये माणसाला अंघोळीसाठीही पाणी मिळत नाही. लोडशेडींग कधी सुरु होते आणि कधी संपते याचीही त्यांना माहिती नसते. लोडशेडींगच्या बाबतीत स्पेसिफिक अशी वेळ असली पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी लोडशेडींगच्या स्पेसिफीक वेळा सांगाव्यात. लोक आता फारच सहनशील झालेले आहेत. परंतु त्यांच्या सहनशीलतेचा उद्रेक होऊ शकतो.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

निरनिराळया संघटनांनी मोर्चे काढले, धरणे धरले, घेराव घातले. जीवनावश्यक विजेच्या प्रश्नावर शेवटी अधिका-यांना आणि पालकमंत्र्यांना कंदील देण्यात आले. वीज नाही तर कंदील घ्या, असे सांगितले. महाराष्ट्रामध्ये विजेचा प्रश्न आहे तो अधिकाधिक बिकट होत गेलेला बघत आहोत. लोडशेडिंगसंबंधी मला संगमेश्वर येथून मोबाईलवर एक मेसेज आला. 43 टक्के लोडशेडिंगमध्ये वाढ केली गेली आहे. वीज अधिका-यांना विचारल्याशिवाय एवढी तंतोतंत आकडेवारी ते सांगू शकणार नाही. एका बाजूला लोडशेडिंग कमी होईल अशा प्रकारे जनता वाट बघत असतांना दुसरीकडे मात्र त्यामध्ये वाढ होत आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा सर्व ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. लोडशेडिंगची स्पेसिफिक वेळ असली पाहिजे, ही वेळ कमी कशी करता येईल यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजे. ठाणे जिल्हा हा उद्योगाचा जिल्हा आहे. आशियातील सर्वात मोठा उद्योगाचा भाग आहे. मध्यंतरी महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी उद्योजकांनी मोर्चे काढले, लघुउद्योजकांनी आंदोलन केले. माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, रेव्हेन्यूमध्ये भर घालणारे हे उद्योग आता महाराष्ट्राबाहेर गेलेले नाहीत. लोडशेडिंग सहन करुन उद्योग करता येईल, महाराष्ट्राकरिता करता येईल, अशी त्यांची मानसिकता आहे. परंतु, हेच उद्योजक मोर्चा घेऊन गेल्यानंतर त्यांना भेटण्यासाठी तुमचा एकही वरिष्ठ अधिकारी पुढे आला नाही, मोर्चाला सामोरा गेला नाही. त्यांना हे माहित आहे की, हा प्रश्न अधिकारी सोडवू शकणार नाहीत. परंतु, एमएसईबीच्या कार्यालयासमोर 2/4 तास पथारी पसरुन बसलेल्या या उद्योजकांना वरिष्ठ अधिकारी भेटणार नसतील तर ही अत्यंत लाजीरवाणी व दुर्देवी बाब आहे. एका बजूला 10 हजाराची बिले येत होती ती आता 18 ते 20 हजार रुपये येत आहेत. बाहेरचा उद्योजक महाराष्ट्रामध्ये येण्यास तयार नाही तर महाराष्ट्रातील उद्योजक दुस-या राज्यांमध्ये जात आहे, असे प्रगतीशील महाराष्ट्राचे दुर्देवी चित्र आहे. ग्रामीण भागामध्ये डी+, डी असे झोन तयार करण्यात आले परंतु त्या ठिकाणी मुलभूत सुविधा, इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही. विजेच्या अभावी ग्रामीण भागातील उद्योजक 5/6 तास देखील उद्योग सुरु ठेवू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे एका बाजूला वीज नाही, उत्पादन नाही, अशा पध्दतीच्या संमीश्र गोंधळामध्ये सामान्य माणुस, शेतकरी आहे. सिंगल फेज योजना सरकारने ग्रामीण भागामध्ये सुरु केली. ही योजना कागदावर

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

राहिली काय ? अशा प्रतिक्रिया येत आहेत. त्यामुळे शहरी भाग असो, ग्रामीण भाग असो सगळीकडे एकच स्थिती आहे. ठाणे जिल्हयामध्ये इमानेइतबारे बिले भरणारे लोक आहेत परंतु चोरी करणारे लोकही आहेत, थकबाकी ठेवणारे लोक आहेत. मंत्री महोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये मोठमोठया उद्योजकांकडे करोडो रुपयांची थकबाकी आहे त्यांची यादी महाराष्ट्रातील जनतेसमोर आणली पाहिजे. भिवंडीमध्ये जेवढी वीज जाते त्याच्या 40 टक्केही पैसे वसूली होत नाही, अशा प्रकारची माहिती अधिका-यांशी बोलतांना मिळाली. मुंब्रा या शहरात देखील अशीच परिस्थिती आहे. विज बिलाची वसूली करण्यासाठी अधिकारी जातात त्यावेळी मॉबने हल्ला होतो. पोलीस इन्स्पेक्टर जखमी झालेले आहेत. ग्रामीण भागामध्ये मुंब्रा, दिवा, दातवली, साफे ही गावे आहेत त्या ठिकाणी आकडे टाकून वीज घेंतली जाते.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

काही वेळेला वीज बील भरले जात नाही. 200 ते 500 रुपये वीज बील भरले नाही म्हणून विजेचे कनेक्शन कट केले जाते. वीज बील भरल्यानंतर पैसे घेऊन कनेक्शन जोडले जाते. दुस-या बाजूला मोठया प्रमाणात शहरामध्ये विजेची थकबाकी आहे, विजेची गळती आहे, विजेची चोरी आहे. विजेची चोरी कोठे झालेली आहे, कोणत्या ठिकाणी विजेची थकबाकी आहे याबाबतची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे, अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. लोकांच्या जखमेवर मिठ चोळले जात आहे. विजेच्या बिलाची आकारणी वाटेल तशी केली जाते. युनिटची संख्या मोठया प्रमाणावर असते. मागच्या आठवडयामध्ये मी एका वीज केंद्राला भेट दिली त्यावेळी झोपडपट्टीतील 20-25 लोक माझ्या बरोबर होते. झोपडपट्टीतील एका माणसाच्या घरामध्ये फक्त एक फॅन आणि एक लाईट होता. त्याला विजेचे बील जास्त आलेले होते. विजेची बीले निरनिराळया एजन्सींमार्फत दिली जातात. विजेचे बील मिळविण्यासाठी सर्वसामान्य माणसाला 4-5 फे-या माराव्या लागतात. एका बाजूला लोडशेडींग, दुस-या बाजूला चुकीचे वीज बील आणि तिस-या बाजूला विजेचे बील मिळविण्यासाठी सर्वसामान्य माणसाला माराव्या लागणा-या फे-या. यामध्ये वीज निर्मिती तर बाजुलाच राहिली यामध्ये ऊर्जा विभाग दुरुस्ती करणार आहे की नाही ? असा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर आणि सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितले की, देवगडचा हापूस आंबा देशामध्येच नव्हे तर विदेशामध्ये प्रसिद्ध आहे. तेथील आंबा उत्पादक शेतक-याला जीवन जगण्यासाठी दुसरे कोणतेही साधन नाही. देवगडमध्ये वीज निर्मितीचा प्रकल्प सुरु करण्यासाठी तेथील जनतेचा विरोध आहे. तेथे प्रकल्प झाला तर तेथील शेतकरी उपाशी राहील, तेथील आंबा नष्ट होईल. म्हणून अशा प्रकारचा प्रकल्प होता कामा नये. देवगडमध्ये प्रकल्प झाला तर आंब्यापासून जे उत्पादन मिळते ते मिळणार नाही हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. ठाणे शहरामध्ये विजेचे जुने ट्रान्स्फार्मर आहेत, जुन्या केबल्स् आहेत. ठाणे शहरामध्ये मोठया प्रमाणावर लोडशेडींग केले जाते. वीज निर्मिती करण्याची शासनाने निश्चित धोरण आखण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी अत्यंत जिव्हाळयाचा विषय सभागृहामध्ये उपस्थित केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. प्रगतिशील महाराष्ट्राला ख-या अर्थाने प्रगतिशील म्हणावयाचे असेल तर यामध्ये आमुलाग्र सुधारणा कराव्यात, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सदाशिवराव पोळ (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, विजेच्या लोडशेडींगमुळे ग्रामीण भागातील शेतकरी अत्यंत अडचणीत आलेला आहे. 12 तासाचे लोडशेडींग असतांना देखील उर्वरित 12 तासामध्ये शेतीसाठी वीज मिळत नाही. नवीन ट्रान्सफार्मरवर कमी दाबाने वीज देणारे मिटर बसविण्यात आलेले आहेत. शेतातील मिटर सुरु करण्यासाठी शेतकरी शेतामध्ये जातो त्यावेळी ट्रान्सफार्मरवरील मिटर बंद झालेले असते. त्यामुळे शेतकरी पिकाला पाणी देऊ शकत नाही अशी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करतो की, 12 तासाऐवजी 14 तास लोडशेडींग केले तरी चालेल. परंतु उर्वरित तासांमध्ये रेग्युलर वीज मिळाली पाहिजे. ट्रान्सफार्मर वरील मिटर सुरु झाल्यानंतर शेतक-यांना त्यांच्या शेतातील मिटर सुरु करण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे आलेले पीक हातातून निघून जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिवराव पोळ ....

म्हणून या ठिकाणी जी नवीन मीटर्स बसविली आहेत ती बदलून दुसरी मीटर्स देऊन तेथे कंटिन्यू वीज कशी देता येईल या दृष्टीने आपण कारवाई करावी. गावामध्ये पिण्याचे पाणी पुरेसे मिळत नाही म्हणून टाकीमध्ये ते साठवून ठेवावे लागते. पण वीज नसल्याने पाणी देखील टाकीमध्ये येऊ शकत नाही. केव्हा तरी टाकीमध्ये पाणी येते आणि ते साठवून ठेवणे लोकांना आवश्यक वाटू लागले आहे. पण अशा प्रकारे टाकीमध्ये साठविलेल्या पाण्यामध्ये चिकुन्या सारख्या रोगांच्या जंतू-डासांची पैदास होऊ शकते आणि मग त्यातून एक प्रकारे गंभीर आजारांना आमंत्रण दिले जाते. तसेच वीज नसल्याने पिठाच्या गिरण्या देखील बंद ठेवाव्या लागतात. अशा तऱ्हेने अनेक प्रकारे शेतकरी, ग्रामीण भागातील सामान्य माणूस अडचणीमध्ये येत असतो. सभापती महोदया, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी 7-7, 8-8 वर्षे अर्ज करूनही लोकांना विजेचे कनेक्शन मिळत नाही, पैसे भरूनही कनेक्शन मिळत नाही अशी अवस्था आहे. तेव्हा या बाबतीत माझी अशी सूचना आहे की, ज्यांना गेल्या तीन वर्षांमध्ये पैसे भरूनही वीज कनेक्शन देण्याचे राहिले आहे, काहींच्या बाबतीत तर 8 वर्षे झाली तरी वीज कनेक्शन मिळालेले नाही., अशा सर्वांच्या बाबतीत एक निश्चित तारीख ठरवून त्या तारखेला त्यांना वीज कनेक्शन देण्याची व्यवस्था आपण करावी. सभापती महोदया, विजेचे ट्रान्सफॉर्मर्स दुरूस्त केले जातात आणि ते डीपी वर बसविले तर 2-3 दिवसातच पुन्हा जळतात. अशा प्रकारे ट्रान्सफॉर्मर बिघडला वा जळून गेला तर महिना 15 दिवस तो दुरूस्त करून मिळत नाही वा त्यात काही अर्थकारण केल्याशिवाय मिळत नाही. अशा वेळेस शेतकरी आपले पीक हातचे जाऊ नये म्हणून हरएक तऱ्हेने प्रयत्न करून ट्रान्सफॉर्मर लवकरात लवकर दुरूस्त करून मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. आता या बाबतीत सांगितले जाते की, मीटर जळाले तरी त्याची विमा हमी आहे त्यामुळे कंपनीकडून ते दुरूस्त करून घेता येते. परंतु असे असले तरी जितके दिवस मीटर बंद तेवढे दिवस शेतकरी अडचणी मध्ये येतो. त्यासाठी मग त्याला वेगळी वर्गणी काढावी लागते. अशा अनेक अडचणी यामध्ये येतात.

सभापती महोदया, या ठिकाणी वीज निर्मितीच्या संदर्भात पवनचक्क्यांचा विषय काढला गेला. या संबंधात चुकीचा मेसेज जाऊ नये म्हणून मी सांगतो की, गेल्या वर्षी आणि गेल्या दोन वर्षामध्ये सह्याद्रीमध्ये मोठ्या प्रमाणात पवनचक्क्या आला असल्या तरी पावसाचे प्रमाण अजिबात कमी झालेले नाही. किंबहुना आपण पाहिले आहे की, गेल्या दोन वर्षांमध्ये राज्यात अतिवृष्टी झाली

..... 4यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पोळ .....

आहे, नद्यांना महापूर आले आहेत आणि त्यातून नुकसान झाले आहे. तेव्हा पवनचक्की उभारली म्हणून पाऊस येत नाही असा जो काही समज पसरला आहे वा मुद्दाम पसरविला गेला आहे तो चुकीचा आहे हे यावरून सिद्ध होते. म्हणूनच नव्याने वीज निर्मितीसाठी पवनचक्की सारख जो विषय आपण घेतलेला आहे तो थांबवून चालणार नाही. तेव्हा अशा प्रकारे वीज निर्मिती करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त वीज उपलब्ध करून देणे आज अत्यावश्यक आहे तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना, लोकांना वीज उपलब्ध करून देताना, आपण लोड शेडींग जरूर करा, पण जे तास वीज पुरवठ्यासाठी ठरवून दिलेले आहे त्या काळामध्ये वीज पुरवठा सातत्याने सुरू राहील, मध्येच वीज पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी आपण अगत्याने घ्यावी एवढी विनंती करून मी माझ ो भाषण संपवितो.

***

..... 4यू 3 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदया, या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी आपण मला दोन मिनिटांचा वेळ दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. विजेसारख्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा सुरू आहे आणि या प्रस्तावावर आतापर्यंत बरीच चर्चा झाली आहे. त्यामुळे यावर जास्त न बोलता एक दोन महत्त्वाच्या विषयांकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले की, वीज पंपाला वीज न मिळाल्याने एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. तेव्हा या प्रश्नाचे गांभीर्य आपण लक्षात घ्यावे. या प्रश्नावर आपण गंभीरतेने उपाय योजना केली नाही तर महाराष्ट्रातील शेतकरी, उद्योजक, कामगार आणि विद्यार्थी यांचे आयुष्य उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपण येथे या प्रश्नावर दोन तास चर्चा केली. पण यापूर्वीही दोन तीन वेळा या प्रश्नावरील चर्चेच्या वेळी माननीय मंत्र्यांच्या लक्षात आणून दिलेले आहे .....

(यानंतर श्री. सरफरे .... 4व्ही 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

कोकणामध्ये तीन ते साडे तीन हजार धनगर वाडया, वस्त्या आहेत त्या ठिकाणी या देशाला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाल्यानंतर सुध्दा आधुनिक, पुरोगामी महाराष्ट्राचे सरकार वीजेचे कनेक्शन देऊ शकले नाही. त्यामुळे घरामध्ये वीज नाहीतर शेतामध्ये कोठून येणार? आणि या लोकांच्या जीवनातील अंधार कधी संपणार? यासंबंधी मागील अधिवेशनामध्ये प्रश्न विचारण्यात आला होता, त्यावेळी डोंगरी विकास योजनेमधून हा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन देण्यात आले होते. ही डोंगरी विकास योजना आपण केव्हा राबविणार आहात? जवळ जवळ तीन पिढया उध्वस्त झाल्या आहेत आणि पुढील पिढी सुध्दा उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, आपण याबाबत ठोस धोरण आखावे आणि महाराष्ट्रातील भटक्या व विमुक्त समाजाला न्याय द्यावा. त्यांच्या आयुष्यामध्ये थोडा तरी प्रकाश आणण्याचा प्रयत्न करावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, या सभागृहामध्ये पवन ऊर्जेबाबत बरीच चर्चा झाली. महाराष्ट्रामध्ये पवन ऊर्जेचा एक चांगला प्रकल्प राबविला जात आहे. यामधील जे दुःख व शल्य आमच्या उराशी आहे, ते मी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे. पवन ऊर्जेचे युनिट जास्तीत जास्त दुष्काळी भागामध्ये बसविले जात आहेत. त्यामध्ये कवठेमहांकाळ, जत, सांगोला, आटपाडी, तासगावचा पूर्व भाग, सातारा जिल्हयातील दुष्काळी भागामध्ये पवन चक्क्या यायला लागल्या आहेत. या पवन चक्क्या कुणाच्या आहेत? हा संशोधनाचा विषय आहे. त्याच्या खोलामध्ये न जाता जी धनदांडगी मंडळी आहेत त्यामध्ये या मंत्रिमंडळातील अर्ध्या अधिक मंत्र्यांच्या पवन चक्क्या असल्याचे आम्ही ऐकत आहोत. ही मंडळी आमच्या माळरानावर येऊन पवन चक्क्या उभ्या करीत आहेत. आमच्या पाचवीला पुजलेल्या दुष्काळामुळे व कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. ही धनदांडगी मंडळी आमच्या माळरानावरील शेतकऱ्याची जमीन घेण्यासाठी येतात. त्यामध्ये प्रामुख्याने सुजलॉन ही कंपनी अग्रेसर असून या कंपनीचे लोक शेतकऱ्यांकडील जमीन घेतात आणि किती पैसे देऊ असे त्याला विचारतात. तो गरीब बिच्चारा कर्जाने पिचलेला शेतकरी म्हणतो काय देशील ते दे. अशाप्रकारे ही धनदांडगी मंडळी त्याठिकाणी पवन चक्की उभी करतात. या पवन चक्कीच्या एका पंख्याच्या उभारणीसाठी येणारा खर्च पाहिला तर आणि त्यामधून त्या कंपनीला होणारा नफा पाहिला तर त्यातील थोडे तरी माप शेतकऱ्याच्या पदरामध्ये पडावे अशी त्यांची मागणी असते. काही ठिकाणी 10 हजार, 15 हजार, 25 हजार तर काही ठिकाणी 40 हजार रुपये इतक्या अल्प दराने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

शेतकऱ्यांची जमीन घेऊन त्यांची फसवणूक करण्याचा उद्योग दुष्काळी भागामध्ये सुरु आहे. यानिमित्ताने मंत्रिमहोदयांकडे मागणी अशी करतो की, ज्यांना कुणाला त्या माळरानावर पवन चक्क्या उभ्या करावयाच्या असतील त्यांच्यावर कमीत कमी दोन लाख रुपये त्या पडीक जमिनीचे शेतकऱ्याला देण्याची सक्ती करावी. आणि जर एखाद्या शेतकऱ्याची शेत जमीन असेल तर त्याला कमीत कमी 4 लाख रुपये भाव देण्याची सक्ती त्या उद्योजकांवर करावी अशी दुष्काळी भागातील शेतकऱ्याच्या वतीने मागणी करीत आहे.

सभापती महोदया, आमच्या माळरानावर हे धनदांडगे विजेचे उत्पादन करणार आणि ती शहराला पुरविणार. त्या विजेवर आमचा हक्क आहे असे आपण त्यांना सांगणार आहात की नाही? म्हणून माझी अशी मागणी आहे की, त्याठिकाणी जे विजेचे उत्पादन होईल त्यावर पहिला हक्क दुष्काळी भागातील जनतेचा असला पाहिजे. त्यामुळे त्या भागातील विजेचे भारनियमन कमी होईल आणि त्या शेतकऱ्याला थोडा तरी दिलासा मिळेल. आणि जेणेकरुन त्या भागातील शेतीचा विकास देखील होईल. सभापती महोदया, आमच्या दुष्काळी भागामध्ये जवळपास दीड हजाराच्या आसपास पवन चक्क्या उभ्या राहिल्या आहेत. दुष्काळी भागातील पवन चक्क्या उभारण्यासाठी खड्डे खणणारे कॉंट्रॅक्टर गुजरातमधून आणण्यात आले आहेत. याचे कारण सुजलॉन या कंपनीचा मालक हा गुजराती आहे. म्हणून त्याने गुजरातमधून कॉंट्रॅक्टर आणले आहेत. कवठेमहाकाळ येथील कॉंट्रॅक्टरनी ते काम मिळविण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांनी त्याला शांत राहण्याचे आवाहन केले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरू.....

म्हणून माझी मागणी आहे की, त्या ठिकाणचे लहानलहान कॉन्टॅक्ट स्थानिक लोकांना दिले तर लोकांना रोजगार मिळेल, तशा प्रकारे त्यांना सक्ती करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक पवन चक्कीमागे कमीतकमी दोन तरुणांना नोकरी देण्याचे बंधन त्यांच्यावर घातले पाहिजे. जेणेकरून तरुणांना पाच ते सहा हजार रुपये पगार मिळू शकेल आणि त्यामध्ये त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालू शकेल. सभापती महोदया आपण मला दोन मिनिटे बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम कृतज्ञता व्यक्त करतो. या ठिकाणी विजेच्या संबंधिचा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेच्यादृष्टीने हा जिव्हाळ्याचा विषय आहे. यापूर्वी या विषयाच्या संबंधात ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. विजेच्या टंचाईमुळे होणारा दुष्परिणाम, त्यामध्ये भरडला जाणारा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, उद्योजक या सर्वांच्याच व्यथा या ठिकाणी मांडल्या गेलेल्या आहेत. त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु विजेच्या टंचाईचा दुष्परिणाम शिक्षण क्षेत्रालाही होत आहे. शाळांमध्ये कशाप्रकारचा अडचणी आलेल्या आहेत, याचा उल्लेख करणे मला गरजेचे वाटते. म्हणून मी दोन मिनिटे वेळ घेणार आहे. सभापती महोदया, मुंबई, पुणे, ठाणे या शहरी भागातील वातावरण कोंदट असल्यामुळे शाळांमध्ये सतत पंखा चालू ठेवावा लागतो. आज विजेअभावी पंखे चालत नसल्यामुळे चांगल्याप्रकारे मुले अध्ययन करू शकत नाहीत आणि शिक्षकही चांगल्या पध्दतीने अध्यापन करू शकत नाहीत. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणम होत आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, आमदार, खासदार या लोकप्रतिनिधींच्या निधीमधून आणि शासनाच्या योजनांमधून शाळांना संगणक पुरविलेले आहेत. आज विजेची टंचाई असल्यामुळे संगणक चालविले जात नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संगणक प्रशिक्षणाचा बोजवारा उडालेला आहे, याचाही विचार करणे आवश्यक आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून या विद्युत मशिनरीच्या सहाय्याने प्रॅक्टीकलचे ज्ञान दिले जाते परंतु आज त्या ठिकाणी वीज पुरवठा होत नसल्यामुळे मशिनरी चालविली जात नाही, त्यामुळे उमेदवारांना प्रॅक्टीकलच्या ज्ञानापासून वंचित रहावे लागत आहे.

आमच्या ठाणे जिल्ह्यामध्ये ससुरवाडी येथे आश्रमशाळा चालविली जाते. या निवासी आश्रमशाळेमध्ये 329 विद्यार्थी शिकत आहेत. त्या ठिकाणी तीन महिन्यापासून विद्युतपुरवठा नाही. याबाबत तक्रार केल्यानंतर अधिकाऱ्यांकडून असे सांगण्यात आले की, त्यांनी विजेचे अगोदरचे बील भरलेले नाही. त्याचबरोबर शहापूर तालुक्यातील दुर्गम भागामध्ये मुला-मुलींचे वसतीगृह आहे. त्या ठिकाणी तीन महिन्यापासून विद्युतपुरवठा केलेला नव्हता. याबाबत डीपीडीसीच्या बैठकीमध्ये मी प्रश्न उपस्थित केला असता पालक मंत्री महोदयांनी त्याची दखल घेऊन एमएसईबीच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले. दुसऱ्या दिवसापासून त्या ठिकाणचा वीजपुरवठा सुरू झाला. सभापती महोदया, मुरबाड या ठिकाणी माळ नावाची निवासी आश्रमशाळा आहे. त्या ठिकाणी 350 विद्यार्थी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु...

शिकत आहेत. त्यामध्ये 125 विद्यार्थिनी आहेत आणि बाकीचे विद्यार्थी आहेत. त्या आश्रमशाळेमध्ये 20 हजार लिटर पाण्याची टाकी उभी आहे, त्या टाकीला मोटार पंप जोडलेला आहे. परंतु विद्युतपुरवठा नसत्यामुळे त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि आंघोळीचीही सोय नाही...

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

मी स्वत: त्या दुर्गम, डोंगराळ, आदिवासी भागातील माळ येथील आश्रमशाळेला दोन वेळा भेट देऊन आलेलो आहे. मी त्या ठिकाणी संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांना घेऊन गेलो. त्या आश्रमशाळेतील विद्यार्थी प्रातर्विधीसाठी बाहेर जातात. त्या ठिकाणी एक छोटा नाला आहे त्या ठिकाणी ते विद्यार्थी आंघोळ आणि इतर कार्यक्रम करतात. अशा प्रकारची दुर्दैवी परिस्थिती त्या ठिकाणी आहे. त्याचे नक्की कारण काय ? त्या ठिकाणी असलेली विहीर पाण्याचे भरलेली आहे. त्या ठिकाणी मोठी विहीर आहे. त्या ठिकाणी पंप आहे. त्या ठिकाणी 20 हजार लीटरची पाण्याची टाकी आहे. परंतु त्या ठिकाणी वीज पुरवठा नाही. अशा प्रकारच्या अडचणी आज आमच्या शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा निर्माण झालेल्या आहेत. भिवंडीमध्ये एका शाळेचा विद्युत पुरवठा खंडित झाला. त्या शाळेमध्ये 3500 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या ठिकाणी ट्रान्सफार्मर जळाला असे कारण सांगण्यात आले. त्या ठिकाणी दुसरा नवीन ट्रान्सफार्मर बसवला परंतु ज्यांनी पैसे दिले त्यांनाच कनेक्शन दिले. कोणाकडून 4 हजार रुपये घेतले तर कोणाकडून 2 हजार रुपये घेतले. या शाळेने पैसे भरले नाहीत म्हणून त्यांचा वीज पुरवठा सुरु केला नाही. मी संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो. संबंधित अधिकारी संवेदनशील होते. मी त्यांना अडचण सांगितली. त्यांनी पंधरा मिनिटांच्या आत त्या शाळेचे कनेक्शन चालू करुन दिले. अशा प्रकारच्या अडचणी अनेक ठिकाणी येतात. प्रत्येक ठिकाणी कार्यकर्ते पोहोचणार काय ? ते सर्व ठिकाणी जाऊन विनंती करणार काय ? ही जी अडचण आहे ती दूर होण्याच्या संदर्भात प्रयत्न व्हावयास पाहिजे. आमचे आदरणीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील साहेब हे अत्यंत कार्यक्षम आहेत. आमच्या शिक्षण क्षेत्राकडे ते लक्ष देतील आणि शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या ज्या समस्या आहेत किंवा वीज टंचाईमुळे ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्यासंबंधी ते आपल्या भाषणामध्ये निश्चित स्वरुपामध्ये उल्लेख करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदया, पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देतो आणि मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदया, आज या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी नियम 260 अन्वये वीज आणि विजेच्या संदर्भातील परिस्थितीच्या संदर्भात जी चर्चा उपस्थित केली त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, यशवंतराव गडाख, अरविंद सावंत, कर्नल सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, रमेश निकोसे, पाशा पटेल, जैनुद्दीन जव्हेरी, सय्यद कमरुझ जामा, परशुराम उपरकर, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री संजय केळकर, सदाशिवराव पोळ, प्रकाश शेंडगे, रामनाथ मोते इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल मी सगळ्यांचे मनापासून आभार मानतो. या चर्चेच्या दरम्यान त्यांनी ज्या उपयुक्त सूचना केल्या त्यांचा ज्या ज्या ठिकाणी शक्य होईल त्या त्या ठिकाणी उपयोग करुन घेण्याचा माझा प्रयत्न राहील हे मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदया, भारनियमन हा शब्द गेल्या काही वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये महत्वाचा शब्द बनलेला आहे. त्याचे जे मूळ कारण आहे त्यामध्ये या राज्यातील स्थापित क्षमता आणि या राज्यातील गेल्या काही वर्षातील वाढलेली विजेची मागणी, नवीन न झालेली विजेची निर्मिती आणि त्यामुळे विजेच्या उपलब्धतेमध्ये निर्माण होत असलेली तूट यामुळे साधारपणपणे चार ते साडेचार हजार मेगावॅटपर्यंत आपल्याला काही वेळा भार नियमन करावे लागते. 1990-91 पर्यंत या राज्याची जी परिस्थिती होती त्यामध्ये या राज्याची गरज भागवून बाजूच्या दोन तीन राज्यांना आम्ही वीज देत होतो. या राज्याच्या उद्योगांना वीज देत होतो तसेच या राज्यातील शेतीला, या राज्यातील घरगुती ग्राहकांना वीज देत होतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी एन्रॉनचा उल्लेख केला. परंतु चाहूल त्याच वेळेला लागली होती की, राज्यामध्ये वीज टंचाई जाणवेल. वीज निर्मिती करावयाची म्हटली तर एकदा काम सुरु केल्यावर साधारणत: चार वर्षाचा कालावधी लागतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

आणि त्यासाठी तेवढी तरतूदही करावी लागते. सुरुवातीच्या काळामध्ये केन्द्रीय ऊर्जामंत्री श्री.एन.के.पी.साळवे हे असताना महाराष्ट्रामध्ये त्यावेळी श्री. शरदचंद्रजी पवार हे मुख्यमंत्री होते. जागतिक बँकेच्या माध्यमातून चर्चा होऊन महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये आलेला हा पहिलाच प्रकल्प होता. हा प्रकल्प नंतर राजकारणात अडकला आणि त्यानंतर त्याचे जे काही व्हायचे होते ते झाले. तो पुन्हा रिव्हाइव्ह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वीज निर्मिती संबंधीच्या लॉंग टर्म आणि शॉर्ट टर्म उपाययोजना काय आहेत हे सांगावे असे अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, नवीन वीज निर्मिती होवो किंवा न होवो, दरवर्षी या विजेची मागणी वाढतच जाणार आहे. कारण इमारती वाढत आहेत, अप्लायन्सेस वाढत आहेत. त्यासाठी आपल्याला वीज निर्मिती करण्याची गरज आहे आणि तातडीने वीज निर्मिती होणार नसेल तर उपलब्ध असलेल्या विजेचे लोड मॅनेजमेंट करुन राज्यातील वीज ग्राहकाला वीज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील कार्यवाही करावी लागते. याच दृष्टीकोनातून आपल्या राज्यामध्ये गेल्या काही दिवसापासून वीज क्षेत्रामध्ये काम करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. विजेची मागणी ही सतत वाढतच आहे. नोव्हेंबर 2005मधील विजेची मागणी लक्षात घेतली तर त्यावेळी 3797 मे.वॅट इतके शॉर्टेज होते. नोव्हेंबर 2006 मध्ये हे शॉर्टेज 4847 मे.वॅट इतके झालेले आहे. अशा वेळी भारनियमन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. मी सुध्दा ग्रामीण भागामध्ये जाऊन लोकांशी जेव्हा बोलतो त्यावेळी लोक असे सांगतात की, एकदा भारनियमनाचे तास ठरवून दिल्यानंतर त्या पेक्षा जास्त भारनियमन करावे लागता कामा नये. मग 12 तासाचे भारनियमन ठरवून दिलेले असेल तर ते 12 तासच करावे. 5 तासाचे भारनियमन ठरवून दिलेले असेल तर ते 5 तासच करावे. परंतु वीज अचानकपणे जाते आणि ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त भारनियमन व्हायला लागते. यामुळे स्वाभाविकच लोकांच्या मनामध्ये वेगळया प्रकारची नाराजी निर्माण होते आणि त्या नाराजी बद्दल त्यांना समजावून सांगता येत नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुम्ही 6 वाजताच भारनियमन का करता ? 8 वाजता ते का करत नाही ? अमूक वेळीच भारनियमन का करता ? अमूक वेळेला ते का करत नाही ? ज्यावेळी फ्रिक्वेन्सी खाली जाते, ग्रीड

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

वाचविण्याचा प्रयत्न केला जातो आणि जेव्हा आणीबाणीची परिस्थिती निर्माण होते अशा वेळी नियमित भारनियमानाच्या ऐवजी अतिरिक्त भारनियमन करावे लागते. याला झिरो लोडशेडिंग असे म्हटले जाते आणि त्यामुळे एनर्जी निर्माण होते. या राज्यामध्ये वीज निर्मितीच्या क्षेत्रामध्ये आपण कोणती पावले टाकलेली आहेत याबाबतीत मी बोलणार आहे. वर्षातून तीन वेळा अधिवेशन होत असते. प्रत्येक अधिवेशनामध्ये हा विजेचा प्रश्न उपस्थित केला जातो. मी पहिल्याच अधिवेशनामध्ये सांगितलेले आहे की, नवीन वीज निर्माण करण्यासाठी 4 वर्षाचा कालावधी लागेल. हा कालावधी विचारात न घेता प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा होते. या चर्चेमधून नवनवीन सूचना होतात आणि मला सुध्दा सुधारणा करायला मदत होते. मधल्या काळामध्ये एक घटना घडली. पॉवर ग्रीड कार्पोरेशन मुझफ्फरनगर ते गोरखपूरनगर पर्यन्त नवीन लाईल टाकली. आजपर्यन्त एका राज्यापुरतीच ग्रीड असायची. नंतर ही ग्रीड 4 ते 5 राज्यांकरिता झाली.

...नंतर श्री. भोगले...

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.....

आता नॅशनल ग्रीडची जी संकल्पना समोर आलेली आहे त्यावेळेला भूतानमध्ये असलेल्या प्रकल्पातून ज्यावेळी उत्तरेकडे जाणारी व्यवस्था नव्हती त्यावेळेला नॉर्थईस्टमध्ये येणारी वीज महाराष्ट्राला मिळत होती. आता ही नवीन लाईन झाल्यामुळे आणि ती उत्तरप्रदेश व दिल्लीला कनेक्ट केल्यामुळे आपल्याला गेल्या वर्षी जेवढी वीज मिळत होती त्यापेक्षा 500 मे.वॅट वीज सध्या कमी मिळायला लागली आहे. कारण ती राज्ये जवळ असल्यामुळे नॅशनल ग्रीडमधून अधिक वीज खेचायला लागली. वीज निर्मितीची गोष्ट बाजुलाच राहिली. पण गेल्या वर्षी उपलब्ध असलेल्या विजेपेक्षाही 500 मे.वॅट वीज आपल्याला यावर्षी कमी मिळू लागली. काही दिवस हा त्रास आपल्याला सहन करावा लागेल. उद्या नॅशनल सेक्टरवर प्रकल्प निर्माण होतील त्यावेळी निश्चितच फायदा याठिकाणी होईल त्याबद्दल मनात शंका असण्याचे काही कारण नाही. मी मागील वेळेला या सभागृहात सांगितले होते. मागच्या नागपूर अधिवेशनातील आणि मागच्या अधिवेशनातील माझी भाषणे मी वाचून काढली. काय काय बोललो, काय बोललो नाही हे पाहिले. डिसेंबर, 2006 पर्यंत या राज्यामध्ये 1000 मे.वॅट विजेची नवीन भर पडेल असे मी मागच्या वेळी सांगितले होते. त्यादृष्टीने आम्ही पावले टाकली आहेत. 1000 मे.वॅट विजेची भर पडेल असे सांगताना मी हेही सांगितले होते की, परळी प्रकल्पातून 250 मे.वॅट वीज, पारस प्रकल्पातून 250 मे.वॅट वीज, घाटघर प्रकल्पातून 250 मे.वॅट वीज व तारापूर येथील प्रकल्पातून 250 मे.वॅट अशाप्रकारे 1000 मे.वॅटवीज या चार प्रकल्पातून महाराष्ट्राला मिळेल असे सांगितले होते. आज वस्तुस्थिती काय आहे? आता सन्माननीय सदस्य श्री.रावते सभागृहात उपस्थित नाहीत. ते म्हणाले होते की, आमच्या काळात विजेची निर्मिती झाली. मला त्यासंबंधी वाद करावयाचा नाही. ज्या तारखेला तो प्रकल्प सुरु झालेला आहे त्यापूर्वी चार वर्षे जायला पाहिजे. मग तो प्रकल्प कधी डिझाईन झाला, कधी काम सुरु झाले आणि कधी वीज निर्मिती सुरु झाली? तुमच्या काळात की आमच्या काळात हा माझ्यासमोर विषय नाही. ज्यावेळेला हे सरकार आले, या सरकारने हे दोन 250 मे.वॅट वीज प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये साधारणत: जानेवारी 2004 ला परळी येथे काम सुरु केले. मी विधानसभेत सांगितले होते की, साधारणपणे जुलै, 2006 पर्यंत हा प्रकल्प आम्ही पूर्ण करु शकू. परंतु आता आपण नॅशनल लेव्हलवरचा सिनॅरिओ पाहिला तर महाराष्ट्रामध्ये विजेची टंचाई आहे त्याप्रमाणेच देशात सुध्दा 1 लाख मे.वॅट विजेची टंचाई आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.....

प्रत्येक राज्य आपापल्या परीने वीज निर्मितीच्या क्षेत्रात कामाला लागली आहेत. त्याचा परिणाम म्हणून आज राज्यातील सगळी मशिनरी, इक्वीपमेंट तयार करणाऱ्या कंपन्या ओव्हरलोड आहेत. अनेक ठिकाणी तांत्रिक अडचणी त्यामध्ये निर्माण होत आहेत. हा जो जुलै 2006 मध्ये परळीचा प्रकल्प येणार होता त्यामध्ये केंद्र सरकारच्या भेलकडून क्रिटिकल पार्टच्या सप्लायमध्ये विलंब झाल्यामुळे वेळ लागणार आहे. परंतु जानेवारी, 2007 मध्ये हा परळी प्रकल्प कार्यान्वित होईल. पारस प्रकल्प नोव्हेंबर, 2006 मध्ये कार्यान्वित करण्याचे सांगितले होते. हा प्रकल्प मार्च, 2007 पर्यंत सुरु होईल. साधारणपणे 36 महिन्यात अशा प्रकल्प सुरु होतात. आम्ही त्यामध्ये ॲडव्हान्स प्लॅनिंग केले होते. 30 महिन्यात प्रकल्प सुरु करण्याच्या संदर्भात राज्यातील जनतेला आणि सभागृहाला कमिटमेंट दिली आहे. 30 महिन्यात करता आले नाही परंतु 36 महिन्यात दोन्ही प्रकल्प सुरु झाले तर राज्याला 500 मे.वॅट वीज मिळू लागेल. हे करीत असताना तारापूरचे दोन युनिट, ज्याठिकाणी न्युक्लिअर पॉवर वीज निर्माण होते. तेथून 250 मे.वॅट वीज मिळावयास पाहिजे होती. ती मिळावयास सुरुवात झालेली आहे. तेथील दोन टप्पे केंद्र सरकारने सुरु केले आहेत.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

काही छोटया समस्या त्यामध्ये सुध्दा आहेत परंतु त्यातून सुध्दा या राज्याला वीज मिळावयास लागली आहे. घाटघर प्रकल्पाची मांडणी श्री. राजाध्यक्ष यांनी केलेली आहे. घाटघर प्रकल्पातून 2006 पर्यंत वीज मिळू शकेल असे सांगण्यात आले होते परंतु या प्रकल्पामध्ये सुध्दा काही अडचणी आल्या त्यामुळे 3-4 महिने यामध्ये उशीर झालेला आहे. पाटबंधारे विभागाचे सुध्दा यामध्ये नियोजन आहे. मध्यंतरीच्या काळात या ठिकाणी अपघात झाला होता त्यामुळे सुध्दा या प्रकल्पातून वीज मिळावयास विलंब झालेला आहे. दाभोळचा प्रकल्प सुरु करण्यामध्ये माननीय सुशीलकुमार शिंदे यांनी पुढाकार घेतलेला आहे. हा प्रकल्प सुरु होण्यामध्ये माननीय पंतप्रधान तसेच माननीय केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार , केंद्रीय मंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी प्रयत्न केलेले आहेत. दाभोळप्रकल्पाच्या संदर्भात आपल्याला जवळ जवळ 27-28 हजार कोटी रुपये द्यावे लागले असते परंतु यातून मार्ग काढून आपण 27-28 हजार कोटी रुपये वाचविलेले आहेत. दाभोळ प्रकल्प आता पूर्णपणे भारताच्या मालकीचा झालेला आहे. या प्रकल्पामध्ये एनटीपीसी 28.7 टक्के वाटा आहे, भेल कंपनीचा 28.3 टक्के वाटा आहे. इंडियन स्टेटस् कंपनीचा 28.3 टक्के वाटा आहे तसेच दाभोळ प्रकल्पामध्ये राज्याची इक्विटी 15 टक्के आहे. या ठिकाणी गॅसमध्ये राज्य सरकारचा वाटा नव्हता तो वाटा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सुरुवातीला दाभोळ प्रकल्प गॅसवर चालेल असे वाटले होते व त्यामुळे त्यांनी प्रती युनीट 2 रुपये 30 पैसे हा दर दिला होता. आपल्याला परदेशी कंपनी बरोबर डिल करावयाचे नव्हते तर देशी कंपनी बरोबर डिल करावयाचे होते. दाभोळ प्रकल्पाला कतार कडून गॅस मिळणार होता परंतु त्यांनी नंतर गॅस उपलब्ध करुन देण्याबाबत असमर्थता दाखवली.. या प्रकल्पाला गॅस मिळवून देण्यासाठी केंद्राने देखील प्रयत्न केले होते. हे सर्व करीत असतांना सुरुवातीला दाभोळचा जो पहिला टप्पा सुरु करण्यात आला होता त्यातून सुरुवातीला 740 मे.वॅ. वीज मिळाली परंतु ही वीज रोज सारख्या प्रमाणात मिळत नव्हती. या विजेचा दर प्रती युनीट 4 रुपये 25 पैसे होता. या प्रकल्पामध्ये आधीचा जो नाफ्ता होता त्यामध्ये दुसरा नाफ्ता घेऊन हा प्रकल्प सुरु करण्यात आला होता. या प्रकल्पाच्या बरोबर मार्च महिन्यामध्ये जो करार केला होता त्या प्रमाणे प्रती युनीट 5 रुपये 50 पैसे दराने वीज मिळणार होती. सुरुवातीस हा प्रकल्प गॅसवर चालत असल्यामुळे प्रती युनीटचा दर कमी होता. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

दराच्या संदर्भातील जी भूमिका होती ती माननीय पंतप्रधान आणि माननीय अर्थमंत्र्यांनी मान्य केलेली आहे. यामध्ये केंद्रसरकारने हस्तक्षेप केला नसता तर हा दर प्रती युनीट रु. 5.50 वरुन प्रती युनीट रु 7.50 पर्यंत गेला असता. जर हा प्रकल्प गॅसवर सुरु झाला तर या ठिकाणी निर्माण होणारी वीज आपल्याला अजून कमी दराने मिळू शकेल. एका बाजूला आपल्या राज्याला वीज कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे आपल्याला लोडशेडींग करावी लागत आहे. भारनियमन करुन जनतेला अंधारात ठेवण्यापेक्षा थोडया अधिक दराने वीज घेऊन जनतेला ती देण्याचा या शासनाचा प्रयत्न आहे. दाभोळ प्रकल्प सुरु झाल्यानंतर दोन दिवस आपल्याला 700 मे.वॅ. वीज मिळावयास लागली होती. परंतु नंतर ही वीज कधी 300 मे.वॅ. तर कधी 400 मे.वॅ. अशी मिळत होती. हा प्रकल्प केंद्र शासनाच्या मालकीचा आहे. या प्रकल्पामध्ये आपल्या राज्याचे दोन डायरेक्टर काम करीत आहेत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

आणि ते निश्चित प्रकारे टाईम टू टाईम प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रेझेन्टेशच्या माध्यमातून आणि नोटस्च्या माध्यमातून टाईम टू टाईम वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक वर्षी किती कॅपॅसिटीची ॲडीशन होणार आहे याची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन 2006-07 मध्ये साधारणत: 4500 मे.वॅ.विजेची टंचाई असेल. कमाल मागणीच्या वेळेला 14,161 मे.वॅ.मागणी असेल. सन 2007-08 मध्ये 15 हजार मे.वॅ., 2008-09 मध्ये 16 हजार 110 मे.वॅ. 2009-10 मध्ये 17 हजार 179 मे.वॅ. विजेची मागणी असणार आहे. या मागणीच्या प्रमाणात प्रोजेक्ट आल्यास सन 2006-07 मध्ये 1300 मे.वॅ.पर्यंत वीज उपलब्ध होऊ शकेल. त्याच्या पुढच्या वर्षी 2 हजार मे.वॅ.पर्यंत वीज उपलब्ध होईल. 2008-09 पर्यंत 1333 मे.वॅ., 2009-10 मध्ये 1408 मे.वॅ. आणि 2010-11 मध्ये 800 मे.वॅ. वीज उपलब्ध होईल. ही सर्व वीज राज्य शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. आपणास वीज मिळण्याचे तीन-चार सोर्सेस आहेत. पहिला सोर्स म्हणजे स्वत:चे प्रकल्प, त्याचबरोबर केंद्र शासनाकडून मिळणारी वीज, खाजगी क्षेत्रातून मिळणारी वीज, त्याच बरोबर रत्नागिरी पॉवर स्टेशन येथून मिळणारी वीज अशा चार सोर्सेसमधून आपणाला वीज उपलब्ध होणार आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एकदा प्रोजेक्ट सुरु केल्यानंतर त्यामध्ये अनेक अडचणी येतात. पैशाचा प्रश्न असतो. परंतु सर्वात मोठा प्रश्न हा इंधनाचा असतो. गेल्या दहा वर्षात या सरकारला वीज निर्मिती करता आलेली नाही. सरकार अकार्यक्षम असेल परंतु या क्षेत्रात उतरलेल्या टाटा आणि रिलायन्स या कार्यक्षम कंपन्यांना देखील गेल्या काही वर्षात वीज निर्मिती करता आलेली नाही. कारण वीज निर्मिती क्षेत्रात अनेक प्रश्न आहेत. हे सर्व पाहत असताना एका बाजुला जागेचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, पर्यावरणाचा प्रश्न इंधनाचा प्रश्न, पैशांचा प्रश्न आणि शेवटी यासाठी लागणारा वेळेचा प्रश्न या सर्व अडचणी लक्षात घेतल्यानंतर मी आपणास सांगू इच्छितो की, फेज-2 मध्ये 250-250 मे.वॅटच्या प्रकल्पानंतर 2000 मे.वॅ.चा प्रकल्प जून 2009 मध्ये उपलब्ध करुन देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्याप्रमाणे कोराडी, चंद्रपूर येथील जुने प्रकल्प बंद करुन त्यामध्ये रिप्लेमेंट करुन 2 हजार मे.वॅ.वीज जून 2010 मध्ये पूर्ण करण्याचा आमचा प्लॅन आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सध्या राज्यात 3000 मे.वॅ.विजेची कमतरता आहे. ही कमतरता लक्षात घेऊन आवश्यक असलेली वीज केव्हा निर्माण करणार आहात आणि महाराष्ट्र अंधकारातून केव्हा मुक्त होणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, जर नवीन वीज निर्मिती होऊ शकली नाही तर सन 2010 पर्यंत 8000 मे.वॅ.विजेचा तुटवडा असेल. आपण आठ ते दहा हजार मे.वॅ.वीज निर्मिती डोळ्यासमोर ठेवलेली आहे. 500 मे.वॅ.निर्मिती सुरु झालेली आहे. 3 हजार मे.वॅ.कोराडी प्रकल्पातून मिळणार आहे. माझ्याकडे जी आकडेवारी आहे ती वाचून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील...

आमचे स्वत:चे जे प्रकल्प आहेत त्यामध्ये आता परळी आणि पारसच्या बरोबरीने आणखी 2 हजार मेगावॅटचे प्रकल्प आपण सुरु करीत आहोत. हे प्रकल्प 30-35 महिन्यांमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न चालू आहेत. त्याचबरोबर गॅस उपलब्ध झाला तर ऊरणचेही आम्ही नियोजन केलेले आहे. ऊरणमध्ये जमीन उपलब्ध असून त्याठिकाणी बाकीच्या ऑईल कंपन्यांनीही जमिनी खरेदी केलेल्या आहेत. केंद्र सरकारने आणि रिलायन्सने डिसेंबर, 2007 पर्यंत गॅस येणार असे सांगितले आहे. गॅस आल्यानंतर त्याचा फायदा दाभोळ प्रकल्पाला आणि ऊरण प्रकल्पाही होईल. त्यामुळे याठिकाणी मी एवढेच सांगू इच्छितो की, विजनिर्मिती क्षेत्रामध्ये राज्य सरकारने विचार केलेला नाही, त्यासाठी पाऊले उचचलेली नाहीत किंवा नियोजन केलेले नाही असा कृपया चुकीचा मॅसेज कोणी बोहर नेऊ नये. या राज्यामध्ये आवश्यक असणारी वीज स्वत:च्या हिम्मतीवर निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून जी जी पाऊले उचण्याची आवश्यकता आहे ती ती पाऊले सरकारने उचलण्याचा प्रयत्न केलेला आहे. मागे, मी सांगितले होते की, राज्य सरकारने काही खाजगी क्षेत्रातील कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केलेला आहे. याबाबतीत जवळपास 12,500 मेगावॅटचा करार करण्यात आलेला आहे. यातील जवळपास 6 हजार मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण होतील व त्यातून जवळपास 3 हजार मेगावॅट वीज आपल्याला मिळेल, तेवढी वीज आपल्याला पुरेशी आहे. आपण 8 कंपन्यांबरोबर करार केले. या 8 कंपन्यांपैकी 4 कंपन्यांनी सिरिअसली विचार केलेला आहे. याबाबतीत मी तीन आठवडयापूर्वी बैठक घेतली, त्यामध्ये टाटा कंपनीने आपला प्लॅन बदलला असून आताच्या करारानुसार 1500 मेगावॅटचा प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टीने शहापूरमध्ये प्लॅन केलेला आहे. आता नवीन प्रकल्प 1500 मेगावॅटचा असून त्यापैकी 1 हजार मेगावॅटचा प्रकल्प सुरु करीत आहेत, तसेच त्यांनी ट्रॉम्बे येथे 250 मेगावॅटच्या प्रकलपाचे काम सुरु केलेले आहे. दुसराही 250 मेगावॅटच्या प्रकल्पाचे काम सुरु केलेले आहे. जिंदाल थर्मल कंपनीनेही इफेक्टीव्ह स्टेप उचललेली आहे. त्यांनी 1 हजार मेगावॅटचा प्रकल्प दिलेला आहे. रिलायन्स कंपनीनेही 4 हजार मेगावॅटचा प्रकल्प शहापूर ता.अलिबाग याठिकाणी सुरु करण्याच्या दृष्टीने इफेक्टीव्ह स्टेप उचललेली आहे. त्यामध्ये काही अडचणी आहेत, परंतु त्यातून आपण निश्चितपणे मार्ग काढू. त्यांना सरकारची मदत राहणार आहे. हे सर्व करीत असताना व एका बाजूला विजनिर्मिती करीत असताना यासाठी बाजारातून पैसा मिळत नाही. यासाठी 80 टक्के रक्कम कर्जाने मिळेल व 20 टक्के रक्कम राज्य

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

सरकारला द्यावयाची आहे. यामध्ये अनेक कंपन्यांना स्वत:ची इक्विटी घालावयाची आहे. आजपर्यंत या क्षेत्रामध्ये मोठयाप्रमाणात खर्च येत असल्यामुळे आणि शेतकऱ्यांच्या विजेची बिले भरण्याचा वाटा राज्य सरकारने उचललेल्यामुळे गेल्या 5 वर्षामध्ये शेतकऱ्यांच्या विजेच्यापोटी आपण जवळपास 7 हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम विज मंडळाला दिलेली आहे. या वर्षाची शेतक-यांच्या विजेची बिले जवळपास 1706 कोटी रुपयांची असून ती रक्कम राज्य सरकारला स्वत:च्या तिजोरीतून द्यावी लागणार आहे. एका बाजूला आपण एवढया मोठयाप्रमाणात पैशाच्या रुपाने सबसिडी देतो आणि दुसऱ्या बाजूला विजनिर्मितीच्या कामासाठी मात्र आपल्याला मर्यादा पडत आहेत. त्याची अनेक कारणे आहेत. यामध्ये निर्माण झालेल्या सर्व अडचणीतून मार्ग काढण्याचा सरकारचा प्रामाणिक प्रयत्न आहे. आपण 400 कोटी रुपये जनरेशनसाठी दिलेले आहेत, सिंगल फेजिंगसाठी 65.32 कोटी रुपये दिलेले आहेत, आर.ए.सी.सी.साठी 9.49 कोटी रुपये दिलेले आहेत, दाभोळ प्रकल्पासाठी 133 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. अशाप्रकारे एकूण साधारणत: 28.30 कोटी रुपये राज्य सरकारला राज्याच्या बजेटमधून पॉवर सेक्टर सुधारण्यासाठी द्यावे लागले.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

आज दुसरी अडचण आपल्यासमोर आहे की 12 तास भारनियमन कसे चालविणार ? असे सांगितले जाते की, कुठल्याही दराने घ्या, कुठुनही घ्या, नाफ्तावर, डिझेलवर घ्या परंतु वीज आणा आणि लोडशेडिंग कमी करा. ही वीज अर्थातच महागडया दराने घ्यावी लागते. त्यामुळे वीज कंपनीला आपल्या कारभारामध्ये, इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये इन्व्हेस्टमेंट करण्याच्या कामामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येत असतात. मी या सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेर 3 वर्षात राज्यामध्ये वीज वितरणाच्या क्षेत्रामध्ये काय काम करणार आहोत हे सांगितले होते. ब-याच वेळा केवळ कनेक्शन द्या अशी मागणी होते. 63 पॉवरचा डी.पी.असतो मात्र लोड 100 चा येतो, 100 चा डी.पी.असेल तर 125 लोड येतो व त्यामुळे ट्रान्स्फारमरची क्षमता नसेल, गरजेपेक्षा जास्त कनेक्शन दिले असतील, हुक टाकून वीज घेणारे असतील तर ते जळतात व मग त्यांची दुरुस्ती करावी लागते. हे सर्व थांबवावयाचे असेल तर या राज्यामध्ये वेगळी परिस्थिती निर्माण करावी लागेल. वीज वितरण क्षेत्रामध्ये आवश्यक असणारे सबस्टेशन, अपग्रेडेशन, नवीन ट्रान्स्फॉरमर 3 वर्षामध्ये करण्याच्या संदर्भामध्ये प्लॅनिंग केले आहे. जवळ जवळ 15400 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. हे सर्व करीत असतांना 555 सबस्टेशन उभी करीत आहोत. उपकेंद्रांची क्षमतावाढ करीत आहोत. उपकेंद्राची वाढीव रोहित्र आहेत त्यामध्ये नवीन 336 ट्रान्स्फॉरमर बसविणार आहोत. 63 हजार डी.पी.करणार आहोत. यासाठी सर्व पैसे बाजारातून कर्ज काढून उभे करावे लागणार आहेत. आतापर्यन्त एवढे पैसे यापूर्वी खर्च करण्यात आले नव्हते. वीज मंडळ होते त्यावेळी सरकारच्या आदेशाशिवाय त्यांना काम करता येत नव्हते. आता कंपन्या झाल्या आहेत. एका मंडळाच्या 3 कंपन्या केल्या, पावडर लावली, लाली लावली, असा शब्दप्रयोग या ठिकाणी वापरण्यात आला. परंतु, वर्षभरामध्ये 500 ते 700 कोटी रुपयांचे काम यापूर्वी झाले नव्हते. येत्या काही वर्षामध्ये 14 हजार कोटी रुपयांचे काम करण्याचा ॲम्बीशियस प्लॅन या कंपन्यांनी तयार केलेला आहे व यासाठीचा निधी देखील उपलबध झाला आहे व ऑर्डर देखील प्लेस केलेली आहे. पूर्वीच्या काळामध्ये 1 सबस्टेशन उभे करण्यासाठी एक ते दीड वर्षाचा कालावधी लागत असे आता कंपन्यांकडून 4/5 महिन्यांमध्ये 33 के.व्ही.चे सबस्टेशन उभे करण्यात येत आहे. आपण आमच्या बरोबर आला तर आम्ही आपल्याला दाखवू शकतो की 4 महिन्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

अशा प्रकारे उपकेंद्र उभे राहिलेले आहे, तेथील शेतकरी देखील हे आपल्याला सांगतील. मी सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो की, खर्च कशा पध्दतीने करावयाचा याचा प्लॅन तयार केलेला आहे. सन 2006-07 या वर्षामध्ये 1503 कोटी रुपये, सन 2007-2008 मध्ये 6635 कोटी रुपये, सन 2008-09 मध्ये 6684 कोटी रुपये, सन 2009-10 मध्ये 1794 कोटी रुपये, सन 2010-2011 मध्ये 1767 कोटी रुपये असे मिळून 18086 कोटी रुपयांचा प्लॅन तयार करुन वीज वितरणाच्या क्षेत्रामध्ये सुध्दा, दुरुस्ती करण्याच्या संदर्भामध्ये कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. डिस्ट्रिब्युशनचा कार्यक्रम हाती घेतला आहे. 220 के.व्ही., 132 के.व्ही. सबस्टेशन, ट्रान्स्फॉरमर लाईन्स यामध्ये देखील काम करणार आहोत. अशा पध्दतीने 14 हजार कोटी रुपयांचा प्लॅन तयार केला आहे तसेच प्रत्येक कंपनीला टारगेट दिलेले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील .....

इतक्या दिवसामध्ये इतके सबस्टेशन उभे राहिले पाहिजेत. त्याचे मॉनेटरींग आणि फॉलोअप करण्याचे काम माझ्यासारखा कार्यकर्ता करीत असतो. आज ट्रान्सफॉर्मर फेल्युअरचे प्रमाण बधितले तर ते कमी झाल्याचे आपल्याला दिसते. मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन 2004-05 मध्ये ट्रान्सफॉर्मर फेल्युअरचा रेट 18 टक्के होता तो सन 2005-06 मध्ये 16.62 टक्क्यांनी खाली आलेला आहे आणि आता नोव्हेंबर अखेर पर्यंत 12.02 टक्के इतका खाली आलेला आहे. त्याचे कारण असे आहे की, आता आपण कॅपॅसिटी ॲडीशन करावयास लागलो आहोत. ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोडेड झाल्यामुळे जळत होता ते प्रमाण आता कमी झालेले आहे. आपण सर्व राज्यामध्ये पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर लावू त्यावेळी आपल्याला यामध्ये सुधारणा झालेली दिसेल. काही ठिकाणी अधिकारी चुकीचे वागत असतील, काही ठिकाणी शेतक-यांना नाडायचा प्रयत्न करीत असतील तर याची मला कल्पना आहे. माझ्या वीज मंडळामध्ये काम करणा-या कर्मचाऱ्यांबद्दल आपण चांगले बोललात त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देईन. वरच्या पातळीवरील अधिकारी चांगले काम करतात. हे चांगले काम करणारे अधिकारी बाकीच्या गोष्टींमध्ये जशी परफॉर्मन्सची अपेक्षा करतात तसच या भ्रष्टाचाराच्या क्षेत्रामध्ये जर आम्हाला तुमच्याकडून माहिती मिळाली तर त्याबाबत सुध्दा कार्यवाही करण्यात येईल. मी अनेक वेळा बघतो की, माझ्या मोबालवर रात्री 12 वाजता सामान्य नागरिकांचे फोन येतात व विजेच्या संदर्भामध्ये काही अडचणी असतील तर ते सांगण्याचा प्रयत्न करीत असतात. सन्माननीय सदस्यांना तर ही सुविधा कायमच उपलब्ध आहे. विजेच्या चोरी संदर्भात आपण पावले उचललेली आहेत. आपण नवीन पोलीस स्टेशन स्थापन केले, नवीन कोर्ट स्थापन केले. सन 2004-05 मध्ये अनधिकृत कनेक्शनच्या 62,544 केसेस दाखल केलेल्या आहेत. सन 2005-06 मध्ये या केसेस 78,625 पर्यंत गेलेलेल्या आहेत. थेप्टच्या केसेसमध्ये 16,337 केसेस डिटेक्ट केलेल्या होत्या. सन 2005-06 मध्ये 25,172 पर्यंत आकडा गेलेला आहे. हे करीत असतांना फक्त ग्राहकांवरच कारवाई केली जाते असे नाही तर वीज मंडळाचे कर्मचारी यामध्ये असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई केली जाते. सन 2003 मध्ये आपण कायद्यामध्ये तशी तरतूद केलेली आहे. सन 2003-04 मध्ये टी. ॲण्ड डी. लॉसेस 38 टक्के होते आणि सन 2004-05 मध्ये 35 टक्क्यापर्यंत आलो आणि सन 2005-06 पर्यंत 32.58 पर्यंत आपण आलो

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील .....

आणि आता सन 2006-07 मध्ये 29.80 टक्क्यापर्यंत टी.एन.डी.लॉस खाली आलेला आहे. दरवर्षी साधारणपणे 3 टक्के टी. ॲण्ड डी. लॉसेस कमी करण्याचे उद्दिष्ट राज्याच्या वीज मंडळाने ठरविलेले आहे. या उद्दिष्टाच्या आधारेच आपण काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपल्याला पाहिजे असल्यास माझ्याकडे या ठिकाणी झोन वाईज आणि सर्कलवाईज आकडे उपलब्ध आहेत. मध्यंतरी टेरी प्रिव्हेजनच्या संदर्भामध्ये निर्णय झाला. एम.ई.आर.सी.ला अधिकार दिलेले आहेत हे खरे आहे. परंतु एम.ई.आर.सी.ला अधिकार दिल्यानंतर पुर्वीच्या काळामध्ये वीज कंपनी जसे वागेल जसे खर्च करतील त्याप्रमाणे ऑडीट वर्ष-दोन वर्षांनी होत होते. आता प्रत्येक वीज कंपनी मग ती सरकारची असो, रिलायन्स असो, टाटा असो त्यांनी वर्षभरामध्ये किती खर्च केला त्यांचा खर्च चालविण्यासाठी मग तो खर्च इंधनाचा असेल, ट्रान्समिशनचा असेल, डिस्ट्रीब्युशनचा असेल हा सर्व खर्च पूर्ण करण्यासाठी त्यांना वर्षाची किती आवश्यकता आहे असा ॲन्युअल रेव्हेन्यू रिक्वॉयरमेंट नावाचे डाक्युमेंट एम.ई.आर.सी.ला सादर करावे लागते. एम.ई.आर.सी.कडे ॲन्युअल रेव्हेन्यू रिक्वॉयरमेंट सादर केल्यानंतर त्याच्या माध्यमातून किती खर्च मान्य करावयाचा याचा निर्णय एम.ई.आर.सी. घेते आणि हे झाल्यानंतर आपल्याला टेरिफ सादर करावे लागते. आता त्यांनी टेरिफ ऑर्डर सादर केलेली आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

त्यामध्ये मला सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांच्याबाबतीत कोठल्याही बाबतीतील विजेचे दर न वाढविण्याचा निर्णय एमइआरसीने घेतलेला आहे. त्याही क्षेत्रात बीपीएल खालील लोकांसाठी विजेचे दर कमी केलेले आहेत. एक गोष्ट खरी आहे की, उद्योग क्षेत्रामध्ये मात्र विजेची दरवाढ जास्त झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून आज ते करतानादेखील बाजूच्या राज्यांमधील दरही त्यांनी विचारात घेतलेले आहेत. अर्थात त्यामुळे त्यातून देखील काही क्षेत्रामध्ये असंतोष आहे. बेसिकली त्यातील जे लहान लहान लोक आहेत त्यांची शिष्टमंडळेसुद्धा मला येऊन भेटली आहेत आणि त्यासाठी मी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर त्यासंबंधा चर्चा केली आहे आणि त्यातून मार्ग काढण्याचा आपण जरूर प्रयत्न करणार आहोत. परंतु एमइआरसीने यामध्ये बदल करण्याची भूमिका स्वीकारली नाही तर मग मात्र आपला नाईलाज होईल आणि आपल्याला त्याला सामोरे जावे लागेल. ...

श्री. अरविंद सावंत : या निमित्ताने मी आपल्याला विनंती करीन की, एमइआरसीमध्ये आपण लोकप्रतिनिधींना घेणार आहात का ? ग्राहकांचे प्रतिनिधी त्यामध्ये जरूर आहेत पण ते सर्व क्षेत्रातील नाहीत. म्हणून त्यामध्ये शासनाने असे सांगितले पाहिजे की, एमइआरसीमध्ये लोकप्रतिनिधी घेतले तर त्यांचेमार्फत त्यांना लोकांच्या भावनादेखील कळतील, ज्या आज त्यांना कळत नाहीत वा कळल्या नाहीत. तसेच एमइआरसीने ज्या पद्धतीने शेतकऱ्यांना कमी भावामध्ये वीज देण्याचे ठरविले आहे मात्र रिलायन्स कंपनीने एक्स्ट्रा फ्यूअल चार्जेस लावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा अशा गोष्टींवर कोण कंट्रोल करणार ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य लोड मॅनेजमेंट चार्जेसबद्दल बोलत आहेत. पण आपणच मघाशी सांगितले की, मुंबईमध्ये होर्डिंग्ज वगैरे मोठ्या प्रमाणात आहे आणि त्यासाठी वीज मोठ्या प्रमाणात खर्च होते. तेव्हा त्यातील विषयही आपण सगळ्यांनी समजून घेतलेला नाही. त्यामध्ये एमइआरसीची भूमिका अशी आहे की, साधारणत: 300 युनिटपर्यंत जे ग्राहक वीज वापरतील त्यांना हे चार्जेस लावले जाणार नाहीत. परंतु त्यापुढील युनिटस् वापरणाऱ्या ग्राहकांना मात्र हे चार्जेस लावले जातील. जेव्हा विजेची टंचाई आहे असे आपण म्हणतो तेव्हा विजेची बचत करा, हे बंद ठेवा, ते बंद ठेवा असे सांगता येणार नाही. म्हणूनच त्यामध्ये 300 युनिटपर्यंतचे सिलिंग ठेवले आहे आणि त्या पेक्षा अधिक युनिटस् ..

..... 5एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

वापरणाऱ्यांना जास्त दर ठेवला असेल तर त्यातून लोकांची वीज वापराची मानसिकता बदलू शकेल. तेव्हा विजेचा वापर कमी केला पाहिजे आणि तो करता आला नाही तर आजच्या परिस्थितीमध्ये वीज कंपनी 5, 7, 8 रूपये किंमतीने बाहेरून वीज खरेदी करते आणि त्याच दराने ग्राहकांना देण्याचा प्रयत्न करते अशा वेळी विजेचा वापर कमीत कमी करण्याच्या दृष्टीनेच ही पावले उचलली आहेत. यामध्ये दुसरा एक प्रयत्न म्हणजे सिंगल फेज करण्याचा. कोणी तरी येथे म्हटले की, त्या योजनेचा बोजवारा उडाला आहे काय ? तर तसे काहीही झालेले नाही. त्यामध्ये सिंगल फेजींगसाठी आपण गावांचे लक्ष्य दिलेले आहे. त्याबाबतची आकडेवारी देखील माझ्याकडे आहे. त्यानुसार फेज 2 मध्ये 4532 गावांचे लक्ष्य दिलेले होते त्यापैकी 454 गावे पूर्ण झालेली आहेत आणि फेज 1 मध्ये देखील जे लक्ष्य दिलेले होते ते 100 टक्के पूर्ण करण्याचा प्रयत्न मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी केलेला आहे.

सभापती महोदया, कृषी पंपांचे विद्युतीकरण करण्याच्याबाबतीत नेहमीच चर्चा होत असते आणि आपण आतापर्यंत साधारणत: 2 लाख 71 हजार च्या आसपास पेड पेंडींग्ज कनेक्शन्स आहेत आणि 27 लाख 13 हजार इतक्या कृषी पंपांचे विद्युतीकरण झालेले आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 5जी 1

"

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील....

सभापती महोदया, सन 2006-07 मध्ये 1 लाख 11 हजार 929 कृषी पंपाना वीज देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माननीय सदस्य श्री. सदाशिवराव पोळ यांनी ग्रामीण भागामध्ये लोड वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या मोटारी जळत असल्याचे सांगितले. त्याकरीता त्या परिसरात असलेल्या ट्रान्सफॉर्मरची जी कॅपॅसिटी आहे, ती वाढविण्याकरीता आम्ही इन्फ्रास्ट्रक्चर प्लॅनिंगचा कार्यक्रम हातामध्ये घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत 555 सब सेंटर्स उभे करण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर आज ग्रामीण भागामध्ये ज्या अडचणी येत आहेत त्या दूर झाल्याशिवाय राहणार नाहीत. इन्फ्रास्ट्रक्चर प्लॅनिंगचा कार्यक्रम दोन वर्षाचा असून तो आज सुरु आहे. या कार्यक्रमामधून मोठया प्रमाणामध्ये विजेची पूर्तता झाली आहे. आम्ही 8 हजार 722 गावांचे उद्दिष्ट ठेवले होते त्यापैकी 8 हजार 85 गावांमध्ये सिंगल फेजिंगचा कार्यक्रम पूर्ण करण्यात आला आहे. त्यामुळे आम्ही 1151 मेगावॅट इतकी वीज वाचवू शकलो आहोत.

माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी वाडया आणि वस्त्यांमध्ये विद्युतीकरण करण्याच्या संदर्भात भूमिका मांडली.आज महाराष्ट्रामध्ये 5 हजार 85 गावांमध्ये विद्युतीकरण बाकी आहे. केंद्र सरकारने राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना जाहीर केली आहे. त्या योजनेमधून 26 लाख 81 हजार 890 लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील 1 लाख 72 हजार 856 लोक आहेत. या योजनेच्या पहिल्या टप्प्याला केंद्र सरकारने मंजूरी दिली आहे. त्यामध्ये यवतमाळ, सोलापूर, गोंदीया, रत्नागिरी, धुळे, वर्धा, नांदेड या सात जिल्हयांचा समावेश आहे. त्याचबरोबर सातारा, सांगली, पुणे,भंडारा, अमरावती, नंदूरबार, औरंगाबाद, अकोला, नागपूर आणि जालना या दहा जिल्हयांना इन प्रिन्सिपल मान्यता दिली आहे, त्यांना फायनल मान्यता लवकरच मिळेल. बाकीचे जे सतरा जिल्हे राहिले आहेत तेथील वाडया वस्त्यांचे विद्युतीकरण गेली अनेक वर्षे करण्यात आले नाही, त्याठिकाणी राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत वर्ष दीड वर्षामध्ये मोठया प्रमाणावर कार्यक्रम हाती घेऊन विद्युतीकरण करण्यात येईल.

सभापती महोदया, अक्षय प्रकाश योजनेच्या संदर्भात सभागृहामध्ये बरीच चर्चा झाली. ही योजना आम्ही लोकांपुढे सादर केली. ज्याप्रमाणे तुम्ही आपल्या घरामधील शेगडया, स्टोव्ह हे काही काळ बंद ठेवता त्याप्रमाणे आपण आपल्या घरामधील वीज रोज तास दोन तास बंद ठेवावी अशाप्रकारची वॉर्निंग त्यांना देण्यात आली. त्यामुळे बाकीच्या वेळी त्यांना पूर्णपणे वीज देता आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील....

मधल्या काळामध्ये आमचे सुध्दा काही वीज निर्मिती संच बंद पडले. संच बंद पडल्यानंतर जी गॅप तयार झाली ती भरुन काढण्यासाठी झीरो लोड शेडींग करावे लागले. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यामध्ये महाराष्ट्रामध्ये कठीण परिस्थिती राहिली. नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेपासून त्यामध्ये थोडी सुधारणा झाली. अक्षय प्रकाश योजनेतील जी गावे आहेत आणि सिंगल फेजिंगची जी गावे आहेत त्याठिकाणी एक-एक तास लोड शेडींग वाढविण्याचा प्रयत्न केला. राज्यामध्ये झीरो लोड शेडींग करावे लागत आहे ते करावे लागू नये यासाठी हा प्रयत्न होता. त्यामुळे थोडीशी नाराजी येण्याची शक्यता नाकारीत नाही. परंतु अक्षय प्रकाश योजना लोकांच्या सहभागाने आणि पाठिंब्याने सुरु झाली आहे, त्यामुळे परिस्थितीमध्ये थोडी सुधारणा होईपर्यंत लोकांना जे टाईमटेबल देण्यात आले आहे त्या टाईम टेबलप्रमाणे राज्यामध्ये अक्षय प्रकाश योजना राबविण्याचे आम्ही ठरविले आहे. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत असे मला सभागृहाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, आजच्या चर्चेमध्ये अनेक माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. त्यामध्ये माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अक्षय प्रकाश योजनेबाबत चांगले मुद्दे मांडले. त्याचबरोबर ते युनियनचे नेते असल्यामुळे त्यांनी वीज मंडळातील कर्मचाऱ्यांच्या पेन्शनच्या प्रश्नासंदर्भात आपली भूमिका मांडली. या प्रश्नासंबंधी वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संपाची नोटीस दिली आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या नेत्यांबरोबर आमच्या विभागाचे अधिकारी चर्चा करीत असून चर्चेच्या पहिल्या टप्प्यामधून काय बाहेर पडत आहे हे पाहून गरज पडली तर मी स्वत: कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करीन. आज अडचणीची परिस्थिती असली तरी आपल्याकडे वनटाईम द्यायला पैसे आहेत हे आपले म्हणणे बरोबर आहे.

(यांनतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

या संदर्भात एकत्र बसून चर्चा करणे गरजेचे आहे, तशी चर्चा करुन मार्ग काढता येऊ शकेल.

सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनी को-जनरेशनच्या संदर्भात काही सूचना केल्या. को-जनरेशनच्या संदर्भात माझे सहकारी मंत्री, श्री.विनय कोरे यांनी निश्चिप्रकारे योजना केलेली आहे. निश्चितपणाने महाराष्ट्रामध्ये को-जनरेशनचा प्रोजेक्ट वाढवायचा असेल तर तसा राज्य शासनाच्या वतीने प्रोजेक्ट देता येईल काय ? असा प्रयत्न करून पाहिला जाईल. केंद्रीय योजनांचा लाभ आपण जास्तीत जास्त घेतला पाहिजे. केंद्र सरकारच्या आयपीडीपी, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनांचा लाभ घेतला जाईल. दाभोळ वीज प्रकल्पाच्याबाबतीत कस्टम ड्युटीच्या व्यवहाराच्या संदर्भातही आपण प्रयत्न केलेला आहे. दाभोळ वीज प्रकल्पाच्या बाबतीत केंद्र सरकार सातत्याने मदत करण्याचा प्रयत्न करत आहे.

सभापती महोदया, मुंबई शहराच्या विजेच्याबाबतीत चुकीच्या पध्दतीने चर्चा केली जात आहे. मुंबईमध्ये टाटा, बेस्ट, रिलायन्स यांच्या माध्यमातून विजेचे वितरण केले जाते. त्यांच्याकडेही विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. आपण आता देखील त्यांना 100 ते 150 मे.वॅ. वीज उपलब्ध करून दिलेली आहे. आज मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून ओळखले जात आहे. नागरिकांमध्ये भेदभाव करण्याचा प्रश्न नाही. त्या ठिकाणच्या सिक्युरिटीचा प्रश्न आहे, सिक्युरिटीचे महत्व लक्षात घेऊन, मुंबईला वीज उपलब्ध करून देण्यामध्ये मदत करण्याच्या संदर्भात भूमिका आपण घेत असतो. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी वीज मंडळ नागरी पोलीस दलाकडून मदत घेते, त्याचबरोबर माजी सैनिकांच्या दलाचाही यामध्ये समावेश केला तर विजेच्या चोरीच्या प्रकरणामध्ये त्यांचा उपयोग होऊ शकेल, अशाप्रकारची सूचना केली. त्यांची सूचना चांगली आहे. ही सूचना निश्चितपणे तपासून घेऊन तसा प्रयत्न केला जाईल. या देशाचे माजी सैनिक वीज चोरी थांबविण्यासाठी मदत करू शकतील. त्यांचा या चांगल्या कामासाठी कसा उपयोग करुन घेता येईल, याबाबतची भूमिका घेतली जाईल.

त्याचबरोबर चार अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट सुरु करण्याचे केंद्र सरकारने ठरविलेले आहे. त्या प्रोजेक्टमधून केंद्र सरकार राज्यांनाही 4 हजार मे.वॅ.वीज उपलब्ध करुन देणार आहे. एका बाजूला आपल्याकडे विजेची टंचाई आणि दुसऱ्या बाजूला केंद्र सरकार वीज निर्माण करणार आहे, त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

प्रोजेक्टमधून वीज घ्यायला सुरूवात केली तर त्याबाबत टोकाची भूमिका घेतली जाते, हे उचित आहे, असे मला वाटत नाही.

सभापती महोदया, कोकण वैभवाच्या संदर्भाने आंब्याचे महत्व आहे, त्या संदर्भाने येथे सांगितले गेले. या संदर्भाने आपल्याला चर्चेमधून मार्ग काढता येईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची आडकाठी येऊ दिली जाणार नाही, या दृष्टीने निश्चितप्रकारे प्रयत्न करुन मदत करण्याची भूमिका आहे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एन्रॉनच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. मी या संदर्भाने सविस्तरपणाने माहिती दिलेली आहे. अगोदरचा केलेला करार, त्यानंतर युती शासन आल्यानंतर झालेला करार आणि आता आम्ही सत्तेवर आल्यानंतर झालेला करार यांचा तुलनात्मक दृष्टीने विचार केला तर आपल्याला कोणत्या करारामुळे फायदा झालेला आहे, हे एकत्र बसल्यानंतर सांगता येईल. कतार येथील गॅसच्या संदर्भात निश्चितप्रकारे माननीय पंतप्रधानांच्या पातळीवरुन त्या देशाच्या पंतप्रधानांशी संपर्क साधून आपल्या देशाला आणि राज्याला गॅस कसा मिळेल, हे पाहिले जाईल. पहिल्या करारामध्ये आपण 15 टक्केच भागीदार राहिलेलो आहोत.

विदर्भातील पिठाच्या गिरण्यांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला गेला. या संदर्भाने जो नियम केलेला आहे, तो महाराष्ट्रामध्ये सगळीकडे लागू केलेला आहे. तरीही विदर्भातील पिठाच्या गिरण्यांना कशी मदत करता येईल, हे एकत्र बसून चर्चा करुन त्याबाबतची भूमिका घेतली जाईल.

सभापती महोदया, पवन चक्क्याच्या संदर्भात चुकीचा संदेश देण्याचा प्रयत्न झालेला आहे. पवन चक्क्याच्या माध्यमातून विजेचे उत्पादन करण्याचा पहिला प्रयत्न हा युतीच्या काळामध्ये इ ालेला आहे. आम्ही त्यावेळेस विरोधी पक्षामध्ये होतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

आपल्याला थर्मल पॉवर जनरेशनमध्ये 100 मेगावॅट वीज निर्मिती करावयाची असेल तर एका मेगावॅटला 4 कोटी रुपये याप्रमाणे 400 कोटी रुपये खर्च येतो. विंड मिलच्या माध्यमातून जर 100 मेगावॅटचा प्रकल्प केला तर प्रती मेगावॅट खर्च येतो. म्हणजे 400 कोटी रुपये खर्च केल्यानंतर 15 टक्के किंवा 18 टक्के वीज मिळू शकते. त्यामुळे जगामध्ये कोणीही विंड मिलचे प्रोजेक्ट घेत नाहीत. कारण ती वीज परवडणाऱ्या कॉस्टमध्ये निर्माण होत नाही. या ठिकाणी अशी भूमिका घेण्यात आली की, आम्ही नवीन कंपन्या स्थापन करतो. त्या ठिकाणी जो कार्बन डाय ऑक्साईड निर्माण होतो त्यासंदर्भात कार्बन क्रेडीट विकत घ्यावयास लावतात. त्यातून विंड मिलला आणि बाकीच्या उद्योगांना सबसिडी देतात. केंद्रामध्ये आणि महाराष्ट्र राज्यामध्ये तुमचे सरकार असताना आयकरामध्ये सवलत द्यावयाची, विक्रीकरामध्ये सवलत द्यावयाची अशी भूमिका युतीच्या शासनाने आणि केंद्रातील एन.डी.ए.च्या शासनाने घेतली. आम्ही त्यावेळी विरोधी पक्षात असलो तरी आम्हाला त्याचे महत्व माहीत होते. पाटण परिसरामध्ये 400 विंड मिल्स लागल्या. त्या ठिकाणी 2 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळालेला आहे. ज्या पध्दतीने त्या परिसरामध्ये विंड मिल्स उभ्या राहिल्या त्या पध्दतीने अपारंपारिक ऊर्जेमधील पोटॅन्शिअल टॅब करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. विनय कोरे या ठिकाणी उपस्थित असते तर त्यांनी याबाबत अधिक सांगितले असते. बजाज सारख्या कंपनीला 700 कोटी रुपये माफ केले यासंदर्भात या ठिकाणी बोलले गेले. वीज मंडळाने कोणत्याही कंपनीला पैसे माफ केलेले नाहीत. विक्रीकरामध्ये किंवा आयकरामध्ये सवलत देण्याच्या तुम्हीच जाहीर केलेल्या योजनेच्या आधारे त्यांना त्यामध्ये काही रिलीफ मिळाला असेल. त्यासंदर्भात आमची काही तक्रार असण्याचे कारण नाही. आज राज्यामध्ये विक्रीकराच्या बाबतीत कन्सेशन वगैरे ठेवलेले नाही. आपण राज्यासाठी पॉलिसी तयार केलेली आहे. विंड मिलच्या बाबतीत पॉलिसी तयार केलेली आहे. को-जनरेशनच्या बाबतीत पॉलिसी तयार केलेली आहे. मर्चन्ट्स प्रोजेक्ट्स आहेत. आयपीडीपी च्या प्रकल्पांच्या बाबतीत पॉलिसी तयार केलेली आहे. ज्याला यावयाचे असेल त्यांनी या प्रकल्पामध्ये यावे अशी आम्ही भूमिका घेतलेली आहे. सुरुवातीला उत्साहाने काही लोक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

पुढे आले आणि आता ते मागे पडले असले तरी दिलेला शब्द खाली पडणार नाही याची काळजी आपण घेतो हे लक्षात घेतले पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. जामा साहेबांनी या ठिकाणी लोड शेडिंगच्या संदर्भात, कोलच्या संदर्भात तसेच एनटीपीसीच्या मौदा येथील प्रकल्पाच्या संदर्भात मुद्दा मांडला. जोपर्यंत तुमचा गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण होणार नाही तोपर्यंत मौदा येथील प्रकल्प पुढे जाणार नाही. केंद्रामध्ये श्री. गिते मंत्री असताना त्यांच्याबरोबर चर्चा केली होती. त्यावेळी एन.टी.पी.सी. आणि केंद्र सरकारने सुध्दा सांगितले होते. सिंचनाच्या कामासाठी राज्य सरकारकडे पैसे नाहीत. तुम्ही केंद्र सरकारकडून पैसे उपलब्ध करुन देणार असाल तर गोसीखूर्द प्रकल्पाचे काम पुढे नेता येईल आणि मौदा येथील प्रकल्प सुरु करता येईल. मधल्या काळात केंद्र शासनाने शांततेची भूमिका घेतली होती परंतु श्री. सुशीलकुमार शिंदे हे केंद्रीय ऊर्जामंत्री झाल्यानंतर मौदा प्रकल्पाचे रिव्हायवल करण्याचे ठरविले आहे. त्यातून निश्चित काही चांगले निघेल. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, गुजरातमध्ये 24 तास वीज मिळते. त्यांनी चांगले काम केलेले आहे. ते काम आपण फिडर सेपरेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये करावयास निघालेलो आहोत. त्यांनी त्या ठिकाणी वेगवेगळे फिडर केले. ॲग्रीकल्चरसाठी फिडर वेगळा केला आणि गावासाठी फिडर वेगळा केला. त्यामुळे वीज कमी असताना सुध्दा ज्यावेळी लोड शेडिंग करण्याची वेळ येते त्यावेळी फक्त पंप बंद राहतील परंतु घरातील वीज त्या ठिकाणी बंद राहणार नाही. त्यामुळे त्यांच्याकडे गावामध्ये 24 तास वीज राहते. परंतु आपल्याकडे जशी वीज टंचाई आहे तशी वीज टंचाई गुजरातमध्येही आहे. या ठिकाणी परिस्थिती दुरुस्त करता येईल. सिंगल फेजिंगच्या माध्यमातून रिलीफ मिळवणे, अक्षय प्रकाश योजनेच्या माध्यमातून रिलीफ मिळवणे, फिडर सेपरेशनमधून रिलीफ मिळवणे हे दोन वर्षे करावयाचे. गेल्या 40-45 वर्षामध्ये जेवढे इन्फ्रॉस्ट्रक्चर उभे राहिले ते इन्फ्रॉस्ट्रक्चर ड्युप्लीकेट करण्याचे काम दोन वर्षात करण्याच्या संदर्भात भूमिका घेतलेली आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील पुढे सुरु...)

आणि म्हणून टप्प्याटप्प्याने आपल्याला जावे लागणार आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे असे म्हणाले की, तुम्ही 2010 पर्यन्त का वाट बघता, त्याआधी हे का शक्य होऊ शकत नाही ? आणखी दोन-तीन महत्वाच्या मुद्यासंबंधी याठिकाणी चर्चा झाली. ओरिसामध्ये कोळसा घेण्यासाठी का जात आहात, असा प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आला. कोळसा आणि कोळसा व्यापारावर केन्द्र सरकारचे नियंत्रण असते. आपल्या महाराष्ट्रातील कोळशाच्या खाणी ओरिसाला दिल्या त्यावेळी आपण ही भूमिका घेतली. केन्द्र सरकारने देखील अशीच भूमिका घेतली. एक राज्य म्हणून वेगळी भूमिका घेता येणार नाही. मग विदर्भातील लोक असे म्हणतील की, विदर्भामध्ये वीज निर्मिती होत असल्यामुळे विदर्भालाच वीज मिळाली पाहिजे. काही भागातील लोक म्हणतील की, पेट्रोल आमच्याकडेच निर्माण होत असल्यामुळे आम्हीच ते वापरणार. याप्रमाणे आणखी कुणी काहीही म्हणतील. यामधून एकत्रित देशाची संकल्पना मांडता येत नाही. ओरिसामधील कोळशाच्या खाणी घेण्याचा आपण पहिल्यांदाच प्रयत्न केलेला आहे. आपल्या राज्यामध्ये असलेले प्रोजेक्ट चालविण्याकरिता पुढील 20 वर्षानंतर आपल्या राज्यातील कोळसा पुरेल की नाही, हा देखील विचार व्हायला पाहिजे. दोन ते अडीच हजार मे.वॅटचे वीज प्रकल्प 20 वर्षे पुढे चालू राहातील एवढा कोळसा ओरिसा राज्यातून आपण मिळविलेला आहे. गुजरात राज्यातून देखील आपल्याला कोळसा मिळणार आहे. गुजरात राज्यातील 60 टक्के कोळसा महाराष्ट्राला आणि 40 टक्के कोळसा गुजरात राज्याला मिळणार आहे. आपण पहिल्यांदा कॅप्टीव्ह माईन्स मधून कोळसा काढून दोन हजार मे.वॅट वीज निर्मितीचे प्रकल्प आपण सुरु करणार आहोत. या सर्व गोष्टी मी यापूर्वीही या सदनापुढे सविस्तरपणे मांडलेल्या आहेत. मी माझे शब्द कधी बदललेले नाहीत आणि बदलतही नाही. वीज निर्मितीच्या बाबतीत वेळ लागतो, काही बाबतीत सेट बॅक बसतो हेही खरे आहे. 2100 मे.वॅटचा दाभोळसारखा वीज प्रकल्प इतके दिवस बंद होता. तो कतारचा गॅस मिळेल म्हणून पुन्हा सुरु केला. परंतु कतारमधून गॅस मिळण्यामध्ये पुन्हा अडचणी निर्माण झाल्या. बाजारामध्ये गॅस आहे, नाही असे नाही. परंतु त्या किंमतीला आपण गॅस खरेदी केला तर आपणाला वीज अधिक महागात पडेल. वीज वितरण कंपनीने किती महाग वीज घ्यायची हा देखील प्रश्न आहे. शेवटी कंपनी टिकली पाहिजे. नाही तर लोक पुन्हा असे म्हणतील की, आम्ही त्यावेळी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील....

वीज मंडळाचे विभाजन करु नका, अनबंडलिंग करु नका असे सांगत असताना देखील ते का केले ? आता तीन कंपन्या केल्यामुळे प्रत्येक कंपनीवर जबाबदारी येऊन पडलेली आहे. आम्ही विजेच्या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहोत. या संदर्भात काही शंका असतील तर त्या मला जरुर सांगाव्यात, मी त्या नक्कीच दूर करण्याचा प्रयत्न करीन. एखादा अधिकारी चुकीचा वागत असेल तर त्याची गय केली जाणार नाही. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी एक-दोन उदाहरणे सांगितली ती मी तपासून घेईन. वीज कंपन्यांचे कर्मचारी हे कधी मोर्चा येईल, कधी तोंडाला काळे फासले जाईल, कधी कार्यालयातील खुर्च्यांची, सामानाची मोडतोड होईल अशा भीतीच्या वातावरणाखाली काम करीत आहेत. आमच्या कारभारामध्ये सुधारणा करायला वाव नाही असे नाही, वाव भरपूर आहे. अनेक ठिकाणी कर्मचा-यांची भरती झालेली नाही, ती करण्यासाठी देखील एमईआरसीची परवानगी घ्यावी लागते. 2003मध्ये एमईआरसीची निर्मिती झाली. यासंदर्भातील कायदा संसदेने पास केलेला असल्यामुळे त्याबाबतीत कोणत्याही पक्षाला दोष देता येणार नाही. एमईआरसीमध्ये तीन सदस्य असतात आणि ते त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ असतात. त्यांना प्रत्येक राज्यातील वीज कंपन्यावर नियंत्रण ठेवायचे असते. रिलायन्स, टाटा अशा खाजगी क्षेत्रातील कंपन्यांवर देखील नियंत्रण ठेवायचे असते. टेलिफोन क्षेत्रामध्ये ज्याप्रमाणे ट्राय आहे त्याच पध्दतीने वीज क्षेत्रामध्ये एमईआरसी काम करीत आहें. या सभागृहामध्ये विजेच्या संदर्भात ही चर्चा उपस्थित झाल्यानंतर वीज निर्मिती, वीज पारेषण आणि वीज वितरण याबाबतीत तसेच कोणत्या लॉन्ग टर्म आणि शॉर्ट टर्म उपाययोजना करण्याचे ठरविलेले आहे हे सांगितल्यानंतर महाराष्ट्रामध्ये एक असा संदेश जाऊ द्या की, या विजेच्या संदर्भात आम्ही प्रयत्न करीत आहोत. अडचणी आहेत तो पर्यन्त ग्राहकांना, नागरिकांना देखील काही गोष्टी सहन कराव्या लागतील. मधल्या काळामध्ये टीका झाली आरोप झाले. परंतु जोपर्यन्त यश मिळत नाही तोपर्यन्त पाठपुरावा करण्याचे आम्ही ठरविलेले आहे. या मधल्या काळात येणारे कोणतेही शब्द मला जखम करणार नाहीत एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

--

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, रत्नागिरी येथील दाभोळ वीज प्रकल्प नाफ्थ्यावर आधारित असला तरी तो गॅसवर चालू शकतो अशी स्थिती आहे. रिलायन्स कंपनीची स्वत:ची रिफायनरी असल्यामुळे त्यांच्याकडे गॅसचा साठा उपलब्ध असल्यामुळे ती कंपनी दाभोळ वीज कंपनी टेकओव्हर करण्याच्या मनस्थितीत आहे. या संदर्भात श्री.मुकेश अंबानी यांच्याशी बोलणी झालेली आहे काय? याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : मी या संदर्भात अनेकदा स्पष्ट केले आहे. दाभोळ प्रकल्पाची पूर्ण मालकी केंद्र सरकारची आहे. या संदर्भात कोणताही निर्णय केंद्र सरकारला घ्यावा लागेल. आजच्या तारखेला अशा प्रकारची कोणती बोलणी चालू आहेत याची मला तरी माहिती नाही. या संदर्भात शासनाची भूमिका एवढ्या लवकर स्पष्ट करण्याची गरज नाही. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी सुध्दा आमच्यासमोर असा कोणताही प्रस्ताव नाही असे स्पष्ट केले आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : पवन ऊर्जा कंपन्यांकडून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी घ्यायचे काम सुरु आहे. याबाबत निश्चित धोरण आखून किमान 2 लाख रुपये कमीत कमी प्रती एकर किंमत द्यावी असे शासन आदेश देईल काय?

श्री.दिलीप वळसे पाटील : पवन ऊर्जा क्षेत्रात 3-4 कंपन्या कार्यरत आहेत. राज्य सरकारच्या वतीने कोणतीही जमीन संपादित करण्यात येत नाही. जो काही व्यवहार होतो तो खाजगी कंपनी आणि जमीन मालक यांच्यामध्ये होतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

सभा□ह्यापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह्याची बैठ□ आता स्था□□त होऊ□ उद्या बुधवार, दि□□ 6 डिसेंबर, 2006 रोजी सकाळी 10.45 वाजता पुन: भरेल. स□ळी 10.45 ते 11.45 या वेळेत विशेष बैठक व दुपारी 12.00 वाजता नियमित कामकाज सुरु होईल..

(सभा□ह्याची बैठ□ रात्रौ 9 वाजू□ 02 मि□□टां□□, बुधवार, दि□□ 6 डिसेंबर, 2006 च्या स□ळी 10.45 वाजेपर्य□त स्था□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही